# “डॉ. न. म. जोशी यांच्या बोधकथांचा चिकित्सक अभ्यास”

साहित्य आणि ललितकला अभ्यास मंडळांतर्गत

आंतर विद्याशाखीय विषयातील

पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध


संशोधिका

सौ. संध्या अजित नाडगौडा

मार्गदर्शक

डॉ. एन. एम. जोशी

संशोधन केंद्र

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,

पुणे.



डिसेंबर 2017

# संशोधकाचे प्रतिज्ञापत्र

मी **सौ.संध्या अजित नाडगौडा** प्रतिज्ञापूर्वक निवदन करते की टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या (Inter Disciplinary) विद्याशाखेत पीएच.डी. पदवीसाठी **"डॉ.न.म.जोशी यांच्या बोधकथांचा चिकित्सक अभ्यास"** या विषयावर तयार केलेला सदर प्रबंध हा माझ्या स्वतःच्या प्रयत्नांचे फलित आहे. त्यासाठी मार्गदर्शकाचे मार्गदर्शन, यापूर्वी झालेल्या संशोधनाचे संदर्भ व विषयाशी संबंधित आधार सामग्रीची मदत घेतली आहे. सदर संशोधनासाठी उपयोगात आणलेल्या संदर्भ स्त्रोतांचा योग्य  निर्देश संशोधन अहवालात केला आहे. सदर संशोधनासाठी संकलित केलेली सामग्री खरी आहे.

प्रस्तुत संशोधन मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या (Inter Disciplinary) आंतरविद्याशाखीय शाखेत पीएच.डी. पदवी शिवाय इतर कोणत्याही पदवीसाठी अथवा पदविकेसाठी कोणत्याही विद्यापीठात अथवा संस्थेत सादर केलेले नाही.

**ठिकाण ः**

**दिनांक ः**

**संशोधक**

**सौ. संध्या अजित नाडगौडा**

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की सौ. संध्या अजित नाडगौडा यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय शाखेसाठी "**डॉ.न.म.जोशी यांच्या बोधकथांचा चिकित्सक अभ्यास**" या विषयात पीएच.डी. संशोधन कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरित्या पूर्ण केलेले आहे. त्यांनी केलेले संशोधन कार्य हे त्यांचे स्वतःचे असून वापरण्यात आलेल्या अन्य संदर्भ स्त्रोतांचा योग्य निर्देश प्रस्तुत संशोधन अहवालात केलेला आहे. तसेच त्यांनी संकलित केलेली सामग्री माझ्या माहितीनुसार खरी आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**मार्गदर्शक**

**डॉ.न.म.जोशी**

# ऋणनिर्देश

हाती घेतलेल्या कोणत्याही कार्यपूर्तीचा आनंद हा एक वेगळेच समाधान देणारा असतो. पूर्णत्वाची गोडी ही अवीट असते. माझ्या या शोध प्रबंधाच्या कार्यपूर्तीचे समाधान मला प्राप्त होण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. सर्वोपरी मदत केली. त्यामुळे कर्तव्य या भावनेतून हा ऋणनिर्देश □

मी एक शिक्षक असल्याने शिक्षणाचे जीवनातील स्थान जाणून आहे. शिक्षण हे प्रवाही असल्याने शिक्षणात नवनवीन विचारप्रवाह बदल हे येणारच ते स्वीकारून त्याची शास्त्रशुद्ध पध्दतीने खात्री करून स्वीकारणे महत्वाचे ठरते. आपल्या दैनंदिन अध्यापनासोबतच शिक्षणक्षेत्रातील पीएच.डी. ही पदवी आपण संपादन करावी हे स्वप्न माझ्या मनात होते. त्या स्वप्नाची पूर्तता या निमित्याने होत आहे.

शिकण्यासाठी गुरू हा परब्रम्ह असतो. माझ्या या संशोधन प्रबंधाचे मार्गदर्शक डॉ.न.म.जोशी यांनी मला संशोधन कार्यात सतत प्रोत्साहित केले. विषय निवडी पासून संशोधन आराखाडा तयार करणे, प्रत्यक्ष संशोधन कार्य व संशोधन कार्याची सांगता होईपर्यंत योग्य ते मार्गदर्शन केले. या संशोधन कार्यात त्यांनी दाखविलेले आपलेपण आणि आस्था यामुळेच मी हे संशोधन पूर्णत्वास नेऊ शकले. मार्गदर्शक डॉ.न.म.जोशी हे व्याख्याने इतर कार्ये यामुळे खूप व्यस्त असतात. तरी सुध्दा त्यांनी मला त्यांच्या व्यस्ततेतून अनेकदा वेळ दिला आणि मार्गदर्शन केले. इतकेच नव्हे तर माझ्या संशोधन कार्याचे कौतुकही केले. डॉ.न.म.जोशी यांच्या मार्गदर्शनाची फलश्रुती म्हणजेच हा शोध प्रबंध होय. त्यामुळे मी मार्गदर्शक डॉ.न.म.जोशी यांची कायमची ऋणी आहे. डॉ.श्री.भट्ट सर यांचे मी मनापासून आभारी आहे. त्यांनीही मला

वेळोवेळी मार्गदर्शन केले. इतकेच नाही तर प्रेरणाही दिली. त्यांच्या या आपलेपणामुळे माझे संशोधनकार्य पूर्णत्वास येऊ शकले.

कोणतेही संशोधन कार्य हे केवळ संशोधकाच्या प्रयत्नांचे फळ नसून या कामी अनेकांचा हातभार लागलेला असतो. प्रबंधाकरिता माहिती गोळा करताना ज्या ज्या व्यक्तींचे व संस्थांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्या सर्वांच्या प्रती कृतज्ञतेचे दोन शब्द व्यक्त करणे हे सुध्दा माझे कर्त व्य समजते. संशोधन कार्य संदर्भ ग्रंथाशिवाय अधुरेच असते. यासाठी मी सतत विविध ग्रंथालयांना भेटी दिल्या. सावित्रीबाई फुले विद्यापीठ शिक्षणशास्त्र विभाग, एस.एन.डी.टी.विद्यापीठ, टिळक विद्यापीठ, जयकर लायब्ररी, टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन लायब्ररी इ.ग्रंथालये व ग्रंथपालांचे आणि संस्था प्रमुखांचेही मी आभार मानते.

साधारणपणे पाच ते सहा वर्षे माझे हे संशोधन कार्य चालू होते. त्यामुळे माझ्या कुटुंबातील सर्व सदस्य त्यांनी मला समजून घेवून सामंजस्याने मदत केली त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. या संशोधन कार्यात माझे प्रेरणास्थान माझे पती श्री. अजित नाडगौडा यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करेन.

प्रबंधाचे संगणकीकृत काम करणारे श्री. संदीप यादव सर यांचे आभार मानलेच पाहिजे. त्याच बरोबर माझे सर्व सहकारी मित्रमैत्रिणी ज्यांनी मला वेळोवेळी मदत केली त्यांचेही मी आभार मानते.

माझे हे संशोधन कार्य विषय निवडीपासून ते प्रबंध सादर करेपर्यंत ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत केली त्या सर्वांचा नामोल्लेख कदाचित झाला नसेल अशा सर्वांची मी ऋणी आहे.

धन्यवाद ☐

**ठिकाण ः**

**दिनांक ः**

**संशोधक**

**सौ. संध्या अजित नाडगौडा**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | अनुक्रमणिका | - |
| | संशोधकाचे प्रतिज्ञापत्र | - |
| | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | - |
| | ऋणनिर्देश | - |
| १. | संशोधनाची ओळख. | १ - ७४ |
| २. | संबधित साहित्याचा व पूर्व संशोधनाचा आढावा. | ७५ - १२६ |
| ३. | संशोधन पध्दती. | १२७ - १५८ |
| ४. | संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन. | १५९ - ३२८ |
| ५. | सर्वेक्षणाचा निष्कर्ष | ३२९ - ३४८ |
| ६. | सारांश, निष्कर्ष व शिफारशी. | ३४९ - ३८६ |

➢ परिशिष्टे.

# प्रकरण 1.

# संशोधनाची ओळख

## १.१ प्रस्तावना :

"शिक्षण म्हणजे मानवातील पूर्णत्वाचा साक्षात्कार होय.(Education is the manitestationa of the perfection in man.)"[१] अशी स्वामी विवेकानंद शिक्षणाची परिभाषा करतात. स्वामी विवेकानंद यांच्या या व्याख्येचा अर्थ 'मन, मनगट आणि मेंदू यांचा संतुलित विकास म्हणजे शिक्षण असाही होतो.'[१.२] स्वामी विवेकानंद यांनी शिक्षणाची केलेली ही व्याख्या जर अर्थपूर्ण व्हायची असेल तर मनाची व बुध्दीची मशागत होऊन मुलाचे मन शिक्षणानुकुल व्हायला हवे असे व्हायचे असेल तर मुलांसमोर उत्तम वाङ्.मय ठेवले पाहिजे. मराठीत अनेक ख्यातनाम लेखकांनी मुलांसाठी उत्तम उत्तम वाङ्मय लिहिलेले आहे. 'श्यामची आई' या सारख्या पुस्तकाने तर गेली अनेक दशके मुलांची मनोभूमी संपन्न केली आहे. कालानुरूप नवे विषय नवीन सादरीकरण आणि नवी क्षेत्रे या संदर्भातील वाङ्मय मुलांसमोर ठेवून त्यांचा अभ्यास केला पाहिजे. अशी आजच्या काळाची गरज आहे.

आचार्य विनोबा भावे यांनी संतप्रवृत्तीला साजेसा 'जय जगत' चा उद्घोष केला व शिक्षणाचे काही मूलभूत सिध्दांत मांडले. आचार्य विनोबा भावे म्हणतात "शिक्षक व मुले दोघेही एकमेकांच्या आचरणापासून शिकत असतात. दोघेही विदयार्थीच आहेत. जे दिले जात नाही ते शिक्षण. जे घेतले जाते ज्याची काही नोंद ठेवली जाऊ शकते ते शिक्षण नाही. जीवनच शिक्षणच आहे. कॅलरीचा खरा हिशोब कागदावर नव्हे शरीरावरच दिसून येतो. जे अनुभवले खाल्ले पचले रक्तात मुरले ते शिक्षण."[१.२] या सिध्दांताचे स्पष्टीकरण देताना असेही म्हणता येईल की,

"विदयार्थी शिक्षकपरायण असावा

शिक्षक विदयार्थीपरायण असावा"[१.३]

दोघेही ज्ञानपरायण असावेत आणि ज्ञान सेवापरायण असावे

आचार्य विनाबा भावे यांनी शिक्षण प्रक्रियेतील विदयार्थी व शिक्षक या दोन घटकांमधील संबंधाची मिमांसा केली असून ही वरील शिक्षण विषयक चतुःसुत्री सार्थ होण्यासाठी अशा उत्तम वाङ्मयाची निर्मिती होणे अत्यंत गरजेचे आहे की जे वाङ्मय शिक्षणातील अध्ययन अध्यापनात गरजेचे महत्वाचे ठरेल.

"किती साहित्यिक बालकांना दृष्टिसमोर ठेवून त्यांन अनुरूप असे वाङ्मय निर्माण करीत आहेत? किती काव्य बालमनाला स्पर्शून जाणारे त्यांच्या मनात स्पदंन घडविणारे त्यांना रिझवणारे व योग्य भावना अंकुरित करणारे जन्माला येत आहे□किती नाटके अथवा कथा बालकांसाठी लिहिल्या जात आहेत अशी खंत माजी शिक्षणमंत्री आणि शिक्षण तज्ञ मधुकरराव चौधरी यांनी व्यक्त केली होती. त्यांची ही खंत डॉ.न.म.जोशी यांनी दूर करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. डॉ.न.म.जोशी यांनी बाल आणि कुमारांना दृष्टीसमोर ठेवून कथा चरित्रकथा कौतुककथा कविता इत्यादी विविधांगी लेखन सातत्याने केले आहे. या त्यांच्या बाल कुमारांसाठी लिहिलेल्या विविधांगी लेखनावर संशोधन व्हायल हवे. नव्हे झालेले आहे आणि जी नवीन साहित्यनिर्मिती आहे त्यावर ही संशोधन व्हायला हवे.

रविंद्रनाथ टागोरांचे एक निसर्गवाक्य प्रसिध्द आहे "निसर्ग हा परमेश्वराचे हस्तलिखित आहे. जसे झाड जशा वेली जसे झुडूप तसेच बालक.बालक ही निसर्गाचेच एक रूप आहे. बालक हे सुध्दा एक दैवी हस्तलिखित आहे. त्याला शरीर आणि मन आहे. शरीर दृष्य तर मन अदृष्य. या मनावरच्या रेघा शिक्षकाला वाचता आल्या पाहिजेत. बालकांची मने वाचता येण्यासाठी शिक्षकाचेही मन तत्पर असायला हवे. त्यासाठी शिक्षकांनी पाठयपुस्तकाच्या बाहेर जाऊन काही उचित संदर्भ शोधणे व बालकांपर्यंत पोहचवणे गरजेचे आहे."[१.४]

"आपल्या सर्वच शिक्षणपध्दतीमध्ये मूल्यशिक्षणाला अतिशय महत्व आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनासाठी आहे. असे आपण मानतो. समाजाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक उन्नती झाली पाहिजे असे आपल्याला वाटते. समाजाची ही जडणघडण शाळेच्या माध्यमातून होते. 'उदयाचा भारत आजच्या शालेय वर्गातून घडतो आहे."[१.५] असे म्हणताना आपल्या समाजाला नैतिक अधिष्ठान असले पाहिजे. नैतिक अधिष्ठानाच्या अभावी समाज दुबळा होईल. समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून नागरिक म्हणून विदयार्थ्यांच्या मनाची जडणघडण आपल्याला करावयाची आहे. त्यासाठी शालेय जीवनात त्यांच्यावर नैतिक संस्कार करणे आवश्यक आहे.

शिक्षणाच्या माध्यमातूनच हे शक्य होईल. यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार भारतातील सर्व राज्यासाठी एक समान शालेय अभ्यासकम सूचित करण्यात आला असून त्या अभ्यासकमात मूल्यांचा समावेश करण्यात आला आहे. ही मूल्ये विदयार्थ्यांपर्यंत विविध मार्गाने विविध पर्यायाने विविध साहित्यांच्या माध्यमातून विदयार्थ्यांपर्यंत पोहचवता येईल अशा विचारात असतानाच डॉ.न.म.जोशी यांचे काही साहित्य निदर्शनास आले की त्यांनी प्रौढांसाठीही बरेच वाङ्मय लिहिले आहे. त्यांचे वाचन निरूद्देष केले. पण सर्व वाङ्मय वाचन केल्यावर संशोधकाच्या लक्षात असे आले की त्यांच्या वाड्.मयाला ललित वाङ्मय म्हणून मान्यता भरपूर असली तरी शैक्षणिक आशयांच्या दृष्टिकोणातून त्यांचे वाङ्मय विशेष समृध्द आहे. काही पुस्तकांची शीर्षकेच त्यांचे शैक्षणिक महत्व सांगतात. उदाहरणार्थ 'पर्यावरण कथा', 'मूल्यकथा', 'कथानम', 'भारतकथा', 'बोधकथा' इत्यादी. अशा त-हेने डॉ.न.म.जोशी यांच्या संपूर्ण वाङ्मयाचे वाचन करताच एक विशिष्ट आकृतिबंध तयार झाला आणि तो म्हणजे बोधकथा आणि नैतिक मूल्यांच्या संदर्भात डॉ.न.म.जोशी यांच्या साहित्यातील मूल्यविचार.

शिक्षणक्षेत्रात नवीन प्रयोग होतात. बदलता काळ समाजाच्या गरजा व त्याच बरोबर त्याला चिरंतन मूल्यांची साथ असेच आजच्या शिक्षणाचे स्वरूप ठेवावे लागते. हयाच दृष्टीकोनातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव केला गेला.

डॉ.न.म.जोशी यांच्या वाङ्मयाच्या अभ्यासाने मूल्यशिक्षणाचा आशय अधिक सधन बनवता येईल. संस्कारित वाङ्.मय हे चिरंतन असते. हा सांस्कृतिक वारसा आम्हाला लाभला हे आमचे भाग्य. हेच भाग्य आमच्या उमलत्या पिढीला लाभावे या सदिच्छेतूनच संशोधकाने प्रस्तुत संशोधन प्रपंच मांडलेला आहे.

## १.२ संशोधनाची गरज व महत्त्व ः

### १.२.१ संशोधनाची गरज ः

शहाणा माणूस चांगला होण्यासाठी व 'स्व' च्या अस्तित्वासाठी इतरांचेही अस्तित्व आवश्यक आहे. हे माणसाला कळणे गरजेचे आहे. भगवान माणसाच्या जगण्याचे मूलतत्व होणे गरजेचे आहे. हे मूलतत्व चांगुलपणाचे लक्षण आहे. शहाणा माणूस चांगला होणे गरजेचे आहे. त्यासाठी मूल्यशिक्षण आवश्यक आहे.

परिसंस्थेच्या अस्तित्वासाठी जैविक घटंकाबरोबरच अजैविक घटकांनाही जगू दिले पाहिजे त्यांची ही हिंसा होऊ नये हेही माणसाला कळणे गरजेचे आहे. परिसंस्थेच्या अस्तित्वासाठी मूल्यशिक्षणाची गरज आहे. उत्क्रांतीसाठी मानवाच्या सर्वांगिण विकासासाठी सामाजिक आणि सांस्कृतिक उत्क्रांतीची गरज आहे आणि त्यासाठी मूल्यशिक्षणाची गरज आहे.

इतरांच्या अस्तित्वाला स्वतःच्या अस्तित्वाइतकेच महत्व देण्यासाठी मूल्यशिक्षणाची गरज आहे.

सदयपरिस्थितीतील विसंगीतवर उपाय योजना करण्यासाठी रोज सकाळी वर्तमानपत्र आपल्यासाठी कालच्या ताज्या बातम्या घेऊन येते. हया बातम्यामधुन आपणास कोठे, काय, कधी, कसे घडले हे कळते. बातम्यामध्ये आकाशवाणी दूरदर्शन व विविध वाहिन्या हेच प्रसारित करत असतात. हुंडाबळी, अंधश्रध्दांचे बळी, बलात्कार, थोर पुरूषांच्या चारिऱ्यांची विटंबना, राजकरणाचे अवमूल्यन जातीय दंगली, भ्रष्टाचार, लाचखोरी, घातपात, दहशत, प्रदूषण बातम्यांचे

हे प्रकार रोजचेच ठरले आहेत. फक्त बातम्यांमधला काळ व व्यक्ती हया संबंधीचा तपशील केवळ बदलत राहतो एवढेच.

हया बातम्या आपल्यासमोर सदयःस्थितीतील विसंगती उभी करतात. हया विसंगतीच्या कारणांचा शोध घेतल्यावर आपल्याला कळते की कौटुंबिक, वैचारिक, शारीरिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक, वैश्विक अशा विविध प्रकारच्या चारिञ्याचे पतन होत आहे. त्यामुळे या सर्व समस्या भेडसावत आहेत.

वरील विवेचनांवरून स्पष्ट होते की माणसांचे वर्तनबदल ही दैनंदिन जीवनातील विसंगती होय आणि मानवी जीवनाच्या मंगलमयतेसाठी पावित्र्यासाठी आवश्यक असणा-या मूल्यांचे अवमूल्यन ही बाब हया विसंगतीच्या मुळाशी आहे.

"माणसाच्या चारित्र्य पतनाचा हा अस्वस्थ करणारा आलेख पाहिला की डॉ.राधाकृष्णन यांचे म्हणणे आठवते ते असे 'माणूस पक्षासारखा आकाशात उडायला शिकला माशासारखे पाण्यात पोहायला शिकला पण तो माणासारखे जमिनीवरून चालायला केव्हा शिकेल? माणूस माणूस असून तो माणसासारखा जमिनीवरून चालत नाही. हयाचा अर्थ असा की तो माणसासारखा वागत नाही तर पशूसारखा वागतो. कधी कधी माणसाचे वर्तन इतके भयानक असते की माणसापेक्षा पशू तरी बरे असे म्हणण्याची पाळी येते. मानवी जीवनातल्या हया विसंगतीचे कारण म्हणजे मूल्यांचे हरवलेले सूर."[१.६]

"मूल्यांचे सूर हरवतात ते अनैतिकतेमुळे. समाजात नैतिकता बळकट करण्यासाठी मूल्याधिष्ठित वर्तन ही प्रत्येकाची कृतिप्रतिज्ञा असली पाहिजे. ही प्रतिज्ञा खरी करायची असेल तर शिक्षण हे नैतिकतेचे मूल्यांचे प्रवेशद्वार सदैव उघडे असायला हवे."[१.७]

सामाजिकीकरणासाठी मूल्यशिक्षण आवश्यक आहे. शाश्वत मूल्यांच्या सार्व त्रिकीकरणासाठी शाश्वत मूल्ये सर्वांसाठीच हितकारक असतात. हया दृष्टिकोणातून शाश्वत मूल्यांचे सार्वत्रिकीकरण होणे गरजेचे आहे आणि त्यासाठी मूल्यशिक्षणाची गरज आहे.

"बदलत्या कौटुंबिक परिस्थितीवर उपाय पूर्वी एकत्र कुटुंबपध्दती होती. त्यामुळे मुलांवर संस्कार होणार याची शाश्वती होती. संस्कारांची चैतन्य केंद्रे घराघरात होती. आजी आजोबांजवळ मूल्य दरवळत ठेवणा-या गोष्टी होत्या. परंतू आता विभक्त कुटुंब पध्दतीमुळे आंगण हरवले, घराचे घरपण गेले. नोकरी निमित्त आई वडील दोघांनाही दिवसभर बाहेर रहावे लागते. जीवनाच्या गतीमानतेमुळे या बदलत्या परिस्थितीला हॅलो हाय करीत मूल्यांना बाय करण्याची वेळ आली आहे.

शाळेतील शिक्षक, विदयार्थ्यांचे, आई, बाबा, आजी, आजोबा झाले पाहिजेत. अपेक्षित असलेल्या भावी समाजाची राष्ट्राची विश्वाची जडणघडण शाळेत झाली पाहिजे. त्यादृष्टीने विदयार्थ्यांच्या निसर्गदत्त क्षमतांचा सर्वांगीण विकास साधून त्यांचा उपयोग समाज राष्ट्र व विश्वाच्या हितासाठी व्हावा अशी विदयार्थ्यांची मनोवृत्ती विकसित होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येक शाळा प्रत्येक महाविद्यालय आणि प्रत्येक विद्यापीठ मूल्यशिक्षणाचे केंद्र होणे गरजेचे झाले आहे."[१.८]

डॉ.न.म.जोशी हे शिक्षक असल्याने त्यांना बाल मानसशास्त्राची चांगली जाण आहे. त्यांनी आतापर्यंत बालकुमारांसाठी जवळपास ३१ पुस्तके लिहिलेली आहेत. शिक्षक पर्यवेक्षक आणि शिक्षण महाविद्यायात प्राध्यापक म्हणून त्यांनी ४0 वर्षे अध्यापनाचे कार्य केलेले आहे. ज्ञान दानाचे पवित्र कार्य करताना शैक्षणिक संशोधक मार्गदर्शक, शिक्षक आणि साहित्यिक म्हणून ते आजही सातत्याने व उत्साहाने वावरत आहेत.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील १0 मूल्ये, मूल्यशिक्षण, पर्यावरण शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, शिक्षकांचे सेवातंर्गत प्रशिक्षण इत्यादी विषयांच्या पुस्तकांचे लेखन प्रशिक्षण वर्ग यामध्ये हिरीरीने भाग घेत आहेत. शिक्षणक्षेत्रातील अधिकार प्राप्त या व्यक्तीच्या बाल कुमार वाङ्मयातील शैक्षणिक विचारांचे संशोधन करणे गरजेचे आहे. असे संशोधकाला वाटले म्हणूनही संशोधकाने सदर विषय प्रवंधासाठी निवडलेला आहे.

## १.२.२ संशोधनाचे महत्त्व ः

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील मूल्यशिक्षण ही संकल्पना अधिक प्रभावीपणे अध्यापनात राबविण्यासाठी प्रस्तुत संशोधनाचा विषय महत्त्वाचा आहे. कारण मूल्यसूचीतील अनेक मूल्यांना पूरक संदर्भ दाखले हे शिक्षकाचा पिंड असलेल्या डॉ.न.म.जोशी यांच्या वाङ्मयात सातत्याने आलेले आहेत. त्याच बरोबर त्यांचा आशय व्यक्त करणारी अनेक कथानके, नाटयप्रवेश प्रसंग डॉ.न.म.जोशी यांच्या वाङ्मयात दिसतात. त्यासाठी या विषयात संशोधन होऊन शिक्षकांसाठी अध्यापनाचे कार्य करीत असताना संदर्भ साहित्य म्हंणून डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय उपयुक्त आहे. म्हणून सदर संशोधन विषयाचे महत्त्व आहे.

आपल्या नेहमीच्या अध्यापनातही डॉ.न.म.जोशी यांनी प्रामुख्याने लिहिलेली पुस्तके उदाहरणार्थ 'पर्यावरण कथा', 'मूल्य कथा', 'बोधकथा' इ. थेट पर्यावरण हा विषय शिकवायला व मूल्यशिक्षणात मूल्य रूजवायला अतिशय उपयुक्त ठरू शकतात. या पुस्तकांवर संशोधन होऊन त्या पुस्तकांमधील घटकांचे प्रकरणांचे आशय विश्लेषण होऊन शिक्षकांसाठी अध्यापनात एक उत्तम संदर्भसाहित्य मिळू शकते म्हणून ही या संशोधन विषयाचे महत्व आहे.

डॉ.न.म.जोशी यांनी विविध प्रकारचे वाङ्मय लिहिले आहे. त्यात कादंबरी, कथा, नाटिका, बोधकथा, चरित्रे इ. आहेत. काही वाङ्मय केवळ थोरांसाठी आहे. परंतु डॉ.न.म.जोशी यांनी बहुतांश वाङ्मय हे बाल कुमार गट डोळयासमोर ठेवून लिहिला आहे. डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय हे दिसायला विनोदी, ललित, उपदेशात्मक, उद्बोधक वाटते परंतु ते सर्व वाङ्मय संस्कार वाङ्मय सुध्दा आहे. अशा प्रकारचे संस्कारक्षम वाङ्मय मुलांनी वाचले पाहिजे. त्यातील संदर्भ शिक्षकांनी आपल्या दैनंदिन अध्यापनात विद्यार्थ्यांवर संस्कार करण्यासाठी वापरले तर अतिशय उपयुक्त ठरेल म्हणून हे संशोधन महत्वाचे आहे.

शैक्षणिक समस्या आणि शिक्षकांची अध्यापनाकडे पाहण्याची वृत्ती यांचा विचार करतांना हया संशोधनामुळे शिक्षण क्षेत्रात काही नवीन विचार प्रस्तुत होतील आणि भविष्यासाठी

कही नवा लाभदायक उपाय शोधता येईल. उदाहरणार्थ मूल्यांचा -हास ही समाजाची ज्वलंत समस्या आहे यात विदयार्थ्याप्रमाणे शिक्षकांनी सुध्दा डॉ.न.म.जोशी यांच्या संस्कारक्षम वाड्मयातील मूल्यांच्या आधारे आत्मपरीक्षण केल्यास त्यांचा नक्कीच फायदा होईल. त्या दृष्टीने संशोधन महत्वाचे आहे.

आजच्या विदयार्थ्यांच्या अनेक समस्या आहेत. उदा. विदयार्थी बेशिस्त झाला आहे; गुरूला योग्य मान देत नाही; त्याचे दप्तर नीटनेटकेपणाने भरलेले नसते जेवणापूर्वी ते हात धूत नाहीत, होळीच्या सणाला वृक्षतोड करतो; शाळेला अनुपस्थित राहतो.इत्यादी या प्रकारच्या आणि अनेक विदयार्थ्यांच्या समस्यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी व निराकरण करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाचा निश्चित उपयोग होईल. उदाहरणार्थ डॉ.न.म.जोशी यांच्या 'मूल्यकथा' या पुस्तकात कथांच्या रूपात मुलांना समजेल अशा भाषेत डॉ.न.म.जोशी यानी १० मूल्यांच्या संदर्भात उद्बोधक कथा लिहिल्या आहेत.त्याचप्रमाणे 'पर्यावरण कथा' या पुस्तकात पर्यावरणाचे महत्त्व यावर गोष्टी रूपात संदेश दिला आहे तो विदयार्थ्यांना सहज समजेल अशा स्वरूपात आहे. शिक्षक आपल्या अध्यापनात त्याचा कसा उपयोग करू शकतात हे या संशोधनात आले असल्याने या संशोधनाचे महत्त्व आहे.

डॉ.न.म.जोशी यांची ओघवती भाषाशैली त्यांना असलेली बाल कुमार मानसशास्त्राची जाण, त्यांनी ४० वर्षाचा जोपासलेला शिक्षकाचा पिंड, बाल कुमारांना प्रेरणा देणारी राष्ट्रीय चरित्रे लिहिण्याची त्यांची साधी सोपी पध्दत, त्यांनी बालकुमारां साठी हाताळलेली कादंबरी, कथा, कविता, नाटिका, चरित्रे, बोधकथा वर्तमानपत्रातील मुलांसाठी कलेले स्तंभ लेखन या सारखे विविध विषय हे सर्व शिक्षकांसाठी आपल्या दैनंदिन अध्यापनात उपयुक्त ठरतील. डॉ.न.म.जोशी यांच्या रूपाने शिक्षकांना सतत प्रेरणा देणरा साहित्यिक शिक्षक यांचे बाल कुमार वाड्.मयातील शैक्षणीक विचार यांचे विश्लेषण करणे व अभ्यासणे आवश्यक असल्याने या शैक्षणिक संशोधनाचे महत्त्व आहे.

या संशोधनाने शिक्षकांना व शिक्षणप्रेमींना डॉ.न.म.जोशी यांच्या आत्मचरित्राकडे त्यांच्या शिक्षकी पेशाच्या वाटचालीकडे पाहण्याची व्यापक दृष्टी मिळेल. जे शिक्षण प्रक्रियेस पोषक ठरेल. शिक्षक म्हणून कार्य करीत असतांना बाल कुमारांना शिकविण्यासोबतच त्यांच्यासाठी वाङ्मय निर्मिती केलेल्या डॉ.न.म.जोशी यांचे पासून शिक्षकांना प्रेरणा मिळेल यासाठी या संशोधनाचे महत्त्व आहे.

संशोधकाला असे वाटते की बाल कुमार वयोगटातील विद्यार्थी म्हणजे पेटीत बंद असलेल्या सुगंधी साबणाच्या वडया नाहीत. त्यांना समजले पाहिजे की आपण पेटीत बंद राहण्यासाठी नसून त्यातून बाहेर पडून स्वच्छ पाण्यात मिसळून अनेकांना स्वच्छ आणि सुगंधी करणे हे आपले जीवनकार्य आहे अशी धारणा विद्यार्थ्यांमधे वाढविण्यासाठी डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय आणि त्यातील शैक्षणीक विचार यातून मानवी मूल्यांची जाणीव आणि संस्कार होणे हे शैक्षणिक दृष्टया उपयुक्त ठरेल.

आज समाजात शील, चरित्र, नीती, सदाचार, सद्गुण इत्यादी लोप पावत आहेत राजकारण, व्यापार, कारखानदारी, वकिली, वैद्यकीत सेवा, सरकारी नोकरी, सहकार इत्यादी प्रत्येक क्षेत्रात दुराचार आहे. माणूस जागोजागी भ्रष्ट झालेला दिसते. अपवाद म्हणून काही सदाचारी प्रामाणिक माणसे आहेत. पण ती संख्या अत्यल्प आहे. या सर्व गोष्टींसाठी शालेय स्तरावर मूल्यसंवर्धनाचे संस्कार आवश्यक आहेत. आणि हे मूल्यसंवर्धनाचे संस्कार संस्कार वाड्.मयातून व दर्जेदार लिखाणातून शक्य आहेत. मुलांनी असे संस्कारक्षम वाड्.मय वाचले तर मूल्यसंवर्धन शक्य आहे. डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय हे या संदर्भात उपयुक्त ठरू शकते म्हाणून प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

## १.२.३ संशोधन विषयाचे शीर्षक ः

" डॉ.न.म.जोशी यांच्या बोधकथांचा चिकित्सक अभ्यास"

## १.२.४ संशोधनातील महत्त्वाच्या संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या ः

### १. डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय ः

"प्रस्तुत संशोधनासाठी डॉ.न.म.जोशी यांनी लिहिलेल्या वाङ्मयापैकी बोधकथा हा वाङ्मय कथा प्रकार एकूण २ पुस्तके म्हणजे डॉ.न.म.जोशी यांचे साहित्य होय.

### २. बाल कुमार वाङ्मय ः

"बाल (वर्ष ६ ते वर्ष १३) व कुमार (वर्ष १४ ते वर्ष १६) या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी लिहिलेले वाङ्मय म्हणजे बाल कुमार वाङ्मय."

### ३. शैक्षणिक अभ्यास ः

"१0 नैतिक मूल्ये यांच्या दृष्टिकोनातून केलेला अभ्यास म्हणजे शैक्षणिक अभ्यास."

### ४. १0 नैतिक मूल्ये ः

"महाराष्ट्र शासनाने शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये रूजविली जावीत अशी ठरवून दिलेली नैतिक मूल्ये म्हणजे १0 नैतिक मूल्ये होय."

### ५. १0 संशोधनाची उद्दिष्टे ः

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये अपेक्षित असलेल्या १0 नैतिक मूल्ये यांच्या आशयांच्या अंगाने डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील संदर्भाचा शोध घेणे.

२. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील १0 नैतिक मूल्ये यांचे अध्यापनाच्य दृष्टिकोनातून विश्लेषण करणे.

३. वर्तमान स्थितीत असलेल्या शालेय अभ्यासक्रमात डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाचा अध्यापनाच्या संदर्भातील उपयुक्ततेचा शोध घेणे.

## १.२.५ संशोधनाची गृहितके ः

१. डॉ.न.म.जोशी यांनी नैतिक मूल्ये केंद्रस्थानी ठेवून बाल कुमार वाङ्मयाची निर्मिती केली आहे.

२. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयात १0 नैतिक मूल्ये यांचे स्पष्टीकरण करणारे संदर्भ आहेत.

३. आधुनिकिकरणामुळे मूल्यांचा ऱ्हास होत आहे.

४. मानवी जीवन आणि मूल्ये यांचा अतुट संबंध आहे.

## १.२.६ संशोधनाची व्याप्ती, व मर्यादा ः

### अ. संशोधनाची व्याप्ती ः

१. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील १0 नैतिक मूल्ये यांचा शालेय अध्ययन अध्यापनाच्या संदर्भातील उपयुक्ततेसंबंधी प्रस्तुत संशोधन आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे ः

अ. विद्यार्थ्यांना अध्ययन करताना

ब. शिक्षकांना अध्यापन करताना व

क. पालकांना विद्यार्थ्यांचा अभ्यास घरी घेण्यासाठी उपयोगी आहे.

### ब. संशोधनाची मर्यादा ः

१. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील १0 नैतिक मूल्यांचा या संदर्भात अभ्यास करण्यात आला आहे.

२. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाड्मयातील 'कथा' प्रकारातील फक्त बोध कथांचा अभ्यास करण्यात आला आहे.

३. केवळ अध्यापनाच्याच दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधनाच्या उपयुक्ततेचा अभ्यास करण्यात आला आहे.

**क. संशोधनाची मर्यादा ः**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाच्या दृष्टिकोनातून विश्लेषण करण्यात आल्यामुळे संशोधनाला मर्यादा येऊ शकते.

## ५.१८ संशोधन पद्धती ः

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे विचारात घेता प्रस्तुत संशोधन हे 'वाड्मय विश्लेषण' (Literary Research) या प्रकाराचे संशोधन आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी 'वाङ्मय विश्लेषण पद्धती' (Analysis of Literature Method) वापरण्यात आली. या संशोधनाला पूरक आशय विश्लेषण पद्धतीचा सुद्धा संशोधन तंत्र म्हणून वापर संशोधकाने केला आहे.

## ५.१९ संशोधनाची साधने ः

प्रस्तुत संशोधनासाठी 'वाड्मय विश्लेषण व सर्वेक्षण' ही संशोधन पध्दती वापरली आहे. त्यासाठी आवश्यक असलेली माहिती संकलनासाठी, वर्गीकरणासाठी व विश्लेषणासाठी आवश्यक असलेले तक्ते / कोष्टके व शिक्षकांची मतावली हे संशोधन साधन म्हणून उपयोगात आणले आहे. ही संशोधन साधने संशोधकाने स्वयंनिर्मित केली आहेत. कोष्टकीकरणासाठी आशय विश्लेषण या संशोधन तंत्राचा उपयोग केला आहे.

## १.३ डॉ.न.म.जोशी यांचा जीवन परिचय.

### १.३.१ जन्म व वारसा ः

डॉ.न.म.जोशी यांचा जन्म ११ जानेवारी १९३६ रोजी पुणे येथे झाला . डॉ.न.म.जोशी हे मूळचे पाटण तालुक्यातील गारवडे या गावचे. हे गारवडे गाव सातारा जिल्हयात अतिशय दुर्गम भागात आहे. अत्यंत टुमदार असलेले गारवडे हे सहयाद्रीच्या कुशीत वसलेले गाव. डॉ.न.म.जोशी यांची बालपणाची पहिली पाच वर्षे या गारवडयातच गेली.

डॉ.न.म.जोशी यांच्या आजोबांचे नाव वामन नारायण जोशी. त्यांचे आजोबा गायक होते. उत्तम नटही होते. आनंद संगीत नाटक मंडळीत ते 'गायक, नट' म्हणून काम करीत.

डॉ.न.म.जोशी यांचे वडील महादेव वामन जोशी. ते सुध्दा 'शाहू नगरवासी नाटक मंडळीत' व्यवस्थापक म्हणून काम पाहत. पुढे नाटक कंपनी बुडाली. मग महादेवराव जोशी आचा-याचे काम करू लागले. चरितार्थ चालविण्यासाठी ते पुण्यात आले. ते मॅट्रिकपर्यंतही शिक्षण घेवू शकले नाहीत.

डॉ.न.म.जोशी यांच्या आईचे नाव श्रीमती अन्नपूर्णा महादेव जोशी . त्यांचे शिक्षण मराठी दुसरी पर्यंत झाले होते.

महादेव जोशी व अन्नपूर्णाबाई यांना एकूण चार अपत्ये झाली. थोरला नरसिंह दुसरा नारायण तिसरा दामोदर तर चौथा नंदू. थोरला नरसिंह म्हणजे डॉ.न.म.जोशी.

### १.३.२ शिक्षणासाठी धडपड ः

डॉ.न.म.जोशी पाच वर्षाचे झाले तेव्हा शाळेत प्रवेश घेण्याचा प्रश्न निर्माण झाला.गारवडयात शिक्षणाची सोय नीट नव्हती. म्हणून मुलांच्या शिक्षणासाठी जोशी कुटुंब गारवडे गाव सोडून साताराला आले.साताराच्या म्युनिसिपालिटीच्या शाळेत डॉ. जोशीं चे

पहिलीचे शिक्षण झाले. नंतर काही कौटुंबिक परिस्थितीमुळे जोशी कुटुंबाने सातारा सोडण्याचा निर्णय घेतला व ते परत कुटुंब पुन्हा गारवडयात आले. डॉ.जोशी यांचे चौथीपर्यत शिक्षण गारवडयात झाले. वडील मात्र पुण्यात होते. ते अधून मधून गावी येत.

मराठी चौथीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यावर डॉ.न.म.जोशी यांची इंग्रजी शाळेत जाण्याची वेळ आली. त्याच्या मावशी श्रीमती सत्यभामा केळकर यांच्याकडे सोलापूरच्या मॉडर्न हायस्कूल या शाळेत डॉ.जोशींनी पाचवीमध्ये प्रवेश घेतला. सातवीपर्यंतचे त्यांचे शिक्षण सोलापूरलाच झाले.

इयत्ता आठवीचे शिक्षण घेण्यासाठी डॉ.जोशी यांना जळगावला यावे लागले. जळगावच्या प्रसिध्द ला.ना सार्वजनिक हायस्कूल मध्ये त्यांनी प्रवेश घेतला. कारण त्यांच्या मावशी श्रीमती केळकर यांची बदली जळगाव येथे झाली होती.

जळगावमध्ये शिकत असताना गांधी हत्येचा परिणाम म्हणून डॉ.जोशी यांचे घर जाळण्यात आले. मग त्यांच्या आईने गाव सोडले. ती घराबाहेर पडली आणि भिलवडीला आली. भिलवडीच्या डॉक्टर म्हसकरांच्या प्रशिक्षण केंद्रात दाखल झाली. तेथे तिने 'दाई' बनण्याचा एक वर्षाचा कोर्स केला.

दरम्यान काकांची बदली सांगलीला झाली. डॉ.जोशी यांना शिक्षणासाठी सांगलीला यावे लागले. सांगलीच्या प्रसिध्द सिटी हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. याच सिटी हायस्कूल मध्ये डॉ.न.म.जोशी यांना सानेगुरूजींनी स्वतः सांगितलेली डॉ.बाबासाहेब आबेडकरांची जीवनकथा ऐकण्याचा योग आला.प्रसिध्द लेखक पु.ल.देशपांडे सांगलीच्या विलिंग्डन महविद्यालयात होते. डॉ.न.म.जोशींनी विद्यार्थी दशेत असतांना पु.ल.देशपांडे यांचे भाषण तन्मयतेने ऐकले.

दहावीच्या शिक्षणासाठी डॉ.जोशी यांना पुण्याला यावे लागले.कारण आता काकांची बदली पुण्याला झाली होती. पुण्याच्या भावे स्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. पुण्यात

जोशी कुटुंब केसरीवाडयात राहू लागले. याच केसरीवाडयात लोकमान्यांचे नातू जयंतराव टिळक, ग.दि.माडगुळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा प्रेरणादायी सहवास डॉ.न.म.जोशी यांना लाभला. नोकरी करून त्यांनी अकरावीचे शिक्षण पूर्ण केले.

## १.३.३ शिक्षकी जीवनाची वाटचाल ः

१९५२ सली डॉ.न.म.जोशी मॅट्रिक उत्तीर्ण झाले.आईच्या निर्देशानुसार त्यांनी एफ.वाय.सायन्सला प्रवेश घेतला.परंतु त्या अभ्यासक्रमात त्यांचे मन रमेना. त्यांचे मन कथा कविता व नाटक यामध्ये रमू लागले. ते एफ.वाय.सायन्समध्ये नापास झाले.

त्याच काळात पुण्यातील टिळक रोडवरच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये एस.टी.सी.चा कोर्स सुरू झाला होता. एस.टी.सी म्हणजे सेकंडरी टिचर्स सर्टिफिकेट. शिक्षक होण्यासाठी हा कोर्स आवश्यक व उपयुक्त होता. मग डॉ.जोशी यांनी हा कोर्स १९५३ मध्ये पूर्ण केला. हा कोर्स पूर्ण करताना त्यांनी नाटकात कामे केली. नाटक आणि साहित्य या विभागातच विशेष रूची दाखवली.

न्यू इंग्लिश स्कूल मध्ये नवीन इमारतीच्या उद्घाटन सोहळयाला त्यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आले होते.ते आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले "साहित्य आणि शिक्षण हे दोन प्रांत वेगळे नाहीत. साहित्याने शिक्षकाची भूमिका घेऊ नये पण शिकविले पाहिजे आणि शिक्षकाने साहित्याच्या अंगानेच प्रबोधन केले पाहिजे." या डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विचारांचा प्रभाव शिक्षक होऊ घातलेल्या डॉ.जोशी यांच्यावर विशेष पडला.

एस.टी.सी. कोर्सनंतर डॉ.जोशी यांनी सी.पी.एड. चा कोर्स शि.प्र.मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयात पूर्ण केला. या काळात डॉ.जोशी यांनी लेखनाला प्रारंभ केला. 'अभिनय गीत' हा एक प्रकार शारीरिक शिक्षणात असतो. त्यावेळी डॉ.जोशी यांनी काही अभिनय गीते लिहून बसवली.

डॉ.जोशी यांनी एस.टी.सी. व सी.पी.एड्. हे दोन्ही कोर्स पूर्ण केले. १९५४ साली त्यांनी पहिली नोकरी मिरज येथे आर.एस.हायस्कूलमध्ये मिळाली. याच काळात गोवा मुक्ती आंदोलनाने जोर धरला होता. त्यावेळी मिरजेत गोवा मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देणा-या सभा भरत. त्या सभातून डॉ.जोशी यांनी भाषणे केली. ही भाषणे त्यांनी अभ्यासपूर्वक दिली. अशा प्रकारे अभ्यासपूर्वक बोलण्याची सवय त्यांना मिरजेतील सभांपासून लागली.

मिरज सोडून डॉ.जोशी पुण्यात आले. १९५६-५७ या वार्षात पुण्याच्या आयडियल इंग्लिश स्कूल मध्ये नोकरी केली. १९५८-५९ या वार्षात टिळक रोडवरच्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये नोकरी केली. याच कालखंडात नोकरी करून ते एस.पी.कॉलेज मध्ये बी.ए. चे शिक्षण घेत होते. ज्यावेळी डॉ.जोशी एस.पी.कॉलेजमध्ये शिकत होते त्यावेळी प्रसिध्द समीक्षक प्रा.व.दि.कुळकर्णी त्यांना शिकवायला होते. त्याच प्रमाणे मराठी विभाग प्रमुख डॉ.पु.ग.सहस्त्रबुध्दे आणि सरोजनी वैद्य यांच्या अध्यापनाचा त्यांना लाभ झाला.

१९५९-६0 या शैक्षणिक वर्षात त्यांना आदर्श विद्यालयात नोकरी मिळाली. नंतर १९६२-६३ या शैक्षणिक वर्षात शिवाजी नगर पुणे येथे भारत इंग्लिश स्कूलमध्ये नोकरी मिळाली. पुढे १९६३ मध्ये त्यांना नू.म.वि. मध्ये निमंत्रित करण्यात आले.

१९६३ ते १९७७ पर्यंत सलगपणे १४ वर्षे डॉ.जोशी नू.म.वि. मध्ये कार्यरत होते. या कालखंडात ते स्वस्थ बसले नाहीत. तर आपली व्यावसायिक व साहित्यिक गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी १९७0 मध्ये 'स्टेट इन्स्टिटयुट ऑफ इंग्लिश फॉर महाराष्ट्र' या शासनाच्या मुंबई आंग्ल भाषा शिक्षण केंद्रात चार महिन्यांचा विशेष अभ्यासक्रम पूर्ण केला. १९७२-७४ मध्ये नू.म.वि. मधून विनापगारी अभ्यास रजा घेऊन पुणे विद्यापीठात एम.ए. मराठीसाठी प्रवेश घेतला. १७७५-७६ या कालखंडात पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये 'पश्चिम विभागीय भाषा केंद्र' या ठिकाणी केंद्रिय शिक्षण खात्याच्या योजनेतून सिंधी भाषेचा अभ्यासक्रम पूर्ण केला.

१९७७ साली डॉ.जोशी यांना पुण्याच्या टिळक प्रशिक्षण महाविद्यालयात व्याख्यात्याची नोकरी मिळाली. आतापर्यंत जे मुलांचे शिक्षक होते ते शिक्षकांचे शिक्षक झाले. नंतर ते १९९६ साली प्राध्यापक पदावरून निवृत्त झाले. तरीही त्यांचे शैक्षणिक व साहित्यिक काम सुरूच होते. ते शिक्षणशास्त्र विभागातील पीएच.डी. चे मार्गदर्शक आहेत. त्यांच्याकडे पीएच.डी. करणा-या विदयार्थ्यांपैकी काहींचे विषय निखळ साहित्याशी संबधित आहेत. उदा. ज्ञानेश्वरी, ग.दि.माडगुळकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णासाहेब विजापूरकर, अण्णाभाऊ साठे या विषयांवर त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठ शिक्षणशास्त्र शाखेत काही संशोधकांनी संशोधन केलेले आहे.

याच सुमारास महाराष्ट्राच्या शिक्षण खात्याने शाळांमध्ये मूल्यशिक्षण उपक्रम अंमलात आणण्याचे ठरविले. त्यासाठी असणा-या साहित्य निर्मितीच्या समितीवर डॉ.जोशी यांनी काम केले आहे.

### १.३.४. साहित्य क्षेत्रात योगदान ः

मराठी वाङ्मयात विविध विषयांवर विविध साहित्य प्रकार हाताळणारे लेखक तुलनेने अल्प प्रमाणात आढळतात. परंतु डॉ.जोशी यांनी साहित्यातील विविध प्रकार सातत्याने हाताळले आहेत. बालवाङ्मयापासून ते वैचारिक वाङ्मयापर्यंत विषय यांनी यशस्वीपणे हाताळलेले आहेत. अशा प्रकारचे विविध वाङ्मय हाताळणारे जे लेखक मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात लेखन करताना दिसतात त्यात डॉ.जोशी यांच्या साहित्य निर्मितीचा प्रवास वाखाणण्यासारखा आहे. त्यांचा साहित्य क्षेत्रातील संचार आणि त्यातही त्यांच्या बालकुमार वाङ्मयातील योगदान हे अभ्यासणे संशोधकाला महत्त्वाचे वाटते.

डॉ.न.म.जोशी यांनी प्रथम लेखणी हातात धरली ती सी.पी.एड. चा कोर्स करताना. त्यावेळी त्यांनी ‘अभिनय गीत’ हया शारीरिक शिक्षणातील गीत प्रकाराचे लेखन केले. हे त्यांचे लेखन अर्थातच अगदी प्राथमिक स्वरूपाचे होते.

एस.पी.कॉलेजमध्ये एक मराठी वाङ्मय मंडळ कार्यरत होते. या वाङ्मय चळवळीचे सूत्र संचालन डॉ.जोशी यांनी केले. त्या काळात त्यांची 'वृंदावने' ही कथा 'सकाळ' मध्ये प्रसिध्द झाली होती आणि ती फार गाजली होती. या कथेवर वाङ्मय मंडळाने गोपीनाथ तळवलकर यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा घडवून आणली होती.

दरम्यानच्या काळात त्यांच्या साहित्यिक चळवळींशी संबंध आला आणि त्यांचे लेखन कार्य चालूच राहिले. १९५९ साली 'विविधवृत्त' आणि 'स्वराज्य' मध्ये त्यांच्या काही कथा छापून येऊ लागल्या. मिरजेच्या साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्ष श्री.के.क्षीरसागर यांचा वैयक्तिक मदतनीस म्हणून त्यांनी काम केले होते. १९६१-६२ च्या दरम्यान आदर्श विद्यालयात असतांना स्नेहसंमेलनानिमित्त 'झाली भली पहाट' ही एकांकिका लिहिली. या कालखंडात डॉ.जोशी यांच्या निवासस्थानी म्हणजे १0१३ सदाशिव पेठ, पुणे येथे अनेक तरूण कवी, कवयित्रींची कवी संमेलने भरविण्यात येत असत. १९६२-६३ या दरम्यान भारत इंग्लिश स्कूल मध्ये असताना त्यांनी पुणे आकाशवाणीसाठी 'आमच्या आळीतील गणपती' हे मुलांसाठी नभोनाटय लिहिले. १९७५-७६ या कालखंडात पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये 'पश्चिम विभागीय भाषा केंद्र' या ठिकाणी केंद्रीय शिक्षण खात्याच्या योजनेतून सिंधी भाषेचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि त्यामध्ये विशेष प्राविण्य मिळविले. पुढे १९७७ मध्ये डॉ.जोशी यांनी 'एकता' मासिकाचे संपादक असताना 'सिंधी समाज व संस्कृती' हा विशेषांकच काढला. याच कालखंडात 'हल्लकल्लोळ आणि इतर एकांकिका' 'डॉ.रोगी यम' 'निश्चयाचा महामेरू' या एकांकिका लिहिल्या. १९६५ साली नू.म.वि.च्या स्नेहसंमेलनात त्यांनी लिहिलेल्या 'जेव्हा देव अवतरतात' ही एकांकिका खूपच गाजली. स्वतः संरक्षणमंत्री कै.यशवंतराव चव्हाण यांनी या नाटकावरच आपले भाषण केले. पुढे या नाटिकेचे संस्कृत रूपांतर 'अवतीर्णेषु देवेषु' या नावाने निगडी येथील ज्ञानप्रबोधिनीचे संचालक वा.ना.अभ्यंकर यांनी केले. याच कालखंडात डॉ.जोशी यांनी 'प्रसाद' मासिकात कथा लिहिण्यास सुरूवात केली.

याच कालावधित त्यांनी छोटी छोटी चरित्रे लिहिण्यास प्रारंभ केला. 'महात्मा बसवेश्वर' हे त्यांचे पहिले चरित्र. १९६२ मधील या चरित्रातील एक उतारा पुढे कर्नाटक शासनाच्या शिक्षण खात्याने मराठी द्वितीय भाषा पाठयपुस्तकात १० वर्षे समाविष्ट केला होता.

१९७६ मध्ये ते महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारीणीवर निवडून आले. पुढे साहित्य परिषदेचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले. तसेच त्यांनी महामंडळाचे कोषाध्यक्षपदही सांभाळले. १९७० साली त्यांनी गांधीजींच्या जीवनावर 'प्रेषित' नावाची सुमारे तीनशे पानांची कादंबरी लिहिली. या कादंबरीची त्या कालखंडात खूपच प्रशंसा झाली. ही कादंबरी २० छोटया छोटया भागात विभगली आहे. गांधीजींच्या उतुंग व्यक्तिमत्वाचे दर्शन त्यातून घडते. त्याच प्रमाणे 'निःस्पृह' या कादंबरीत त्यांनी पेशव्यांच्या दरबारातील मुख्य न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांचे चरित्र रेखाटले आहे. एकूण १५ भागात या कादंबरीचे त्यांनी लेखन केले आहे. तसेच 'निष्प्रेम' ही त्यांची तिसरी कादंबरी ही सामाजिक विषयावरची कादंबरी ७ भागात लिहिली आहे. वासनेने बरबटलेल्या पुरूषी प्रकृतीचे दर्शन या कादंबरीत घडते. स्त्रीची कुचंबणा, विटंबना व अवहेलना यातून प्रतीत होते.

डॉ.जोशी यांनी कादंबरी लेखना बरोबर विपुल कथालेखनही केलेले आहे. हे कथालेखन वेगवेगळया मासिकातून आणि दिवाळी अंकातून प्रकाशित झालेले आहे. अशा प्रकारे सुमारे ३२ कथा त्यांनी लिहिल्या आहेत. यातील ब-याचशा कथा 'प्रसाद' मासिकात प्रकाशित झालेल्या आहेत.

१९७७ साली डॉ.जोशी पुण्याच्या टिळक प्रशिक्षण महाविद्यालयात व्याख्याता म्हणून सेवेत रूजू झाले. १९७७ ते १९९६ या कालखंडात साहित्य संस्थामधील कार्य व लेखन कार्य या दोन्ही आघाडयांवर त्यांनी लक्षणीय काम केले. महारष्ट्र साहित्य परिषदेचे चिटणीस मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष या नात्याने त्यांनी १९७६ ते १९८१ अशी सलग सहा वर्षे काम केले. या कालखंडात जी साहित्य संमेलने झाली त्यामध्ये त्यांचा वाटा महत्त्वाचा आहे.

डॉ.जोशी यांनी स्वतःच्या गुणवत्तेतील एक त्रुटी भरून काढायची होती. त्यांनी पीएच.डी. करायचे ठरविले. त्यासाठी त्यांनी शिक्षणशास्त्र या विद्याशाखेतच संशोधन करायचे ठरविले. परंतु विषय मात्र मराठी साहित्याच्या क्षेत्रातील घेतला.

'१९५0 पूर्व मराठी निबंध वाङ्मय आलेल्या शिक्षण विचारांचा चिकित्सक अभ्यास' हा विषय त्यांनी संशोधनासाठी घेतला. त्यात चिपळूणकर, टिळक, आगरकर, शि.म.परांजपे, अ.ब.कोल्हटकर, न.चि.केळकर आणि वा.म.जोशी या सात निबंधकारांची अभ्यास क्षेत्रासाठी निवड केली. १९८८ मध्ये डॉ.जोशी यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळाली. त्यांचे मार्गदर्शक होते डॉ.रा.सो.सराफ याच प्रबंधाला पुढे डॉ.जोशी यांनी 'पत्रकारांचा शिक्षण विचार' हा ग्रंथ प्रसिध्द केला. या ग्रंथाला मानाची तीन पारितोषिके सुध्दा मिळाली.

पाच कालखंडात डॉ.जोशी यांनी स्तंभलेखनही सुरू केले होते. दै.तरूण भारत च्या पुणे आवृत्तीसाठी ते 'भ्रमंती' व 'नम गोष्टी' लिहत. त्यांनी औरंगाबादच्या तरूण भारत साठी सुध्दा 'न.म.गोष्टी' लिहिल्या. या स्तंभ लेखनासाठी त्यांनी विविध विषय हाताळले.

## १.३.५. डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मयातील योगदान ः

डॉ.न.म.जोशी यांच्या समग्र साहित्याचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की त्यांनी विविध विषयांवर विविधांगाने लेखन केले आहे. त्यात प्रामुख्याने मुलांसाठी त्यांनी तुलनेने जास्त लेखन केलेले दिसते. मुलांसाठी त्यांनी जे बाल कुमार वाङ्मय लिहिले ते ख-या अर्थाने संस्कारक्षम साहित्य आहे.बाल कुमारांसाठी लेखन करताना ते चरित्र, एकांकिका, कादंबरी, कथा, बोधकथा, चरित्रकथा इत्यांदी वाङ्मय प्रकार हाताळताना दिसतात. पेशाने ते शिक्षक असल्याने मुलांना नेमके काय द्यावे याची त्यांना चांगली जाण आहे. शालेय रंगभूमीची गरज म्हणूनही त्यांच्या हातून बाल कुमारांसाठी साहित्याची निर्मिती विपुल प्रमाणात झालेली दिसते. त्याना मुलांच्या मानसशास्त्राविषयी चांगली जाण असलेली जाणवते. मुलांची संस्कारक्षम

वयातील गरज, आवड आणि स्वभाव वैशिष्टये विचारात घेऊनच त्यांनी बाल कुमार वाङ्मयाची निर्मिती केलेली दिसते.

**कथालेखन ः**

डॉ.न.म.जोशी यांनी मुलांसाठी जे कथालेखन केलेले आहे ते 'कोण आणि काय', 'पर्यावरण कथा', 'भारत कथा', 'पाखरांची शाळा' आणि 'मूल्य कथा' या पाच पुस्तकांमधून प्रकाशित झाले आहे.

यातील 'कोण आणि काय' हे लेखन शिशु गटातील मुलांसाठी आहे. या लेखनात ताल तंत्र आणि ठेका यांचे भान असल्याचे जाणवते. यमक जुळतो व पुनरावृत्तीमुळे लय साधली जाते. या छोटीखानी पुस्तकात घर, बाळ, चिमणी, राजा, कुटुंब इत्यादी संकल्पना लहानग्यांना समजतील अशा सोप्या भाषेत लिहिल्या आहेत. बाल मानसशास्त्राची जाण असल्यामुळेच अशा प्रकारचे लेखन करणे शक्य झाले आहे.

'पर्यावरण कथा' मध्ये 'अमृतादेवी', 'होळी आगळी होळी वेगळी', 'एक होता माणूस', 'आजरी पृथ्वी', 'निसर्गदेवाची कृपा' इ. दहा कथांचा समावेश आहे. माणसाचे वृक्षप्रेम वाढीस लागावे दुवर्तनाची होळी व्हावी माणसाकडून पृथ्वीची होणारी लयलूट थांबावी निसर्गाचा विध्वंस थांबावा इ. आजच्या जिवंत व वास्तव प्रश्नांना हात घालून बाल कुमारांचे प्रबोधन त्यांनी केलेले आहे.

'भारत कथा' मध्ये प्रतिज्ञा भारताची राज्यघटना, राष्ट्रगीत, राष्ट्रीय पंचांग, राजमुद्रा इ. संकल्पनांची ओळख सोप्या भाषेत करून दिली आहे. आपल्या देशाच्या प्रतिकांची माहिती मुलांना आणि त्यांचे देशप्रेम वाढीला लागावे हा त्यांचा हेतू या लेखनातून दिसून येतो.

'मुलांच्या मूल्यकथा' हे पुस्तक त्यांनी शाळेत सुरू असलेल्या मूल्यशिक्षणाला धरून लिहिलेले आहे. मुलांमध्ये मूल्यसंस्कार रूजावेत त्यांचे संवर्धन व्हावे हा त्यांचा उद्देश दिसतो. या बहुमूल्य पुस्तकात 'श्रमप्रतिष्ठा', 'राष्ट्रभक्ती', 'स्त्री पुरूष समानता',

‘सर्वधर्मसहिष्णुता’, ‘राष्ट्रीय एकात्मता’ इ. दहा मूल्यांवर आधरित कथांचा समावेश आहे. प्रामुख्याने किशोरवयीन मुलांचा विचार करून हे लेखन केलेले दिसते.

‘पाखरांची शाळा’ या पुस्तकात एकूण १७ व्यक्तिचित्रणे आहेत. ही सर्व व्यक्तिचित्रणे धडपडणा-या मुलांची आहेत. त्यांची नावेही मोठी मजेशीर आहेत. उदा. दिनू धडपडे, बबली बुकवर्म, शिरीष षटकारे, चारूदत्त छत्रपती, फिरस्ता फेरीवाला, गायत्री गोंधळे इ. ही नावे वरपांगी विचित्र वाटत असली तरी प्रत्यक्ष या नावांची नसलेली पण नावानुसार प्रवृत्तीची असलेली मुले आहेत. प्रत्यक्ष शालेय जीवनात डॉ.न.म.जोशी यांच्या सहवासात ही मुले आली. त्यांनी ती स्मरणात टिपून ठेवली आणि शब्दबध्द केली. कुणाला नाटकाचे वेड आहे, तर कोणाला क्रिकेटचे, कोणी अभ्यासात कच्चा पण धडपडया, तर कोणी फक्त पुस्तकी किडा. या सर्वाच्या धडपडीला वेळच्यावेळी दिशा मिळाल्यामुळे त्यांचे जीवन कसे बदलून गेले हे या व्यक्तिचित्रणातून प्रतिपादन केले आहे. शिक्षणशास्त्राचा आणि मानसशास्त्राचा आधार असलेल्या या वाड्.मयीन कलाकृती आहेत.

**चरित्र कथा / चरित्रे ः**

डॉ.न.म.जोशी यांनी बाल कुमारांसाठी एकूण १४ चरित्र कथा चरित्रे लिहिले आहेत. ती पुढील प्रमाणे आहेत ः

१ . श्री बसवेश्वर २. भगीरथ डॉ.भाभा ३. पंतप्रधान लालबहादुर शास्त्री ४. डॉ. शामा प्रसाद मुखर्जी ५. न्यायनिष्ठूर रामशास्त्री ६.जगज्जेता सिकंदर ७.डॉ. बाबासाहेब आंबेडकर ः चरित्र व कार्य ८. मौलाना अबुल कलम आझाद ९.डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन १0.महार्षि धोंडो केशव कर्वे ११.गोष्ट उंच वामनाची प्रा.वा.मा.दवडघाव यांचे चरित्र १२. झाशीची राणी १३. आर्य चाणक्य १४. मॅरेथॉन महादेव श्री महादेव बाबूराव काशिनाथ गोखले यांचे चरित्र.

वरील चरित्र वाङ्मयात ऐतिहासिक चरित्रे संत व सेनानींची चरित्रे, राजकीय नेत्यांची चरित्रे, समाजसुधारकांची चरित्रे आणि शास्त्रज्ञांची चरित्रे अशी विविधता दिसून येते. ही सर्व चरित्रे बाल कुमारांसाठी उपयुक्त अशीच आहेत. त्यात 'मर्दानी झाशीवाली' 'आर्य चाणक्य' 'न्यायनिष्ठूर रामशास्त्री' व 'सम्राट सिकंदर' ही ऐतिहासिक चरित्रे आहेत. मुलांमध्ये ऐतिहासिक चरित्रांच्या निमित्ताने शौर्य, देशप्रेम, तेजस्विता व धाडस हे गुण वाढीला लागावे हा उद्देश दिसतो.

कर्नाटकमध्ये उदय पावलेल्या 'श्री संत बसवेश्वर' यांची जीवन कहाणी मराठी मुलांसाठी लिहिली आहे. या पुस्ताकातून संत बसवेश्वरांचे विचार आणि शिकवण स्पष्ट होते. ही शिकवण फक्त शैव पंथियांपुरती मर्यादित नसून सा-या मानव जातीच्या कल्याणासाठी उपयुक्त ठरेल. अतिशय सुबोध पध्दतीने या चरित्राचे लेखन डॉ. न.म.जोशी यांनी केलेले आहे.

'डॉ.बाबासाहेब आंबेडकर', 'लालबहादूर शास्त्री', 'शामाप्रसाद मुखर्जी 'डॉ.सर्व पल्ली राधाकृष्णन', 'मौलाना अबुल कलाम आझाद', 'डॉ.भाभा', 'महर्षी कर्वे यासारख्या नेत्यांची राजकीय व सामाजिक कामगिरी डॉ.न.म.जोशी यांनी बाल कुमारांसाठी त्यांना समजेल अशा त-हेने लेखनबद्ध केली आहे. मुलांना अशा थोरांच्या परिचयातून स्फूर्ती मिळावी हा त्यांचा मूख्य उद्देश दिसतो. भगीरथ डॉ.भाभा यांच्या चरित्रातून प्रयत्नवादी शास्त्रज्ञाचे चरित्र रेखाटले आहे. अणुऊर्जेचा उपयोग माणसांच्या विकासासाठी करणारे हे महान शास्त्रज्ञ डॉ.जोशी यांच्या लेखणीतून भाभांची धडपड प्रयत्नवाद व कष्टाळूपणा बाल कुमारांच्या मनावर ठसतो.

डॉ.जोशी यांनी अलिकडच्या काळात अलिकडच्याच व्यक्तींची चरित्रे रेखाटली आहेत. त्यात प्रा.वा.मा.दबडघाव यांचे चरित्र प्रामुख्याने आले आहे. या पुस्तकाचे नाव 'गोष्ट उंच वामनाची' असे असून प्रा.वा.मा.दबडघाव यांच्या जीवनात केलेल्या धडपडीचा उहापोह करण्यात आला आहे. 'मॅरेथॉन महादेव' यामध्ये सुध्दा महादेव काशीनाथ गोखले यांचे चरित्र आहे. बाल कुमारांसाठी अशा धडपडया व्यक्तींपासून प्रेरणा मिळते.

**नाटिका / एकांकिका ः**

डॉ.जोशी यांनी शालेय रंगभूमीची गरज लक्षात घेता एकांकिका व बालनाटयांसाठी एकूण ७ पुस्तके लिहिली आहेत. त्यात एकूण ११ एकांकिका / नाटिका त्यांनी लिहिल्या आहेत. ती पुस्तके पुढील प्रमाणे आहेत ः

१. डॉक्टर, रोगी आणि यम २. हलकल्लोळ आणि इतर एकांकिका ३. तीन एकांकिका ४. दत्तक राजपुत्र ५. बिनखात्याचा मंत्री ६. जगणारी माणसं ७. निश्चयाचा महामेरू

वरील सर्वच एकांकिका / नाटिका शालेय रंगभूमीवर प्रयोग करण्यासाठी अतिशय सुलभ आहेत. आजवर त्यांचे अनेक यशस्वी प्रयोग झाले आहेत. केवळ मुलेच भूमिका करू शकतील अशा स्त्री पात्र विरहीत एकांकिकाही त्यांनी लिहिल्या आहेत. त्यात प्रामुख्याने 'जगणारी माणसे', 'डॉक्टर, रोगी आणि यम', 'निश्चयाचा महामेरू' आणि 'बिन खात्याचा मंत्री' यांचा समावेश आहे. 'जगणारी माणसे' या एकांकिकेत लहानांपासून तर वृध्दांपर्यंतची सर्व माणसे केवळ पोटासाठी जगतात. परंतू जगतांना ते जीवनामध्ये विनोदाला स्थान देतात. अशा प्रकारचे वर्णन लक्ष्मण आणि बगळया यांचे वृध्दांशी झालेल्या संवादातून दिसते. या एकांकिकेत काही ठिकाणी द्विअर्थी विनोदही आहे. 'डॉक्टर रोगी आणि यम' ही देखील विनोदी एकांकिका आहे. यामध्ये डॉ.राजे आणि सेवक बावळे यांच्यासोबत काही रोग्यांच्या संवादातून अनेक विनोदी घटना प्रसंग आगळया वेगळया पद्धतीने रंगविलेली आहेत.

'निश्चयाचा महामेरू' या ऐतिहासिक एकांकिकेमधून छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे श्रद्धास्थान नारायणभट देव यांच्यातील श्रद्धा आणि कर्तव्य मोठया मार्मिक पद्धतीने रंगविलेले आहे. या एकांकिकेतून छत्रपती शिवाजी महारांजांचा परखडपणा, निर्ण यक्षमता, धोरणीपणा व स्वभाव यांचे दर्शन घडते.

बाल कुमारांच्या मनावर शिवशाहीतील प्रसंगाच्या रूपाने संस्कार करण्याचा प्रयत्न या एकांकिकेत केलेला दिसतो. या एकांकिकेत विनोदाला स्थान नाही उलट त्यातून आवेश आवेग आणि उत्स्फूर्तपणा इ.प्रगट होतात. शिवाय एकांकिकेची भाषा ऐतिहासिक असून ती आवेशपूर्ण शैलीत लिहिलेली आहे.

'बिन खात्याचा मंत्री' ही देखील एक स्त्री पात्र विरहीत विनोदी एकांकिका आहे. वेगवेगळया रसांचे ज्ञान असलेले मंत्री आपले बोलणे त्या त्या रसातून व्यक्त करतात आणि विनोद निर्मिती होते. जितू मात्र सर्वज्ञान असलेला सेवक असल्यामुळे त्याची नेमणूक बिन खात्याचा मंत्री म्हणून केली जाते.

'तीन एकांकिका' या पुस्तकात बाल कुमारांसाठी 'जेव्हा देव अवतरतात' 'मशाल' आणि 'तेजस्विनी' या एकांकिकांचा अंतर्भाव आहे. 'जेव्हा देव अवतरतात' या एकांकिकेत असलेला विनोद शैक्षणिक पातळीवरचा आहे. सुरूवातीला मुलांच्या संवादात विनोद आहे. पुढे मात्र देशप्रेम, राष्ट्रभक्ती याकडे विषय वळतो. 'मशाल' ही मुलांना देशभक्तीने प्रेरीत करणारी एकांकिका आहे. मुलांमध्ये देशप्रेम निर्माण व्हावे व वाढावे हा त्यांचा हेतू या लेखानामागे दिसतो. 'तेजस्विनी' या एकांकिकेत बालिका आश्रमातील विविध समस्या हाताळल्या आहेत. वाट चुकलेल्या उतारवयात पश्चाताप झालेल्या एका वद्धेची ही करूण कहाणी आहे. जीवना बद्दल गंभीरपणे विचार करायला ही एकांकिका आपणास भाग पाडते.

डॉ.जोशी यांनी बाल कुमारांसाठी 'दत्तक राजपुत्र' हे बालनाटयही लिहिलेले आहे. या दोन अंकी बालनाटयामध्ये निपुत्रिक राजे साहेबांच्या गादीला वारस म्हणून स्वतःच्या मुलाला दत्तक म्हणून देऊ इच्छिणा-या प्रधानजींची कुटील नीती अत्यंत विनोदी पद्धतीने चित्रित केलेली आहे.

**बाल कुमारांसाठी वृत्तपत्रातून प्रबोधन ः**

वृत्तपत्र हे प्रबोधनाचे उत्तम माध्यम आहे. नित्यनेमाने वृत्तपत्र वाचणारी मुले अनेक आहेत. वृत्तपत्राच्या बाल कुमार वाचंकासाठी डॉ.जोशी यांनी काही सदरे चालविली आहेत. त्यात प्रामुख्याने 'दै.लोकसत्ता' मध्ये महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याने नेमून दिलेली दहा नैतिक मूल्ये यावर प्रत्येक मूल्यावर एक मूल्य कथा लिहिली. पुढे 'मुलांच्या मूल्यकथा' या नावाने हे पुस्तक प्रसिध्द झाले. या पुस्तकाला कोल्हापूरच्या साहित्य सभेचा रा.गो.शेवडे पुरस्कारही मिळाला.

'सकाळ' मध्ये सुट्टीच्या कालखंडात 'पाखरांची शाळा' या सदरात मुलांची सतराव्यक्तिचित्रे त्यांनी लिहिली. पुढे या व्यक्तिचित्राचेंही पुस्तक 'पाखरांची शाळा' या नावाने प्रसिध्द झाले आहे. शिवाय 'सकाळ' मध्ये सात महिने 'बोधकथा' हे सदर दररोज लिहिले. यामध्ये त्यांनी विद्यमान काळातील विविध व्यक्ती व प्रसंग यांच्या आधारे बोधकथा लिहिल्या. त्या बाल कुमार वाचकांच्या चांगल्याच पसंतीला उतरल्या.

त्यानंतर डॉ.जोशी यांनी १ जानेवारी २००१ पासून दैनिक 'लोकमत' मध्ये वर्षभर दररोज चरित्रकथांचे स्तंभलेखन बाल कुमारांसाठी केले. वर्ष २००९ ते २०१० या दरम्यान डॉ.जोशी यांनी दै.सकाळ या वृत्तपत्रातील 'फुल २ धमाल' या शैक्षणिक मनोरंजनात्मक सदरात 'बोधकथा' हे सदर सुध्दा चालविले होते.

नव्यानेच त्यांचे आत्मचरित्र प्रसिध्द झाले आहे त्याचे नाव 'बखर एका सारस्वताची' असे आहे.

## १.४. भारतातील मूल्यशिक्षणाचा विचार ः

### मूल्यांचे स्त्रोत ः

मूल्ये ही भावात्मक संकल्पना आहे. मूल्ये कोठेही तयार मिळत नाहीत. ती कृत्रिम पध्दतीने तयार करता येत नाहीत. ती वर्तनातून व्यक्त होत असतात. वर्तनाला वळण देणा-या, वर्तनातून नियंत्रण ठेवणा-या वर्तनाचे दिग्दर्शन करणा-या बाबी मूल्यांचे स्त्रोत ठरतात.

१. **माणूस** ः "माणूस हे मूल्यांचे उगमस्थान आहे. माणूस जस जसा विकसित होत गेला तसतशा त्याच्या गरजा वाढू लागल्या. बदलत्या परिस्थितीची आव्हाने त्याला साद घालू लागली. त्या आव्हानांना प्रतिसाद देण्यास व आव्हाने पेलण्यासाठी स्वावलंबन, संवेदनशीलता, विचारक्षमता, नवनिर्माणक्षमता, शोधकवृत्ती, संशोधनवृत्ती, अध्ययनशीलता, मर्मदृष्टी, धाडस, निर्णयक्षमता, निराकरणक्षमता, निरीक्षणक्षमता, आत्मपरीक्षण, आत्मविश्वास, अचूकता, समयसूचकता, उत्स्फुर्तता, चिकित्सा, स्मृती, वेळेचे नियोजन, वेळेचा सदुपयोग, स्वयंशिस्त, शास्त्रीयं विचारसरणी, शास्त्रीय कार्यपध्दती, अभिवृत्ती अशी मूल्ये मानवात विकसित झाली."[१.९]

२. **कुटुंबसंस्था** ः जीवनकलहात टिकून राहण्यासाठी आदिमानवामध्ये जवळीक निर्माण झाली. त्यातून कुटुंबसस्था उदयास आली. जिज्ञासापूर्ती परस्परावलंबन परस्पर सहकार्य विचार विनियोग हया मूल्यांना खरे कुटुंबसस्थेनेच जन्म दिला. वंशपरंपरेला स्त्रियांमुळेच स्थैर्य मिळाले. त्यामुळे स्त्रियांना महत्वाचे स्थान मिळाले. "यत्र नार्यःस्तु पुजयन्ते रमन्ते तत्र देवत ः"[१.१०] (जेथे स्त्रियांची पूजा होते तेथे देवता रमतात) (मनुस्मृति ३.९६) हे मूल्य उदयाला आले.

"एकत्र कुटुंबपध्दतीमुळे आज्ञापालन, आदरभाव, कर्तव्यपालन, त्याग, शिस्त, नियमितपणा, वक्तशीरपणा इतरांच्या हक्काची जाणीव ही मूल्ये विकसित झाली. 'जग जगते ते मातेच्या संस्कारामुळे' हे अमूल्य सूत्र सिध्द झाले ते कुटुंबसंस्थेतच. काळानूसार एकत्र

कुटुंबपध्दतीचा ऱ्हास व विभक्त कुटुंबध्दतीमुळे निणर्यक्षमता स्वतःच्या अभिरूचीची जाणीव, स्वतःच्या क्षमतांची जाणीव, महत्त्वकांक्षेची जाणीव आत्मविश्वास, स्वावलंबन या शैक्षणिक, व्यावसायिक मूल्यांचा विकास झाला."

जसे मूलाशिवाय घराला घरपण येत नाही तसे मूल्याशिवाय ही घराला घरपण येत नाही आणि म्हणूनच कुटुंब म्हणजे मूल्यांची माता होय.

३. **समुदाय** : "स्वरंक्षणासाठी माणूस समुदाय करून राहू लागला. टोळी हे समुदायाचे प्राथमिक रूप. विशिष्ट टोळया विशिष्ट व्यवसाय करू लागल्या. त्यामुळे श्रमप्रतिष्ठा, व्यावसायिकता, वैचारिक आदानप्रदान, बंधुभाव, परस्पर सामंजस्य, समुहनिष्ठा अशा मूल्यांचा विकास झाला. टोळयांमुळे एकात्मता, समता, ममता, माणुसकी, श्रमविभागणी इ. मूल्ये ही उदयास आली.

समुहांमुळे नेतृत्व, अनुयायित्व, लढाऊवृत्ती, शौर्य, धैर्य, संघर्ष, त्याग, बलिदान, समर्पण अशी मूल्ये वाढीस लागली."[१.११]

४. **समाज** : मानव समाज करू राहू लागला. एकमेकांच्या आधाराशिवाय आपण जगू शकत नाही. हे माणसांना कळले. मानवाची दिशाहीन भटकंती थांबली. मानवी जीवनाला स्थैर्य लाभले. स्थिरावलेल्या मानवी जीवनाला पुढे नेण्यासाठी नीतीशास्त्र उदयाला आले.

"नीतीशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, जीवनशास्त्र, अध्यात्मशास्त्र, वैद्यकशास्त्र, समाजशास्त्रांशी घनिष्ट संबंध येत गेला. नीतीशास्त्राने समाजजीवन व्यापून टाकले आणि त्यामुळेच सामाजिकता, परस्पर सहकार्य, सामाजिक सुसंवाद, सामाजिक भान, सामाजिक जाण, सामाजिक ज्ञान, सामाजिक सुसंवाद, सामाजिक समायोजन, सामाजिक धारणा, सामाजिक उत्तर दायित्व, सामाजिक बांधिलकी, सामाजिक सामीलकी, सामाजिक नियमांचे पालन, बंधुता, समाजवाद, सामाजिक अस्मिता, सेवा अशी मूल्ये विकसित झाली. समाज हा नेहमी समाजमान्य मूल्यांच्या चौकटीत राहतो. मूल्यांना सामाजिक गतिमत्व लाभते ते समाजामुळेच."[१.१२]

५ . **विनिमय** ः स्वतःच्या सगळया गरजांची पूर्तता स्वतःच करणे मानवाला शक्य झाले नाही . गरजा भागवण्यासाठी विनिमयाची प्रक्रिया उदयास आली . विनिमयाचे माध्यम म्हणून चलन अस्तित्वात आले . व्यक्तीचे श्रम चलन आर्थीक मूल्य विकसित झाले .

"आर्थिक समानतेची विनिमयाच्या संतुलनाचा विचार पुढे आला . त्यातुन स्वतःच्या हक्कांची जाणीव . इतरांच्या आर्थिक हक्कांची जाणीव, आर्थिक कर्तव्यांचे पालन, कर प्रदान परिश्रमांच्या आर्थिक मोबदल्याची जाणीव, कर्तव्याच्या मोबदल्याची जाणीव, आर्थिक सवलती, शिष्यवृत्ती, शुल्क माफी, सहाय्यक निधी, देणगी, आर्थिक नियोजन, बचत, काटकसर, परिग्रह प्रमाण, आर्थिक चारित्र्य अशी आर्थिक मूल्ये विकसित झाली ."[१.१३]

६ . **उदयोगधंदे व्यवसाय** ः चरितार्थ चालावा गरजांची पूर्तता व्हावी हया हेतूंनी मानवाने विविध उदयोगधंदे व्यवसाय सुरू केले . त्यामुळे व्यावसायिकता, व्यवसायकता, व्यवसाय अभिरूची, अभिवृत्ती, अभियोग्यता, वेळेचे, श्रमाचे, पैशांचे, नियोजन, योजकता, उपक्रमशीलता, नवोपकमशीलता, अभिव्यक्ती, प्रदर्शनीयता, लोकाभिमुखता, व्यवसायाभिमुखता, नम्रता,

"उद्यमशीलता, उद्योजकता, सेवा, व्यवस्था, समन्वय, व्यवहार्यता, नियमितपणा, वक्तशीरपणा, क्षमता, प्रशासन, सुलभता, वैचारिक आदान प्रदान, सुसंवाद, दक्षता, सक्षमता, विकसनशीलता, उत्पादनक्षमता, मनुष्यबळाचा योग्य उपयोग करून घेण्याची क्षमता, लोकसंग्राहकता, वस्तुसंग्राहकता, तंत्रसंग्राहकता, लोकमान्यता, सर्जनशीलता, विश्रांती, कामात बदल, अनुधावनता, नावीन्याची ओढ, जनमानसाची जाणीव, उणिवांची जाणीव, शास्त्रीय कार्य पध्दती, व्यावसायिक शिस्त, नेतृत्व, अनुयायित्व, शिकाऊवृत्ती, मूल्यनिर्धारण, आयनिर्धारण, खिलाडूवृत्ती, सहनशीलता, वाक्कटुता, नुकसान पचविण्याची वृत्ती, योग्य विनियोगाची वृत्ती, शांतवृत्ती, करारीपणा, करार करण्याची वृत्ती, सहकार्य, धैर्य, संघटन, कौशल्य अशा मूल्यांची निर्मिती झाली ."[१.१४]

७. **भाषा** ः "अनुभवांचे विचारांचे आदानप्रदान व्यक्त करण्यासाठी भाषा उदयाला आली. देहबोली हे भाषेचे प्राथमिक स्वरूप ठरले. बोलघेवडेपणा, मितभाषिक, मंडन खंडन, संवाद विसंवाद, आरोहअवरोह, एकसुरीपण, सहजता, कृत्रिमता, लयबध्दता, साधेपणा, भावानुकुलता, दक्षता, स्पष्टवक्तेपणा, संदिग्धता, विस्तृतपणा, संक्षिप्तपणा, सरळपणा, सूचकता, पुढाकार, अनुमोदकता, चर्चा, दृष्टांत नियम उद्गमन, अवगमन सुत्रबध्दता, गतिमानता, संथपणा, ओघ तुटकपणा, पूर्णता अपूर्णता, गांभीर्य, हलकेफुलकेपणा, पल्लेदारपणा, त्रोटकपणा, वक्रोक्ती, साधुक्ती, अन्योक्ती, सरळ कानउघडणी, अतिशयोक्ती, यथास्थितित्व, वस्तुनिष्ठा, व्यक्तिनिष्ठा, आत्ममग्नता, समाजमग्नता, वास्तवता, काल्पनिकता, आलंकृती, अनालंकृती, उल्लेख, अनुल्लेख, उत्स्फूर्तता, साचेबध्दता, नागरता, ग्रामीणता, गद्यमयता, पद्यमयता, रसग्रहण, समीक्षण, काव्यात्मकता, वैज्ञानिकता अशी कितीरती मूल्ये भाषेच्या माध्यमातून उदयास आली.

शिवाय भाषण, संभाषण, समयोचित, बोलणे, म्हणी, वाक्प्रचार, शब्दचित्र, अभिनंदन, सांत्वन, मतप्रदर्शन, बहुभाषित्व, अनुवाद, भाषांतर, दुभाषित्व, भाषासंकर अशी मूल्ये भाषेमुळे वाढली."[१.१५]

८. **साहित्य** ः "भावनांचा उद्रेक आणि विचारांचे चिंतन, मनन, मंथन शब्दबध्द होऊ लागले. अशा रीतीने साहित्य निर्मिती होऊ लागली. साहित्याच्या पसंती नापसंतीच्या कारणामुळे साहित्यातील गुण चांगले गुण, वाईट गुण हयाबाबत विचार विनिमय मंथन होऊ लागले आणि त्यातून रसात्मकता, आशयघनता, कल्पनारम्यता, वास्तवता, संभवनीय, सत्य, सौंदर्य, काव्यात्मकता, रचनात्मकता इत्यादी वाङ्मयीन मूल्ये उदयाला आली."[१.१६]

मात्र ज्या साहित्यात जीवनातील वास्तवाचे चित्रण झाले ते साहित्य संघर्ष वास्तवता, नवसामाजिकता, संवेदनशीलता, धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टीकोण, गतिमानता, आधुनिकता अशा जिवनाभिमुख पुरोगामी परिवर्तनशील मूल्यांचे स्त्रोत ठरले आहे.

ज्या साहित्यात जीवनातील आदर्शाचे मंगल चित्रण झाले त्या साहित्यातून प्रेम, वात्सल्य, अहिंसा, न्याय, समता, ममता, त्याग, बंधुता, सेवा, करूणा, मैत्री, अपरिग्रह, सहानुभूती, जीवनाची निरामयता अशी शाश्वत मूल्ये झंकृत होत असतात.

**९. कला :** मानवाच्या भावभावनांना आविष्कृतीसाठी गवसलेले नितांतसुंदर माध्यम म्हणजे कला शिल्पकला, चित्रकला, गायनकला, वादनकला, नृत्यकला, वक्तृत्वकला, संभाषणकला, लेखनकला, अभिनयकला, दिग्दर्शनकला, संघटनकला, व्यवस्थापनकला, संपादनकला अशी कलांची कितीतरी नावे सांगता येतात.

"कलेकलेने कलांची संख्या वाढत जाणारी आहे. ती चौसष्टच्याही पुढे जाते. कलेचा स्वतंत्र अविष्कार होत राहिला तर कला नवनवीन मूल्यांचा स्त्रोत ठरते. एकाग्रता कलेचा अविष्कार कलाभिरूची, सौंदर्यदृष्टी, नावीन्य शोधकता, सर्जनशीलता, अभिव्यक्तीची प्रयोगशीलता उदातता तर कलेच्या आविष्कारातून सत्य, करूणा, अहिंसा, परिवर्तनशीलता, प्रायोगिकता, पुरोगामित्व ही जीवनविषयक मूल्ये प्रत्ययाला येतात दोन्ही धारणांचा समन्वय असेल तर कला ही कलात्मक व जीवनविषयक मूल्यांचा स्त्रोत ठरते."[१.१७]

**१०. खेळ व क्रीडा :** "सहजप्रवृत्तीतून खेळ व किडा यांचा जन्म झाला. खेळाची आवड तयारी अध्ययनशीलता, प्रशिक्षकाबद्दल आदर, सहकार्याबरोबरचे प्रेम, बालोपासना, मनोबल सराव, अभ्यासवृत्ती, नियमांची जाणीव, नियमांचे पालन, एकाग्रता, संघर्षप्रियता, सांघिक भावना, नायकत्व, अनुयायित्व, प्रतिस्पर्ध्याबद्दल आदर, मर्मदृष्टी, निर्णयक्षमता, समयसूचकता, उत्स्फूर्तता, मानसिक संतुलन, जिंकण्याची जिद्द, रंजकता, प्रेक्षकाबद्दल आदर, त्यांच्या भावनांची कदर, निर्मोही वृत्ती, सामाजिक उत्तरदायित्व, संग्राहकता, सकारात्मकता, विधायकता, गुणग्राहकता, सर्जनशिलता, संशोधन वृत्ती, पराभवाचे शल्य जपण्याची वृत्ती, चिकित्सक वृत्ती, अशा विविध मूल्यांनी खेळ व किडेचे मैदान गजबजलेले असते."[१.१८]

**११. प्रवास ः** "माणसाला जेवढा निवास प्रिय असतो तेवढाच प्रवासही प्रिय असतो. प्रवासाचे नियोजन, आयोजन, व्यवस्थापन, जागरूकता हया मूल्यांची स्थानके प्रवासातचं लागली. नवे मार्ग नवे भूभाग शोध सर्जकता सावधानता निखळ आनंद प्रवासवर्णन आपला इतिहास सहअनुभूती निरीक्षण सहज अभ्यास ही तर प्रवासाची सहलीची सहचर मूल्येच आहेत."[१.१९]

## १.४.१ ः विविध धर्म व मूल्यशिक्षण ः

धर्म म्हणजे आपल्या प्रदीर्घ चिंतनपर तपस्येनंतर मानवी जीवनाच्या इतिकर्तव्यतेचा मानवाने घेतलेला शोध जीवनाला नियंत्रित आणि मार्गदर्शित करणारी नैतिक मूल्ये हा धर्माचा गाभा असल्यामुळे धर्माची आभा मानवी जीवनाला उजळून टाकते. कोणताही धर्म घ्या मूल्यांची अमोल रत्ने त्यात सापडतात.

**१. हिंदूधर्म ः** " 'आ नो भद्राः कृतवो यन्तु विश्वतः' (ऋग्वेद १.८९) अर्थात 'सा-या विश्वातून उदात्त विचार आमच्या अंतःकरणापर्यंत येऊ दे' ही हिंदू धर्माने दिलेली हाक म्हणजे अवघ्या विश्वातल्या महन्मंगल मूल्याचे स्वागतच होय. 'अवघे विश्वचि माझे घर' (संत ज्ञानेश्वर) हया वैश्विक मूल्याचा उद्घोष हया धर्माने केला आहे. ( 'ईशावास्यमिदं सर्व ई शावास्योपनिषद १) अर्थात सर्व जगत ईश्वराने व्याप्त आहे. हे हया धर्माचे सार आहे. विश्व ही ईश्वराची निर्मिती आहे.

'ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ज्ञान वैराग्ययोश्वैय षण्णां भग इलीरणा' (विष्णुपुराण ६.५.७४) अर्थात ऐश्वर्य धर्म यश संपत्ती ज्ञान आणि वैराग्य हे सहा गुण ईश्वराचे स्वरूप दाखवितात हया सहा गुणांची म्हणजेच मूल्यांची प्राप्ती म्हणजे ईश्वराची प्राप्ती ठरते.

धर्म हा पुरूषार्थ प्राप्त करावयाचा आहे. तो दहा लक्षणांच्या प्राप्तीतून घृतिःक्षमा दहो स्तेयं शौचमिन्द्रि (मनुस्मृती ६.९२) अर्थात धर्म, क्षमा, मनःसयंम, अस्तुेय, शुचिता,

इंद्रियनिग्रह, तत्वजिज्ञासा, आत्मज्ञान, सत्य, अक्रोश ही धर्माची दहा लक्षणे होत. ही दहा लक्षणे म्हणजेच दहा मूल्येच आहेत.

श्रीमद्‌भगवदगीतेच्या सोळाव्या अध्यायात गुणांना दैवी संपदा म्हटले आहे.

‘अभयं सत्वसंशुद्‌धिर्ज्ञाज्ञयोगव्यव स्थितिः □

दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् □१ □

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् □

दया भुतेष्वलोलुप्त्वं मार्दवं हीरचापलन् □२ □

तेजः क्षम घृतिः शौचमद्रोहे नातिमानिता □

भवन्ति संपदं दैवीमभि जातस्य भारत □३ □

अर्थात अथ सत्वसंशुध्दी ज्ञानयोगता स्थिरता दान दम यज्ञ स्वाध्याय तप आर्जव, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शान्ती, अपैशुन (सौजन्य सत्यता असे पर्याय गीताईत विनोबांनी दिले आहेत.) भूतदया, अलोलुपता, मार्दव, विनयशीलता, दृढता, तेज, क्षमा, धृती, शौच, अद्रोह, अंगर्व हे ज्यांचे गुण आहेत ते दैवी गुण आहेत. हे दैवी गुण म्हणजेच मूल्ये होत हया मूल्यांचा संदेशच श्रीमद्‌भगवद्‌गीता देते.

ॐ असतो मा सद्‌गमय □तमसो मा ज्योतिर्गमय मृत्योर्मा मृतं गमय □ (बृहदारण्यकोपनिषद १.३.८४)

अर्थात ः मला असत्याकडून सत्याकडे ने. मला अंधारापासून प्रकाशाकडे ने. मृत्यूपासून अमृताकडे ने. अशा विकासशील मूल्यांचा उद्‌घोष हया धर्माने केला आहे. हया धर्माने मूल्यांची मागणीही करायला सांगितली आहे. हे मागणे स्वतःचसाठी तर सर्वांसाठी मागायला सांगितले आहे. ते असे सर्वेःपि सुखिनःसन्तु □सर्वे सन्त निरामयाः □सर्वे भद्राणि पश्चन्तु □

माकश्चि दुःखमाक्षुयात □ही हया धर्माची प्रार्थना म्हणजेच मूल्यांची कार्यात्मक व्याख्या होय. आणि म्हणूनच हिंदू धर्म हा 'सहिष्णुता' हया मूल्याचा मुख्य स्त्रोत ठरला आहे."[१.२०]

**२. जैन धर्म ः** सव्वे जीवां वि उच्छंति जी विऊं (समणसुत्तं १४७) अर्थात सर्व जीव जगू इच्छितात हया जीवनमूल्यांचा उद्घोष जैन धर्माने केला आणि 'जगा आणि जगू दया' हा अभयाचा मूलमंत्र आणि मूल्यमंत्र सर्व जगाला दिला हा मंत्र सार्थ होण्यासाठी अहिंसा हया मूल्याला परमार्थ मानले. सर्व जगाने जगावे म्हणून हिंसेचे कृत्यच नव्हे तर हिंसेचा विचार ही नाकारून अहिंसा ही जीवनाची कृतकृत्यता ठरवली. म्हणून अहिंसेच्या सूक्ष्म पालनावर भर दिला. त्यासाठी अहिंसेला सत्य अस्तेय ब्रम्हचर्य व परिग्रहप्रमाण हया व्रतांची जोड दिली. ही व्रते म्हणजे विवेकपूर्ण वर्तनातून अभिव्यक्त होणारी मूल्येच होत.

हया धर्माने मानवाला श्रेष्ठत्व बहाल केले आहे. एकप्रकारचे माणसाचे मूल्यनिर्धारण केले आहे. मात्र 'समता सर्वभूतेषू' (अमितगतीकृत सामायिक पाठ ६) समताभाव धारण करणे त्याच बरोबर संयम व तप, आचार, विचार, उच्चार, शुध्दता, क्षमा, मार्दवी, आर्जव, मनाची सरलता, शौच, त्याग, ब्रम्हचर्य हया उत्कृष्ट मूल्यांची जोड दिली आहे.

मोक्षप्रत वाटचाल करण्यासाठी जैन धर्माने सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान व सम्यक चारित्र्य हया तीन मूल्यरत्नांचा पुरस्कार केला आहे.

"खम्मामि सव्वजीवाणं सव्वेजीवा खमंतुमे □मित्ती मे सव्वभूदेसू वेरं माज्झं ण केण वि □(समणसुत्तं ८६) अर्थात मी सर्व जीवांना क्षमा करतो. सर्व जीव मला क्षमा करोत. माझी सर्व जीवांशी मैत्री आहे. माझे कुणाशीही वैर नाही. सर्व जीवांप्रती मैत्रीचा निरपेक्ष प्रेमळ भाव पुरस्कृत करणारा हा धर्म सर्व मांगल्याची सर्व कल्याण्याची प्रार्थना करायला सांगतो. ही प्रार्थना म्हणजे जैन धर्माने पुरस्कृत केलेल्या मंगलमय मूल्यांची कार्यात्मक व्याख्याच होय. म्हणून हा धर्म ही हया विविध मूल्यांचा मुख्य स्त्रोत ठरला आहे."[१.२१]

**३. बौध्द धम्म ः** "'स्व' चा विकास 'स्व' च्या प्रकाशात होत असतो. 'अत दीप भव' स्वतःच स्वतःचा दीप हो 'स्व' ला प्रकाशित करणा-या हया मूल्याचे दीप प्रज्वलन बौध्द धम्माने केले. 'स्व' च्या प्रकाशासाठी चित्तशुध्दी सचादरण हे मूल्य आवश्यक मानले.

शील हे मूल्य महत्वपूर्ण मानले आहे. ते पुढील गाथेवरून स्पष्ट होते. चन्दनं तगरं वा पि उप्पलं अथ वस्सिको एतेसं गन्धजातानं सीलगन्धो अनुत्तरो (धम्मपद ४.१२) अर्थात चंदन किंवा तगर कमळ किंवा जुई यांच्या सुगंधापेक्षा शीलाचा सुगंध उत्तम असतो.

सदाचारासाठी 'पावन पाथाचे' पाच तत्वाचे पालन करायला सांगितले आहे. ही पाच तत्वे अशी ः १. हिंसा न करणे २.चोरी न करणे ३. असत्य कथन न करणे ४. व्यभिचार न करणे ५. मादक प्राण्याचे सेवन न करणे. ही पाच तत्वे म्हणजे पंचशील होय. जीवनाचे मानदंड ठरणारी ही शीले म्हणजे जीवन मूल्ये होत."[१.२२]

विचारपूर्ण आचरणाचे मूल्य पुरस्कृत करताना धम्माने अष्टांग मार्गाचे विवेचन केले आहे. ते पुढील प्रमाणे ः

१. सम्यक दृष्टी ः मिथ्या मान्यतेचा त्याग मुक्त चिंतन मुक्त चित्त

२. सम्यक संकल्प ः कल्याणकारी ध्येय

३. सम्यक वाणी ः सत्य विनम्र व भद्र कथन

४. सम्यक कर्मान्त ः दुस-याच्या भावना व अधिकारांचा आदर करून केलेले कर्म

५. सम्यक आजीविका ः न्यायपूर्ण उपजीविंका

६. सम्यक व्यायाम ः अष्टांगिक मार्गाला पूरक सकारात्मक प्रवृत्तींची निर्मिती व विकास

७. सम्यक स्मृती ः चित्ताची निरंतर जागृती

८. सम्यक समाधी ः “लोभ, द्वेष, आलस्य, विचिकित्सा व अनिश्चय हया पाच बाधांवर विजय होय.

हा अष्टांगिक मार्ग म्हणजे जीवनाचा विशुध्द करणा-या मूल्यांचा विचारपूर्वक केलेला उद्घोष होय. प्रत्येकाने सदगुणचरण करावे म्हणून धम्माने सद्गुण पंथ सांगितला आहे. शील, दान, उपेक्षा, अनासक्ती, नैष्कार्म्य, कामवासनांचा त्याग, वीर्य सम्यक, श्रम, शांती, क्षमाशीलता, सत्य, अंधिष्ठान, दृढ संकल्प, करूणा, प्रेमपूर्ण, दया, मैत्री, बंधुभावाचा विस्तार या आचरणातून व्यक्त करावयाचे हे दहा सद्गूण म्हणजे दहा मूल्येच होत. निर्वाण हा बौध्द धर्माने पुरस्कृत केलेल्या सर्व मूल्यांचा केद्रंबिंदू आहे.

यानि ध भूता भूतानि समागतानि □भूम्मानि वा यानि व अन्तलिक्खे □

सब्बे व भूता सुमना भवन्तु □अथो पि सक्कय सुणन्तु मासितं □□

अर्थात जे भूमिगत किंवा अंतरिक्षातील प्राणी येथे जमले असतील ते आनंदित होवोत आणि लक्षपूर्वक सुभाषितांचे श्रवण करोत. बौध्द धम्माची ही ‘सब्बसुखगाथा’ म्हणजे परम पवित्र मूल्यांची कार्यात्मक व्याख्याच होय. म्हणूनच हा धम्म करूणा हया मूल्यांचा मुख्य स्त्रोत ठरला आहे.”[१.२३]

४. **ख्रिस्ती धर्म** ः “प्रेषित येशू ख्रिस्ताचा उपदेश म्हणजे ख्रिस्ती धर्म होय. ‘बायबल’ हा ग्रंथ हया धर्माचे ‘अध्यात्मिक महाकाव्य’ होय. ख्रिस्ती धर्माने परमेश्वराला मानवी जीवनाचे सर्वोच्य मूल्य मानले. परमेश्वर म्हणजे करूणा प्रेम क्षमा हयांचा उच्चतम अविष्कार होय. हया संकल्पनेत समता हे मूल्य अंतर्भूत आहे. ईश्वर हा परमपिता आहे. सारेजण त्याची लेकरे आहेत. हया शिकवणीतून हया धर्माचे ‘विश्वबंधुत्व’ हया मूल्याचा उद्घोष केला आहे. प्रेम, सद्भावना ही मूल्ये तळमळीने सांगितली आहेत.

हे पित्या त्यांना क्षमा कर. ते काय करत आहेत हे त्यांना माहित नाही. ज्यांनी येशूला कुसावर चढवले त्यांच्यासाठी येशूने केलेली ही प्रार्थना म्हणजे क्षमा हया मूल्याचा सर्वोच्च जयघोष आहे.

५. **इस्लाम धर्म** ः इस्लाम हया शब्दाचा अर्थ ईश्वराप्रती संपूर्ण शरणागती. 'दिव्यकुरआन' हा हया धर्माचा ग्रंथ होय. महमंद पैगंबराच्या दिव्य वाणीतून आलेले ईश्वराचे संदेश आदेश कुराणात ग्रंथबध्द झालेले आहेत. कुराण म्हणजे हृदयाची हाक असे साने गुरूजींनी म्हटले आहे. हया धर्माने पुढील पाच मूल्यांचा पुरस्कार केला. १. तक्ता (धर्मश्रध्दा) २. इख्लास ( ईश्वरासाठी सद्वर्तन) ३. तवक्कुल (ईश्वराच्या कृपेवर पूर्ण विश्वास) ४. सब्र ५. शुक्र.

क्षमा, न्यायबुध्दी, समर्पणभाव, धर्मोचरण, सदाचरणी, संयम, सत्संग, अनासक्ती, नम्रता, निःस्वार्थीपणा, बंधुभाव, कर्तव्य, सहनशीलता, कृतज्ञता, दया, करूणा, कृपा, व प्रेम हया मूल्यांचा समावेश वरील पाच तत्वात आहे. हा धर्म समता हया मूल्याचा पुरस्कर्ता आहे."[१.२४]

६. **शीख धर्म** ः "'गुरू नानक' (इ.स. १४६९ - १५३८) हे शिख धर्माचे संस्थापक होत. शीख म्हणजे शिष्य. गुरू नानकांनी शीख धर्माची स्थापना 'गुरूत्व' व 'शिष्यत्व' हया दोन मूल्यांची प्राणप्रतिष्ठा केली आहे. हया धर्माने गुरूकृपा हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानले.

गुरू मेरा पूजा गुरू गोविंद □

गुरू मेरा परब्रम्ह गुरू भगवन्तु □□

अर्थात गुरू हीच माझी पूजा. गुरू हाच गोविंद गुरू हेच परब्रम्ह. गुरू हाच भगवंत हया शब्दांत गुरू नानकांनी गुरूचे महात्म वर्णन केले. गुरू हे ज्ञान वैराग्य विवेक व मोक्ष हया मूल्यांचे प्रतिक आहे.

'गुरूग्रंथसाहिब' हा शीखांचा धर्मग्रंथ होय. हया ग्रंथात सर्व धर्माच्या मूल्यतत्वांचा सुंदर समन्वय आढळतो. 'गुरूग्रंथसाहिब' म्हणजे सर्वधर्मसमन्वय सर्वधर्मसमभाव व समता एकता हया मूल्यांचा मंगल उद्घोष होयं. सद्गुरू, सत्संग व सत्नाम ही तीन मूल्ये या धर्माची प्राणभूत तत्वे होत. हे जग म्हणजे ईश्वराचे विश्वरूप आहे. विश्वबंधुत्व हाच सर्वोच्च धर्म होय. स्वावलंबन, सहकार्य, श्रमप्रतिष्ठा हया मूल्यांचाही पुरस्कार केला. 'आत्मविजय' हाच विश्वविजय होय. असा उपदेश करणा-या या धर्माने व्यक्तिग व वैश्विक मूल्यांमध्ये भावबंध निर्माण केला. माणसाबरोबरच मूल्ये निर्माण झालेली आहेत व सर्व धर्मातून मूल्यशिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे."[१.२५]

## १.४.२ : संतपरंपरा आणि मूल्यशिक्षण :

"धर्माने पुरस्कृत केलेल्या अध्यात्माचा वसंत पल्लवित आणि प्रफुल्लित झाला तो संतांमुळेच. संतांनी अध्यात्माच्या गाभा-यातील मूल्यांची प्राणप्रतिष्ठा मानवी मनाच्या गाभा-यात केली. संत आणि मूल्य हयांचे नाते तोलामोलाचे ठरले. संत आणि मूल्य हया दोन शब्दांची संगत कधी सुटली नाही. असे म्हटंल्यावर संत कबीरांची आठवण येते 'पोथी पढि पढि जग मुवा पण्डित भय न कोई ढाई आखर प्रेम का पढे सो पण्डित होई कोरडया पांडित्याला प्रेम हया मूल्याची ओळख संत कबीरांनी करून दिली. 'दया धर्म का मूल है' पाप मूल अभिमान हया सोप्या शब्दांत संत तुलसीदासांनी धर्म हया मूल्याचे मूळ स्पष्ट केले.

जो खांडावया घाओ घाली का लावणी जयाने केली दोघा एकच सावली वृक्ष दे जैसा ही धर्मवन्सलता संत ज्ञानदेवांनी उद्घोषित केली 'मुलाम्याचे नाणे | तुका म्हणजे नोहे सोने | अवगुणांचे हाती आहे अवघीचफाजिती भेदाभेद भ्रम अमंगळ असा इशारा देत संत तुकारामांनी 'कोणाही जीवाचा न घडावा मत्सर' अशी मूल्यांची अभंगवाणी झंकृत केली. जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधु ओळखावा देव तेथेचि जाणावा हया अभंग शब्दात साधुत्व देवत्व हया मूल्यांची कृती ओळख संत तुकारामांनी सर्वसामान्य माणसाला करून दिली.

संत नामदेवांनी 'कीर्तनाचे रंगी' नाचत मूल्यांचा 'ज्ञानदीप' प्रज्वलित केला. 'दळता कांडिता तुज गाईन अनंता' असे गात संत जनाबाईनी कर्तव्यदक्षता हया मूल्यांचा कृतिपर पाठ सादर केला. 'कांदा मुळा भाजी | अवघी विठाबाई माझी □असे म्हणत संत सावता माळी हयांनी उक्तीला कृतीची जोड देणा-या मूल्याचा मळा फुलविला. संत गोरोबा काकांनी भावभक्ती हया मूल्याचे अमृतकुंभ घडविले. नाही पै भेद अवघा मनी अभेद हया शब्दांत संत नरहरी सोनारांनी अद्वैत हे मूल्य स्पष्ट केले.

आम्ही वारीक वारीक □करू हजामत बारीक □१ □

विवेक दर्पण आयना दाऊ □वैराग्य चिमटा हालवू □२ □

उदक शांती डोई घोळूं □अहंकाराची शेंडी पिळू □३ □

भावार्थाच्या बगला झाडूं □काम, कोध नखे काढूं □४ □

हया शब्दांत संत सेना न्हावी हयांनी आपल्या व्यवसायातले आध्यात्मिक मूल्य सांगितले.

माणसाला त्याच्यातल्या विखारीपणाची जाणीव करून देत 'तमोगुण मागे सारा' हा मूल्यमंत्र संत एकनाथांनी भारूडातून दिला. 'उस डोंगा परी रस नव्हे डोंगा | काय भुललासी वरलिया रंगा □हया शब्दांत संत चोखामेळा हयांनी मूल्यांच्या अंतरंगातील रसाचा ख-या अर्थाने मेळ बसविला. 'मन चंगा तो काथवट में गंगा' अशा सोप्या शब्दांत संत रविदासनी मूल्यांची गंगा माणसांच्या मनात आणली. विवेक किया आपुली पालटावी असे मनाच्या श्लोकांद्वारे सूचित करत समर्थ संत रामदासांनी मनोबल हया मूल्याच्या विकसनावर भर दिला. शिवाय बलोपासना हया पिळदार मूल्याचे प्रयत्न धडे दिले.

अव्वल समजो एक बिस्मिल्ला □मग सहस्रनामे विश्व व्यापला □बंदगी करो छोडो गलबला □सद्गुरू सेवुनिया □हया शब्दांत संत शेख महंमद हयांनी सर्वधर्मसमभाव हया मूल्याची हाक सर्वांना दिली .

हातात खराटा घेऊन संत गाडगेबाबांनी स्वच्छता हया मूल्याचे प्रत्यक्ष संस्कार जनमानसावर केले . 'उपाशी रहा पण लेकरायले शिकवा' असे भावजागरण कीर्तनातून करत शिक्षण हे मूल्य गाडगेबाबांनी जनमानसात रूजविले . व्यसने अंधश्रध्दा हयांनी जनजीवनातून हद्दपार करणे ही स्वतःच्या जीवनाची इतिकर्तव्यता मानली .

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी त्यांच्या भजनातून राष्ट्रीय मूल्याचा आवाज बुलंद केला . शिवाय 'सब के लिए खुला है मंदीर यह हमारा' अशी विश्वात्मक मूल्याची हाक तुकडोजी महाराजांनी दिली . वैष्णव जन तो तेणे कहिए □पीड पराई जाणे रे □परदुःखे उपकार कर तोये □ मन अभिमान न आणे रे □□हया शब्दांत संत नरसी मेहतांनी संवेदनशीलता हया मूल्याची शिकवण दिली . 'महति म्हणे सुभावना | होय धर्माची कल्पना' मूल्याचे हे मर्म संत, ब्रम्ह महतिसागरांनी उलगडून दाखवले .

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह

शरीरश्रम, अस्वाद सर्वत्र भयवर्जन

सर्वधर्मी, समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना .

ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये □□

हया काव्यपंक्तीमध्ये व्यक्त झालेल्या अकरा वृतमूल्यांचा पुरस्कार महात्मा गांधीनी केला . संत विनोबांनी हया मूल्यांना दुजोरा दिला . शिवाय 'सर्वोदय' 'भूदान' ही मूल्येही त्यांनी रूजविली .

अपराधी नही बनो अपरा 'धी' बनो. 'पराधी' नही पराधीन नही परन्तु अपराधीन बनो (मुकमाही) अर्थात अपराधी होऊ नका. स्वतंत्र स्वावलंबी व्हा. हया सोप्या शब्दांत 'स्वातंत्र्य' हया मूल्यांचा उद्घोष आचार्य विद्यासागर हयांनी केला आहे. चर्चा से न चरित से आतम का हित होय फिर भी चर्चा चाहते चर्चा चहे न कोय (दोहाशतक १९) केवळ चर्चा करून चारित्र्यांचे वाचन करून आपले कल्याण होत नसते तरीपण सर्वजण चर्चा करतात आचरण मात्र कोणीही विचारातही घेत नाही. त्यामुळे आचरण हे मूल्य त्याची आवश्यकता मुळी चिन्मयसागर यांनी उद्घोषित केली आहे.

संत पारनेरकर महाराजांनी पूर्णत्वाचे मूल्य पुरस्कृत केले. संत गुलाबराव महाराजांनी सर्व सामान्यांचे प्रज्ञा हे मूल्य जागे केले आहे. संत भगवान, बाबा संत सेवालाल महाराजांनी भटक्या जमातींना स्थैर्याचे मूल्य दिले. हे सर्व साधू, संत, मुनी, ऋषी, मौलवी, पोप म्हणजे मूल्यांची चालती बोलती विद्यापीठेच. हया परंपरेने मूल्यांचा डोळस विचार व सालस आचार दिला. मूल्यांची पताका खांदयावर घेऊन मूल्यांचे टाळ मृदंग वाजवत मूल्यांची दिंडी माणसांच्या रूपाने पुढे पुढे गेली. संत तुकारामांच्या शब्दांचा आधार घेऊन असे म्हणता येते की 'दया, क्षमा, शांती' हया व अशा मूल्यांची माणसांच्या वसतीला किती आवश्यकता आहे हे 'बुडत हे जन देखवे न डोळा' हया कळकळीने पोटतिडिकीने संतांनी सांगितले.

संत वाङ्मय हा मूल्यांचा कधीही न संपणारा अक्षय झुळझुळणारा पारदर्शी व प्रसन्न असा स्त्रोत आहे. वर नमूद केलेली उदाहरणे वानगीदाखल आहेत. ही मांडणी म्हणजे तेजःपुंज प्रकाशाचा एक कण आहे. कोणत्याही संतांचे वाङ्मय उघडा व त्यातून लागतील तितकी मूल्ये घ्या. ही वस्तुस्थिती आहे. 'संतांचिये गावी प्रेमाचा सुकाळ हया ऐवजी असे म्हणावे वाटते. 'संताचिये गावी मूल्यांचा सुकाळ.'

संतांनी आपल्याला मूल्यांचा एवढा सुकाळ दिला आहे की संताच्या ऋणातून मुक्त होऊ शकत नाही . या वरून असे दिसून येते की शिक्षणाच्या ही पूर्वी मूल्यशिक्षण समाजात अंतर्भूत होते."[१.२६]

## १.५ ः विविध आयोग व समित्यांच्या शिफारशी ः

स्वतंत्र भारतातील शिक्षणविषयक विविध आयोग चर्चासत्रे धोरणे व समित्या हयांनी मूल्यशिक्षणांच्या गरजेंच्या शिफारशी केल्या आहेत. ते खालील प्रमाणे ः

१. "भारताच्या संविधानाने (इ.स.१९४९) समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना हयांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता, कर्तव्य हया मूल्यांचा पुरस्कार केला आहे.

२. डॉ.राधाकृष्णन हयांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण आयोगाने (इ.स.१९४८- ४९) असे म्हटले आहे की आपल्या शिक्षण व्यवस्थेत आध्यात्मिक शिक्षणाला स्थान देणे गरजेचे आहे.

३. डॉ.मुदलियार हयांच्या अध्यक्षतेखालील माध्यमिक शिक्षण आयोगाने (इ.स.१९५२- ५३) चारिज्याचे शिक्षण अनिवार्य मानले आहे.

४. धार्मिक व नैतिक शिक्षणविषयक श्रीप्रकाश समितीने (इ.स.१९५९) विद्यार्थ्या ंचे वर्तन चारिज्य व क्षमता हयांच्या विकासाला पोषक अशा नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची जोड मिळावी असे आग्रही प्रतिपादन केले आहे.

५. डॉ.संपूर्णानंद हयांच्या नेतृत्वाखालील भावनात्मक एकात्मता समितीने (इ.स.१९६१) अशी शिफारस केली आहे की शिक्षणातून अध्यात्मिक मूल्यांची शिकवण दयावी.

६. डॉ.कोठारी हयांच्या अध्यक्षतेखालील शिक्षण आयोगाने (इ.स.१९६४- ६६) उत्पादन क्षमता, सामाजिक राष्ट्रीय एकात्मता, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, लोकशाही मूल्यांचे संवर्धन, आधुनिकीकरण, सामाजिक, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना ही शिक्षणाची उद्दिष्टये म्हणजे शिक्षणाच्या माध्यमातून साध्य करावयाची मूल्येच होत.

७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणविषयक संसद सदस्य समितीने (इ.स.१९६७) शालेय व सहशालेय उपक्रमांतून नैतिक सामाजिक व अध्यात्मिक मूल्ये रूजविण्याच्या कार्यक्रमांवर भर दिला आहे.

८. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने (इ.स.१९६८) समता, मानवतावाद चारित्र्य संवर्ध न, राष्ट्रीय एकात्मता, आंतराष्ट्रीय सामंजस्य हयांना उपयुक्त अशा शिक्षणावर भर दिला आहे.

९. गांधीजींचे शिक्षणविषयक विचार हया विषयावरील चर्चासत्राने (इ.स.१९७0) नैतिक व अध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी असे म्हटले आहे.

१0. १0 + २ + ३ हया शैक्षणिक आकृतिबंधावर आयोजित राष्ट्रीय समितीने (इ.स.१९७३) नैतिक शिक्षण हा अनिवार्य विषय असावा असे नमूद केले आहे.

११. एन.सी.ई.आर.टी. च्या दरवर्षीय शालेय शिक्षणक्रमाच्या आराखडयामध्ये (इ.स.१९७५) असे नमूद करण्यात आले आहे की नैतिक मूल्यांचे संस्कार अभ्यासक्रमातून घडवावेत.

१२. डॉ.ईश्वरभाई पटेल हयांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासक्रम समीक्षण समितीने (इ.स.१९७७) असे म्हटले आहे की शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन, साधेपणा, एकात्मभावना, सहिष्णुता, सहकार्य हया मूल्यांच्या विकासावर भर दयावा.

१३. व्ही.एम.तारकुंडे हयांच्या अध्यक्षतेखालील आपल्या हक्कांसाठी शिक्षण पुढील दहा वर्षात शिक्षणाच्या विकासाचे धोरण (इ.स.१९७८- ८७) हया प्रलेखामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की शिक्षणातून मूल्यांचा परिचय संस्कार व संवर्धन व्हावे हयावर भर दिलेला आहे.

१४. सिमला येथील मूल्यधिष्ठित शिक्षणविषयक अखिल भारतीय चर्चासत्रामध्ये (इ.स.१९८१) असे प्रतिपादन करण्यात आले आहे की मूल्य उद्बोधन हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. सर्व समाजाला मूल्यधिष्ठित शिक्षणात अंतर्भूत करून घेतले पाहिजे.

१५. औरंगाबाद येथील नैतिक शिक्षणविषयक राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये (इ.स.१९८१) असे प्रतिपादन करण्यात आले आहे की नैतिक शिक्षण शालेय पाठयक्रमातील विविध विषय व अभ्यासपूरक उपक्रम हयांच्या माध्यमातून एकात्म पध्दतीने व योजनाबध्द रीतीने हाताळण्यात यावे.

१६. महाराष्ट्र शासनाच्या नैतिक शिक्षण प्रायोगिक प्रकल्पाच्या (इ.स.१९८४-८५ ते १९८६-८७) अहवालामध्ये नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर भर देण्यात आला आहे.

१७. शैक्षणिक आव्हान (इ.स.१९८५) हया प्रलेखामध्ये आधुनिकतेसाठी मूल्यांची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली आहे.

१८. भारत सरकारच्या कलमी कार्यक्रमाच्या टिप्पणीवरून (इ.स.१९८६) असे स्पष्ट होते की देशाच्या विकासासाठी मूल्य शिक्षणाच्या कार्यक्रमाची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.

१९. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने (इ.स.१९८६) असे प्रतिपादन केले आहे की शिक्षणाने नैतिक व शाश्वत मूल्यांना उत्तेजन दिले पाहिजे.

२०. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या (इ.स.१९८८) मसुद्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की नैतिकतेचे संस्कार अभ्यासक्रमातील विविध विषयांच्या माध्यमातून व्हावेत.

२१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कृतिकार्यक्रमामध्ये (इ.स.१९८७) मूल्यांचे उद्‌बोधन करणा-या शिक्षणाचाही विचार करण्यात आला आहे.

२२. डॉ.राममूर्ती हयांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समीक्षण समितीने (इ.स.१९९0) असे नमूद केले आहे की आपल्या देशात मानवता असलेला समाज निर्माण करण्याच्या प्रकियेसाठी मूल्यशिक्षण पोषक ठरावे.

२३. महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशामध्ये (इ.स.१९९७) मूल्यसंस्कार ही आवश्यक बाब आहे व ती कृतियुक्त ठरली पाहिजे.

वरील विविध आयोग व समित्या यांच्या शिफारशी नुसार आपणास कळते की मूल्य शिक्षण हा अभ्यासकमाचा शिक्षणाचा कायमच एक भाग राहिलेला आहे."[१.२७]

## १.६ मूल्यशिक्षण ः

### १.६.१. शालेयस्तरावर मूल्यशिक्षणाची गरज ः

आज मानवी मूल्यांचा -हास होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे विघातक दुष्ट प्रवृत्तीमुळे समाजस्वास्थ्य नष्ट होत चालले आहे. नैतिकतेअभावी जीवनात निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला संस्कार शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. मानवी विकासाच्या प्रगतीसाठी तंत्रविज्ञानाची प्रगती पुरेशी नाही तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाला नैतिक प्रेरणेचे अधिष्ठान असावे लागते. समाज परिवर्तनासाठी माणूस सद्‌वर्तनी व सदाचारी बनला तरच मूल्याधिष्ठित सामाजिक बदल घडून येऊ शकतो. आज लोकशाहीप्रधान भारताला सुसंस्कृत नागरिकांची आवश्यकता आहे.

शिक्षणाने विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा म्हणजे चांगला माणूस बनावा यासाठी बौध्दिक विकासाबरोबर विद्यार्थ्यांचा भावनिक व मानसिक विकास झाला पाहिजे म्हणून संस्कार संपन्न व्यक्तिमत्त्व घडविण्याची शालेय स्तरावर मूल्यशिक्षणाची नितांत गरज आहे.

देशात नवे शैक्षणिक धोरण इ.स.१९८६ ला लागू झाले. या धोरणाचा मूख्य रोख होता तो शाळेत दिल्या जाणा-या शिक्षणात मूल्य शिक्षणातील अभाव दूर करण्याचा जर यापूर्वीच्या शिक्षण आयोगांनी वेळोवेळी धरलेल्या आग्रहानुसार नैतिक शिक्षण दिले गेले असते त्याची अंमलबजावणी प्रामाणिकपणे झाली असती तर आज दिसणारा भ्रष्टाचार, अनाचार, हिंसकवृत्ती, लबाडी, असत्यता आणि आतंकवाद वगैरे हे दोष समाजात दिसले नसते. किमान त्याचे प्रमाण तरी कमी झाले असते. हे सर्व अनाचार थांबवायचे असतील तर नागरिकांमध्ये नैतिकता रूजवायला हवी. यासाठी कायमस्वरूपी उपाय म्हणून शाळांमधून नैतिक शिक्षणाची कास धरावी लागते.

"शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. आपल्या सर्वच शिक्षण पध्दतींमध्ये मूल्यशिक्षणाला अतिशय महत्व आहे. आपल्या विद्यार्थ्यांना कोणते शिक्षण दयायचे आहे त्यांच्यावर कोणते संस्कार करायचे आहेत याचा विचार शिक्षण क्षेत्रात प्रामुख्याने केला जातो. समाजाला नैतिक अधिष्ठान असले पाहिजे. त्यासाठी शालेय स्तरावर नैतिक शिक्षणाची म्हणजेच मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहे."[१.२८]

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणसाची जीवनशैली पार बदलून गेली. एकत्र कुटुंब पध्दती गेली त्यामुळे घरातील आजी आजोबा यांच्या माध्यमातून होणारे संस्कार कमी झाले. शिवाय आर्थिक स्थिरतेच्या नावावर या ना त्या मार्गाने पैसा कमाविणे हे धोरण स्वीकारल्या गेल्यामुळे मुलांकडे कमी लक्ष असते. कुटुंबाकडून संस्कार होणे हे आता दुरापास्त झाले आहे. अशा स्थितीत मुलांवर सुसंस्कार करण्याची जबाबदारी आता प्रामुख्याने शिक्षणसंस्थावर पडलेली आहे. शाळा ही समाजाचीच एक प्रतिकृती आहे. त्यामुळे समाजातील मानवांच्या परस्परांशी होणा-या व्यवहारांचे प्रतिबिंब शाळांच्या अंतर्गत व्यवहारात पडणे स्वाभाविक आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी असणा-या क्षमता पूर्णपणे विकसित करून त्यांचा उपयोग त्यांनी समाजहितासाठी व पर्यायाने राष्ट्रहितासाठी करावा अशा प्रकारचे चारित्र्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे हे शिक्षण प्रक्रियेचे

प्रमुख उद्दिष्ट आहे. म्हणून शाळांमधून 'नैतिक शिक्षण किंवा मूल्यांचे शिक्षण' देणे हे समाजाची एक महत्वाची गरज आहे.

"शिक्षण प्रक्रियेमध्ये मूल्यशिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. शिक्षणाच्या माध्यमातून आवश्यक ती मूल्ये जोपासली जाऊन ती विकसित होणे हाच शिक्षणाचा मूलभूत हेतू आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सत्प्रवृत्ती वाढीस लागाव्यात, सद्भावनांचा परिपोष व्हावा, विद्यार्थ्यांचे वर्तन, चारित्र्य आणि क्षमता याबाबत नैतिक संस्कार केले जावेत असे शिक्षण तज्ञांनी वेळोवेळी प्रतिपादन केलेले आहे."[१.२९]

शिक्षणाच्या व्याख्या अनेक शिक्षण तज्ञांनी केल्या आहेत. परंतु वेगवेगळया मान्यवरांच्या शिक्षणाबद्दलच्या व्याख्या बघितल्या तरी तेथेही शिक्षणाचा अर्थ मूल्यांची जोपासना करणे हाच दिसून येतो. विवेकानंदांच्या मताप्रमाणे "सर्व शिक्षणाचे ध्येयच मुळी माणूस निर्माण करण्याचे असते. मूल्य नसेल तर माणूस काय आणि जनावर काय यांच्यातील फरक झाला नसता." जेष्ठ शिक्षणतज्ञ व विचारवंत जे.पी.नाईक म्हणतात की "शिक्षण ही त्रिस्तरीय शिक्षण प्रकिया आहे. एका स्तरावर माहिती घेणे ज्ञान घेणे आहे. दुस-या स्तरावर कौशल्य संपादन करणे आहे. मात्र तिस-या स्तरावर मूल्यांची जोपासना करणे आहे." विनोबा भावे म्हणतात "निरंतर सर्वोत्तम विचाराचे स्मरण त्यांचे नित्य मनन आणि त्यानुसार आचरण हे शिक्षण होय." शिक्षणाची ही व्याख्या एकदा स्वीकारली की मूल्यशिक्षणातून आपली सुटका होऊच शकत नाही."[१.३०]

## १.६.२ तत्वज्ञान आणि मूल्यशिक्षण ः

"तत्वज्ञान ही ज्ञानाची श्रेष्ठतम शाखा होय. तत्वज्ञान म्हणजे ज्ञानाविषयी प्रेम. तत्वज्ञान मानवी जीवनाचे रहस्य उलगडून अंतिम सत्याचा शोध घेण्याचे कार्य करीत असते. जगातील निरनिराळया कला व शास्त्रे यांचे स्वतःपुरते विशिष्ट कार्य असतेच. पण या कार्याचा मानवी जीवनाशी व त्यातील चिरकालीन सुखाशी संबंध जोडण्याचे कार्य तत्वज्ञान करीत असते

म्हणून तत्वज्ञान हे सर्व शास्त्र व कला यांचे सार होय असे म्हणतात. Philosophy या शब्दात philos म्हणजे Love व Sophia म्हणजे प्रज्ञान किंवा सुज्ञपणा  हा अर्थ आहे. तत्वज्ञान म्हणजे प्रज्ञाविषयी प्रेम व प्रज्ञान म्हणजे विशेष प्रकारचे ज्ञान. हे विशेष प्रकारचे ज्ञान म्हणजे या सृष्टीच्या उत्पत्तीचे व विलयाचे ज्ञान होय. सर्वच तत्ववेत्यांनी सृष्टीच्या निर्मितीची व विलयाची कहाणी मान्य नसल्यामुळे दृश्य व अदृश्य शक्तीच्या वादात तत्वज्ञानाचे काही महत्वाचे संप्रदाय किंवा पंथ निर्माण झाले आहेत. जसे की हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पारसी, जैन, बौध्द, विविध धर्म त्यांचे तत्वज्ञान त्यांचे शिक्षण अध्यात्मवाद, आदर्शवाद, कार्यवाद, निसर्गवाद, वास्तववाद, पुनर्रचनांवाद, अस्तित्ववाद, तर्कनिष्ठ, प्रत्यक्षवाद विविध विचारवंताचे शिक्षणविषयक तत्वज्ञान विषयक दृष्टिकोण जरी भिन्न असले तरी प्रत्येकाचा मुळ पाया मूल्यशिक्षण हाच आहे.

तत्वज्ञानात तीन शास्त्रांचा अभ्यास प्रमुख होय. ती तीन शास्त्रे म्हणजे तत्वमीमांसा (ऑनटॉलजी) ज्ञानमीमांसा (एपिस्टेमॉलजी) आणि मूल्यमीमांसा किंवा मूल्यशास्त्र अथवा मूल्य तत्वज्ञान (ॲक्सिऑलजी) तत्वज्ञानाच्या इतिहासात अनुक्रमाने प्रथम वस्तू अथवा तत्व यांचा विचार आला. त्यानंतर ज्ञानाविषयी स्वतंत्रपणे विचार करण्याची आवश्यकता भासली आणि शेवटी मूल्य हे स्वतंत्र विचाराचा विषय बनले व मूल्य विषयक तत्वज्ञान अस्तित्वात आले. मूल्यविषयी सामान्य विचार जरी जुन्या काळांत आणि पौर्वात्य व पाश्चात्य देशांत होत आला असला तरी तो आनुषंगिक होता. मूल्यमीमांसेचा पध्दतशीरपणे विचार व त्याचा स्वतंत्रपणे उगम एकोणिसाव्या शतकांतील नीतीशास्त्रीय विचारसरणीमधून झाला आहे व त्याचा विकास विसाव्या शतकांत चालू राहिला आहे."[१.३१]

"'मूल्य' या शब्दाचा अर्थ 'व्हॅल्यू' हा इंग्रजी शब्द लॅटिन Valeo शब्दावरून आला आहे. संस्कृतांत 'जे मूलांत आहे' त्यांच्याशीच मूल्य शब्दांचा संबंध आहे. याचा अर्थ असा की सृष्टीची मूळ रचनाच मूल्यात्मक आहे. मूल्य हा एक स्वतंत्र विषय आहे. मूल्यांचा संबंध जीवशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, ज्ञानमीमांसा, न्याय शास्त्र आणि जवळ जवळ सर्व शास्त्रांशी आहे. शिक्षणाची उदि्दष्टे आणि ध्येयें मूल्यमीमांसेला धरून असतात. ज्या

मूल्यांचा अविष्कार जीवनांत घडवायचा त्या मूल्यांचे यथोचित ज्ञान शिक्षणक्रमामध्ये असणे एवढेच आवश्यक नसून त्या मूल्यांचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनामध्ये दृढमूल करणे अगत्याचे आहे. धर्म हा तर मूल्यात्मक विचारसरणीचा गाभाच आहे. धर्माचे अधिष्ठान परममूल्यविषयक श्रध्देवर असून धर्माचा श्रेष्ठ विषय जो ईश्वर तो मूल्यांचा आदर्श आधार होय. भारतीय कल्पनेप्रमाणे जे इष्ट तें मूल्य होय. परंतु मूल्याची जाणीव मात्र मानवामध्येच आहे. भारतीय मूल्यमीमांसेचा आणखी एक महत्त्वचा सिंध्दात असा आहे की मूल्यांमध्ये जरी प्रकार असले तरी सर्व मूल्यें व्यापक अर्थाने 'शाश्वत व आध्यात्मिक' मूल्येच आहेत."[१.३२]

भारताच्या सामाजिक रचनेचा व भौगोलिक परिस्थितीचा विचार केल्यास बहुभाषिक, बहुधार्मिक व अनेक संस्कृती असलेल्या देशात धर्माच्या माध्यमातून शिक्षण देणे शक्य होत नाही.

"घटनेच्या कलम २८ व ३0 प्रमाणे धार्मिक शिक्षणाला अनुदानित शाळेतील अभ्यासक्रमातून मनाई केलेली आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात धार्मिक शिक्षण दिल्यास राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्याऐवजी जातिधर्मात तेढ निर्माण होण्याची अधिक शक्यता आहे. याची जाणीव तज्ञ मंडळीना असल्यामुळे त्यांनी धार्मिक शिक्षणाऐवजी नैतिक शिक्षणाची कल्पना सुचविली. मात्र भारताच्या सांस्कृतिक स्थितीचा अभ्यास केल्यास भारताला आध्यात्मिक स्वरूपाची बैठक आहे. म्हणून भारतीय शिक्षण आयोगाने धार्मिक शिक्षणाऐवजी सामाजिक, अध्यात्मिक व नैतिक मूल्यांवर आधारित अभ्यासक्रम सुचविण्याचा प्रयत्न केला. भारतीय शिक्षण आयोगाच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे 'ज्या प्रक्रियेच्या माध्यमातून सामाजिक आध्यात्मिक व नैतिक मूल्यांचे संस्कार केले जातात त्याला 'मूल्यशिक्षण' असे म्हणतात.

सर्वच आयोग व समित्यांनी मूल्यशिक्षणाची शिफारस केलेली दिसून येते. केवळ शब्दप्रयोग भिन्न आहेत. काहीनी धार्मिक शिक्षण काहींनी नैतिक शिक्षण तर काहींनी मूल्यशिक्षण असा शब्दप्रयोग केला आहे. १९८६ च्या शैक्षणिक धोरणाने मूल्यशिक्षण हा प्रयोग रूजविला."[१.३३]

## १.६.३ महाराष्ट्र शासन आणि मूल्यशिक्षण ः

आपल्या सर्वच शिक्षणपध्दती मध्ये मूल्यशिक्षणाला अतिशय महत्व आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनासाठी आहे. असे आपण मानतो. समाजाची आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक उन्नती झाली पाहिजे असे आपल्याला वाटते. समाजाची ही जडणघडण शाळेच्य माध्यमातून होते. 'उदयाचा भारत आजच्या शालेय वर्गातून घडतो आहे.' असे म्हणताना आपल्याला आपल्या विद्यार्थ्यांना कोणते शिक्षण द्यायचे आहे□कोणते ज्ञान द्यायचे आहे□त्यांच्यावर कोणते संस्कार करावयाचे आहेत□याचाच विचार मनात असतो.

समाजाला नैतिक अधिष्ठान असले पाहिजे. नैतिक अधिष्ठानाच्या अभावी समाज दुबळा होईल. समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून नागरिक म्हणून विद्यार्थ्यांच्या मनाची जडणघडण आपल्याला करावयाची आहे. त्यासाठी शालेय जीवनात त्यांच्यावर नैतिकसंस्कार करणे आवश्यक आहे.

"महाराष्ट्र शासनाने जानेवारी १९८३ ते मार्च १९९३ या कालावधीत शिक्षणतज्ज्ञांची बैठक घेऊन तीन कृतिसत्रांमध्ये नैतिक शिक्षक मार्गदर्शक पुस्तिका तयार केली व १९९६–९७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर 'मूल्यशिक्षण व सामान्यज्ञान' हे दोन विषय निर्धारित करण्याचे शासनाने निश्‍चित केलेले आहे. त्या संदर्भात परिपत्रकही काढले गेले आहे.

शालेय वेळापत्रकानुसार प्रत्येक दिवसाची सुरूवात विद्यार्थ्यांची सामुहिक स्वरूपात म्हणावयाच्या प्रार्थनेने आणि प्रतिज्ञेने होते. त्याच बरोबर परिपाठ हा तिसरा उपक्रम सुचविण्यात आला आहे. श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, स्त्री पुरूष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन इत्यादी मूल्ये विद्यार्थ्यांच्या अंगी बाणावी. उच्चमाध्यमिक शाळांमधून पहिला तास परिपाठ या उपक्रमासाठी वापरावा असे सांगण्यात आले आहे."[१.३४]

**१.६.४ मूल्यशिक्षण संकल्पना ः**

सुसंस्कृत जीवनासाठी इष्ट ठरणारी मानवी व्यवहारांचे आदर्श जीवनाच्या दृष्टीने नियमन करणारी जी जीवन मूल्ये त्यांचे संस्कार शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण ही एक भूमिका आहे. तर परंपरागत मानवी जीवनामध्ये व्यक्तिजीवन आणि सामाजिक व्यवहार यावर धर्मश्रध्देचा पगडा असल्याने धर्माने परावर्तीत केलेल्या आदर्श मानवी व्यवहारविषयक मूल्यांचा संस्कार म्हणजे नैतिक शिक्षण अशी दुसरी भूमिका आहे.

## मूल्य म्हणजे काय ?

"१. मनुष्याच्या जीवनातील आवडीनिवडीवर प्रभाव गाजवून त्याच्या वर्तनाचे नियंत्रण करणारे घटक म्हणजे 'मूल्य' होय.

२. मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वातील ज्या गोष्टींना समाजामध्ये मूल्य आहे त्या गोष्टी म्हणजे 'मूल्य' होत.

३. संस्कार हे शिक्षणानेच करता येतात म्हणून मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्कार होत.

४. सामाजिक हित साधण्यासाठी स्वतःच्या इच्छा आकांक्षा व प्रवृत्तीवर बंधन घालण्याची प्रेरणा ज्या शिक्षणामूळे मिळते ते मूल्य शिक्षण होय.

५. राष्ट्राचा व विश्वाचा एक सुजाण नागरिक बनविण्याच्या दृष्टीने बालकाचा सामाजिक भावनिक व तात्विक विकास घडवून आणण्यासाठी प्रचलित अभ्यासक्रमामध्ये निर्माण केलेली अनुभवांची व उपक्रमांची नियोजनबध्द क्रमपरंपरा म्हणजेच नैतिक शिक्षण होय.

६. मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्कृत नागरी जीवनाचे संस्कारित केलेले शिक्षण होय. जे शिक्षण मानवी व्यवहाराचे आदर्श व जीवनमूल्ये यांचे नियमन करते.

यावरून असे लक्षात येते की चारिञ्यसंवर्धन व व्यक्तिविकासाचे साधन म्हणून मूल्यशिक्षणाकडे पाहिले जाते."[१.३५]

## १.६.५ शालेय स्तरावरील मूल्यशिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्टे ः

"१. परस्परांबद्दल प्रेम भूतदया क्षमाशीलता अहिंसा समता बंधुता कार्यतत्परता सेवावृत्ती न्यायप्रियता विज्ञाननिष्ठा साहसीवृत्ती इत्यादी मानवी गुण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

२. व्यक्तीला निरोगी निरामय जीवन जगता यावे म्हणून समर्थता यावी.

३. कुटुंबातील घटक म्हणून कुटुंबातील अन्य व्यक्तिंशी आदरयुक्त जिव्हाळयाचे संबंध प्रस्थापित होण्यासाठी पोषक मूल्यांची जोपासना व्हावी. (आदरभाव, परस्पर, सहकार्य, बंधुभाव व प्रेम इ.)

४. व्यक्तिगत व सामाजिक जीवनाची जबाबदारी पेलू शकरणारे नागरिक निर्माण व्हावेत.

५. धर्म, भाषा, जाती, लिंग यावर आधारित संकुचित दृष्टीचा लोप करण्यासाठी वैचारिक जागृती व्हावी.

६. स्वतःविषयी, मित्रांविषयी, शेजा-याविषयी देशाच्या प्रगतीविषयी, पर्यावरणाविषयी तसेच सर्वधर्म व संस्कृती याविषयी उदार दृष्टिकोण विकसित व्हावा.

७. देशाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन मिळावे.

८. आत्मसन्मान जागृत होऊन आत्मोध्दारासाठी प्रयत्नशील व्हावे.

९. ज्या परिसरात आपण वाढतो व वावरतो त्या परिसरातील कलाकृती निसर्ग, प्राणी, पक्षी यांचे संरक्षण व जोपासना करण्यासाठी प्रेरित व्हावे व सा-यांबद्दल प्रेम, आपुलकी निर्माण व्हावी.

१०. समाजाचा एक घटक म्हणून लोकशाही जीवनपध्दती, सामाजिक बांधीलकी, धर्मनिरपेक्षता, साजाजिक एकसंघता यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांचा परिपोष व्हावा."[१.३६]

## १.६.६ शालेय स्तरावरील मूल्यशिक्षणाची सर्वसाधारण मूल्ये ः

मूल्यांची ओळख ः महाराष्ट्राच्या शिक्षणविषयक प्रक्रियेमध्ये सद्यःस्थितीत प्रमुख आणि आवश्यक अशा निवडक दहा मूल्यांचा समावेश करण्याचा विचार झाला आहे. या मूल्यांवर अवधान केंद्रित करावयाचे आहे.

"अभ्यासक्रमात समाविष्ट झालेल्या मूल्यांचे वर्गीकरण स्थूल मानाने पुढीलप्रमाणे करता येईल.

**वर्गीकरण ः**

**अ. वैयक्तिक मूल्ये ः**

| | |
|---|---|
| १. स्वच्छता | २. स्वावलंबन |
| ३. कर्तव्यदक्षता | ४. श्रमप्रतिष्ठा |
| ५. विज्ञाननिष्ठा | ६. शुचिता |
| ७. भूतदया | ८. निर्भयता |
| ९. खिलाडूवृत्ती | १०. शिस्तप्रियता |

**ब. सामाजिक मूल्ये :**

| | |
|---|---|
| ११. समता | १२. बंधुभाव |
| १३. सर्वधर्मसहिष्णुता | १४. न्यायप्रियता |
| १५. सौजन्यशीलता | १६. आदरभाव |
| १७. सत्यप्रियता | १८. अहिंसा |
| १९. मानवता | २0. निसर्गप्रेम |
| २१. परस्पर सहकार्य | |

**क. राष्टीय मूल्ये :**

| | |
|---|---|
| २२. राष्ट्रभक्ती | २३. राष्ट्रीय एकात्मता |

**महाराष्ट्र शासनाने शालेयस्तरावर निर्धारित केलेली दहा मूल्ये :**

( या संदर्भातील शासन निर्णय : परिशिष्ट E मध्ये )

| | |
|---|---|
| १. श्रमप्रतिष्ठा | २. राष्ट्रभक्ती |
| ३. स्त्री पुरूष समानता | ४. सर्वधर्मसहिष्णुता |
| ५. राष्ट्रीय एकात्मता | ६. वैज्ञानिक दृष्टिकोन |
| ७. संवेदनशीलता | ८. सौजन्यशीलता |
| ९. वक्तशीरपणा | १0. नीटनेटकेपणा"[१.३७] |

## महाराष्ट्र शासनाने शालेयस्तरावर निर्धारित केलेल्या दहा नैतिक मूल्यांची रूजवण ः

"विद्यार्थ्यांमध्ये विविध उपक्रमांतून मूल्यांची रूजवण करता येते. मूल्य ही शिकवायची नसतात तर ती रूजवायची असतात. मूल्यशिक्षणात सहजता असावी लागते. त्यासाठी काही प्रतिनिधिक स्वरूपाच्या उपक्रमांचे आयोजन करून त्याचे कार्यान्वियन करता येते. शासनाने निवडलेल्या दहा मूल्यांची मूल्यनिहाय माहिती पुढे दिली आहे.

**१. श्रमप्रतिष्ठा ः**

**स्वरूप ः**

बुध्दिजीवीप्रमाणे श्रमजीवीही महत्वाचा घटक आहे. समाजजीवनाची ही दोन्ही अंगे सारखीच महत्वाची असूनही बाहय पोशाखी आकर्षणामुळे श्रमजीवींना दुय्यमत्व देण्याची अपप्रवृत्ती निर्माण झालेली दिसते. दैनंदिन जीवनातील वैयक्तिक कामे स्वतः सुव्यवस्थित करणे जसे महत्वाचे तसेच समाजात वावरतानाही श्रम करण्यास तत्पर असले पाहिजे. बुध्दिजीवीनी श्रमांना आपल्या हुशारीची युक्तींची व गतीची जोड दिली पाहिजे.

**आवश्यकता ः**

विद्यार्थ्याला सर्व कामे सारखीच महत्वाची वाटली पाहिजेत. आपले काम आपणच केले पाहिजे हा विचार रूजविणे आवश्यक आहे. आपले घर, शाळा, परिसर आपण स्वतः स्वच्छ ठेवला पाहिजे ही जाणीव जोपासली पाहिजे. पांढरपेशा नोकरदारांप्रमाणे शेतात राबणारा शेतकरी व कारखान्यात काम करणारा कामगार व दोघांच्याही श्रमास सारखीच प्रतिष्ठा आहे. हा भाव ठसविण्यासाठी श्रमप्रतिष्ठेचे मूल्य रूजविले गेले पाहिजे. व्यक्ती व समाज यांच्या विकासासाठी हे मूल्य प्रभावी ठरते.

**कार्यात्मक व्याख्या ः**

व्यक्ती, समाज, राष्ट्र यांच्या सुदृढ आणि निकोप विकासासाठी कराव्या लागणा-या श्रमास सर्वत्र मान्यता मिळणे व ती आचरणात आणणे या मूल्यास 'श्रमप्रतिष्ठा' म्हणता येईल .

**२ . राष्ट्रभक्ती ः**

**स्वरूप ः**

राष्ट्रभक्ती हे स्वतंत्र सार्वभौम राष्ट्राच्या मानवी जीवनातील एक श्रेष्ठ जीवनमूल्य आहे . भक्ती म्हणजे नितांत प्रेम आणि निरपवाद पूज्यभाव .

राष्ट्राच्या संवर्धनार्थ पोषणार्थ आणि संरक्षणार्थ समर्पणाची भावना ठेवणे राष्ट्रभक्तीत अपेक्षित असते . त्याच प्रमाणे राष्ट्रीय इतिहास, संस्कृती, भारतीय संविधान, पर्यावरण, साधनसंपत्ती याबाबत जिज्ञासा अढळ श्रध्दा व प्रेम बाळगून त्यानुसार समर्पित भावनेने वर्तन करणे अपेक्षित आहे .

राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रीय प्रार्थना, राष्ट्रीय बोधवाक्य, राष्ट्रीय चिन्ह, भारतीय संविधान आणि थोर राष्ट्रीय व्यक्ती यांसारख्या राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या बाबींबद्दल सदैव डोळस राहून आदर व्यक्त करणे राष्ट्रभक्तीशी संबंधित आहेत .

**आवश्यकता ः**

देश आणि समाज याविषयीचे प्रेम, आस्था, कृतज्ञता या भावनांचा अभाव सर्वत्र दिसून येतो आहे . त्यामुळे राष्ट्रभक्ती हे मूल्य शालेय जीवनापासून संस्कारित करणे ही काळाची गरज आहे .

विद्यार्थी परीक्षार्थी झाला आहे . समाज केवळ भौतिकदृष्टया सुखासीन होतो आहे . जातीयता, सांप्रदायिकता, भ्रष्टाचार इत्यादी लोकशाहीविरोधी घटकांची वाढ यांमुळे राष्ट्रभक्ती या

मूल्याकडे दुर्लक्ष किंवा अनास्था वाढीस लागल्याने राष्ट्रभक्ती या मूल्याच्या संस्काराची आवश्यकता आहे.

**कार्यात्मक व्याख्या ः**

आपला देश, समाज, संस्कृती योग्य चालीरीती, परंपरा, साहित्य, इतिहास, कला राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या बाबी (राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत इ.) देशबांधव, निसर्ग या सर्वांबद्दल सार्थ अभिमान म्हणजेच 'राष्ट्रभक्ती' होय.

**३. स्त्री पुरूष समानता ः**

**स्वरूप ः**

आपली कुटुंब व्यवस्था पुरूषप्रधान आहे. पुरूषप्रधान संस्कृतीचा वरचष्मा आणि पुरूषी प्रावल्याच्या रूढी परंपरा आणि त्या मोडण्याविषयी उदासीनता त्यामुळे भारतीय समाजात स्त्रियांचा दर्जा दुय्यम राहिला आहे. समाजाच्या रीती रिवाजांच्या व धर्माच्या नावावर स्त्रियांना विकासाच्या संधी नाकारण्यात आल्या. भारतातील स्त्रियांचा दर्जा सामाजिक क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र यात खालावलेला दिसून येतो. स्त्रियांना आर्थिक अधिकार दिले गेले आहेत. त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्यामुळे निरक्षरता व अज्ञान यांची वाढ झाली.

भारतात संविधानाच्या अनुच्छेद चौदानुसार भारतीय नागरीक कायदयासमोर समान आहेत. संविधानाने भारतीय स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा दिलेला आहे. समाजाच्या आकृतिसबंधात पुरूषांइतकाच स्त्रियांचा सहभाग आवश्यक ठरतो. त्यातूनच समाजाचा खराखुरा विकास होतो. ही नवी जाणीव 'स्त्री पुरूष समानता' या मूल्याचा उचित आग्रह धरते.

**आवश्यकता ः**

१. एक जिवंत व्यक्ती म्हणून स्त्रीला पुरूषाच्या बरोबरीने स्थान असले पाहिजे. शारीरिक क्षमता व बुद्धिमत्ता या बाबतीत स्त्रीपुरूषांच्या इतकीच कार्यक्षम आहे.

२. समाजात रूढ झालेल्या अनिष्ट परंपरा आणि अंधश्रद्धा यातून मुक्त होण्यासाठी स्त्री पुरूष समानतेचे तत्व रूजविण्यासाठी आवश्यक आहे.

३. स्त्रीला आत्मनिर्भर, स्वावलंबी आणि समर्थ बनविणे आवश्यक आहे.

४. कुटुंबात मुलगा व मुलगी असा भेद न राहता त्यांना समान संधी मिळाली पाहिजे.

५. सर्व भारतीय नागरिक कायदयापुढे समान आहेत. संविधानातील राज्याच्या मार्गदर्शक तत्वात स्त्री कल्याण विषयक तरतुदी दिल्या आहेत. स्त्री पुरूषांना जाणीव शिक्षणाच्या माध्यमातून करून देणे. स्त्रीला आत्मसन्मान आत्मविश्वास असतो. तिचे विचार स्पष्ट असतात. ध्येये निश्चित असतात. ती वैचारिकदृष्टया स्वतंत्र असते. ती सामाजिक परिवर्तन कार्यक्रमात सक्रिय सहभागी होऊ शकते हे जाणवून देणे.

राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतिसाठी स्त्री पुरूष समानता आवश्यक आहे.

**कार्यात्मक व्याख्या ः**

पुरूषांच्या सुखदुःखाप्रमाणेच स्त्रीलाही तिची सुखदुःखे आहेत. ही आत्मौपम्य बुध्दी स्त्री पुरूषात निर्माण होणे याचेच नाव 'स्त्री पुरूष' समानता.

**४. सर्वधर्मसहिष्णुता ः**

समाजजीवनाला धारण करणारी जीवन पध्दती म्हणजे धर्म असे म्हणता येईल. त्याकडे पाहण्याचे दृष्टिकोन भिन्न असले तरी त्याचा गाभा माणूस हाच आहे. या माणसाला माणसाने समजावून घेणे हे जीवन समृध्दीचे लक्षण आहे. त्यासाठी सहिष्णुवृत्तीची जरूरी आहे. आपल्या धर्माप्रमाणेच इतर धर्माचाही आदरभाव दाखविणे सुजाणपणाचे लक्षण आहे.

भारतासारख्या विविध धर्मीय लोकांमध्ये जी एकता आढळते त्याचे ठळक कारण म्हणजे 'सर्वधर्मसहिष्णुता' 'आदर्शाची जागृत आकांक्षा' हे आहे. हे शैक्षणिक मूल्य आहे.

**कार्यात्मक व्याख्या ः**

सर्व धर्माविषयी सारखाच भाव असणे म्हणजे 'सर्वधर्मसहिष्णुता' होय. विविध धर्मांनी प्रतिपादन केलेली तत्वे, सिध्दांत, उपासना, मार्ग, रीतिरिवाज, जीवनपध्दती त्याविषयी आदर बाळगणे म्हणजे 'सर्वधर्मसमभाव' होय.

**आवश्यकता ः**

भारतीय राज्यघटना ज्या आधुनिक मूल्यांवर आधारलेली आहे. त्यापैकी एक मूल्य आहे 'समता'. ही समता प्रत्यक्षात आणावयाची असेल तर निरनिराळया जाती जमाती पंथ व धर्म यांच्याविषयी सद्भाव जागृत करून 'सहिष्णुता' निर्माण करणे त्यांची जोपासना करणे आवश्यक आहे.

भारतासारख्या विविध जाती, जमाती, धर्म, पंथ यांनी नटलेल्या देशात या सर्वांमध्ये सौहार्दाचे सलोख्याचे वातावरण असेल तरच स्थैर्य शांतता. सुव्यवस्था या गोष्टी नांदू शकतील. त्यासाठी विद्यार्थी जीवनात सर्वधर्मसहिष्णुतेचे मूल्य ठसणे आवश्यक आहे. राष्ट्र सामर्थ्यशाली बनविण्यासाठी सर्वधर्मसमभाव प्रत्येकाच्या मनात दृढ झाला पाहिजे. एवढयासाठी सुजाण भारतीय नागरीक बनवण्यासाठी 'सर्वधर्मसहिष्णुता' असणे आवश्यक आहे.

**५. राष्ट्रीय एकात्मता ः**

**स्वरूप ः**

भारत अतिविशाल देश आहे. या देशात भाषा, धर्म, जात, संप्रदाय, वेशभूषा, जीवनपध्दती, रीतिरिवाज, आहार यात आढळणा-या भिन्नतेतही भारत हे सार्वभौम राष्ट्र म्हणून संस्कारित करणे तशी अनुभूती देणे असे राष्ट्रीय मूल्याचे सर्वसाधारण स्वरूप आहे. विविध भाषा

बोलणा-या विविध धर्मांचे पालन करणा-या विविध सांस्कृतिक उपक्रम साजरे करणा-या लोकांनी बनलेला संमिश्र असा भारतीय समाज आहे. या सर्व विभिन्नतेला एकत्रित बांधणारा असा एक प्रवास आहे. हा प्रवास म्हणजे आम्ही सारे भारतीय आहोत ही भावना आणि या देशाविषयी त्याच्या भविष्यकालीन प्रगतीविषयी एकजुटीविषयी वाटणारी आपुलकी.

**आवश्यकता ः**

१. भारतीय संविधानात अभिप्रेत असणारी राष्ट्रीय एकात्मतेची भावना असणारा नागरिक घडविण्यासाठी.

२. सर्वधर्मसमभाव समाजवाद धर्मनिरपेक्षता लोकशाही या तत्वांवर श्रध्दा ठेवून फुटीरतेला आळा घालणे.

३. राष्ट्रध्वज, राष्ट्रभाषा, राष्ट्रगीत, राष्ट्रीय बोध चिन्ह, बोधवाक्य यांमागील संबोध व्यक्तिगत जीवनांच्या प्रत्येक क्षेत्रात प्रमाण मानून जातिनिर्मूलन व धार्मिक सहिष्णुता यांच्या आधारावर भारतीय एकसंघ समाज हा संस्कार दृढ करणे.

४. भाषा, धर्म, जात, संप्रदाय, वेशभूषा, जीवन पध्दती, रीतिरिवाज, आहार यातील भिन्नतेमुळे प्रादेशिक अस्मिता वाढीस लागून सार्वभौम एकात्मता या भारताच्या प्रतिमेला धक्का पोहोचत असल्याची लक्षणे दिसू लागली आहेत. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता या मूल्याची संस्कार करणे गरजेचे आहे.

**कार्यात्मक व्याख्या ः**

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे राष्ट्रातील व्यक्तिची मने जोडण्याची प्रक्रिया होय. राष्ट्राच्या समाज घटकात सुखदुःखाच्या समान भावना असल्या पाहिजेत. आपण या राष्ट्राचे सर्व नागरिक एकच आहोत हे आपल्या वर्तनातून प्रत्यक्षात दिसणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचा अनुभव होय.

## ६ . वैज्ञानिक दृष्टिकोन ः

### स्वरूप ः

आजच्या विज्ञात युगामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाणविणे ही आवश्यक गोष्ट आहे . विशेषतः आधुनिकीकरणासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाची कास धरणे आवश्यक आहे . वास्तविक पाहता ही एक व्यापक संकल्पना आहे . त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो .

मनमोकळेपणा, चिकित्सक विचारसरणी, अचूक निरीक्षणक्षमता, पूर्वग्रहरहित दृष्टिकोन, बौध्दिक प्रामाणिकपणा, जिज्ञासूवृत्ती, नव्या कल्पनांचा स्वीकार करण्याची तयारी, सत्याचा आग्रह धरण्याची वृत्ती, अंधश्रध्दांवर विश्वास न ठेवण्याची वृत्ती, पुराव्याअभावी मते न मांडण्याची वृत्ती, मते न स्वीकारण्याची वृत्ती, वैज्ञानिक पध्दतींचा अवलंब करण्याची वृत्ती, प्रयोगा बद्दल आदर बाळगण्याची वृत्ती . वैज्ञानिक दृष्टिकोन ही खूप व्यापक संकल्पना आहे .

### आवश्यकता ः

भारत हा विकसनशील आणि परंपरानिष्ठ देश आहे . विकसित देशांच्या प्रगतीला विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या विकासाबरोबरच त्यांनी स्वीकारलेला वैज्ञानिक दृष्टिकोन कारणीभूत आहे . विकसनशील देश आणि विकसित देश यांच्यातील विकासाची ही दरी कमी करण्यासाठी विकसनशील देशांना वैज्ञानिक दृष्टिकोनाची कास धरणे अपरिहार्य आहे . वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे बलशाली भारतीय समाज निर्माण करण्यासाठी या मूल्याची रूजवणूक शालेय जीवनापासूनच केली पाहिजे .

### कार्यात्मक व्याख्या ः

पृथ्वीवरील कोणत्याही घटक घटनांचे शास्त्रीय निकष लावून केलेल्या पडताळणीची प्रकिया म्हणजे 'वैज्ञानिक दृष्टिकोन' होय .

**७. संवेदनशीलता ः**

**स्वरूप ः**

आजच्या यंत्रयुगात संगणकादी साधनांचा वरचष्मा असल्याने भावभावनांचा कळत नकळत कोंडमारा होतो. संवेदना बोथट होतात. अनेक कारणांनी मनुष्य स्वभाव आत्मकेंद्रित झालेला दिसतो. मला काय त्याचे ? ही वृत्तीही दिसते. यास पायाबंद घालण्यासाठी संवेदनशीलता जोपासली पाहिजे. सूक्ष्मातील सूक्ष्म जाणिवा टिपण्याची क्षमता विद्यार्थ्यांत निर्माण करणे म्हणूनच आवश्यक आहे. मुलांमध्ये हळवेपणा किंवा मनाचा कमकुवतपणा नको तर आजूबाजूच्या जगातील निसर्गातील वस्तू घटनांशी समरस होण्याची वृत्ती हवी. शेजारी पाजारी अनाथ अपंग यांचे जीवन समजून घेण्याची उदारता हवी. मानवी जीवनातील सुखदुःखे यशापयश यांच्याकडे पाहण्याची समतोल वृत्ती हवी. मानवेतर सृष्टीतील निसर्गातील भावभावनासुध्दा समजून घेण्याची कविवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी हे संवेदनशीलता मूल्य संक्रमित करण्याचे अंतिम उद्दिष्ट असावे.

**आवश्यकता ः**

आपल्या आजूबाजूच्या जगात माणुसकीपेक्षा व्यवहारवाद बोकाळत चालला आहे. स्वार्थीवृत्तीचे आकर्षण वाढले आहे. गतिमान जीवनात आपण आपले माणूसपण हरवत चाललो आहोत असे वाटते. यंत्रयुगाच्या प्रभावामुळे आपणही यंत्राचाच एक भाग बनण्यात माणसास धन्यता वाटू लागली आहे. नाटय, काव्य, संगीत, नृत्य, चित्र आदी कलांमधील आनंद टिपण्याची रसिकता आपण गमावत आहोत की काय अशी शंका येते. या पार्श्वभूमीवर संवेदनशीलता हे मूल्य जागविण्याची नितांत आवश्यकता जाणवत आहे. शिक्षणाच्या माध्यमातून हे मूल्य जागविणे शक्य आहे. कार्यात्मक व्याख्या सूक्ष्मातील सूक्ष्म जाणिवा टिपण्याची क्षमता विद्यार्थ्यांत विकसित करणे म्हणजे 'संवेदनशीलता' होय. विद्यार्थी अन्यायाविरूध्द उदार स्वागतशील व निर्भय दृष्टिकोन म्हणजेही 'संवेदनशीलता' होय.

**८. सौजन्यशीलता ः**

**स्वरूप ः**

सौजन्य म्हणजे आपल्या बांधवांशी प्रेमळपणाने वागणे हे समजून घेणे दुस-यांना दुःख होईल असे न वागणे हे सौजन्यपूर्ण वागणे होय. सौजन्य ओळखण्याची बाहय खूण म्हणजे मधुर भाषण होय. सर्वांना आदराने वागविणे त्यांच्याबद्दल स्नेह बाळगणे त्यांना साहाय्य करणे याचा समावेश सौजन्यपूर्ण वागण्यात होतो.

**आवश्यकता ः**

सौजन्यशीलता हे मूल्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवणे त्यांच्या सवयीचा भाग होणे आवश्यक आहे. अनेक विद्यार्थी उद्धटपणे वागतात. त्यांच्या परस्परांच्या वागण्यात अनेकदा बेशिस्तच नाही वैरभावही असतो. ही परिस्थिती योग्य नाही. यात बदल होण्याची गरज आहे. शिक्षक व विद्यार्थी यांचे परस्परसंबंध सौहार्दाचे असले पाहिजे. आई, वडील व मूल यांच्या कौटुंबिक नात्यातही अनेकदा तणावाचे वातावरण निर्माण होते. कौटुंबिक स्वास्थाच्या दृष्टीने हे योग्य नाही. अशा वेळी शाळेच्या माध्यमातून सौजन्यशीलतेचा संस्कार करणे आवश्यक आहे. भारतीय शिष्टाचार पध्दतींची माहिती व्हावी. तसेच सौजन्य हे विकसित व्यक्तिमत्वाचे अंग आहे. या जाणिवेचा विकास होणे आवश्यक आहे.

**कार्यात्मक व्याख्या ः**

आपल्या सहवासात येणा-या परिचित व अपरिचित वयाने मोठया बरोबरीच्या व्यक्तिशी विनयाने नम्रतेने व शिष्टाचाराने वागणे इतरांचे म्हणणे शांतपणे व पूर्णपणे ऐकून घेणे आणि त्यांना समंजपणे प्रतिसाद देणे म्हणजे सौजन्यशीलता होय.

## ९. वक्तशीरपणा ः

### स्वरूप ः

वेळेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. गेलेली वेळ पुन्हा कधीही परत येत नाही. वक्तशीर माणसेच जीनवनात यशस्वी होतात.

वेळेवर केलेले लहानसे काम पुढील मोठा अनर्थ टाळू शकते. वक्तशीरपणा हा जीवनाचा असा महत्त्वाचा घटक बनावा. वक्तशीरपणा म्हणजे वेळ पाळणे, वेळेवर ठरलेले काम करणे होय. व्यक्तिगत तसेच सामाजिक जीवनात सर्वांनीच वेळेचे भान ठेवणे आवश्यक आहे. कमीत कमी वेळेत अधिक काम वेळेचे काटेकोर नियोजन याही गोष्टींकडे आपण जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे.

### आवश्यकता ः

संपन्न व कार्यसमृध्द व्यक्तिमत्वासाठी वक्तशीरपणा हे अनिवार्य मूल्य आहे. हाती घेतलेले काम सुविहितपणे पूर्ण होण्यासाठी वक्तशीरपणाचे मूल्य महत्वाचे ठरते. कामातील गोंधळ टाळण्यासाठी आत्मविश्वास कायम राखण्यासाठी वक्तशीरपणाचा आचार आवश्यक आहे. नियोजनपूर्वक केलेले कोणतेही काम यशस्वी होतेच. नियोजनामध्ये वेळ हा घटक फार मोलाचा आहे.

### कार्यात्मक व्याख्या ः

नियोजनानुसार हाती घेतलेले काम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अत्यावश्यक असलेला घटक म्हणजेच 'वक्तशीरपणा' होय.

**१० . नीटनेटकेपणा ः**

**स्वरूप ः**

एक जीवनमूल्य म्हणून 'नीटनेटकेपणा'कडे पाहताना आपल्या डोळयांसमोर व्यक्तिमत्वाचे आंतरबाहय असे दोन्ही घटक येतात . वेशभूषा, केशभूषा, आपापल्या वस्तू योग्य स्थितीत आणि जागच्या जागी ठेवणे इत्यादी गोष्टी सवयीचा भाग असणे आवश्यक आहे . सुसंगत विचार करणे व त्यांची योग्य प्रकारे अभिव्यक्ती करणे यांचा समावेशही नीटनेटकेपणात होतो . नीटनेटकेपणाची ही जाणीव व्यक्तिगत व सामाजिक पातळीवर प्रकट करणे आवश्यक आहे .

हे मूल्य व्यक्तिगत जीवनात जसे आणि जितके आवश्यक आहे . तितकेच ते सार्वजनिक जीवनातही महत्त्वपूर्ण ठरते . व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनात वावरताना स्वयंस्फूर्तीने आणि सहजतेने नीटनेटकेपणाने वागणे ही त्या मूल्याची एक कसोटीच आहे .

**आवश्यकता ः**

व्यक्तिगत स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता परस्पर संबंध चांगल्या रितीने जोपासणे यांसारख्या सवयींसाठी 'नीटनेटकेपणा' हे मूल्य निश्चितच उपयुक्त ठरेल . वर्गमित्र, कुटुंबीय, शेजारी अथवा सार्वजनिक ठिकाणी भेटणारे नागरिक या सर्वांचे मनात आपुलकी व स्नेह शालेय पातळीवरच रूजले जाणे आवश्यक आहे . आदर्श कार्यसमृध्द जीवनासाठी या मूल्यांची नितांत गरज आहे .

जीवनाची कार्यशक्ती वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे मूल्य आहे . त्यातून व्यक्तीचा स्वतःचा काम करण्याचा आत्मविश्वासही वाढतो . म्हणून 'नीटनेटकेपणा' हा गतिमान जीवनाचा कणाच आहे .

**कार्यात्मक व्याख्या ः**

ज्या मूल्यांच्या संस्कारामुळे व्यक्तीचे बाहय तसेच आंतरव्यक्तित्व प्रभावी बनते वैचारिक आदानप्रदानास सुविहितता येते. परिसरातील प्रत्येक घटकाचा नीटसपणा वाढून त्यांच्या उपयुक्ततेचा कस अधिक वाढतो व त्यायोगे जीवन गतिमान आणि कार्यमग्न बनून यशाप्रत जाते ते मूल्य म्हणजेच 'नीटनेटकेपणा' होय.

वरील प्रमाणे दहा मूल्ये ही आवश्यक मानून त्यांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आलेला आहे."[१.३८]

## १.६.७ मूल्यशिक्षणाची माध्यमे ः

"विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जोपासना करण्यासाठी विविध माध्यमांचा वापर केला जातो. त्यापैकी प्रामुख्याने पुढील माध्यमाचा वापर शालेय स्तरावर नैतिक शिक्षण देण्यासाठी करता येतो असे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली या संस्थेने नमूद केले आहे.

**माध्यमे ः**

१. शालेय परिपाठ

२. वर्ग अध्यापन

३. अभ्यासपूरक उपक्रम

४. श्रमाधिष्ठित उत्पादक कार्यक्रम

५. आरोग्यविषयक व स्वच्छता विषयक कार्यक्रम

६. शिक्षकाचे स्वतःचे आचरण"[१.३९]

## १.६.८ मूल्य शिक्षणात शिक्षकाची भूमिका ः

मुले अनुकरणशील असतात. ते मोठयांचे अनुकरण करतात. त्यात आई वडिल सभोवतालचे नागरिक तर असतातच परंतु शिक्षकही असतात. मुलांना शाळेत असतांना आपले शिक्षक व शिक्षिका यांचे सर्वच बाबतीत अनुकरण करावे असे मनापासून वाटते. शिक्षकांच्या सर्व च व्यवहारांचे ते निरीक्षण करतात. जेवढा विश्वास आई वडीलावर नसतो तेवढा विश्वास मूले शिक्षकांवर ठेवीत असतात. गणित सोडविण्याची एखादी पध्दत वर्गात शिक्षकांनी समजावून दिली असेल तर तीच पद्धत ते स्वीकरीत असतात. घरी आई बाबांनी जर एखादे गणित शिक्षकांच्या पद्धती व्यतिरिक्त शिकवले तर मुले ते स्वीकारायला तयार नसतात. आमच्या सरांनी किंवा मॅडमनी आम्हाला असे सांगितले असे ठणकावून सुध्दा मुले सांगतात. एवढा विश्वास मुलांचा शिक्षक शिक्षिकांवर असतो.

"आपल्या शिक्षकांचे बोलणे, चालणे, बसणे, उठणे, लिहिणे, वाचणे इत्यादी अनेक कियांचे मुलं निरीक्षण करतात. अशा अनेक कियांबाबत शिक्षकांच्या पावलांवर पाऊल टाकून चालावे असे विद्यार्थ्यांना वाटत असते. म्हणून शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी आहे. शिक्षक म्हणजे शाळेत किंवा एखाद्या वर्गात विद्यार्थ्यांना शिकविणारी व्यक्ति एवढाच मर्यादित अर्थ नाही. 'शिक्षक' ही संकल्पना फार व्यापक आहे. शिक्षक हा अध्यापन करतो शिकवतो हे तर खरेच आहे. परंतु त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की शिक्षक विद्यार्थ्यांना अध्ययनाच्या अनुभूतीचा आनंद देत असतो. या भूमिकेतून शिक्षकाची भूमिका किती विस्तृत आहे हे लक्षात येते. येथेच शिक्षकाची 'मूल्य रूजविणारा' ही भूमिका लक्षात येते.

मूल्य शिक्षणाच्या प्रकियेत शिक्षकाच्या भूमिका मोलाच्या ठरतात. काही वेळा शिक्षक दीपस्तंभ असतो तर कुठे रोपांची निगराणी करणारा माळी असतो केव्हातरी प्रकाशदूत म्हणूनही त्याला भूमिका वठवावी लागते तर काही वेळा मूल्यमार्गावरून विद्यार्थ्यांचा जीवनरथ योग्य त-हेने चालावा म्हणून त्याला सारथ्याची भूमिका करावी लागते. या सर्व भूमिका शिक्षक व शिक्षिका यांनी मातृभावाने केल्या तरच मूल्यशिक्षणाचे प्रभावी कार्य शिक्षकाच्या हातून घडू शकते.

शिक्षकाच्या हातून मूल्यशिक्षणाचे अपेक्षित कार्य प्रभाविपणे घडले तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नैतिकतेची पवित्र आणि प्रसन्न साथ मिळेल.

खरं तर मूल्य रूजविण्यासाठी कोणत्याही पाठयपुस्तकाची अभ्यासकमाची आवश्यकता भासू नये. मूल्य ही रूजवायची असल्याने ती रूजविणा-याने स्वतः नीट समजून घेऊन स्वतःमध्ये स्वतःच्या आचरणात आणली पाहिजेत. शिक्षकाचे स्वतःचे आचरण वागणे इत्यादी कृतीतून ती दिली जाणे हेच अधिक योग्य आहे. शिक्षकाला ही मूल्ये समजली तरच तो आपल्या विषयातून ती देवू शकणार आहे. एखादे मूल्य समजावून देणं हेच केवळ अपेक्षित नाही तर ते मूल्ये विद्यार्थ्यांच्या अचरणातून आपल्याला प्रत्यक्ष दिसायला हवे. शाळांमध्ये मूल्यशिक्षणाचा तास रोज घेतला जात असला तरी आपण तेवढयावरच न थांबता आपण शिकवित असलेल्या विषयात जेव्हा एखाद्या मूल्यांशी संबंधीत आशय येईल तेंव्हा तो आशय ते मूल्य रूजविण्यासाठी म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवे. ते मूल्य रूजविण्यासाठी त्यासारखी आपल्या अनुभवातून आलेली कही उदाहरणे द्यायला हवीत."[१.४०]

मूल्यशिक्षणाबाबत शिक्षकाची भूमिका ही मूल्यकांतीच्या अग्रदूताची आहे. याबाबत सुदैवाने कुणाचेही दुमत नाही. शालेय जीवनात विद्यार्थ्यांना विविध विषयांचा अभ्यास करावा लागतो. भाषा, गणित, सामाजिकशास्त्रे व शास्त्र आणि कला अशा चार गटांमध्ये अभ्यासकमाची स्थूल विभागणी असते. नेमलेल्या अभ्यासकमानुसार त्या त्या ज्ञान घटकाचे अध्यापन तर शिक्षक करीत असतातच पण या प्रत्येक ज्ञानघटकाबरोबर विद्यार्थ्यांच्या मनात उच्च नैतिक मूल्यांची रूजवण ती अप्रत्यक्षपणे करीत असतात. प्रयोगशाळेत शास्त्राचे प्रयोग करून घेत असतांना शास्त्रीय उपकरणांची हाताळणी करणे प्रयोग साहित्याची मांडणी करणे या प्रकियांमुळे नीटनेटकेपणा या मूल्यांची रूजवण होते. तर प्रत्यक्ष प्रयोग करून त्यातील शास्त्रीय निष्कर्ष तपासताना वैज्ञानिक दृष्टी या मूल्याचे शिक्षण आपोआपच मिळते. ही अनुभूती विद्यार्थ्यांना देणे हे मात्र सर्वस्वी शिक्षकाच्या हाती आहे आणि इथे शिक्षकाची भूमिका मूल्यशिक्षणात महत्त्वाची ठरते. इतिहासाचे अध्यापन करीत असतांना छत्रपती शिवाजी महाराज किंवा कांतिकारक यांच्याशी

संबंधीत पाठ असेल तर राष्ट्रभक्ती या मूल्याची अनुभूती शिक्षक देऊ शकतात. अशा त-हेने अभ्यासकमाच्या स्तरावर शिक्षक मूल्ये रूजवू शकतात.

मूल्य रूजविण्याच्या बाबतीत शिक्षकांच्या भूमिकेचा इतिहास आपल्या समोर आहे. म.फुले, लोकमान्य टिळक, आगरकर, डॉ.अब्दुल कलाम, डॉ.राधाकृष्णन हे सर्व लोकशिक्षक स्वतः शिक्षकच होते. त्यांनी देशाच्या वैचारिक जडणघडणीला मोठा हातभार लावला आणि मूल्यकांती घडविली. मदोन्मत व जुलमी धनानंदाला सत्तेच्या सिंहासनावरून खाली खेचणारा सम्राट चंद्रगुप्त चाणक्य नावाच्या शिक्षकाने घडविला हे आपणास माहित आहे.

## १.६.९ संशोधनातील महत्त्वाच्या संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या ः

### १. डॉ.न.म.जोशी यांचे साहित्य ः

"प्रस्तुत संशोधनासाठी डॉ.न.म.जोशी यांनी लिहिलेल्या वाङ्मय कथा प्रकार एकूण दोन पुस्तके म्हणजे डॉ.न.म.जोशी यांचे वाङ्मय होय."

### २. बोधकथा ः

"ज्या कथेतून बोध घेतला जातो अशा कथा किंवा बोध / उपदेश सांगणा-या कथा."

### ३. आशय विश्लेषण ः

कथेमधील आशयाचे विश्लेषण करणे.

## १.६.१० संशोधनाची उद्दिष्टे ः

१. डॉ.न.म.जोशी यांच्या साहित्याचे वाचन करणे.

२. साहित्यातील मूल्यविचार शोधणे.

३. मूल्यविचारांचे आशयानुरूप स्पष्टीकरण करणे आशयविश्लेषण करणे.

## १.६.११ संशोधनाची गृहितके ः

१. मूल्यविचारांचा उगम तत्वज्ञानातून झालेला आहे.

२. मूल्यसंस्कारामुळे मानवी विचारांमध्ये सकारात्मक फरक पडतो.

३. आधुनिकीकरणामुळे मूल्यांचा -हास होत आहे.

४. मानवी जीवन आणि मूल्ये यांचा अतुट संबंध आहे.

५. डॉ.न.म.जोशी यांनी नैतिक मूल्ये केंद्रस्थानी ठेवून बोधकथांची निर्मिती केली आहे.

## १.६.१२ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ः

१. प्रस्तुत संशोधन सर्व मूल्यांसाठी मूल्य शिक्षणासाठी उपयुक्त आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे फक्त डॉ.न.म.जोशी यांच्या साहित्यापुरतेच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे साहित्य प्रकारातील बोधकथांपुरतेच मर्यादित आहे.

## १.७ समारोप ः

मूल्यांचा उगम, महत्व, गरज, प्रकार या विषयी सविस्तर माहिती आपण वरील प्रमाणे अभ्यासली.

*****

## संदर्भ सूची ः


१. डॉ. ग.ना. जोशी ः तत्वज्ञान, महाकोश, मूल्यशास्त्र, मूल्यतत्वज्ञान

२. डॉ. क्षमा लिमये ः मूल्यशिक्षण, विद्या विकास मंडळ, नागपूर.

३. म.बा.कुंडले जगताप ः मूल्यशिक्षण व धर्मनिरपेक्षता, प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान पान क.५७ ते ७२

४. म.बा.कुंडले ः प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान पान क.१०८ ते १११

५. डायमंड सामाजिक ज्ञानकोश ः २२९३ ते २३००

६. प्रा. धनंजय असवरीकर ः मानवी जीवनातील मूल्यांचे स्थान. मंगळवार दि.१६ नोव्हेबर २०१०

७. तत्रैव.

८. प्रा.डॉ.एकनाथ गावंडे ः मूल्याधिष्ठित शिक्षण प्रकिया आणि उपचार

९. मूल्यशिक्षण सुसंवाद ः

१०. तत्रैव.

११. तत्रैव.

१२. तत्रैव.

१३. तत्रैव.

१४. तत्रैव.

१५. तत्रैव.

१६ . तत्रैव .

१७ . तत्रैव .

१८ . तत्रैव .

१९ . तत्रैव .

२० . संस्कृत मराठी ः श्रीमद्भगवद्गीता संवत २०५९ पाचवा संस्करण . गोरखपुर गीताप्रेस .

२१ . तत्रैव .

२२ . तत्रैव .

२३ . जोशी ग . ना . इ . स . १९७५ धर्माचे तत्वज्ञान प्रथमावृत्ती पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी .

२४ . तत्रैव .

२५ . तत्रैव .

२६ . जोशी महादेवशास्त्री सं . इ . स . १९६५ भारतीय संस्कृती कोश खंड आठवा . प्रथमावृत्ती पुणे ः भारतीय संस्कृतिकोश मंडळ .

२७ . गद्रे गीता गद्रे ल . रा . इ . स . १९८५ शिक्षणाचा इतिहास भाग १ २ ३ नूतन प्रकाशन पुणे .

२८ . राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नवी दिल्ली मनुष्यबळ विकास मंत्रालय भारत सरकार शिक्षण विभाग . मराठी भाषांतर प्रकाशन ः संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे .

२९. शिक्षक हस्तपुस्तिका मूल्यशिक्षण ः इयत्ता नववी व दहावी इ.स.१९९९ पुनर्मुद्रण पुणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.

३०. तत्रैव.

३१. आचार्य श्री.रा. इ.स.१९७९ आधुनिक भारतातील शैक्षणिक प्रबोधन. पहिली आवृत्ती पुणे पुष्पक प्रकाशन.

३२. उमाठे वि.तु.व.इ.सं.इ.स. १९९२ शिक्षण भारती मूल्यशिक्षण विशेषांक त्रैमासिक जानेवारी. बाहुबली अनेकान्त शोधपीठ श्री बाहुबली विद्यापीठ बाहुबली.

३३. पारसनीस न.रा. इ.स.१९८७ शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका प्रथमावृत्ती पुणे ः नुतन प्रकाशन.

३४. पाटील वसंत ः सं. अदिनांकित मूल्यांचे शिक्षण शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका इ.१ ते ८ पुणे ः महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

३५. पाटील वसंत ः सं. इ.स. १९९६ शिक्षणसंक्रमण मूल्यशिक्षण विशेषांक मासिक ऑगस्ट पुणे ः महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.

३६. तत्रैव.

३७. नैतिक शिक्षण प्रकल्प ः १९८४- ८५ ते १९८६- ८७ मूल्यमापन अहवाल इ.स. १९८७- ८८ पुणे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

३८. नैतिक शिक्षण मार्गदर्शक पुस्तिका इ.स.१९८४ पुणे ः शिक्षणशास्त्र संस्था.

३९. भारताचे संविधान १३ जून १९९५ पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे इ.स.१९९६ चौथी आवृत्ती पुनर्मुद्रण महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनाद्वारे अनुवादित आणि संचालक मुद्रण व लेखन.

४0. तत्रैव.

*****

# प्रकरण 2

# संबंधित साहित्याचा व पूर्व संशोधनाचा आढावा

## २.१ प्रस्तावना ः

संशोधन विषयाची निवड झाल्यावर संशोधकाने या विषयाशी संबंधित साहित्याचा व पूर्व संशोधनाचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

संबधित साहित्य आणि पूर्व संशोधन साहित्य यांचा मागोवा घेणे ही एक वेळ घेणारी प्रकिया असली तरी ती अत्यावश्यक आहे. कारण पूर्व संशोधनाच्या संदर्भ साहित्याशिवाय संशोधन कार्य करता येत नाही. म्हणून संशोधन कार्यप्रकियेत अशा संदर्भ साहित्याचा अभ्यास करून आढावा घेणे हा एक महत्वाचा टप्पा मानला जातो.

## २.२ पूर्व संशोधन साहित्याचे महत्त्व आणि आवश्यकता ः

पुस्तके, ज्ञानकोश, वृत्तपत्रे, मासिके यांतील लेख, प्रकाशित प्रबंध आणि लघुप्रबंध इत्यादींचा उपयोग संशोधनकर्त्याला आपल्या संशोधनाच्या समस्येची निवड करणे उद्दिष्टे ठरविणे संशोधनाची रूपरेषा तयार करणे इत्यादी महत्त्वपूर्ण बाबींसाठी मार्गदर्शक ठरतात. त्यामुळे संशोधन कार्याला दिशा व गती मिळते. संशोधनात पुरक ठरणा-या अशा सर्व साहित्याला संशोधन संबंधित साहित्य म्हटले जाते.

संशोधनासाठी समस्या निश्चित झाल्यावर त्या समस्येचा अभ्यास कसा करावा□ कोणती संशोधन पध्दती वापरावी□संशोधनासंबंधी माहिती मिळविण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर करावा□याचा विचार संशोधनासंबंधी करावा लागतो. त्यासाठी संशोधकाला आपल्या संशोधनाशी संबंधित पूर्व संशोधनाच्या अभ्यासामुळे पुढील बाबींचे मार्गदर्शन होते ः

१. संशोधनाच्या मांडणीची पध्दत.

२. संशोधनासाठी नमुना निवडण्याची पध्दत.

३. संशोधनासाठी आवश्यक माहिती मिळविण्याची साधने.

४. संशोधनासाठी जमा केलेल्या माहितीचे विश्लेषण.

५. माहितीचे अर्थनिर्वचन करण्यासाठी वापरण्याची संख्याशास्त्रीय परिमाणे.

६. संशोधनाचे मिळालेले निष्कर्ष.

७. संशोधकाने केलेल्या शिफारशी.

पूर्व संशोधनामुळे समस्या निवडताना त्या समस्येवर किंवा त्या सारख्या समस्येवर पूर्वी कोणी संशोधन केले आहे का? या विषयी मार्गदर्शन मिळते. पूर्वीचा संशोधन विषय जसाच्या तसा संशोधनासाठी घेण्यात अर्थ नसतो. कारण नाविन्य हे संशोधन विषयाचे महत्त्वपूर्ण अंग आहे. संबंधित संशोधन साहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व विषद करताना J.W. Best म्हणतात "The research for related literature is one of the first step in research process. It is the valuable guide to defining the problem recognizing its significance suggestion promising data gathering devices , appropriate study design and sources of data."

**संदर्भ साहित्याचा आढावा घेण्याची उद्दिष्टे ः**

१. पूर्वी झालेल्या संशोधनाची माहिती प्राप्त करून घेऊन त्याची पुनरावृत्ती टाळणे.

२. निवडलेल्या विषयासंबंधिचे सिध्दांत परिकल्पना त्यांच्या मांडणी विषयी निश्चित कल्पना समाजावून घेणे.

३. संशोधन विषयाची उद्दिष्टे आणि गृहितके यांच्या मांडणीबाबत निश्चित कल्पना समजावून घेणे.

४. संदर्भ साहित्याचा आढावा घेऊन स्वतःचे ज्ञान, गुणवत्ता वाढविणे.

वरील उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून विविध ग्रंथालय, संशोधन संस्थांमधून संशोधनाला पूरक व आवश्यक अशा साहित्याचा शोध घेतला. यासाठी संशोधकाने पुढील संस्थांना व ग्रंथालयांना भेटी दिल्यानंतर तेथील ग्रंथपाल व व्यवस्थापक यांच्याशी वेळोवेळी चर्चा केली.

१. जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ पुणे.

२. शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग वाचनालय पुणे विद्यापीठ पुणे.

३. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ लायब्ररी अमरावती.

४. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ शिक्षण विभाग वाचनालय नाशिक.

५. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ वाचनालय जळगांव.

६. के.एल.ई. सोसायटीज कॉलेज ऑफ एज्युकेशन लायब्ररी हुबळी.( कर्नाटक )

७. डॉ.वि.भि.कोलते वाचनालय व संशोधनालय यवतमाळ.

८. शासकीय अध्यापक महाविद्यालय वाचनालय यमवतमाळ.

९. अण्णासाहेब खडसे शिक्षण महाविद्यालय वाचनालय यवतमाळ.

१0.'एकता मासिक' प्रकाशन भारत भवन १३६0 शुक्रवार पेठ पुणे २ यांचे कार्यालय.

११. एस.एन.डी.टी. पुणे.

या ग्रंथालयामध्ये आणि संस्थामध्ये असणारे संशोधन अहवाल विविध प्रकाशनांनी व संस्थांनी वेळोवेळी प्रकाशित केलेले संशोधन विशेषांक रिसर्च जर्नल्स् लेख नियतकालिके इत्यादींचा

अभ्यास केला. यातून संशोधकाला असे आढळून आले की संशोधकाने निवडलेल्या संशोधन विषयाशी तंतोतंत जुळणारे संशोधन पूर्वी झालेले नाही. मात्र विविध शिक्षण तज्ज्ञ समाजसुधारक विचारवंत तत्वज्ञ व संस्कारक्षम साहित्य लिहिणारे लेखक यांच्या कार्याचा व त्यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास झालेला आहे. याचा संशोधकाला प्रस्तुत संशोधनासाठी वेळोवेळी उपयोग झाला.

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी जास्तीत जास्त साहित्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या साहित्याचे वर्गीकरण दोन प्रकारे केले आहे.

अ. संशोधन विषयाशी संबंधित साहित्य.

ब. संशोधन विषयाशी संबंधित पूर्व संशोधन ( पीएच्. डी. प्रबंध )

## २.३ संबंधित साहित्याचा आढावा ः

प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाचा शैक्षणिक अभ्यास करावयाचा असल्याने संशोधकाने संशोधन विषयाला न्याय देण्यासाठी संदर्भ साहित्याचा आढावा घेतला आहे. हा आढावा घेताना संशोधकाने संबंधित संदर्भ साहित्याची वैशिष्ट्ये आणि उद्दिष्टे विचारात घेतली. प्रस्तुत संशोधन विषयामध्ये डॉ.न.म.जोशी एक साहित्यिक आणि शिक्षक असल्याने त्यांच्या बद्दलचेही साहित्य विचारात घ्यावे लागले शिवाय पूर्व संशोधनही विचारात घ्यावे लागले. डॉ.न.म.जोशी यांच्यावर काही संशोधनात्मक कार्यही झाले आहे. त्याचाही विचार संशोधकाने याठिकाणी केला आहे.

### २.३.१ डॉ.न.म.जोशी यांच्याशी संबंधित संशोधनात्मक साहित्य ः

डॉ.न.म.जोशी हे साहित्यिक आहेत. त्यांनी विविधांगी लेखन विपूल प्रमाणात केले आहे. त्यामुळे डॉ.न.म.जोशी एक व्यक्ति आणि त्यांचे वाङ्मय हे संशोधनाचे विषय होऊ

शकतात. अशाच एका संशोधन कार्याचा आढावा संबंधित साहित्य म्हणून प्रस्तुत संशोधनात विचारात घेतला आहे. त्या संदर्भातील माहिती पुढीलप्रमाणे आहे.

संशोधक ः दिलीप मानसिंह गरूड

पदवी ः पीएच.डी.

विद्यापीठ ः पुणे विद्यापीठ पुणे

सन ः २००६

विषय ः मराठी वाङ्मय

संशोधन शिर्षक ः **"डॉ.न.म.जोशी ः व्यक्ति आणि वाङ्मय"**

मार्गदर्शक ः डॉ.मनोहर जाधव पुणे.

वरील संशोधन प्रवंध हा 'मराठी वाङ्मय' या विषयात पुणे विद्यापीठात सादर करण्यात आला आहे. पुणे विद्यापीठाने पीएच.डी. पदवीसाठी प्रबंध मान्य करून २००६ मध्ये दिलीप मानसिंग गरूड यांना पीएच्.डी. ही पदवी सुध्दा प्रदान केली आहे.

"डॉ.न.म.जोशी ः व्यक्ति आणि वाङ्मय" या संशोधन प्रबंधात डॉ.जोशी यांच्या समग्र वाङ्मयाचा निखळ वाङ्मयीन दृष्टिकोनातून अभ्यास केलेला आहे. तसेच डॉ.न.म.जोशी यांच्या वाङ्मयाचे आधुनिक वाङ्मयात कोणते स्थान आहे याची चिकित्सा केलेली आहे. त्याचप्रमाणे या प्रबंधात डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाचा सुध्दा अभ्यास केला गेला आहे. कारण डॉ.न.म.जोशी यांच्या समग्र साहित्यात बाल कुमार वाङ्मय अधिक प्रमाणात दिसून येते. या वाङ्मय प्रकारात त्यांनी मुलांसाठी पुस्तकांच्या संस्कारमाला लिहिल्या आहेत. त्यांचे बाल कुमार वाङ्मय हे प्रबोधनासोबत संस्कार निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून लिहिले गेल्याचा उल्लेख या प्रबंधात आहे.

प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म.जोशी यांचे चरित्र वाङ्मयीन वाटचाल डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय इत्यादींचा आढावा घेण्यासाठी या संदर्भ साहित्याचा उपयोग झाला आहे.

## २.३.२ डॉ.न.म.जोशी यांच्यावर प्रकाशित साहित्य ः

१. नियतकालिक ः **'एकता मासिक'** पुणे

विशेषांक ः ऑक्टोबर २००३ ( डॉ.न.म.जोशी यांच्यावरील गौरव विशेषांक )

संपादक ः विद्याधर ताठे

प्रकाशन ः 'एकता मासिक प्रकाशन' १३६0 भारत भवन, शुक्रवार पेठ, पुणे २

डॉ.न.म.जोशी यांची जेव्हा १७ व्या अखिल भारतीय बाल कुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी जेव्हा निवड झाली होती तेव्हा पुण्यातील 'एकता' या मासिकाने डॉ.न.म.जोशी यांच्या गौरवार्थ एक विशेषांक ऑक्टोबर २००३ (अश्विन १९२५ कलियुवाध्द ५१0५) मध्ये प्रकाशित केला होता.

या विशेषांकात डॉ.न.म.जोशी यांचे विद्यार्थी सहयोगी प्राध्यापक समकालीन साहित्यिक व समीक्षक यांनी डॉ.न.म.जोशी यांच्या विषयी गौरवपर लेख मुलाखत इत्यादी स्वरूपात लेखन केले आहे. या विशेषांकांत प्रामुख्याने डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाच्या योगदानाबद्दल अधिक लेखन आढळले.

या विशेषांकात पुढील लेखांचा समावेश आहे. 'अष्टपैलू व्यक्ति डॉ.न.म.जोशी (सौ.ज्योती बागदरे) 'न.म.जोशी एक संस्था' (र.रा.बेलसरे) 'संघर्षातून सन्मानाकडे' ज्योतिष विशारद (सौ.विद्या प्रदीप कोल्हटकर) 'गावाकडचा लेखक ः न.म.जोशी' (बजरंग शेलार) 'आनंदयात्री साहित्यिक शिक्षक ः डॉ.न.म.जोशी' (दत्ता टोळ) इत्यादी या लेखामधील माहिती प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म.जोशी यांचे जीवन चरित्र उलगडताना उपयोगी पडले. शिवाय डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाचे विविध पैलू सुध्दा समोर आले.

या विशेषांकातील संबंधित साहित्याचे अवलोकन केल्यानंतर प्रस्तुत संशोधनातील गृहितक मांडतांना संशोधकाला त्याची मदत झाली.

२. नियतकालिक ः 'ज्ञानकुंभ' (शैक्षणिक वार्तापत्र )

विशेषांक ः फेब्रुवारी २००६ (डॉ.न.म.जोशी यांचे अभिष्टचिंतन करणारा विशेषांक)

प्रकाशक ः सौ.योगिनी कुळकर्णी, १३१८ कसबा पेठ पुणे ११

श्री विनायक कुळकर्णी हे संपादक असलेल्या 'ज्ञानकुंभ' शैक्षणिक वार्तापत्र' च्या या विशेषांकात डॉ.न.म.जोशी यांच्या सप्तदशकपूर्ती निमित्य अभिष्टचिंतन करतांना डॉ.न.म.जोशी यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबाबत उल्लेख केला आहे. या विशेषांकातील ही माहिती डॉ.न.म.जोशी यांचे चरित्र व जीवनातील वाटचालीसाठी संदर्भ म्हणून उपयोगी पडली आहे.

३. नियतकालिक ः 'साहित्य सूची' पुस्तकावरील समीक्षात्मक लेख

अंक ः एप्रिल २००८

प्रकाशक ः श्री मोरेश्वर दत्तात्रय नांदूरकर, ६४० नारायणपेठ पुणे ३०

श्री.योगेश मो.नांदूरकर यांनी संपादित केलेल्या या अंकात 'पुस्तक परिचय' या सदराअंतर्गत डॉ.न.म.जोशी यांचे अलिकडेच प्रकाशीत झालेले पुस्तक 'कथानम' या संदर्भात समीक्षणात्मक लेख प्रकाशित झाला आहे. प्रस्तुत संशोधनात 'कथानम' हे पुस्तक 'कथा' या वाङ्मय प्रकारात समाविष्ट असल्याने या समीक्षणात्मक लेखाचा संदर्भ साहित्य म्हणून उपयोग झाला. या लेखात गाभा घटक आणि नैतिक मूल्यांच्या संदर्भात व्यक्त झालेले आशय आणि प्रस्तुत संशोधनातील संदर्भ याची तुलना करता आली आणि संशोधकाने व्यक्त केलेला विचार आणि या लेखातील विचार कसा मिळता जूळता आहे हे सुध्दा बघता आले. तसेच संशोधनाचे गृहितक ठरवितांनाही सदर लेख उपयोगी ठरला.

## २.४ पूर्व संशोधनाचा आढावा ः

संशोधकाने प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यापूर्वी पूर्व संशोधनाचा आढावा घेतला असता पीएच्.डी. स्तरावरील पुढील संशोधन संदर्भ शिक्षणशास्त्र या विषयात झाल्याचे आढळते.

१. संशोधक ः भट्ट जे.एन.२ (१९७३) यांनी सरदार पटेल युनिव्हर्सिटी (SPU) मध्ये "A study of the Educational Philosophy of Vinoba Bhavae" या विषयावर जे संशोधन केले आहे त्यासाठी त्यांनी पुढील उद्दिष्टे ठरविली होती.

**प्रमुख उद्दिष्टे ः**

"विनोबा भावेंच्या जीवनविषयक तत्वज्ञानाच्या संदर्भात त्यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे."

**उपउद्दिष्टे ( Subsidiary Objectives )**

अ. विनोबा भावेंच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे पृथःक्करण इतर तत्वज्ञानांच्या शाखांच्या संदर्भात करणे.

ब. भारतातील सद्य परिस्थितीत विनोबांचे शैक्षणिक विचार कसे राबविता येतील याचा विचार करणे.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांनी ऐतिहासिक संशोधन पध्दती वापरली आहे. या संशोधनात निघालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. जीवनोपयोगी शिक्षण ही नुसतीच एक प्रकिया नसून काही उद्दिष्टे ध्येय बाळगणारी व ध्येयाप्रत नेणारी प्रकिया आहे.

२. आपल्या 'स्व' ची ओळख करणे ही शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट होय असे विनोबा म्हणतात.

३. विनोबांच्या मते अभ्यासक्रम हा जीवनोन्मुख श्रमाला प्रतिष्ठा देणारा व उपयुक्त असावा.

४. शिक्षक हा आध्यात्मिक गुरू असला पाहिजे असे विनोबा म्हणत असत.

**१. संशोधक ः अब्बासी ए.एन्.एम्.एस्.३ (१९८०)** यांनी गुजरात युनिव्हर्सिटी मध्ये "जवाहरलाल नेहरू यांचे शैक्षणिक विचार" या विषयावर जे संशोधन केले आहे त्यासाठी त्यांनी पुढील उद्दिष्टे ठरविली आहेत ः

१. शैक्षणिक समस्या बाबत नेहरूंच्या विविधांगी दृष्टिकोन अभ्यास करणे.

२. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटनांचा शैक्षणिक क्षेत्रावरील प्रभावांचा अभ्यास करणे.

३. नेहरूंच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव तत्कालीन सामाजिक व राजकीय घडामोडीवर पडला काय? याचा शोध घेणे.

४. प्राथमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणातील विषयांमध्ये नेहरूंच्या विचारांचा अभ्यास करणे.

५. भाषिक समस्या राष्ट्रीय एकात्मता युवकांच्या समस्था आणि शिक्षणावरील खर्च या प्रश्नांवरील नेहरूंच्या दृष्टीकोनाचा शोध घेणे.

या प्रबंध संशोधनासाठी 'ऐतिहासिक संशोधन पध्दती' वापरण्यात आली आहे. या संशोधनात निघालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. बालकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या व मानवी समाजाचा विकास करणे आणि त्यांचा दृष्टीकोन व्यापक करणे हे शिक्षणाचे ध्येय असावे.

२. छोटया मुलांसाठी अनौपचारिक शिक्षणाची व्यवस्था असावी व त्यातून त्यांचा सौंदर्यात्मक दृष्टीकोन विकसित व्हावा.

३. बेकारीची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षणाला प्राधान्य द्यावे.

४. मागास घटकांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य देणारी शिक्षण व्यवस्था व अर्थव्यवस्था असावी.

५. विद्यार्थ्यांनी आणि युवकांनी स्वतःला भावी जबाबदार नागरिकांसाठी तयार करावे.

६. जागतिक सामंजस्यासाठी दिले जाणारे शिक्षण विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन व्यापक करते.

**२. संशोधक ः काडीयाल आर.ए.४** (१९८०) यांनी शिवाजी विद्यापीठ मध्ये "A Critical study of the contribution of karmaveer Dr.Bhaurao Patil to the Educational Thought, practices and Development of Education in the state of Maharashtra" या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी यासाठी पुढील उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या शिक्षण विचारांचा टीकात्मक अभ्यास करणे.

२.रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाखांमधील कार्यपध्दतीवरून कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक विचारांच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

या प्रबंध संशोधनासाठी Case study approach या पध्दतीचा अवलंब केला आहे. या संशोधनात मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. समाजातील उपेक्षितांपर्यत शिक्षण पोहचविण्याची फार मोठी शिक्षण विषयक कामगिरी कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांनी बजावली आहे.(Education is not for classes but for masses.)

२. शिक्षण हे सामाजिक पुनर्रचनेचे महत्वाचे साधन आहे. समाजातील शिक्षणातून भावनिक एकात्मता साधून वर्गविरहित जातीविरहीत समाज कर्मवीर भाऊराव पाटील यांनी निर्माण केला.

३. लोकशाहीच्या दृढीकरणासाठी जाणिव निर्माण करणा-या व शोषणरहित समाजव्यवस्था निर्माण कराण्याची गरज असते आणि ही गरज शिक्षणातून पूर्ण केली जाते.

४. तरूणांमध्ये निःस्वार्थपणा जातीविरहित कार्यकर्ता इ.आवश्यक गुण निर्माण करण्यासाठी सर्वधर्म सर्ववर्गीय वसतिगृहांची स्थापना केली.

**३. संशोधक : डॉ.जैन के.सी.५** (१९८०) यांनी शिवाजी विद्यापीठ मध्ये “A study of the Educational philosophy of Lord Mahavir with relevance to modern India” या विषयावर संशोधन करतांाना पुढील उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. शैक्षणिक संदर्भात भ.महावीरांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

२. भगवान महावीरांच्या तत्वज्ञानाचा चिकित्सक अभ्यास करणे व सध्याच्या शैक्षणिक विचारांना पुष्टी देणा-या मूलभूत संबोधाचा अभ्यास करणे.

३. आधुनिक भारतातील समस्या निवारण करण्यासाठी भगवान महावीरांच्या तत्वज्ञानाचा कसा उपयोग करून घेता येईल ते पाहणे.

या प्रबंध संशोधनासाठी 'ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा' अवलंब करण्यात आला होता. संशोधनात निघालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत ः

१. जैन धर्म हा वास्तव जीवनाशी निगडीत असलेला धर्म आहे.

२. मानवी जीवन वास्तव बनवण्यासाठी कोणती मूल्ये आत्मसात करावयास हवीत हे यात सांगितले आहे.

३. मानवमात्राचे जीवन सुखी व संपन्न बनविण्यासाठी काही सामान्य सूचना यात दिलेल्या आहेत. जैन धर्माची उद्दिष्टे, मूल्ये, तत्वे यांनी शैक्षणिक प्रकियेत आपले काही योगदान दिले आहे.

४. आदर्शवाद, निसर्गवाद, वास्तवाद, कर्मवाद, मानवतावाद व अस्तित्ववाद याबरोबर जैन धर्माची तुलना केली असता आत्मज्ञान (Self-realization ) हेच शिक्षणाचे अंतिम ध्येय असल्याचे प्रतिपादन जैन धर्माने केलेले आढळले.

५. जैन धर्मातील निसर्गवादाच्या विचारांची तुलना रूसोच्या विचारांशी करता येते.

६. कार्यवादाप्रमाणे जैन धर्मात श्रमाला कार्याला महत्त्व दिले आहे.

७. भगवान महावीरांनी जैन धर्मात सांगितलेली सर्व साधारण तत्वे कार्यपध्दती यातून शैक्षणिक ध्येय अभ्यासक्रम पध्दती शिक्षकांचे कार्य शिष्याचे गुण व शिस्त इत्यादी बाबतीतील अनेक समस्यांवर उत्तर मिळते.

**४. संशोधक ः चव्हाण बी.पी.एस्.६** (१९८१) यांनी मेरठ विद्यापीठात "Educational Philosphy of Swamai Dayanand" (स्वामी दयानंद यांचे शैक्षणिक तत्वज्ञान) या विषयावर संशोधन केले. त्यासाठी त्यांनी ठरविलेली उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१. स्वामी दयानंद यांनी लिहिलेले ग्रंथ भाषाग्रंथ आणि त्यांच्यावरील अन्य साहित्यातील शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

२. स्वामी दयानंद यांच्या तात्विक पार्श्वभूमीचे तत्वज्ञान यांचा अभ्यास करणे.

३. त्यांचे ग्रंथ आणि अन्य साहित्यावरून त्यांच्या शिक्षणाचे स्वरूप शोधणे.

४. स्वामी दयानंद यांनी सांगितलेल्या जीवनपध्दतीनुसार शैक्षणिक पध्दती व शिक्षणाची उद्दिष्टे अभ्यासणे.

५. त्यांच्या तत्वज्ञानातील आध्यात्मिक आणि धार्मिक शिक्षणाचा अभ्यास करणे.

६. त्यांचे शैक्षणिक तत्वज्ञान आणि आधुनिक भारतातील शिक्षण यांचा संबंध शोधणे.

या संशोधन प्रबंधासाठी 'ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा' उपयोग करण्यात आला आहे. संशोधनातून निघालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. स्वामी दयानंद केवळ तत्वज्ञ किंवा धार्मिक वृत्तीचे नसून ते एक थोर शिक्षणतज्ज्ञ होते.

२. स्वराज्यानंतर राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना त्यांनी सर्वप्रथम मांडली.

३. गुरूकुल शिक्षण पध्दतीत ब्रम्हचर्य या संकल्पनेची अपरिहार्यता त्यांनी आवर्जुन मांडली.

४. दीर्घ आणि सुदृढ जीवनासाठी त्यांनी शारीरिक शिक्षणाचे आग्रही प्रतिपादन केले.

५. त्यांच्या मतानुसार शिक्षण ही आध्यात्मिक व सामाजिक प्रकिया असून ती मोक्षापर्यंत चालते.

६. गुरू शिष्याचा संबंध प्रेम आणि आदराचे स्थान असावे असा विचार त्यांनी प्रस्तुत केला.

**५. संशोधक ः गुप्ता आर.पी.७** (१९८५) यांनी रोहीलखंड युनिव्हर्सिटीमध्ये "A Study of Educational thoughts of Swami Vivekanand" या विषयावर संशोधन करताना जी उद्दिष्टे ठरविली होती ती पुढील प्रमाणे आहेत.

१. स्वामी विवेकानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा अभ्यास करणे.

२. स्वामी विवेकानंद यांच्या शैक्षणिक विचारांची आधुनिक प्रणालीमधील उपयुक्तता अभ्यासणे.

सदर संशोधनासाठी 'ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा' वापर केलेला असून स्वामी विवेकानंदाच्या वाङ्मयाचे प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत यांचा संदर्भ साहित्य म्हणून अभ्यास केला आहे. या संशोधनात मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. स्वामी विवेकानंद बालकाच्या शिक्षणामध्ये शारीरिक व मानसिक विकासावर भर देतात.

२. शिक्षण म्हणजे जीवनाची तयारी.

३. शिक्षणातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भावना जोपासली जाते.

४. शिक्षणातून चारिÎयसंवर्धन घडावे.

५. शिक्षण मोफत आणि सक्तीचे असावे.

६. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.

७. स्वावलंबन हे शिक्षणाने घडावे.

८. शिक्षण केंद्राच्या (शासनाच्या) अधीन नको.

९. शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळावी.

१०. मुलांना त्यांच्या आवडीप्रमाणे शिक्षण घेता यावे.

११. शिक्षणाने निर्वाणाची पूर्वतयारी करावी.

१२. शिक्षणात धार्मिक शिक्षणावर भर हवा. वेदान्त शारीरिक शिक्षण, तत्वज्ञान, भूगोल, इतिहास, शास्त्र, तांत्रिक शिक्षण, व्यवसाय शिक्षण, कला, संगीत, गृहविज्ञान इत्यादी विषय अभ्यासक्रमात असावेत.

**६. संशोधक : पेरियरा जे.जे.८** (१९८५) यांनी केरळ विद्यापीठात "Narayan Guru as a social Educator" हा विषय संशोधनासाठी निवडला होता. त्यासाठी त्यांनी जी उद्दिष्टे ठरविली होती ती पुढील प्रमाणे आहेत.

१. नारायण गुरूंच्या साहित्यिक योगदानाचे एक 'समाज शिक्षक' हया नात्याने मूल्यमापन करणे.

२. त्यांनी सुचविलेल्या शैक्षणिक तत्वांचा अभ्यास करणे.

३. जातपात नसलेला समाज व धार्मिक सहिष्णुता या संदर्भात त्यांनी जे योगदान दिले त्याचा अभ्यास करणे.

४. त्यांनी सुचविलेल्या सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणे.

५. आध्यात्मिक मूल्यांच्या मदतीने जीवनातील समस्या सोडविण्याच्या त्यांनी सांगितलेल्या पध्दतींचा अभ्यास करणे.

६. नारायण गुरूंनी सुचविलेल्या अध्यापन पध्दतीचा अभ्यास करणे.

७. आरोग्य शिक्षण संदर्भातील नारायण गुरूंच्या विचारांचे पृथःक्करण करणे.

सदर प्रबंध संशोधनासाठी विश्लेषणात्मक वर्णनात्मक (Analytico descriptive) संशोधन पध्दती उपयोगात आणली आहे. या संशोधनात मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. आपल्या कविता, संभाषण, लेखन याद्वारे मूख्यतः त्यांनी आपले समाजशिक्षण विषयक विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते व्यक्तीला राजकीय, स्वातंत्र्य विचार, स्वातंत्र्य वृत्ती, स्वातंत्र्य हे मिळाले पाहिजे.

२. सर्व समाजाला निदान प्राथमिक शिक्षण तरी मिळाले पाहिजे. समाजातील गरीब लोकांना शिक्षणासाठी प्रेरणा देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजाच्या वरच्या थरातील लोकांच्या तुलनेत उभे राहण्यासाठी समाजातील गरीब वर्गाला सुध्दा शिक्षण मदत करेल.

३. शिक्षणाद्वारे अस्पृशता निवारण केले पाहिजे. शिक्षणाद्वारे चांगल्या स्वच्छतेच्या सवयी समाजाला लावल्या पाहिजेत.

४. प्रगतीसाठी समाजाला शिक्षण हे आवश्यक आहे. हुशार व बुध्दीमान मुले गरीब आर्थिक परिस्थितीमुळे ज्ञानापासून वंचित राहू नयेत.

५. शिक्षणाचे ध्येय हे फक्त भौगौलिक / ऐहिक नसून ते मुळात आध्यात्मिक / परमार्थिक आहे.

६. शिक्षकाने आरोग्य शिक्षण सुध्दा दिले पाहिजे. आपल्या लिखाणात त्यांनी पालकांना चौरस आहाराबद्दल सल्ला दिलेला आहे.

७. अस्पृश्यता व जातीयता निवारण्यासाठी त्यांनी लेखन केले आहे.

**७. संशोधक ः अभ्यंकर शंकर ः** (१९८७) यांनी पुणे विद्यापीठात “A comaprehensive in depth and critical analysis of Swami Vivekanad’s educational thoughts and philosophical forndations with special focus on value

education, in the context of nuclear and space age global value crisis and need for value education in India today.” या विषयावर संशोधन करतांना पुढील उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. स्वामी विवेकानंद यांच्या शिक्षण विषयक विचारांचे पृथःक्करण करणे व मांडणी करणे.

२. प्राचीन भारतीय तत्वज्ञानात्मक ग्रंथात समाविष्ट असलेल्या विचारात स्वामी विवेकानंदाच्या शिक्षण विषयक विचारांचा शोध घेणे.

३. भारतात आज मूल्यशिक्षणाची आवश्यकता का आहे याची पडताळणी करणे.

४.आधुनिक जागतिक मूल्यसंघर्ष व नैतिकतेसाठी हाक या संदर्भात मूल्यशिक्षणासंबंधी स्वामी विवेकानंदाच्या वैचारिक दृष्टिकोनांचे पृथःक्करण करणे.

वरील संशोधनासाठी संशोधनाच्या लिखित आधारे सर्वेक्षण (Documentary Survey) व पृथःकरण पध्दतीचा अवलंब करण्यात आला त्यात सैध्दांतिक उपयुक्तता नमुना (Theoritical empirical mode) पध्दतीचा उपयोग माहितीचे पृथःक्करण व भाष्य करण्यासाठी करण्यात आला आहे. या संशोधनातून निघालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. स्वामी विवेकानंद यांचा शिक्षण विचार प्रामुख्याने सर्वसमावेशक अशा अद्वैत वेदातांच्या तत्वज्ञानावर आधारित होता.

२. स्वामी विवेकानंद यांच्या शिक्षण विषयक दृष्टिकोनातून प्रतीत होणा-या प्रासंगिक व स्फुट विधानाखेरीज त्यांच्या शिक्षण विषयक व्याख्यान व लेखात आत्मज्ञान प्राप्ती हा अतिशय प्रभावी विषय होता.

३. सर्वसामान्यपणे भारतीय तत्वज्ञान व विशेष करून अद्वैत वेदान्त यांचा आधुनिक अणुविज्ञानाशी खूप मोठया प्रमाणात संबंध व जवळीक आहे.

४. स्वामी विवेकानंद यांच्या शिक्षण विषयक विचारात गुरूकुल पध्दती व धर्मसंस्थातील गुरूजनांचा आदर्श शिक्षण विषयक संकल्पना यांचा मोठा प्रभाव दिसून येतो.

५. स्वामी विवेकानंद हे परिवर्तनवादी यापेक्षा हिंदू पुनरूज्जीवनवादी होते.

६. स्वामी विवेकानंद हे आदिशंकराचार्यांची बुध्दिमत्ता व बुध्दाची करूणा यांचे प्रतिक होत.

७. आज भारतातील शिक्षणाच्या सर्वस्तरावर मूल्यशिक्षणाची अतिशय प्रभावी व तातडीची गरज आहे.

८. स्वामी विवेकानंदांनी आपल्या शिक्षण विषयक व्याख्यानातून व लेखनातून विशिष्ट मूल्य संस्कारावर अतिशय भर दिला. ती विशिष्ट मूल्ये म्हणजे प्रेम, आत्मज्ञान, बंधुभाव, सेवाभाव, जबावदारीची भावना, सहानुभूती, अहिंसा, सहनशीलता, स्वातंत्र्य, साहस, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, प्रामाणिकपणा, सत्य व निर्भयता अशी आहेत.

**८. संशोधक ः चौधरी प्रभाकर श्रावण १०** (१९८९) यांनी पुणे विद्यापीठात "लोकमान्य टिळक यांचे शैक्षणिक विचार व कार्य" या विषयावर संशोधन करतांना पुढील उद्दिष्टे ठवविली आहेत.

१. लोकमान्य टिळकांच्या शैक्षणिक विचारांचा शोध घेणे व त्यांचे पृथःक्करण करून विशदीकरण करणे.

२. टिळक कालीन हिंदुस्थानातील ब्रिटीशांच्या शैक्षणिक धोरणावर केलेल्या समीक्षेचा आढावा घेणे आणि त्यांनी व्यक्त केलेल्या शैक्षणिक विचारांचे स्पष्टीकरण करणे.

३. टिळकांच्या आध्यात्मिक तत्वज्ञानाचा व शिक्षण विचारांचा संबंध पाहणे.

४. टिळकांनी 'शिक्षक' म्हणून केलेल्या 'औपचारिक' व 'लोकशिक्षक' म्हणून केलेल्या अनौपचारिक शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.

लोकमान्य टिळक यांचे शैक्षणिक विचार व कार्य हा प्रबंध लिहितांना संशोधकाने ऐतिहासिक संशोधन पध्दतीला मिळती जूळती 'तात्विक पध्दती' संशोधनासाठी निवडली आहे. या संशोधनात त्यांनी काढलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. लोकमान्य टिळकांनी भारतीय शिक्षणाला ज्वलंत राष्ट्रवादाची देणगी दिली.

२. अध्यापन कार्याला व शिक्षणाच्या प्रचार व प्रसाराला वाहून घेणारी त्यागी सेवापरायण शिक्षकांची एक नवी पिढी निर्माण होण्यास लोकमान्य टिळकांमुळे प्रेरणा मिळाली.

३. देशहिताची कामे हाती घेऊन त्यासाठी आयुष्य वेचणारा तेजस्वी तरूण निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय प्रमाणित केले.

४. अभ्यासक्रमात वास्तववादी आशय आणण्याचे कार्य टिळकांनी केले.

५. टिळकांनी शिक्षण क्षेत्राला विद्यार्थी केंद्री अशी नवी मोलाची दिशा दिली.

६. शिक्षणाचा संख्यात्मक, गुणात्मक विकास होऊन ते लोकाभिमुख झाले.

७. विद्यालयातील चार भिंतीतील औपचारिक शिक्षणाच्या एकविध व एकांगी रूपात टिळकांनी परिवर्तन घडवून आणले.

८. सर्वसामान्य माणसाचा व बहुजन समाजाच्या जीवनाच्या गरजांचा व महत्वाकांक्षांचा विचार भारतीय शिक्षणात होण्यास लोकमान्य टिळकांपासून चालना मिळाली.

९. आज स्वतंत्र भारतात लोकमान्य टिळकांचे सर्वच आदर्श उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात.

**९. संशोधक : गोगटे व्ही.व्ही.११** (१९९१) यांनी शिवाजी विद्यापीठात "शिक्षणाच्या क्षेत्रातील समर्थ रामदासांच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास" हे शिर्षक असलेल्या विषयावर संशोधन कार्य केले आहे. त्यांनी यासाठी जी उद्दिष्टे ठरविली होती ती पुढील प्रमाणे आहेत.

१. समर्थ रामदासांच्या साहित्यातून दृग्गोचार होणा-या शैक्षणिक विचारांचा शोध घेणे.

२. समर्थ रामदासांकडून स्थापन केलेल्या मठांचे शिक्षणाच्या क्षेत्रातील योगदान निर्धारीत करणे.

३. वर्तमानकालीन संदर्भात समर्थ रामदासांच्या शैक्षणिक विचारांचे व दृष्टीकोनाचे मूल्यांकन करणे.

सदर प्रबंधासाठी संशोधन पध्दती म्हणून 'वाङ्मय विश्लेषण पध्दती' वापरण्यात आलेली आहे. या संशोधनातून मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. समर्थ रामदासांनी ख-या ज्ञानावर भर दिला असून त्यांच्या मते शिक्षण आणि ज्ञान समानार्थी आहेत.

२. 'स्व' ची ओळख हे शिक्षणाचे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. शिक्षणाची इतर उद्दिष्टे सामाजिक कार्याची उन्नती श्रमाची प्रतिष्ठा आणि शारीरिक सुदृढतेची प्राप्ती ही आहेत.

३. संत रामदासांनी मठाची स्थापना करून त्यातून दिलेल्या शैक्षणिक प्रशिक्षणातून रामदासी संस्कृती निर्माण केली हे मठच पुढे महाराष्ट्रातील महत्त्वाची गैरराजकीय धार्मिक केंद्रे बनली.

४. शिक्षणात ऐकणे, वाचणे, लिहिणे, संगीत आणि धार्मिक पुस्तकांचा अभ्यास करणे याला समर्थ रामदास आत्यंतिक महत्व देतात.

**१०. संशोधक ः श्रीमती लोहकरे एस.एस.१२** (१९९१) यांनी नागपूर विद्यापीठात "जीवन मूल्यांच्या संदर्भात समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधाचे शैक्षणिक तत्वज्ञान" या विषयावर संशोधन करतांना खालील उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. समर्थ रामदासांच्या दासबोधातील शैक्षणिक तत्वज्ञानाचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. इयत्ता ५ वी ते १0 वी मराठी विषयाच्या अभ्यासक्रमातील श्री.दासबोधाची शैक्षणिक स्थिती अभ्यासणे.

या प्रबंधासाठी 'चिकित्सक विश्लेषणात्मक' (Critical analytical Study) या संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. सदर संशोधनात मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. समर्थ रामदासांच्या दासबोधात पुढील मूल्ये आढळतात.

अ. वैयक्तिक मूल्ये : निःस्वार्थीपणा, उद्योजकता, साधेपणा, स्वयं शिक्षण, क्षमता, स्वयंनियंत्रण, शुध्दता, नेतृत्व, विज्ञाननिष्ठा व परिश्रम.

आ. सामाजिक मूल्ये : समानता, मैत्री, त्याग, सर्वधर्मसमभाव, बंधूता, चांगली वागणूक.

इ. नैतिक मूल्ये : जबाबदारी, सत्य, दया, निसर्ग, प्रेम.

ई. आध्यात्मिक मूल्ये : देवावरील विश्वास, अद्वैत, प्रेम.

२. श्री दासबोधात अध्यात्मिकता, सत्यता, निसर्गवाद इत्यादी शैक्षणिक तत्वज्ञान आढळते.

३. श्री.प्रकाश कमिटी (१0६0), कोठारी कमिशन (१९६४-६६), समाज कल्याणाच्या संदर्भातील शिक्षण आयोग १९४९ तसेच रामदासांच्या 'आनंद वन भुवन' या संकल्पनेत दासबोधाचे प्रतिबिंब दिसून येते.

**११. संशोधक ः अग्रवाल कुसुम १३** (१९९२) यांनी आग्रा युनिव्हर्सिटी येथे "रामतीर्थ यांचे शैक्षणिक तत्वज्ञान" हे शीर्षक असलेले संशोधन कार्य केले आहे. त्यासाठी त्यांनी पुढील उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. रामतीर्थ यांचे तत्वज्ञान आणि शैक्षणिक विचार यांची निवड करणे वर्गीकरण करणे आणि चर्चा करणे.

२. रामतीर्थ यांचे शैक्षणिक विचारातून शिक्षणाचे भारतीयकरण आणि शैक्षणिक तत्वज्ञान यासाठी कृतीशील कार्यक्रम देणे.

या प्रबंध संशोधनासाठी 'चिकित्सक आणि विश्लेषणात्मक' या संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यात रामतीर्थांच्या तात्विक आणि शैक्षणिक संकल्पनांचा चिकित्सक आणि विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. संशोधनात मिळालेले मुख्य निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. जीवनाविषयीच्या कल्पना आणि अंतर्गत क्षमता विकसित करून बालकाचा व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी शिक्षण हाच मूळ आधार आहे.

२. अभ्यासक्रम आणि शिक्षणाच्या विविध स्तरावर भारतीय विचार असले पाहिजेत.

३. विद्यार्थ्यांना वेदांतांचे प्रात्यक्षिक ज्ञान दिले पाहिजे.

४. अभ्यासक्रमात तत्वज्ञान तसेच विज्ञान हे विषय असले पाहिजेत.

५. आर्थिकदृष्टया सक्षम बनविणारे शिक्षण असले पाहिजे.

६. शिक्षण स्नातक (B.Ed.) स्तरावर शिक्षकांना भारतीय तत्वज्ञानाची माहिती शिकविली पाहिजे.

७. शिक्षण स्नातकोत्तर (M.Ed.) स्तरावरील अभ्यासक्रमात पाश्चात्य व भारतीय तत्वज्ञानाची तुलना करणारा अभ्यासक्रम पाहिजे.

**१२. संशोधक ः कु.देशमुख ज्योती बाबाराव १४ (१९९९)** यांनी अमरावती विद्यापीठ येथे "आचार्य विनोबा भावे यांच्या शैक्षणिक विचारांचा वर्तमान भारतीय शैक्षणिक प्रणालीच्या संदर्भात एक चिकित्सक अभ्यास." या विषयावर जे संशोधन केले आहे. त्यासाठी त्यांनी पुढील उद्दिष्टे ठरविली होती.

१. आचार्य विनोबा भावे यांच्या शैक्षणिक विचारांचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. वर्तमान परिस्थितीच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास करणे.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने 'सर्वेक्षण पध्दती आणि आशय विश्लेषण पध्दती' यांचा अवलंब केला आहे. प्रस्तुत संशोधनातून निघालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. आजच्या शिक्षण प्रणालीत 'जीवन कसे जगावे' याचा अंतर्भाव करण्याची आवश्यकता आहे.

२. वर्तमान शिक्षण प्रणालीत नैसर्गिक व जोमदार भावना निर्माण करणे या शिक्षणाची आवश्यकता आहे.

३. वर्तमान परिस्थितीत नैतिक शिक्षणाच्या व संस्काराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. जेणे करून विद्यार्थ्यांमध्ये विश्वबंधुत्वाची भावना निर्माण होईल.

४. अनुभवातून मिळते तेच खरे शिक्षण हे विनोबांचे मत आहे.

५. विनोबांची बुनियादी शिक्षणाची कल्पना आजच्या वर्तमान प्रणालीत असावी.

६. शिक्षण हे कृतीतूनच दिले जावे.

७. ज्ञानशक्ती व शारीरिक श्रमशक्ती या दोहोंचा समन्वय शिक्षणात असावा.

८. शिक्षणात उत्पादनाला जास्त महत्त्व देण्यात यावे.

९. शिक्षण संस्थेत मुक्त वातावरणाची गरज आहे.

१०. जीवन व शिक्षण यांचा मेळ असावा.

११. शिक्षणात स्वावलंबन हे उद्दिष्ट असावे.

१२. अध्यात्म आणि विज्ञान या दोहोंचा समन्वय शिक्षणात असावा.

१३. शिक्षणाचे माध्यम मातृभाषेत असावे.

१४. विनोबांनी मांडलेली 'आचार्य कुलाची' संकल्पना वर्तमान परिस्थितीत सर्वांनाच मान्य आहे.

**१३. संशोधक ः निळकंठ रामदास फेगडे १५** (२००२) यांनी अमरावती विद्यापीठात "साने गुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यातून प्रकट झालेली मानवीमूल्ये व त्याद्वारे शिक्षणात संक्रमित होवू शकणारी मानवी मूल्ये ः एक चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधन करतांना जी उद्दिष्टे ठरविली आहेत ती पुढील प्रमाणे होती.

१. साने गुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यातून प्रगट झालेली मानवी मूल्ये शोधणे.

२. साने गुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यातून प्रगट झालेल्या विचारांचा ठसा शैक्षणिक स्वरूपाचा कसा आहे ते पाहणे.

३. इयत्ता ७, ८, ९ या वर्गांच्या मराठी पाठयपुस्तकातून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचा शोध घेणे.

४ . पाठयपुस्तकात प्रगटलेले मानवीमूल्ये किती प्रमाणात रूजलेले आहे याचा शोध घेणे .

५ . साने गुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यात प्रगट झालेल्या मानवी मूल्यांचा अंतर्भाव पाठयक्रमात समाविष्ट करण्यासाठी शिफारस करणे .

६ . साने गुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यात व मराठी पाठयपुस्तकातून प्रगट होणारी मूल्ये यांचा परस्पर संबंध शोधणे व तुलना तक्ता तयार करणे .

या संशोधनासाठी 'सर्वेक्षण पध्दती' ही संशोधन पध्दत म्हणून वापरली आहे . या संशोधनातून निळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत .

१ . साने गुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यामध्ये अनेक मानवी मूल्ये आहेत .

२ . साने गुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यामधील मानवी मूल्ये शैक्षणिक दृष्टया उपयुक्त आहे . म्हणून ते शिक्षणात संस्कारक्षम व स्विकारणीय आहे .

३ . या मानवी मूल्यांमुळे व्यक्तिमत्व विकासात हातभार लागतो .

४ . इयत्ता ७,८,९ च्या पाठयपुस्तकात अनेक मानवी मूल्ये आहेत .

५ . संस्कारक्षम वयोगटात साने गुरूजींच्या आत्मचरित्राचा प्रभाव पडतो .

६ . विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण अनुभूती दिली तर त्यांची आत्मचरित्राबद्दल अभिरूची वाढते .

७ . मानवीमूल्यांमुळे सामाजिक व भावनिक विकासाला हातभार लागतो .

**१४ . संशोधक ः पंडितराव वसुधा वासुदेव १६** (२००३) यांनी पुणे विद्यापीठ येथे "संत कबीरांच्या दोहयांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्याधिष्ठित अनौपचारिक शिक्षणाचा अभ्यास" असे

शीर्षक असलेले संशोधन केले आहे. त्यासाठी त्यांनी जी उद्दिष्टे ठरविली होती ती पुढील प्रमाणे आहेत.

१. संत कबीरांच्या दोहयांची संख्या मिळविणे.

२. दोहयांचे संकलन करणे.

३. संकलीत दोहयांचे वर्गीकरण करणे.

४. वर्गीकरणानुसार समाज प्रबोधन व लोकशिक्षणाचे मुद्दे शोधणे.

५. समाज प्रबोधन व लोकशिक्षणाच्या मुद्यांनुसार कोणती प्रचलित निर्धारीत मूल्ये प्रतिबिंबित होतात याचा शोध घेणे.

६. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या निर्धारित गाभा घटकांनुसार दोहयांचा अभ्यास करणे.

या संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन व सर्वेक्षणात्मक संशोधन या दोन पध्दतीच्या मधील 'विश्लेषणात्मक मार्ग' स्वीकारला गेला आहे. सदर संशोधनतून मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. संत कबीरांनी मानवतेच्या भूमिकेतून स्त्रीकडे पाहिले ही गोष्ट त्यांच्या मनातील स्त्री विषयी आदराची भावना प्रकट करते.

२. पाखंडांवर टीका, अंधःश्रध्दा निर्मूलनाचा प्रचार, समानतावादाचा पुरस्कार, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आग्रह, लोभ, अहंकाराचा त्याग करण्याचा सल्ला, गुरूविषयी पूज्य भावना, जीवनाच्या नश्वरतेवरील भाष्य, श्रमाला प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न, सकल विश्वाला दिलेला प्रेमाचा संदेश, शीलतेचे महत्व सांगणारे दोहे इत्यादींमुळे कबीरांना अनौपचारिक शिक्षणातील एक ऋषितुल्य गुरू मानण्यास प्रत्यवाय नसावा.

३. संत कबीरांच्या दोहयांचा उपयोग मूल्यशिक्षणाला पूरक असून बरेच दोहे अनेक मूल्यांना प्रतिबिंबित करणारे आहेत.

४. संत कबीरांचे अनेक दोहे हे अनेक गाभा घटकांना सामायिकरित्या पूरक आहेत.

५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील गाभाघटक व मूल्य शिक्षण या दोन संकल्पनांचा अभ्यास केला व यातून मूल्यशिक्षण व गाभा घटकांसाठी अनेक दोहे पूरक ठरलेले आढळलेले उदा. मूल्यशिक्षणाबाबत श्रम प्रतिष्ठा, राष्ट्रभक्ती, स्त्री पुरूष समानता, सर्वधर्म समभाव, राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक उपाय, भारताचा सामायिक सांस्कृतिक वारसा, समानतावाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक अडसराचें निर्मूलन, वैज्ञानिक मनोभावाची रूजवणूक-या गाभा घटकांच्या आशयाची पूर्तता होते.

**१५. संशोधक ः प्रा.मगर दादासाहेब पांडुरंग १७** (२००४) यांनी पुणे विद्यापीठ येथे "संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील अनौपचारिक मूल्यशिक्षणाचा अभ्यास" या विषयावर संशोधन करतांना पुढील उद्दिष्टे ठरविली होती.

१. मूल्य शिक्षणाचा अर्थ स्वरूप व आवश्यक यांचा थोडक्यात परामर्ष घेणे.

२. संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचा साकल्याने अभ्यास करणे.

३. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील मूल्यांचा शोध घेणे.

४. प्रत्येक मूल्यानुसार अभंग शोधून काढून त्यांचे वर्गीकरण करणे.

५. प्रत्येक मूल्याचे स्पष्टीकरण करणे व मूल्य संकल्पना विशद करणे.

६. अभंगातील मूल्ये राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व परिषदेची मूल्ये डॉ.एन.एस. गुप्तांनी संकलीत केलेली धार्मिक मूल्ये व भगवद्‌गीतेतील मूल्ये यांची तौलनिक मांडणी करून

प्रत्येक मूल्यांतर्गत अभंगाद्वारे लोकशिक्षण समाज प्रबोधन व मूल्यशिक्षण कसे घडून येते याचा शोध घेऊन शिफारशी करणे.

प्रस्तुत संशोधनात ऐतिहासिक संशोधन पध्दती व सर्वेक्षण पध्दती अंतर्गत येणारी 'पृथःक्करण वर्णनात्मक पध्दती' अशा मिश्र संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे. या संशोधनात पुढील निष्कर्ष मिळालेले आहेत.

१. जीवनाचे श्रेष्ठ अनुभव आणून देण्याचे सामर्थ्य संत तुकाराम महाराजांच्या अभंगात आहे. त्यासाठी संत तुकाराम महाराजांचे अभंग मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने अतिशय श्रेष्ठ असे मूळ स्त्रोत आहेत.

२. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील मूल्यांमध्ये प्रत्येकाच्या जीवनकार्याला दिशा गती व गुणवत्ता देण्याचे सामर्थ्य आहे असे आढळून येते.

३. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील मूल्ये प्राचीन वैदिक व भागवत सांप्रदायिक परंपरेशी सुसंगत व सुसंवादी अशी आहेत.

४. संत तुकारामांचे अभंग सामान्य प्रतीच्या काव्यासारखे नसून त्यांच्या अभंगाना वाङ्मयाच्या क्षेत्रात अतिशय पवित्र मानाचे व उच्च स्थान आहे.

५. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील देवदेवतांच्या धर्मग्रंथाच्या व मानवी जीवनाच्या संदर्भामुळे त्यांचे अभंग समृध्द झाले आहेत.

६. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील मूल्य ख-या अर्थाने जीवनदायी व्यवहारवादी व जीवनाभिमुख आहेत.

७. समाजाच्या चांगल्या वाईट प्रवृत्तींची चित्रणाचे संदर्भ देऊन त्यातून लोकशिक्षण व समाज परिवर्तन करण्याचा संत तुकाराम महाराजांचा प्रयत्न दिसून येतो.

८. संत तुकारामांच्या अभंगाची विविधता व गेयता या गुणधर्मामुळे त्यांचे अभंग मूल्यशिक्षणाचे व समाजप्रबोधनाचे अतिशय प्रभावी साधन म्हणून उपयोगात आणता येतील.

९. संत तुकाराम हे पुरोगामी विचारवंत व प्रागतिक समाजसुधारक होते.

१०. संत तुकारामांच्या अभंगाना समाज चिंतनाची भक्तीची बैठक होती व त्यांच्या अभंगातील लोकशिक्षण बहुआयामी होते.

११. शब्दसामर्थ्य व भाषा प्रभुत्व उत्तुंग कल्पनाशक्ती व्यापक प्रतिभाशक्ती अफाट लोकप्रियता यामुळे तुकोबांच्या अभंगातून मूल्यशिक्षणाचे कार्य अतिशय प्रभावीपणे होण्यास मदत होते.

**१६. संशोधक ः आबणे रामदास दशरथ १८** (२००४) यांनी पुणे विद्यापीठात "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यातील शिक्षण विचारांचा चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधन केले आहे. त्यासाठी त्यांनी ठरविलेली उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१. अण्णाभाऊ साठयांच्या साहित्यातील शिक्षण विषयक तत्वज्ञानाचा चिकित्सक अभ्यास करणे.

२. शैक्षणिक समाजशास्त्रीय तत्वांचे प्रतिबिंब अण्णाभाऊंच्या साहित्यात कोणत्या रीतीने उमटले आहे याचा अभ्यास करणे.

३. अण्णाभाऊंच्या साहित्यातील शिक्षण विचारांची राष्ट्राच्या उन्नतीसाठी काळानुरूप उपयुक्तता जाणून घेणे.

४. मुल्य शिक्षणाच्या संदर्भात लोकशाहीर अण्णाभाऊ साठयांच्या साहित्याचा अभ्यास करणे.

५. गाभा घटकांच्या संदर्भात लोकशाहीर अण्णाभाऊ साठयांच्या साहित्याचा अभ्यास करणे.

६. पर्यावरण शिक्षणाच्या संदर्भात लोकशाहीर अण्णभाऊ साठयांच्या साहित्याचा अभ्यास करणे.

या प्रबंधाच्या संशोधनासाठी 'ऐतिहासिक संशोधन पध्दती' वापरली आहे. सदर संशोधनातून जे निष्कर्ष मिळाले ते पुढील प्रमाणे आहेत.

१. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात शिक्षण विषयक विचार लक्षणीय प्रमाणात आहेत.

२. गाभा घटकांचा विचार करता प्रत्येक गाभा घटकांसंदर्भात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात संदर्भ मिळू शकतात आणि त्या गाभा घटकांसंबंधात अध्यापन करण्यासाठी उदाहरणे उपलब्ध होतात.

३. मूल्य शिक्षणासंदर्भात अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य उपयुक्त आहे. विविध मूल्यांची रूजवण करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य उपयुत्त ठरू शकेल.

४. अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यकाळातील महाराष्ट्राच्या तात्कालिन सामाजिक स्थितीचे दर्शन त्यांच्या साहित्यात घडते.

५. लोकसंख्या शिक्षण, पर्यावरण शिक्षण इत्यादी उपयुक्त शैक्षणिक घटकांचे अध्यापन करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य उपयुक्त ठरते.

६. विविध प्रकारची भाषिक कौशल्ये विकसित करण्यासाठी आणि विविध भाषिक घटक शिकविण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य उपयुक्त ठरते.

७. स्वतः शिक्षणापासून वंचित असलेल्या अण्णाभाऊ साठे यांनी लिखित साहित्यात एवढी कामगिरी केली आणि ते उत्तम साहित्यिक झाले. यावरून शिक्षण नसतानाही स्वप्रयत्नाने अभ्यासाने व अनुभवाने एखाद्या क्षेत्रात प्राविण्य संपादन करता येते हे शैक्षणिक तत्व या संशोधनावरून स्पष्ट होते.

**१७. संशोधक ः तनपुरे निलिमा १९** (२००५) यांनी पुणे विद्यापीठ येथे "राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात गुरूवर्य बाबूरावजी जगताप यांनी शालेय माध्यमिक स्तरावर केलेल्या कार्याचा अभ्यास" या शीर्षकाचे जे संशोधन केले आहे त्यासाठी त्यांनी जी उद्दिष्टे ठरविली होती ती पुढील प्रमाणे आहेत.

१. गुरूवर्यांनी शालेय माध्यमिक स्तरावर मूल्यशिक्षणाच्या संदर्भात केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मांडलेल्या 'मूल्यशिक्षण' संकल्पनेचा अभ्यास शालेय माध्यमिक स्तरावर करणे.

३. गुरूवर्यांच्या कार्यातील मूल्ये व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मूल्ये यातील साधर्म्य शोधणे.

प्रस्तुत संशोधनात सामुग्री संकलनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला गेला आहे. या संशोधनातून पुढील निष्कर्ष निघाले आहेत.

१. पुण्याच्या पूर्वभागातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या विकासात गुरूवर्यांनी विचारपूर्वक राबविलेल्या शिक्षण पध्दतीमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पुरस्कृत दहा मूल्यांसहित अनेक समाजोपयोगी मूल्ये दिसून येतात.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मूल्याधिष्ठीत उपक्रमांची संकल्पना व गुरूवर्यांच्या उपक्रमातून आढळणारी मूल्यसंपदा यात कमालीचे साधर्म्य आढळते.

३. सामाजिक सुधारणासाठी गुरूवर्यांनी शिक्षण या माध्यमाचा प्रभावी वापर केलेला आढळतो.

४. गुरूवर्यांचे द्रष्टे व्यक्तित्व प्रामाणिक व निरपेक्ष कार्य यामुळे बहुजन समाजातील उपेक्षित बालकांमधुन समाजाच्या, राष्ट्राच्या प्रगतीला साहयभूत ठरणा-या थोर व्यक्ती निर्माण झालेल्या दिसून येतात.

५. गुरूवर्यांनी स्त्री शिक्षणाच्या केलेल्या सकीय पुरस्कारामुळे पुण्याच्या पूर्व भागातील बहुजन समाजातील कुटुंबामधून अनेक कर्तृत्वावान स्त्रियांनी सामाजिक प्रगतीत पुढाकार घेतलेला आढळतो.

६. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात व्यक्त झालेल्या मूल्यांव्यतिरिक्त इतरही मूल्ये गुरूवर्यांच्या कार्यात आढळतात.

**१८. संशोधक ः उगले सुहास प्रल्हादराव २०** (२००६) यांनी अमरावती विद्यापीठात "संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथातील शिक्षण व मूल्य विचारांचा चिकित्सक अभ्यास" या संशोधन विषयावर संशोधन करतांना पुढील प्रमाणे उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. 'ज्ञानेश्वरी' ग्रंथातील शिक्षण विचारांचा शोध घेऊन त्यांची सुसंगत मांडणी करणे.

२. 'ज्ञानेश्वरी' ग्रंथातून अभिव्यक्त झालेले किंवा सूचित होणारे मूल्यविचार शोधून त्यांची मांडणी करणे.

३. 'ज्ञानेश्वरी' ग्रंथातील मूल्यविचारांची माध्यमिक शिक्षण स्तरावरती उपयुक्तता स्पष्ट करणे.

४. 'ज्ञानेश्वरी' ग्रंथातील शिक्षण व मूल्यविचारांचा एकविसाव्या शतकाच्या संदर्भात उपयुक्ततेचा विचार स्पष्ट करणे.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने 'ऐतिहासिक संशोधन पध्दती' 'सर्वेक्षण पध्दती' आणि 'आशय विश्लेषण पध्दती' यांचा अवलंब केला आहे. प्रस्तुत संशोधनातून मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ भारतीय शिक्षणाचा मूळ स्त्रोत असलेल्या मूल्यांची खाण असलेला सतत वर्तमान क्षण टिपणारा कालसंवादी असा ग्रंथ आहे.

२. ज्ञानेश्वरीचे कालसंवादी महत्त्व शैक्षणिक गाभा घटकांच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे.

३. वर्तमान शिक्षणाला ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जीवनमूल्यांचे अधिष्ठान देता आले तर मानवी जीवनात माध्यमिक शिक्षणात नैतिकता सद्‌गुण सम्यकदृष्टी विकसन कर्तव्यनिष्ठा आदी गुणांचा परिपोष घडवून आणता येतो.

४. लोकशाही व्यवस्थेबद्‌दल प्रेम, भारतीय संस्कृतीबद्‌दल गौरवाची भावना, वैज्ञानिक दृष्टीकोन, पर्यावरण संरक्षण, समता आणि बंधूभाव, सर्वधर्मसहिष्णूता अशा मूल्यांची रूजवणूक विद्यार्थ्यांच्या मनावर खोलवर करण्यासाठी बदलत्या अभ्यासक्रमानुसार शिक्षकांपुढील नवनवीन आव्हाने पेलण्यासाठी दिशादर्शक असा ज्ञानेश्वरी ग्रंथ आहे.

५. विश्वामध्ये अस्तित्वात असलेल्या विश्वोत्पत्तीच्या रहस्याची उकल तार्किक आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोनातून करणे ही अतिशय महत्त्वाची बाब ज्ञानेश्वरी ग्रंथामध्ये ओवीबध्द आहे.

६. वास्तविक 'पर्यावण संरक्षण' असा शब्द ज्ञानेश्वरीत नाही परंतु पर्यावरणात समाविष्ट असणा-या घटकांचा विचार मात्र ज्ञानेश्वरीत आढळतो.

७. एकविसाव्या शतकात आदर्श शिक्षण व्यवस्थेचा विचार करतांना शिक्षण क्षेत्रातील विशेषतः शिक्षण्क व विद्यार्थी यांचे आदर्श परस्पर संबंध जोपासत विकसनार्थ

ज्ञानेश्वरांनी पदोपदी व्यक्त केलेली गुरूबद्दलची कृतज्ञता लक्षात घेऊन तिचे अनुकरण करण्याची परंपरा आधुनिक शिक्षणात रूढ करण्यासाठी ज्ञानेश्वरी हा एक अप्रतिम ग्रंथ आहे.

**१९. संशोधक : प्रा. किसनराव कचरू जाधव २१** (२००७) यांनी पुणे विद्यापीठात "महाराष्ट्र राज्याच्या उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयाच्या पाठयपुस्तकांचा समीक्षणात्मक अभ्यास" या विषयावर संशोधन कार्य करतांना पुढील उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. इयत्ता ६ वी ते ८ वी उच्च प्राथमिक स्तराच्या भूगोल पाठयपुस्तकाच्या बाहयांगाचा व अंतरंगाचा समीक्षणात्मक अभ्यास करणे.

२. भूगोल पाठयपुस्तकातील आशयाचे विश्लेषण करणे.

३. भूगोल पाठयपुस्तकातील स्वाध्याय, आकृत्या, नकाशे, चित्रे, आलेख यांचा अभ्यास करणे.

४. भूगोल पाठयपुस्तकातून साध्य होणारे दहा गाभा घटक व मूल्ये यांचा अभ्यास करणे.

५. भूगोल अध्यापन करणा-या शिक्षकांकडून तज्ज्ञांकडून भूगोल पाठयपुस्तकाविषयीच्या मतांविषयी माहिती मिळविणे.

६. भूगोल पाठयपुस्तकाच्या समीक्षणात्मक अभ्यासातून मिळणा-या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढणे व शिफारशी सूचविणे.

प्रस्तुत संशोधनात 'सर्वेक्षण पध्दतीचा' उपयोग केला आहे. पाठयपुस्तकांचे आशय विश्लेषण करून निष्कर्ष काढले आहेत ते पुढील प्रमाणे आहेत.

१. पाठयक्रमातील सर्व घटक पाठयपुस्तकात घेतले आहे.

२. पाठयक्रम व पाठयपुस्तकातून भूगोलाची काही उद्दिष्टे साध्य होतात.

३. भूगोलाच्या आशयातून पर्यावरण संरक्षण व वैज्ञानिक मनोभावाची रूजवणूक हे घटक शंभर टक्के साध्य होतात. त्यांच्या खालोखाल 'स्त्री पुरूष समानता', 'लहान कुटुंबाचा आदर्श', 'सामाजिक अडसरांचे निर्मूलन', 'समानता लोकशाही' व 'धर्मनिरपेक्षता' हे गाभा घटक काही प्रमाणात साध्य होतात.

४. भूगोलाच्या आशयातून मूल्यांचे शिक्षण मिळते.

५. भूगोलाच्या पाठयपुस्तकातील आशयाची भाषा सुलभ व समजण्यास योग्य आहे.

६. भूगोलाच्या पाठयपुस्तकातील आशयाची भाषाशैली विद्यार्थ्यांच्या वयोगटास योग्य अशी आहे.

७. भूगोलाच्या पाठयपुस्तकातील आशयाची मांडणी तर्कशुध्द प्रमाणे केलेली आहे.

८. भूगोलाच्या आशयातून 'भारतीय संविधानात्मक जबाबदा-या' व 'भारतीय स्वातंज्य चळवळीचा इतिहास' हे गाभाघटक साध्य होत नाही. तसा आशयही फारसा नाही.

९. भूगोलाच्या पाठयपुस्तकातील आशय अद्ययावत आढळत नाहीत.

१०. भूगोलाच्या पाठयपुस्तकातील स्वाध्यायात विभिन्नता आढळत नाही.

११. इयत्ता ६ वी च्या पाठयांशातून भूगोलाची काही उद्दिष्टे साध्य होतात.

१२. इयत्ता ६ वी ७ वी आणि ८ वी च्या पाठयक्रमातून काही गाभा घटक व मूल्ये साध्य होतात परंतु सर्वच साध्य होत नाहीत.

१३. इयत्ता ८ वी च्या पाठयपुस्तकातील स्वाध्याय मर्यादित प्रमाणात दिलेले आहे.

१४. इयत्ता ८ वी पाठयपुस्तकात अद्ययावत आशयाची उणीव भासते. उदा. भूकंप क्षेत्र.

**२०. संशोधक ः भूषण वसंतराव कर्डिले २२** (२००७) यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव येथे "ज्ञानकवी कुसुमाग्रजांच्या काव्यातील शिक्षण व मूल्य विचारांचा चिकित्सक अभ्यास" असे शीर्षक असलेले संशोधन कार्य केले आहे. त्यासाठी त्यांनी पुढील उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. कवी कुसुमाग्रजांच्या सर्व प्रकाशित कवितांची प्राप्ती करणे. अनुवादित आणि पुनरूक्त झालेल्या कविता वगळून मूळ स्वरूपातील एकूण प्रकाशित कवितांची संख्या ठरवणे.

२. कवी कुसुमाग्रजांच्या प्रकाशित मूळ कवितांमधील शिक्षण विचारांचा शोध घेऊन त्यांची सुसंगत प्रकारात मांडणी करणे आणि स्पष्टिकरण करणे.

३. कवी कुसुमाग्रजांच्या विविध प्रकाशित मूळ कवितांमधून अभिव्यक्त झालेली सूचित झालेली किंवा सूचित होणारी मूल्ये शोधून काढून त्या मूल्यांसाठी पूर्ण कविता किंवा समर्पक काव्यांश यांची मांडणी करणे.

४. कवी कुसुमाग्रजांच्या काव्यात आढळून येणारी मूल्यांची गटात वर्गवारी करणे प्रत्येक गटात येणारी मूल्ये ठरविणे आणि प्रत्येक मूल्यासाठी प्राप्त होणा-या कविता काव्यांशाची संख्या शोधणे.

५. कवी कुसुमाग्रज यांचे विविध शिक्षण विचारांना झालेले योगदान संबंधित कवितेवरील टिपणीच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणे.

६. कुसुमाग्रजांच्या काव्यामध्ये मूल्यांचा कोणता गट प्रभावी ठरतो आणि प्रत्येक गटातील कोणते मूल्य सर्वाधिक प्राधान्याने आलेले आहे याचा शोध घेणे.

७. कुसुमाग्रजांचे शिक्षण विचार आणि मूल्यविचार कार्यवाहित आणण्यासाठी शिक्षक व मुख्याध्यापक यांना सूचना करणे.

८. शिक्षणाचे नियंत्रण करणा-या विविध संस्था उदा. अभ्यासक्रम संशोधन व पाठयपुस्तक नियोजन मंडळ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विद्यापीठे आणि महाराष्ट्र शासन यांना यासंबंधी शिफारशी करणे.

प्रस्तुत संशोधनासाठी 'विश्लेषणात्मक (पृथःक्करणात्मक) वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दती' (Analytical Descriptive Method) या मिश्र संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे. प्रस्तुत संशोधनाअंती पुढील निष्कर्ष मिळाले आहेत.

**अ. कुसुमाग्रजांच्या काव्यातील शिक्षण विचार विषयक निष्कर्ष ः**

१. लोक शिक्षणाचे व्यापक कार्यक्रम अंमलात आणावे लागतील आणि मोठे जनजागरण करावे लागेल तेथे कुसुमाग्रजांचे लोकशिक्षण विषयक विचार निश्चितच मार्गदर्शकच नव्हेत तर पथदर्शकही ठरू शकतील.

२. जे शिक्षण हे स्वयं शिक्षण असते स्वावलंबी असते जीवन जगण्यास समर्थ करते एवढेच नव्हे तर प्रगती करण्यास प्रोत्साहन देते साहय करते तेच खरे शिक्षण होय. या दृष्टिने कुसुमाग्रजांनी आपल्या काव्यातून प्रसंगानुरूप विविध विचार व्यक्त केलेले आहेत.

३. जीवन सुखासमाधानाने जगा प्रगतीचा ध्यास घ्या. सदैव ध्येय्याकडे नजर ठेवा. कुठल्याही प्रसंगात हार मानू नका निधडया छातीने संकटाला तोंड द्या. कुणाची मदत मिळाली नाही तरी निराश होऊ नका आणि संकटांना भिऊन पाठ दाखवू नका अशा प्रकारचे पुरूषार्थी जीवन जगण्याचा संदेश कुसुमाग्रजांनी दिला.

४. संत आणि शूरवीर यांनी भारतीय संस्कृतीची जपणूक केलेली आहे. ती वाढविली आहे. अशा संस्कृतीचे रक्षण झाले पाहिजे. तिची स्मारके प्रतिके जपली गेली पाहिजे. हा सांस्कृतिक वारसा जाणीवपूर्वक पुढच्या पिढीकडे सोपवायला पाहिजे. आणि मुलांच्या शिक्षणात या गोष्टीसंबंधीची जाणीव जागृत झाली पाहिजे असे कुसुमाग्रजांचे आग्रही मत आहे.

५. कवी कुसुमाग्रज हे कमालीचे पर्यावरण प्रेमी होते. पर्यावरणाच्या -हासाविरूध्द पन्नास वर्षापूर्वीच त्यांनी जोरदार आवाज उठवलेला आहे.

६. कुसुमाग्रजांनी कर्मकांडावर कडाडून टिका करून दिन दुर्बलांची सेवा हीच खरी ईश्वरी सेवा आहे आणि भूकेल्या माणसाच्या तृप्तीमध्ये ईश्वरी प्राप्तीचे समाधान मिळते असे सुंदर विचार व्यक्त केलेले आहेत.

**आ. कुसुमाग्रजांच्या काव्यातील मूल्य विचार विषयक निष्कर्ष ः**

१. कुसुमाग्रजांचा सर्वाधिक भर हा वैयक्तिक आणि सामाजिक या मूल्यांवर आहे.

२. कुसुमाग्रजांचे अखेरचे काही काव्यसंग्रह आध्यात्मिक व धार्मिक या मूल्यांनी व्यापलेले आढळतात.

३. कुसुमाग्रजांच्या काव्यामध्ये राजकीय, सांस्कृतीक आणि ज्ञान विज्ञाननिष्ठ मूल्येही आलेली आहेत.

४. कधीही पक्षीय अभिनिवेष न बाळगलेल्या कुसुमाग्रजांच्या काव्यातही देशाचा भूत, वर्तमान आणि भविष्याचा विचार मांडतांना राजकीय मूल्ये आलेली आहेत.

५. कुसुमाग्रजांच्या कविता या प्राधान्याने ज्ञान विज्ञाननिष्ठ व त्या जोडीला सांस्कृतिकनिष्ठ आहेत. त्या मानाने राजकीय मूल्यांना कुसुमाग्रजांच्या काव्यात सर्वात खालचे स्थान आहे.

६. कुसुमाग्रजांच्या साहित्यात अगदी कमी प्रमाणात आढळलेली मूल्ये ही कणखरपणा, वक्तशीरपणा, आत्मसन्मान, पराक्रम, क्षमाशीलता, सौजन्यशीलता, सोशिकता अशा प्रकारची आहेत.

७. कुसुमाग्रजांच्या काव्यात सौदर्य हे मूल्य प्रथम क्रमांकाने आढळून येते.

८. सांस्कृतिक मूल्यात सौंदर्याच्या खालोखाल कुसुमाग्रजांचा भर उदात्तता या मूल्यावर असलेला आढळून आला.

**२१. संशोधक ः श्री.काशीनाथ पुरूषोत्तम राणे २३** (२००७) यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे "मधुकरराव चौधरी यांचे शैक्षणिक विचार व कार्य" या विषयावर संशोधन करताना पुढील उद्दिष्टे ठवविली आहेत.

१. मधुकरराव चौधरी यांची 'शिक्षण' संकल्पना स्पष्ट करणे.

२. मधुकरराव चौधरी यांच्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करणे.

३. मधुकरराव चौधरी यांच्या व्यावसायिक शिक्षण, स्त्री शिक्षण, मातांचे शिक्षण, विज्ञान शिक्षण, नैतिक शिक्षण, राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण या संदर्भातील विचारांचा अभ्यास करणे.

४. मधुकरराव चौधरी यांच्या सहशालेय उपक्रम विषयक विचारांचा अभ्यास करणे.

५. मधुकरराव चौधरी यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

६. एक श्रेष्ठ शिक्षण तज्ञ म्हणून मधुकरराव चौधरी यांच्या शिक्षण विचारांचे मूल्यमापन करणे.

प्रस्तुत संशोधनासाठी 'ऐतिहासिक संशोधन पध्दती व तात्विक संशोधन पध्दती' यांचा उपयोग केला आहे. या संशोधनातून मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, यावर आधारित लोकशाहीनिष्ठ, विज्ञाननिष्ठ, सौंदर्याभिरूची, भावसाक्षर, असलेल्या समाजाची निर्मिती करणे आणि ज्ञान विज्ञान व तंत्रज्ञान

यांचा सुंदर समन्वय साधून श्रेष्ठ सहजीवनाची प्राप्ती करून देणे हे मधुकराव चौधरी यांचे शैक्षणिक तत्वज्ञान आहे.

२. शिक्षण हाच एक संस्कार आहे.

३. मधुकरराव चौधरी यांच्या मते अभ्यासक्रम हे राष्ट्रनिर्मितीचे साधन आहे. बालकांच्या आशा, आकांक्षा, भावना, प्रेरणा, सूप्त शक्ती यांचा विकास साधणारा अभ्यासक्रम असावा.

४. विद्यार्थ्यांची कुवत, सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन अध्यापन व्हावे.

५. अध्यापनाच्या दृष्टीने शालेय परिसर प्रसन्न व चैतन्यमय असावा.

६. उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावर व्यावसायिक शिक्षण मिळाले.

७. शिक्षण हे बालक केंद्रित असावे. आत्मविष्कारास संधी असावी. त्याच्या विकासासाठी पोषक वातावरण असावे.

८. शिक्षणाचे माध्यम मातृभाषाच असावे. त्यानंतर प्रांतीय भाषा असावे. जोडभाषा म्हणून राष्ट्रभाषा हिंदीचा वापर करावा. भारताला जगाशी जोडण्यासाठी इंग्रजीचा वापर करावा.

## २.५ पूर्व संशोधन आणि प्रस्तुत संशोधनाचा संबंध ः

संशोधन पूर्व संशोधनाचे महत्व लक्षात घेता सदर प्रबंधासाठी पूर्व संशोधनातील शीर्षक, संशोधन पध्दती, सांख्यिकीय माहिती व तिचे विश्लेषण निष्कर्ष गृहितके इत्यादी मुद्दे कसे ठरले याचा आढावा घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

**१. संशोधक : गोगटे व्ही.व्ही.**

यांनी सदर संशोधनात समर्थ रामदास स्वामी यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा चिकित्सक अभ्यास केला आहे. गोगटे यांच्या संशोधनात जे उद्दिष्ट घेतले होते ते म्हणजे "समर्थ रामदासांच्या साहित्यातून दृग्गोचर होणा-या शैक्षणिक विचारांचा शोध घेणे" हे उद्दिष्ट प्रस्तुत प्रबंधातील उद्दिष्टांशी मिळते जुळते आहे. गोगटे यांनी त्यांच्या प्रबंधासाठी वाङ्मय विश्लेषण पध्दती वापरली आहे. तीच पध्दती प्रस्तुत संशोधनासाठी घेतली असून संपूर्ण संशोधनात दिशादर्श क ठरली.

**२. संशोधक : अब्बासी ए.एन.एन.एस.**

यांनी 'जवाहरलाल नेहरू यांचे शैक्षणिक विचार' या विषयावर संशोधन केले आहे. त्यांच्या संशोधनात जवाहरलाल नेहरू यांचे शैक्षणिक विचार हे विविध दृष्टिकोनातून अभ्यासले गेले आहेत. त्यांच्या या प्रबंधातील "प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विषयाच्या नेहरूंच्या विचारांचा अभ्यास करणे" हे उद्दिष्ट प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे ठरवितांना पूरक ठरले. नेहरूंचे शैक्षणिक विचार हे भाषिक समस्या, राष्ट्रीय एकात्मता, व्यावसायिक शिक्षण या दृष्टिकोनातून गेले तर प्रस्तुत प्रबंधात संशोधकाने डॉ.न.म.जोशी यांचे शैक्षणिक विचार दहा नैतिक मूल्ये या संदर्भात अभ्यासले आहेत.

**३. संशोधक : कुसुम अग्रवाल :**

यांनी "रामतीर्थ यांचे शैक्षणिक तत्वज्ञान" या विषयावर यापूर्वी संशोधन केले आहे. हे संशोधन करतांना डॉ.कुसुम अग्रवाल यांनी संशोधनासाठी चिकित्सक आणि विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केला आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात वापरण्यात आलेल्या संशोधन पध्दतीशी मिळती जुळती असल्याने संशोधकाला संशोधन कार्य करतांना सुलभ झाले.

**४. संशोधक ः श्रीमती एस. एस. लोहकरे ः**

यांनी "जीवनमूल्यांच्या संदर्भात समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधाचे शैक्षणिक तत्वज्ञान" या विषयावर यापूर्वी संशोधन केले आहे. या पूर्व संशोधनातील उद्दिष्टे क्र. २ "इयत्ता ५वी १0 वी च्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमातील श्री.दासबोधाची शैक्षणिक स्थिती अभ्यासणे" हे उद्दिष्टे प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्टे ठरवितांना मार्गदर्शक ठरले. त्याचप्रमाणे या पूर्व संशोधनातील 'चिकित्सक विश्लेषणात्मक' ही संशोधन पध्दती प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या संशोधन पध्दतीशी मिळती जुळती आहे. त्यामुळे या संशोधनाची कार्यवाही करतांना सुलभ झाले.

या पूर्व संशोधनातील वैयक्तिक मूल्ये, सामाजिक मूल्ये, नैतिक मूल्ये या संदर्भात आलेले निष्कर्ष हे डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्यातही आढळतात.

या पूर्व संशोधनात समर्थ रामदासस्वामींच्या केवळ एकच ग्रंथ 'दासबोध' हा अभ्यासला गेला आहे. परंतु प्रस्तुत प्रबंधासाठी डॉ.न.म.जोशी यांचे कथा या वाङ्मय प्रकारातील एकूण २ पुस्तके अभ्यासली गेली आहेत.

**५. संशोधक ः चव्हाण बी.पी.एस. ः**

यांनी 'स्वामी दयानंद यांचे शैक्षणिक तत्वज्ञान' यावर पूर्व संशोधन केले आहे. स्वामी दयानंद सरस्वती हे तत्वज्ञ होते. त्यांच्या तत्वज्ञानात अध्यात्मिक आणि धार्मिक शिक्षणाचा भरणा अधिक होता. असे असले तरी ते शिक्षण तज्ञ होते. प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म.जोशी हे अलिकडच्या काळात सातत्याने विविधांगी लेखन करणारे शिक्षणतज्ञ आहेत. त्यांच्या लिखाणातील शिक्षण विचार हा नैतिक मूल्ये या अनुषंगाने अभ्यासला गेला. या पूर्व संशोधनातील उद्दिष्टे प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्टे ठरवितांना मार्गदर्शक ठरली.

**६. संशोधक ः काडीयाल आर.ए. ः**

या संशोधकाने कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या संदर्भातील संशोधनात कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या शिक्षण विचारांचा टिकात्मक अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने डॉ.न.म.जोशी यांच्या शैक्षणिक विचारांचा मूल्य शिक्षण या संदर्भात विचार केला आहे. या पूर्व संशोधनातील उद्दिष्टे प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्टे ठरवितांना उपयुक्त ठरली.

**७. संशोधक ः गुप्ता आर.पी. ः**

यांनी 'स्वामी विवेकानंद यांचे शैक्षणिक विचार' या संदर्भात पूर्व संशोधन केले आहे. या पूर्व संशोधनातील उद्दिष्टे ही प्रस्तुत संशोधनाशी मिळती जुळती आहेत. या पूर्व संशोधनात स्वामी विवेकानंद यांच्या वाङ्मयाचे प्राथमिक व दुय्यम स्त्रोत संदर्भ साहित्य म्हणून घेतले आहे तर प्रस्तुत संशोधनात सुध्दा डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय हे प्राथमिक व दुय्यम स्त्रोत म्हणून उपयोगात आणले आहे. या पूर्व संशोधनात स्वामी विवेकानंद यांच्या शैक्षणिक विचारांची आधुनिक प्रणालीमधील उपयुक्तता म्हणजे त्यांच्या बाल कुमार वाङ्मयातील नैतिक मूल्ये यांची सध्याच्या अभ्यासक्रमात कशी उपयुक्तता आहे ही बाब अभ्यासली आहे. त्यामुळे या बाबतीत सदर पूर्व संशोधन व प्रस्तुत संशोधन ब-याच अंशी मिळते जुळते आहे.

**८. संशोधक ः जे.जे.पेरीयार ः**

या संशोधकाने "Narayana Guru as a social Educator" हे जे संशोधन केले आहे त्या संशोधन प्रबंधासाठी 'विश्लेषणात्मक वर्णनात्मक' (Analyticol-descriptive) ही संशोधन पध्दती वापरली होती. प्रस्तुत संशोधनासाठी सुध्दा संशोधकाने या संशोधन पध्दतीशी मिळती जुळती वाङ्मय विश्लेषण पध्दती वापरली आहे.

**९. संशोधक ः डॉ.के.सी.जैन ः**

यांनी यापूर्वी भगवान महावीरांचे तत्वज्ञान आधुनिक भारताच्या संदर्भात अभ्यासले आहे. त्या पूर्व संशोधनात जे निष्कर्ष निघाले आहेत. त्यातील काही निष्कर्ष हे जैन धर्माच्या मूल्यांच्या बाबतीत आहे. जैन धर्मातील भ.महावीरांनी सांगितलेली मूल्ये यांचे शैक्षणिक प्रक्रियेतील योगदान सांगणारी आहेत. प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातही अनेक नैतिक मूल्ये अशी आहेत की त्यामुळे शिक्षण प्रक्रिया ही अर्थपूर्ण होऊ शकते. जीवनातील मूल्ये आणि शिक्षकांचे अध्यापनातील कार्य या संदर्भातील पूर्व संशोधनातील निष्कर्ष प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांशी मिळते जुळते आहेत.

**१०. संशोधक ः पंडितराव वसुधा वासुदेव ः**

यांनी 'संत कबीरांच्या दोहयांमधून प्रतिबिंबित होणा-या मुल्याधिष्ठित अनौपचारिक शिक्षणाचा अभ्यास' या विषयावर पूर्व संशोधन केले आहे. या पूर्व संशोधनातील एक उद्दिष्टे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६' च्या निर्धारित गाभा घटकांनुसार दोहयांचा अभ्यास करणे हे उद्दिष्टे प्रस्तुत प्रबंधातील उद्दिष्टाशी मिळते जुळते आहे. संत कबीरांच्या दोहयातही विविध मूल्ये आढळतात तर डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातही मूल्ये आढळतात याची खात्री झाली. त्यामुळे या पूर्व संशोधनातील उद्दिष्टे ही मार्गदर्शक ठरली. तसेच या पूर्व संशोधनात वापरलेली संशोधन पध्दती ही प्रस्तुत संशोधनात वापरलेल्या वाङमय विश्लेषण पध्दतीशी मिळती जुळती आहे.

**११. संशोधक ः प्रा.मगर दादासाहेब पांडुरंग ः**

यांनी 'संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील अनौपचारिक मूल्यशिक्षणाचा अभ्यास' या विषयावर संशोधन केले आहे. संत तुकाराम यांच्या अभंगात अध्यात्म भक्ती समाजसुधारणा लोकशिक्षण या सोबत नैतिक मूल्ये इत्यादी पैलू प्रामुख्याने आढळतात. प्रस्तुत संशोधन प्रबंधात डॉ.न.म.जोशी यांच्या विविधांगी सातत्यपूर्ण लेखनात सुध्दा लोकप्रबोधन,

मनोरंजन, बोधप्रद, ललित नाटय, स्तंभलेखन इत्यादी पैलू आढळतात. या शिवाय डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्यातील सर्व वाङ्मय प्रकारात नैतिक मूल्ये यांच्या स्पष्टीकरणासाठी आशय विपूल आहेत. हे साम्य प्रामुख्याने दिसून आले.

या पूर्व संशोधनात ऐतिहासिक संशोधन पध्दती व सर्वेक्षण पध्दती अंतर्गत येणारे पृथःक्करण वर्णनात्मक पध्दती अशा मिश्र पध्दतीचा उपयोग केला आहे. प्रस्तुत संशोधन कार्यात वापरलेल्या संशोधन पध्दतीला पूरक आहे.

**१२. संशोधक ः भट्ट जे.एन.ः**

यांच्या संशोधनात त्यांनी विनोबा भावे यांचे शैक्षणिक विचार भारतातील सद्य परिस्थितीत कसे राबविता येतील हे एक उद्दिष्टे ठरविले होते. प्रस्तुत संशोधनातही संशोधकाने डॉ.न.म.जोशी यांचे शैक्षणिक विचार सध्याच्या अभ्यासकमाच्या अध्यापनात कसे पूरक होतील असे उद्दिष्ट घेतले आहे. त्यामुळे या पूर्व संशोधनाचा उद्दिष्टे ठरवितांना संशोधकाला झाला.

**१३. संशोधक ः आबणे रामदास दशरथ ः**

या संशोधकाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यातील शिक्षण विचारांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. या पूर्व संशोधनातील उद्दिष्टांपैकी 'मूल्य शिक्षणाच्या संदर्भात लोकशाहीर अण्णाभाऊ साठयांच्या साहित्याचा अभ्यास करणे' हे उद्दिष्ट प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्टांशी मिळते जुळते आहेत. या पूर्व संशोधनात संशोधकाने अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा विचार मूल्य शिक्षणाच्या संदर्भात केला आहे तर प्रस्तुत संशोधनात सुध्दा संशोधकाने डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील मूल्यशिक्षणांचा अभ्यास केला आहे.

**१४. संशोधक ः तनपुरे निलीमा ः**

यांनी गुरूवर्य बाबूरावजी जगताप यांच्या शालेय माध्यमिक स्तरावरील केलेल्या कार्याचा अभ्यास आपल्या संशोधनात केला आहे. त्यांनी या पूर्व संशोधनात जी उद्दिष्टे ठरविली होती ती प्रस्तुत संशोधनाशी काही प्रमाणात मिळती जुळती आहेत. या पूर्व संशोधनात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील 'मूल्यशिक्षण' या संकल्पनेचा अभ्यास माध्यमिक स्तरावर केला आहे. प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील मूल्यशिक्षणाच्या संदर्भातील आशय माध्यमिक स्तरावर अध्यापनात कसे उपयुक्त आहेत ते दाखविले आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन आणि हे पूर्व संशोधन यामध्ये साम्य आढळून येते.

**१५. संशोधक ः चौधरी प्रभाकर श्रावण ः**

या संशोधकाने 'लोकमान्य टिळकांचे शैक्षणिक विचार व कार्य' या संदर्भात संशोधन करतांना त्यांनी केलेले लेखन व त्यांनी शिक्षक म्हणून केलेले कार्य यांचा आढावा घेतला आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने डॉ.न.म.जोशी यांचे लेखन व सध्याच्या काळात एक शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांचे कार्य यांचा आढावा घेतला असल्यामुळे संशोधन पूर्णत्वास नेण्यासाठी दिशादर्शक ठरले आहे.

**१६. संशोधक ः निळकंठ रामदास फेगडे ः**

यांनी साने गुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंबरी यांमधील मानवी मूल्ये शिक्षणात कशी संक्रमित होऊ शकतील याबाबत संशोधन केले आहे. या पूर्व संशोधनात जी उद्दिष्टे आहेत ही उद्दिष्टे प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्टांशी मिळती जुळती आहेत. संशोधकाने साने गुरूजी यांच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यांचा अभ्यास करताना त्यातील मानवी मूल्ये शोधली आणि इयत्ता ७, ८, ९ वर्गाच्या मराठीच्या पाठयपुस्तकात ती कशी प्रतिबिंबीत होतात याचा शोध घेतला आहे. प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील नैतिक मूल्ये असलेले आशय शोधले

आहेत आणि ते आशय संबंधित मूल्याचे स्पष्टीकरण देण्यासाठी अध्यापनात कशी उपयुक्त आहेत याचा अभ्यास केला आहे.

**१७. संशोधक : उगले सुहास प्रल्हादराव :**

या संशोधकाने संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथातील शिक्षण व मूल्य शिक्षणाचा चिकित्सक अभ्यास केला आहे. तो करताना त्यांनी या पूर्व संशोधनात ज्ञानेश्वरीतील मूल्य विचारांची माध्यमिक शिक्षणात उपयुक्तता अभ्यासली आहे. तीच बाब प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाच्या संदर्भात केली असल्याने या पूर्व संशोधनाचा उपयोग उद्दिष्टे ठरवितांना व निष्कर्ष तयार करतांना झाला आहे.

**१८. संशोधक : प्रा.किसनराव कचरू जाधव :**

यांनी 'महाराष्ट्र राज्याच्या उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल पाठयपुस्तकांचा समीक्षात्मक अभ्यास' यावर यापूर्वी जे संशोधन केले आहे त्यात त्यांनी इयत्ता ६ वी ते ८ वी च्या भूगोल पाठयपुस्तकातील आशयांचे विश्लेषण केले आहे. त्याशिवाय भूगोल पाठयपुस्तकातून साध्य होणारी मूल्ये यांचा अभ्यास केला आहे. या पूर्व संशोधनातील ही उद्दिष्टे प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांसाठी मिळती जुळती आहे. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील मूल्यांचे आशय शोधतांना व त्यांचे विश्लेषण करतांना हे पूर्व संशोधन दिशादर्शक ठरले.

**१९. संशोधक : कु.देशमुख ज्योती बाबाराव :**

या संशोधिकेने आचार्य विनोबा भावे यांच्या शैक्षणिक विचारांवर जे पूर्व संशोधन केले आहे त्यातील आशय विश्लेषण पध्दतीचा संशोधन पध्दतीमध्ये जो उपयोग केला आहे तो प्रस्तुत संशोधन कार्यात मार्गदर्शक ठरला आहे.

**२०. संशोधक ः भूषण वसंतराव कर्डिले ः**

यांनी 'ज्ञानकवी कुसुमाग्रजांच्या काव्यातील शिक्षण व मूल्य विचारांचा चिकित्सक अभ्यास' यावर या पूर्वी जे संशोधन केले आहे त्यामध्ये संशोधकाने जी उद्दिष्टे ठरविली आहेत त्यातील मूल्य विचारांसंबंधीची उद्दिष्टे उदाहरणार्थ 'कवी कुसुमाग्रजांच्या काव्यात आढळून येणारी मूल्यांची गटात वर्गवारी करणे' वगैरे ही उद्दिष्टे प्रस्तुत संशोधनातील उद्दिष्टांशी मिळती जुळती आहेत.

या पूर्व संशोधनात कवी कुसुमाग्रजांच्या काव्यातील शिक्षण विचार अभ्यासला आहे. तर प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील शिक्षण विचार अभ्यासला आहे.

या पूर्व संशोधनात जी 'विश्लेषणात्मक (पृथःक्करणात्मक) वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दती (Analytical Descriptive Method) मिश्र पध्दती वापरली आहे. त्याच पध्दतीला मिळती जुळती वाङ्मय विश्लेषण प्रस्तुत संशोधनात वापरली गेली आहे.

**२१. संशोधक ः अभ्यंकर शंकर ः**

यांनी यापूर्वी स्वामी विवेकानंदांच्या शिक्षण विषयक विचारांचे पृथःक्करण या संदर्भा त संशोधन केले आहे. त्यामधील पृथःकरण संशोधन पध्दती प्रस्तुत संशोधनासाठी दिशादर्शक ठरली आणि संशोधनाला नेमकेपणा आला.

**२२. संशोधक ः श्री.काशीनाथ पुरूषोत्तम राणे ः**

यांनी 'मधुकरराव चौधरी यांचे शैक्षणिक विचार व कार्य' या विषयावर संशोधन केले आहे. त्यात त्यांनी मधुकरराव चौधरी यांचे विचार साहित्य या संदर्भात व्यावसायिक शिक्षण स्त्री शिक्षण विज्ञान शिक्षण नैतिक शिक्षण व राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण यांचा जो अभ्यास केला तो प्रस्तुत संशोधनातील नैतिक मूल्यांच्या संशोधनासाठी महत्त्वाचा ठरला.

**२३. संशोधक ः श्री. नितीन तुकाराम खर्चे ः**

यांनी पुणे विद्यापीठ येथे "डॉ.न.म. जोशी यांच्या बालकुमार वाड्मयाचा शैक्षणिक अभ्यास" या विषयावर संशोधन करताना पुढील उद्दिष्टे ठरविली आहेत

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये अपेक्षित असलेल्या दहा गाभा घटक आणि दहा नैतिक मूल्ये यांच्या आशयांच्या अंगाने डॉ.न.म. जोशी यांच्या बालकुमार वाङ्मयातील संदर्भांचा शोध घेणे

२. डॉ.न.म. जोशी यांच्या बालकुमार वाड्मयातील दहा गाभा घटक आणि दहा नैतिक मूल्ये यांचे अध्यापनाच्या दृष्टीकोनातून विश्लेषण करणे

३. वर्तमान स्थितीत असलेल्या शालेय अभ्यासक्रमात डॉ.न.म. जोशी यांच्या बालकुमार वाड्मयाचा अध्यापनाच्या संदर्भातील उपयुक्ततेचा शोध घेणे

प्रस्तुत संशोधनासाठी आशयविश्लेषण पध्दतीचा वापर करण्यात आला. या संशोधनातून मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१. डॉ.न.म. जोशी यांचे साहित्य सर्व स्तरातील सर्व वयोगटातील मुलांसाठी आहे.

२. डॉ.न.म. जोशी यांचे साहित्य गाभा घटक व मूल्यांनी भरलेले आहे.

३. डॉ.न.म. जोशी यांचा साहित्याचा संदर्भ साहित्य म्हणून वापर करता येतो.

४. डॉ.न.म. जोशी यांचे साहित्य म्हणजे विद्यार्थी शिक्षक व पालक यांना योग्य मार्गदर्शक व मूल्यवर्धनासाठी उत्तम प्रेरणादायी स्त्रोत्र आहे.

५. अध्यापनाच्या दृष्टीने व विद्यार्थी वयोगटानुसार योग्य दाखले दिलेले आहे.

६. डॉ.न.म. जोशी यांच्या मते शिक्षणाचे, संस्काराचे माध्यम मातृभाषा असावी विद्यार्थ्यांच्या आकलनास सोपी व सहज वाटते.

७. सध्याच्या शैक्षणिक परिस्थितीत सुद्‌धा त्याचे साहित्य उपयोगी प्रेरणादायी आहे.

**गृहितके ः**

१. डॉ.न.म. जोशी यांनी नैतिक मूल्ये केंद्रस्थानी ठेवून बालकुमार वाङ्मयाची निर्मिती केली आहे.

२. डॉ.न.म. जोशी यांच्या बालकुमार वाङ्मयात १0 गाभाघटक आणि १0 नैतिक मूल्ये यांचे विश्लेषण करणारे संदर्भ आहेत.

**२.६ समारोप ः**

पूर्व संशोधनांचा आढावा घेताना संशोधकाने पूर्वसूरींच्या संशोधनातील उद्दिष्टे संशोधन पध्दती आणि निष्कर्ष यासंदर्भात प्रस्तुत संशोधनाशी तुलना केली आणि शेवटी सर्व साधारण साम्य भेद दाखविण्याचा प्रयत्न केला. यातून 'A great men think alike' हे परत एकदा सिध्द झाले. त्याच बरोबर डॉ.न.म.जोशी यांचे द्रष्टेपण सुध्दा नव्याने जाणवले. इतकेच नव्हे तर या पूर्व संशोधनाचा आढावा घेतांना डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील शैक्षणिक विचारांवर संशोधन करण्यासाठी यामुळे खूपच प्रेरणा मिळाली आणि संशोधनात नेमकेपणा आला.

*****

**संदर्भ :**

1. Best ,John W. (1977), 'Research in Education' Prentic Hall of India Pvt.New Delhi, Third Edition 1977 (Page 77)

2. Buch M.B. 'Second Survey of Research'(1971-78) New Delhi : NCERT (Page 31)

3. Buch M.B. 'Third Survey of Research' (1978-1983) First Edition, March 87, New Delhi : NCERT (Page 36)

4. तत्रैव (Page 42)

5. तत्रैव (Page 41)

6. तत्रैव (Page 38)

7. Buch M.B. 'Fourth Survey of Research' (1983-88) Vol-1, First Edition : Aug. 1991, New Delhi : NCERT (Page 65)

8. Buch M.B. 'Fourth Survey of Research' (1983-88) Vol-1, First Edition : Aug. 1991, New Delhi : NCERT (Page 73)

9. Buch M.B. 'Third Survey of Research' (1978-1983) First Edition, March 87, New Delhi : NCERT (Page 58)

10. जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ पुणे.

11. Buch M.B. 'Fourth Survey of Research' (1983-88) Vol-1, First Edition : Aug. 1991, New Delhi : NCERT (Page 797)

12. तत्रैव (Page 800)

13. तत्रैव (Page 791)

14. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ग्रंथालय अमरावती.

15. तत्रैव

16. जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ पुणे.

17. तत्रैव

18. जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ पुणे.

19. शिक्षणशास्त्र व विस्तार केंद्र विभाग पुणे विद्यापीठ पुणे.

20. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ग्रंथालय अमरावती.

21. शिक्षणशास्त्र व विस्तार केंद्र विभाग एस.एन.डी.टी. विद्यापीठ पुणे.

22. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय जळगांव.

23. तत्रैव

*****

# प्रकरण 3

# संशोधन पद्धती

## ३.१ प्रस्तावना ः

प्रस्तुत प्रकरणात निरनिराळया संशोधन पद्धतींचा थोडक्यात आढावा घेऊन संशोधकाने संशोधनासाठी वापरलेल्या 'वाङ्मय विश्लेषण' या संशोधन पध्दतीचा उहापोह केला आहे. या संशोधन पद्धतीला पूरक असलेले 'आशय विश्लेषण' हे संशोधन तंत्र याचीही सविस्तर माहिती दिली आहे. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाचा शैक्षणिक अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेले वर्गीकरण संख्यात्मक कोष्टके आणि संशोधनाची नेमकी प्रकिया कशी राबविली आहे याचा आढावा पुढे मांडण्यात आला आहे.

## ३.२ संशोधनाच्या पद्धती ः

संशोधनाची उद्दिष्टे, माहिती, संकलनाचे तंत्र नियंत्रण तंत्र, साधने, क्षेत्र इत्यादी अनेक प्रकारच्या आधारावर शैक्षणिक संशोधन पध्दतींचे वर्गीकरण करण्यात येते. संशोधन पध्दतींचे वर्गीकरण खालील तीन गटात केले जाते.

अ. ऐतिहासिक संशोधन पद्धती.

ब. सर्वेक्षण संशोधन पद्धती.

क. प्रायोगिक संशोधन पद्धती.

वरील विविध पद्धतीमधील फरक समजून घेणे महत्वाचे आहे. प्रत्येक पद्धतीत उद्देश, प्रमुख पाय-या, स्त्रोत, माहिती संकलनाची साधने, नियंत्रणाचे स्वरूप इत्यादीबाबतीत भेद आढळून येतो.

## ३.२.१ ऐतिहासिक संशोधन पद्धती ः

**प्रमुख उद्देश ः**

ऐतिहासिक संशोधन पद्धतीत भूतकाळाशी संबंधीत असलेल्या समस्यांचे संशोधन करण्यात येते (What was). भूतकाळातील घटनांचा अभ्यास वर्तमानकालीन घटनांचा अर्थ लावण्यासाठी संदर्भ या अर्थाने करण्यात येतो. यावरून "भूतकाळाशी निगडित असणा-या घटना अथवा समस्या ज्या पद्धतीत सोडविण्यात येतात अशा पध्दतीस ऐतिहासिक संशोधन पद्धती असे म्हणतात."

**प्रमुख पाय-या ः**

ऐतिहासिक शैक्षणिक संशोधनात प्रमुख पाय-या पुढील प्रमाणे येतील.

**१. समस्येची निवड (Selection of Problem) :**

ऐतिहासिक संशोधनाची समस्या निवडताना केवळ तिचे महत्त्व पाहून चालत नाही तर तिच्या निराकरणासाठी आवश्यक पुरेशी आधारसामग्री मिळू शकेल काय याचा सुध्दा विचार करावा लागतो. समस्या मोजक्या शब्दात मांडता आली पाहिजे. तसेच ऐतिहासिक महत्त्व असणारी शैक्षणिक समस्या निवडली पाहिजे. त्यामुळे ती संशोधनास यथार्थ आहे असे समजले जाईल.

**२. माहिती गोळा करणे (Collecion of data)**

ऐतिहासिक आधारसामग्री दोन प्रकारची असते.

अ. प्राथमिक स्त्रोत (Primary Sources )

आ. दुय्यम स्त्रोत (Secondary Sources )

**अ. प्राथमिक स्त्रोत ः**

प्राथमिक स्त्रोत यामध्ये प्रत्यक्ष अनुभवलेल्या किंवा पाहिलेल्या घटना यांचा समावेश होतो. ही साधने मूलभूत स्वरूपाची असतात. प्राथमिक स्त्रोतात अवशेष (Relics) आणि मौखिक व लेखी अभिलेख (Oral and Hand written Records) यांचा समावेश होतो.

**अवशेष (Relics of Remains) :**

यामध्ये व्यक्ती समूह किंवा एक विशिष्ट कालखंड यांच्याशी संबंधित असलेल्या अवशेषांचा किंवा जुन्या स्मारकांचा ऐतिहासिक संधोधनात उपयोग होतो. शस्त्रे, भांडी, चित्रे, खाद्य पदार्थ, वस्त्र, इमारत, नाणी, कलावस्तू इत्यादींचा अंतर्भाव होतो.

तसेच या स्त्रोतात भौतिक अवशेष (Physical remains) उदाहरणार्थ खाद्यवस्तू, कलाकृती, जुनी नाणी, इमारती, फर्निचर, शस्त्रे, हत्यारे, जुने सांगाडे इत्यादी येतात. जर मुद्रित साहित्य (Printed Materials) उदाहरणार्थ हजेरी पत्रक दाखल खारीज रजिस्टर पाठयपुस्तके वर्तमान पत्रातील जाहिराती बखर घटनात्मक दस्तावेज करार इत्यादी येतात.

**मौखिक व लेखी अभिलेख (Oral and Hand Written Record)**

यामध्ये ध्वनि मुद्रिका (रेकॉर्ड), ध्वनिफित, चित्रफित, आत्मचरित्र, पत्रे, दैनंदिनी, मृत्यूपत्रे, प्रमाणपत्रे, घोषणापत्रे, शिलालेख, ताम्रपत्रे, नियतकालिके, ग्रंथ अशा लेखी अभिलेखांचाही समावेश होतो.

**आ. दुय्यम स्त्रोत (Secondary Sources )**

घटनेला साक्षी नसलेल्या व्यक्तीने प्रत्यक्ष घटनेत सहभागी व साक्षी असलेल्या व्यक्ती कडून ऐकलेल्या माहितीच्या आधारे अहवाल तयार केले असतील तर त्यांना दुय्यम किंवा गौण साधने म्हणतात.

व्हॅन डॅलेन (१९७८) यांच्या मतानुसार “Primary sources are highly prized by a historian and secondary sources are never trusted completely.”2

ज्ञानकोश, कमिक पाठयपुस्तके, वर्तमानपत्रे, नियतकालिके, बखरी व अन्य संदर्भ ग्रंथाचा दुय्यम साधनात समावेश होतो.

### ३. गोळा केलेल्या माहितीची मीमांसा (Criticism of Data)

प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत याद्वारे माहिती जमा केली जाते. त्यावर योग्य प्रकारे मीमांसा व्हावी लागते. ही मीमांसा दोन पध्दतीने करता येत.

अ. बाहय मीमांसा (External Criticism)

ब. आंतरिक मीमांसा (Internal Criticism)

**अ. बाहय मीमांसा ः**

प्राप्त माहितीच्या प्रामाण्याचा शोध घेण्याच्या चिकित्सेला बाहय मीमांसा म्हणतात. ज्यावेळी अवशेष उपलब्ध होतात त्यावेळी त्यांची मीमांसा करण्यात येते. ते नकली आहेत की असली अधिकृत की अनाधिकृत इत्यादींचा शोध घेण्यात येतो. बाहयमीमांसेचा हेतू सत्याची प्रस्थापना हा आहे.

**ब. आंतरिक मीमांसा ः**

उपलब्ध माहिती वैध आहे की अवैध आहे याचे मूल्यांकन करण्याच्या पध्दतीस आंतरिक मीमांसा किंवा आंतरिक चिकित्सा म्हणतात. अशा माहितीची गुणवत्ता व अचूकता तपासण्यात येते.

### ४. गोळा केलेल्या माहितीचे अर्थ निर्वचन (Interpretation of Data)

प्राप्त माहितीची काळजीपूर्वक तपासणी केल्यावर तिचे संयोजन करून तिच्याअधारे स्पष्ट होणा-या गोष्टी समोर ठेवाव्या लागतात. हे स्पष्टीकरण करताना अभ्यासकाने स्वतःची मते दृष्टीकोन आवडी निवडी बाजूला ठेवणे आवश्यक आहे. पुराव्यातून निघणारा अर्थ पुराव्यासह स्पष्ट करण्याचा वस्तुनिष्ठ प्रयत्न केला पाहिजे. उपलब्ध माहितीतून सामान्यीकरण (Generalization) केले पाहिजे. माहितीच्या वर्गीकरणानंतर योग्य अर्थनिर्वचन करणे गरजेचे आहे.

### ५. अहवाल लेखन (Writing of the Research Report)

ऐतिहासिक संशोधन अहवाल लेखन महत्त्वाचे आहे. लेखनशैली भाषारचना मांडणी इत्यादी बाबींना त्यात अधिक महत्व आहे. तीक्ष्ण दृष्टी सुस्पष्टता अचूकता आणि नेमकेपणा ही अहवाल लेखनाची वैशिष्टे त्यात असावीत. लिखाण करतांना संशोधकाने तटस्थपणे उभे राहणे गरजेचे असते.

## ऐतिहासिक संशोधनाचे प्रकार (Types of Historical Research)

ऐतिहासिक संशोधनाचे पुढील प्रकार पडतात ः

### १. जीवन चरित्रे ः

शिक्षण क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करणा-या अनेक विभूती होऊन गेल्या आहेत. त्यांचे जीवन कार्य व विचार यातून शिक्षण विषयक सूत्र शोधून काढणे व त्याचा अर्थ स्पष्ट करणे हा ऐतिहासिक संशोधनाचा प्रकार आहे.

उदा. मॉटेसरी, फोबेल, डयुई इत्यादी पाश्चिमात्य शिक्षणतज्ञांप्रमाणे विवेकानंद, टागोर, म.गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, म.फुले, गाडगेबाबा इत्यादी शिक्षणतज्ञांच्या चरित्रांचा अभ्यास होऊ शकतो.

**२. शैक्षणिक विचार प्रवाहाचा इतिहास ः**

शिक्षण क्षेत्रातील अनेक महत्त्वाचे विचार प्रवाह केव्हा व कसे सुरू झाले त्यांची वैशिष्टये त्यांचा शिक्षण पद्धतीवर झालेला परिणाम या प्रकारचे संशोधन या प्रकारात येते.

उदा. गुरूकूल शिक्षण प्रणाली, वर्धा शिक्षण पद्धती, प्राचीन भारतीय शिक्षण इत्यादी विचार प्रवाहांचा या प्रकारात समावेश होतो.

**३. वैधानिक संशोधन ः**

केंद्र राज्य व जिल्हा परिषदेचे विविध प्रशासक, मुख्याध्यापक, प्राचार्य अशा विविध प्रशासकांना उपयुक्त नियम व कायदे शासनाचे नियम कसे तयार करण्यात आले त्यांचा योग्य अर्थ केंद्रिय शासन व राज्य शासन यांचे शिक्षण विषयक कायदेशीर अधिकार यांचा अभ्यास वैधानिक संशोधनात चालतो.

**४. संस्था व संघटना यांचा इतिहास ः**

शिक्षणाचे कार्य करण्यासाठी व ज्ञान प्रसारणासाठी शैक्षणिक संस्था आणि संघटना कार्यरत असतात. अशा संस्थांना आणि संघटनांचा इतिहास आणि शैक्षणिक कार्य त्यांच्या प्रगतीतील गुणविशेष विधायक कार्याचा आढावा यांवर संशोधन होणे गरजेचे असते. उदाहरणार्थ रविंद्रनाथ टागोर यांची शांतीनिकेतन संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पीपल्स एज्युकेशन सोसायटी, कर्मवीर भाऊराव पाटील यांची रयत शिक्षण संस्था, डॉ.पंजाबराव देशमुख यांची श्री.शिवाजी शिक्षण संस्था इ. वर संशोधन गरजेचे आहे.

**५. संदर्भ संशोधन ग्रंथ संशोधन ः**

ऐतिहसिक शैक्षणिक संशोधनात संदर्भ ग्रंथांना विशेष महत्त्व आहे. संदर्भ ग्रंथ संशोधन विषयक माहितीमुळे विशिष्ट कालखंडात झालेल्या ऐतिहासिक शैक्षणिक संशोधनाचे अध्ययन करणे सोयीचे असते. उदाहरणार्थ गुरजरातमधील बडोदा येथील प्रगत शैक्षणिक

अध्ययन केंद्र (CASE) दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद (NCERT) या संस्थांचे कार्य प्रशंसनीय मार्गदर्शक आणि प्रेणादायी आहे.

## ३.२.२ सर्वेक्षण संशोधन पद्धती :

सर्वेक्षण पद्धतीला अनेक नावांनी संबोधण्यात येते. उदा. सर्वेक्षण पद्धती (Survey Method), वर्णनात्मक पद्धती (Descriptive Method), आदर्शमूलक सर्वेक्षण पद्धती (Normative Method) स्तर (Status) इ.

**व्याख्या :**

जॉन डब्ल्यू. बेस्टने सर्वेक्षण पद्धतीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "सर्वेक्षण पद्धतीत एका विशिष्ट वेळच्या परिस्थितीत अगदी मोठया जनसंख्येच्या संदर्भात माहिती संकलित करण्यात येते. कोणत्याही एका व्यक्तीच्या गुणवैशिष्टयांशी याचा संबध नसतो. सर्वेक्षणाचा संबंध मोठया संस्थेमधून माहिती काढून त्यावरून निघालेल्या सर्वसामान्य संख्याशास्त्रीय माहितीशी असतो. सर्वेक्षण हे तिर्थक छेदात्मक असते"३

**प्रमुख उद्देश :**

सर्वेक्षण पध्दतीत वर्तमानावर भर असतो. आज भारतात आणि पाश्चिमात्य देशांमध्ये या पद्धतीचा व्यापक प्रमाणात वापर करण्यात येतो. सर्वेक्षणाचे प्रमुख उद्देश / हेतू पुढील प्रमाणे आहेत.

**१. वस्तुनिष्ठ पद्धतीने संशोधन :**

सर्वेक्षणात निर्माण होणा-या समास्यांचे वस्तुनिष्ठ पद्धतीने संशोधन करण्यात येते. त्यासाठी या पद्धतींचा उपयोग होतो.

**२. विचार स्पष्टीकरणे परिकल्पना यांची जाणीव :**

समस्या निर्माण झाल्यास सर्वप्रथम तिचे स्वरूप समजणे आवश्यक असते. त्यानुसार विचार, स्पष्टीकरणे, परिकल्पना यांची माहिती मिळते.

**३. वर्तमानस्थितीचा शोध घेणे :**

विविध क्षेत्रातील वर्तमान स्थितीचा तपास करणे हा आदर्शमूलक सर्वेक्षणाचा प्रमुख हेतू समजला जातो.

**४. योग्य साधनसामग्रीची निर्मिती :**

सर्वेक्षणात माहिती गोळा करण्यात येते. त्यासाठी यथार्थ साधने उपलब्ध असणे आवश्यक असते. त्यासाठी अशा साधनांची निर्मिती करता येते.

**५. पूरक माहिती उपलब्ध करणे :**

मूलभूत संशोधन करण्यासाठी या पध्दतीचा वापर करण्यात येतो. याकरिता अशा संशोधनास पूरक माहिती उपलब्ध करणे गरजेचे असते.

**६. शालेय उपक्रमाच्या नियोजनात उपयोगी :**

विविध शालेय उपक्रमांचे नियोजन करण्यात सर्वेक्षणाची मदत होते. शाळेची वास्तु, अध्यापक, अध्यापन पध्दती, प्रयोगशाळा, विकासाचे कार्यक्रम इत्यादीबाबतीत नियोजन करताना सर्वेक्षणाची आवश्यकता असते.

## सर्वेक्षण पध्दतीची वैशिष्टये :

सर्वेक्षण पध्दतीत खालील वैशिष्टये आढळून येतात.

१. या पध्दतीने कमी वेळात अधिक माहिती उपलब्ध करता येते.

२. सर्वेक्षण हे व्यक्तिच्या वैशिष्टयांशी संबधित नसते ते गटाच्या किंवा जनसंख्येच्या वैशिष्टयांशी संबंधित असते.

३. सर्वेक्षण हे गुणात्मक असते तसेच संख्यात्मकही असते.

४. सर्वेक्षण स्थानिक समस्यांचे सत्वर निराकरण करण्यास उपयोगी पडते.

५. सर्वेक्षण हे सामान्यतः तिर्थक छेदात्मक असते.

६. आधी सुरू असलेल्या संशोधनाचा पाठपुरावा (Follow-up) करण्यासाठी सर्वेक्षणाचा उपयोग होतो.

७. सर्वेक्षणात भाषेला महत्त्व आहे. तसेच गणितीय सांकेतिक भाषेचाही त्यात उपयोग होतो.

८. सर्वेक्षण पद्धतीत समस्येचे स्वरूप निश्चित आणि हेतू सुस्पष्ट असतो.

**सर्वेक्षणाचे प्रकार ः**

अभ्यासाचे उद्दिष्ट, क्षेत्र, साधनतंत्र, विषय इत्यादीनुसार सर्वेक्षणाचे विविध प्रकार पडतात.

१. विद्यालय सर्वेक्षण (School Survey)

२. सर्वेक्षण परीक्षण (Survey Testing)

३. प्रलेखी वारंवारिता अभ्यास (Documentary Frequency Studies)

४. सर्वेक्षण मूल्यांकन (Survey Appraisal)

५. पाठपुरावा अभ्यास (Follow-up studies)

६. न्यादर्श सर्वेक्षण (Sample survey)

### ३.२.३ प्रायोगिक संशोधन पद्धती ः

प्रायोगिक पद्धती ही एक वैज्ञानिक पध्दती असून शैक्षणिक संशोधनात तिचा उपयोग होतो. वैज्ञानिक पद्धतीवर ती आधारित असली तरी तिचे वैशिष्ट्य प्रयोग हे आहे.

**प्रायोगिक संशोधनाच्या व्याख्या ः**

जॉन डब्ल्यू बेस्टने प्रायोगिक संशोधनाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे ः

"काळजीपूर्वक नियंत्रित परिस्थितीत काय होईल आणि काय घडेल याचे वर्णन आणि विश्लेषण करणे म्हणजे प्रायोगिक संशोधन होय."[४]

एडवर्डच्या मतानुसार,

"एखाद्या संशोधन समस्येच्या बाबतीत ज्यावेळी एक अध्ययनकर्ता काही चलावर प्रत्यक्षपणे नियंत्रण किंवा हेरफेर प्रस्थापित करतो अशा प्रकारच्या संशोधन प्रक्रियेस प्रयोग असे म्हणतात."[५]

**प्रायोगिक संशोधनाची मूलभूत वैशिष्टये ः**

संपूर्ण प्रायोगिक संशोधनातील प्रयोगात मूलभूत बावींकडे लक्ष दिले जाते त्या पुढील प्रमाणे आहेत.

**१. अवलोकन / निरीक्षण ः**

प्रायोगिक संशोधनाचे अवलोकन हे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. प्रायोगिक संशोधनावर स्वतंत्र चल (Independent Variable) आणि अश्रित चल (Dependent Variable) यांच्या हेराफेरीमुळे प्रभाव पडतो काय याचे संशोधक अवलोकन करण्याचा प्रयत्न करतो.

**२. हेराफेरी ः**

प्रायोगिक शैक्षणिक संशोधनात संशोधक ज्या संघटकांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो त्यामध्ये कमतरता कशी निर्माण होईल याप्रमाणे वातावरण निर्माण करीत असतो. काही असे घटक असतात की जे अवलोकन करण्याकरीता जटिल वा कठीण बनविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे नियंत्रण ठेवता येते. हेराफेरी अशा प्रकारच्या प्रकियेत अभ्यासासाठी ज्यांची निवड करण्यात येते अशा परिक्षार्थ्यांवर पूर्वनियाजित अनेक अवस्थेचे समुदाय लावण्यात येतात.

**३. आवृत्ती ः**

नियंत्रणाच्या सर्व तंत्राचा उपयोग करून व यादृच्छिक न्यादर्श निवडूनही बाहयचलांचा प्रभाव पूर्णपणे टाळता येत नाही. यासाठी मोठया प्रयोगात अनेक उपप्रयोग करून हा प्रभाव कमी करता येतो. प्रायोगिक व नियंत्रित गटांतील एक निरीक्षणाऐवजी अनेक निरीक्षणे घेतली जातात. त्यामुळे बाहयचलांचा प्रभाव कमी कमी होत जातो.

**४. नियंत्रण ः**

विविध चलांवर नियंत्रण ठेवणे ही प्रायोगिक पद्धतीमधील सर्वात महत्त्वाची बाब आहे. यात बाहय घटकाचा प्रभाव प्रयोगावर पडू नये याची दक्षता घेण्यात येते. आश्रयी चलावर बाहय घटकाचा प्रभाव पडल्यास अशावेळी त्यास अनुमान काढणे अवघड होईल. अशा अवस्थेत निष्पन्न होणारी सफलता ही स्वाश्रयी चलामुळे आहे की बाहय घटकामुळे आहे हे त्यास समजणार नाही. अशावेळी बाहय घटक नियंत्रित करणे अगत्याचे ठरेल. नियंत्रण दोन बाबतीत असते ः

१. स्वाश्रयी चलावर नियंत्रण

२. बाहय चलावर नियंत्रण

**प्रायोगिक पद्धतीच्या पाय-या (Steps of Experimental Method) :**

प्रायोगिक पद्धतीच्या पुढील प्रमाणे पाय-या पडतात ः

१. समस्या कथन

२. संबंधित साहित्याचे परिशिलन अथवा सर्वेक्षण

३. जनसंख्या स्पष्ट करणे

४. कार्यवाही

५. फलाचे मापन

६. फलाचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

७. अनुमान काढणे

८. प्रायोगिक अभिकल्प ठरविणे

९. अहवाल लेखन

## ३.३ विश्लेषणात्मक सर्वेक्षण पद्धती (Analytical Descriptive Survey Method)

विश्लेषण अभ्यासामध्ये आशय विश्लेषण किंवा दस्तऐवज विश्लेषण यांचा प्रामुख्याने समावेश होतो. आशय विश्लेषणात संबंधित व्यक्तिची भाषणे, पुस्तके, अग्रलेख,

दूरदर्शन आणि रेडिओवरील कार्यक्रम इत्यादीचे विश्लेषण विशिष्ट निकषांच्या आधारे केले जाते. या पद्धतीने घटक विश्लेषण, व्यवसाय विश्लेषण हे सुध्दा करता येते. संप्रेषण प्रकियेच्या दृष्टिने आशय विश्लेषण हा फार महत्त्वाचा प्रकार आहे. दस्तऐवज विश्लेषणात संशोधकाचा हेतू हा एखाद्या मुद्याची किंवा संकल्पनेची वारंवारता पाहणे हाच

असतो. आशय विश्लेषण आणि दस्तऐवज विश्लेषण हे अभ्यासाचे दोन्ही प्रकार अतिशय जवळचे असतात. कारण दोघांमध्ये आशय प्रमुख असतो तो लिखित, ध्वनिमुद्रित, चित्रमुद्रित किंवा ध्वनिचित्रमुद्रित असू शकतो. विश्लेषण या सर्वेक्षण पध्दतीच्या प्रकारासाठी निरीक्षण सूची, पदनिश्चयन शलाका यांसारख्या साधनांचा वापर होतो. सर्वेक्षण संशोधनानुसार हे संशोधन सामान्य प्रकारात येते की विश्लेषणात्मक प्रकारात येते त्याचा निर्णय होत असतो. पृथःकरणात्मक संशोधन यामध्ये काही माहिती आकडेवारी किंवा संख्येच्या स्वरूपात असू शकते आणि ती मापनातून प्राप्त होते. तर अन्य माहिती ही गुण वैशिष्टये सांगणारी असते. "विश्लेषणात्मक संशोधनामध्ये संख्यात्मक बाबीपेक्षा गुणात्मक बाबींवर अधिक भर असतो. म्हणून एरिक्सन या तज्ञांने त्याला अर्थनिर्वचनात्मक (Interpretative) संशोधन असे म्हटले आहे."६

विश्लेषणात्मक संशोधनामध्ये जरी प्राधान्याने भर हा उपलब्ध दस्तऐवजाच्या विश्लेषणावर असला तरी या विश्लेषणासंबंधी तज्ञांची मते विचारात घेतली जातात. त्यांच्या मुलाखती घेतल्या जातात. तसेच कागदपत्रे किंवा दस्तऐवज यांच्या अधिकृत प्रकाशनाचाच आधार घेतला जातो.

"वर्तमान काळातील घटनांच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीचा मोठया प्रमाणात उपयोग होतो. ८०% पेक्षा जास्त शैक्षणिक संशोधने सर्वेक्षण पध्दतीने केली जातात. दप्तरामध्ये किंवा कागदपत्रांमध्ये सापडणारी काही वैशिष्टे शोधण्यासाठी आणि त्यांची मात्रा मोजण्यासाठी वापरल्या जाणा-या सर्वेक्षण प्रकाराला कागदपत्रांची वारंवारता सेवा किंवा विश्लेषणात्मक सर्वेक्षण पद्धती म्हणतात." अशा प्रकारे अभ्यासातून पुढील हेतू साध्य होतात.

१. वर्तमान स्थितीत कोणत्या कार्यरिती चालू आहेत किंवा वर्तमानकाळी कोणत्या प्रकारची परिस्थिती उपलब्ध आहे हे कळते.

२. आपल्या समस्येचे सापेक्ष महत्त्व ठरवता येते आणि तिच्यामध्ये संशोधनाची अभिरूची किती आहे हे ठरविता येते.

३.अभ्यासक्रम, पाठयक्रम, पाठयपुस्तके, संदर्भपुस्तके यामधील पक्षपातीपणा कोणता, पूर्वग्रह कोणते, प्रचारांचा भाग कोणता□हे निश्चित करता येते.

अशा प्रकारच्या विश्लेषण सर्वेक्षणासाठी वापरले जाणारे माहितीचे स्त्रोत पुढील प्रमाणे आहेत.

१. अहवाल, प्रकाशने आणि संस्थेचे दप्तर

२. अभ्यासक्रम व पाठयक्रमाची पुस्तके

३. क्रमिक आणि संदर्भ पुस्तके अवांतर वाचनाची पुस्तके

४. पत्रव्यवहार, दैनंदिनी, चरित्रग्रंथ, आत्मचरित्रे

५. छायाचित्रे, चित्रे किंवा व्यंगचित्रे यांचे संग्रह

## ३.४ आशय विश्लेषण ः संशोधन तंत्र

### आशय विश्लेषणाचा हेतू ः

सामाजिक आणि शैक्षणिक अध्ययन करताना संशोधकाला एका विशिष्ट प्रक्रियेतून जावे लागते. त्यासाठी वेगवेगळया तंत्राचा आणि पद्धतीचा अवलंब करावा लागतो. अशा निरनिराळया तंत्रापैकी एक उपयुक्त तंत्र म्हणजे 'आशय विश्लेषण तंत्र' होय. आशय विश्लेषण म्हणजे आशयाचे विश्लेषण करणे होय. आशय विश्लेषण हे संशो्धनातील एक प्रगत व नवीनतम अध्ययन तंत्र आहे. या तंत्राच्या सहाय्याने गुणात्मक तथ्यांचे सांख्यिकीय व वस्तुनिष्ठ तथ्यांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढता येतात.

भौतिक घटनांच्या तुलनेत सामाजिक घटना या अधिक जटील परिवर्तनशील अमूर्त आणि गुणात्मक असतात. ही एक वास्तविकता आहे. त्यामुळे सामाजिक घटनांच्या संदर्भात निष्कर्ष काढणे आणि नियमांचे प्रतिपादन करणे अतिशय कठीण आहे. परंतु आशय

विश्लेषणाच्या सहाय्याने गुणात्मक तथ्यांचे परिणामात्मक आणि वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे शक्य होते. म्हणून सामाजिक शास्त्रात आणि शिक्षण शास्त्रात आशय विश्लेषणाचे विशेष महत्त्व आहे.

**आशय विश्लेषणाचा इतिहास ः**

"सामाजिक संशोधनात आशय विश्लेषणाच्या विकासाला पत्रकारांपासून प्रेरणा मिळाली आहे. १९२६ मध्ये सर्वप्रथम मेल्कोम विल्ली यांनी आशय विश्लेषणाचा उपयोग आपल्या वृत्तपत्राच्या अध्ययनाच्या माध्यमातून केला आहे. त्यानंतर १९३0 मध्ये वुडलॅंड यांनी Foreign News in American Meaning News Papers या आपल्या अध्ययनात आशय विश्लेषणाचा उपयोग केला. त्यांनी अमेरिकन दैनिकांमधून परराष्ट्रीय बातम्यांना किती जागा देण्यात येते याचे विश्लेषण केले. मनोविश्लेषण पध्दतीचा उपयोग करून घेतलेल्या अभिलेखित मुलाखतीच्या शास्त्रीय अध्ययनात हेरॉल्ड लॉसवेल (Herald Laswel) यांनी १९३७ मध्ये आशय विश्लेषणाचा उपयोग केला. त्यामुळे सामाजिक संशोधनातील एक तंत्र म्हणून आशय विश्लेषणास विशेष महत्त्व प्राप्त झाले. संगीत, शिक्षण, साहित्य, रेडिओ कार्यक्रम, वृत्तपत्रे इत्यादींच्या अध्ययनात आशय विश्लेषणाचा उपयोग केला जातो."८

**आशय विश्लेषणाच्या व्याख्या ः**

आशय विश्लेषण तंत्राच्या काही शास्त्रीय व्याख्या दिल्या आहेत. या व्याख्यांमध्ये आशय विश्लेषण तंत्राच्या पध्दती शास्त्रीय औचित्य आणि त्याच्या प्रक्रियांचे वर्णन आढळून येते. आशय विश्लेषणाचा संबंध भाषेतील अभिव्यक्ती आणि संचाराच्या साधनाद्वारे प्राप्त तथ्यांच्या आशयाशी आहे. वृत्तपत्रे, कादंबरी, भाषणे या संचाराच्या इतर माध्यमातून व्यक्त झालेल्या वस्तूसंबंधीचे विश्लेषण कोणत्याही प्रशिक्षित संशोधनकर्त्याद्वारे केले जाते. आशय विश्लेषणाच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**व्याख्या (Defination) :**

**१. बर्नार्ड बेरेल्सन (Bernard Berelson)**

"संज्ञापनातील व्यक्त किंवा प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ठ व्यवस्थित व संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण हे एक तंत्र आहे."

"Content analysis is a research technique for the objective systematic and quantitative description of the manifest content communication"9

**२. पॉलिन यंग (Pauline Yong)**

"मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची आणि इतर लिखित किंवा मौखिक भाषाविषयक अभिव्यक्तीद्वारे प्राप्त संसोधन तथ्यांच्या आशयाचे कमबध्द, वस्तुनिष्ठ आणि परिमाणात्मक वर्णन करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे संशोधन तंत्र म्हणजे आशय विश्लेषण होय."

"Content analysis is a research technique for the systematic,objective and quantitative description of the content of research data procured through interviews, questionnaires, schedules and other linguistic expression, written or cal."10

**आशय विश्लेषणाची वैशिष्टे ः**

आशय विश्लेषणाच्या वरील विवेचनावरून पुढील काही वैशिष्टये सांगता येतील.

१. संज्ञापन किंवा भाषाविषयक अभिव्यक्तीद्वारे प्राप्त केलेल्या आशयाशी विश्लेषणाचा संबंध आहे.

२. या तंत्रामध्ये प्रगट आणि बाहय बाजूने निरिक्षण योग्य असलेल्या आशयाचे विश्लेषण केले जाते.

३. संज्ञापनाच्या कोणत्याही साधने किंवा लिखित आणि मौखिक भाषाविषयक माध्यमातून अभिव्यक्तीद्वारे प्राप्त कलेल्या संशोधन तथ्यांचे विश्लेषण या तंत्राद्वारे केले जाते.

४. या आशयाचे वस्तुनिष्ठ, कमबध्द आणि परिमाणात्मक वर्णन प्रस्तुत करणे हा आशय विश्लेषणाचा उद्देष आहे.

५. आशय विश्लेषण तांत्राचा आधार शास्त्रीय आहे आणि हे तंत्र अशा परिमाणांना शोधून काढते की त्याच्या सत्यतेच्या संबंधात परीक्षण आणि पुनर्परीक्षण केले जाते.

**आशय विश्लेषण तंत्राची उद्दिष्टे ः**

वर्नार्ड बेरेल्सन यांनी आशय विश्लेषण तंत्राचे उद्देश नमूद केले आहेत. आशय विश्लेषण तंत्र ज्या अध्ययन क्षेत्रामधून वापरण्यात आले त्यांचे व्यापक सर्वेक्षण करून बेरेल्सन यांनी अभिलेखांच्या आणि संज्ञापनाच्या आशय विश्लेषणाचे उद्देश स्पष्ट केले. आशय विश्लेषणाच्या सर्व उद्देशांचे तीन प्रमुख उद्देशांमध्ये विभाजन केले जाते.

**अ. आशय वैशिष्टयांच्या निर्देशनचे उद्देश ः**

आशय वैशिष्टयांच्या निर्देशन उद्देशामध्ये पुढील उद्देशांचा समावेश होतो.

१. आशय संज्ञापनाच्या दिशेचे वर्णन करणे.

२. विद्वत्तेचे विकसन कशाप्रकारे होते ते दर्शविणे.

३. आशय संज्ञापनाबाबत राष्ट्रा राष्ट्रामधील भिन्नत्व स्पष्ट करणे.

४. संज्ञापन माध्यमे आणि संज्ञापन पातळीची तुलना करणे.

५. उद्दिष्टांच्या संबंधात संज्ञापन आशयाची तपासणी करणे.

६. संज्ञापन मापदंडाची रचना करणे.

७. तांत्रिक स्वरूपाच्या संशोधनकार्याला सहाय्य करणे.

८. शैली लक्षणाचे शोधन करणे.

**आ. आशयाची कारणे शोधण्याचा उद्देश :**

आशयाची कारणे कोणती आहेत हे पडताळून पाहणे हा आशय विश्लेषणाचा एक प्रमुख उद्देश आहे. या उद्देशांतर्गत पुढील उद्देशांचा अंतर्भाव होतो.

१. संज्ञापनामागील उद्देश कोणते आणि संज्ञापनाची वैशिष्टे कोणती याचा शोध घेणे.

२. आशयामागील प्रचाराचे अस्तित्व शोधणे.

३. व्यक्ती व गटाच्या मनःस्थितीच्या स्वरूपाचे निर्धारण करणे.

४. राजकीय किंवा सैनिकी स्वरूपाची हेरगिरी करणे.

**इ. आशयाचे परिणाम बघणे :**

आशयाचे परिणाम कोणते आहेत□याचा शोध आशय विश्लेषणात घेतला जातो.

१. लोकांच्या अभिवृत्ती हितसंबंध आणि मूल्ये प्रतिबिंबित करणे.

२. संज्ञापनाप्रती होणा-या वर्तन प्रतिक्रियांचे किंवा अभिवृत्ती प्रतिक्रियांचे वर्णन करणे.

३. संज्ञापनामुळे लक्ष्य केंद्र कशाप्रकारे प्रभावित होते ते स्पष्ट करणे.

अशाप्रकारे आशय विश्लेषणाचे विविध उद्देश आहेत. आशय विश्लेषणात तंत्राचा उपयोग वरीलपैकी एक किंवा अधिक उद्देशांसाठी केला जातो.

**आशय विश्लेषणाचे एकक ः**

आशय विश्लेषणास वस्तुनिष्ठ, कमबध्द आणि परिणामकारक बनविण्यासाठी विश्लेषणाचे एकक निवडणे आवश्यक असते. या तंत्राच्या प्रक्रियेचा हा एक अतिशय महत्वाचा भाग आहे. आशय विश्लेषणाचे एकक हे शब्द, वाक्य, परिच्छेद, प्रसंग, पात्रस्थान, वेळेचे मापन इत्यादी अनेक प्रकारचे असू शकतात. यापैकी शब्द, वाक्य आणि परिच्छेद हे तीन एकक व्याकरण संबंधीचे असून बाकीचे एकक अव्याकरण संबंधीचे आहेत. काही महत्त्वाचे एकक पुढीलप्रमाणे आहेत.

**१. शब्द (Words) :**

आशय विश्लेषणातील सर्वात लहान एकक म्हणजे शब्द होय. अध्ययन केल्या जाणा-या भाषणात, लेखात, संपादकीयमध्ये किंवा इतर लिखित किंवा मौखिक सामुग्रीमध्ये काही विशेष शब्दांची किंवा प्रमुख प्रतिकांची किती पुनरावृत्ती झाली आहे, हे त्यात वेगळे लिहून किंवा मोजले जाते आणि त्या आधारावर अध्ययन विषय असलेल्या भाषण, लेख इत्यादीच्या संबंधात काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढले जातात. लॉसवेल (Lesswell) यांनी "World Attention Survey" मध्ये आधुनिक राजकारणाच्या संबंधित स्वतंत्रता, स्वातंत्र, संवैधानिक सरकार, राष्ट्रीय समाजवाद इत्यादी शब्दांना प्रमुख प्रतिकांच्या रूपात निवडले होते. १९५६ मध्ये फ्रान्समध्ये निवडणूक प्रचाराच्या उद्देशाने दिलेल्या निवडणूक भाषणातील शब्दाच्या आधारावर विश्लेषण करण्यात आले होते.

**२. वाक्य आणि परिच्छेद (Sentence and Paragraph) :**

वाक्य किंवा परिच्छेदास देखील एकक म्हणून आशय विश्लेषणासाठी निवडले जाऊ शकते. ख-या अर्थाने वाक्य किंवा परिच्छेद हा शब्दाचाच एक समूह असतो. ज्याद्वारे एक निश्चित विचार प्रतिमानास प्रस्तुत केले जाते. वाक्य किंवा परिच्छेदाच्या आधारावर भाषण लेख संवाद इत्यादींच्या आशयाचे विश्लेषण केले जाते.

### ३. पात्रे (Roles) :

नाटक, कादंबरी, कथा, सिनेमा, टेलिव्हिजन, फिचर फिल्म इत्यादीमधील पात्रांना आशय विश्लेषणाचे एकक मानले जाते. शेक्सपियर यांच्या नाटकातील पात्रे, सुप्रसिध्द हिंदी लेखक प्रेमचंद मुन्शी यांच्या कथेतील किंवा इतर कोणत्याही साहित्यकृतीतील पात्रांची आशय विश्लेषणाचा एकक म्हणून निवड करता येते.

### ४. भाग (Item) :

आशय विश्लेषणाकरिता एखादा भाग एकक म्हणून निवडण्यात येतो. पुस्तक, साप्ताहिके, मासिक, लेख, कथा, कादंबरी, भाषण, रेडिओ प्रोग्राम, संपादकीय वृत्तपत्रातील बातमीचा भाग इत्यादी मधील एक विशिष्ट भाग म्हणून निवडला जातो.

### ५. स्थान आणि काळाचे मापन (Measurement of Place and Time) :

वृत्तपत्रे किंवा साप्ताहिकातील विविध विषयांना विशिष्ट स्थान दिले जाते. त्याचप्रमाणे रेडिओ आणि टेलिव्हिजन कार्यक्रमाकरिता वेगवेगळा वेळ निश्चित करतात. या स्थान आणि वेळेच्या मापनास देखील आशय विश्लेषणाचा एकक मानला जातो.

### आशय विश्लेषणाच्या पाय-या ः

आशय विश्लेषण हे एक तंत्र आहे. आशय विश्लेषण तंत्राची रूपरेषा तयार करण्यासंबंधीच्या विशिष्ट पाय-या आहेत. या पाय-यानुसार आशय विश्लेषणाचे कार्य केले जाते. आशय विश्लेषणाच्या पाय-या पुढीलप्रमाणे आहेत.

**१. विषयाशी संबंधीत तथ्यांची निवड (Collection of Data Regarding the Topic)**

अध्ययन विषयाशी संबंधीत ज्या तथ्यांच्या आशयाचे आपणास विश्लेषण करायचे आहे. त्या तथ्यांची निवड करावी लागते. म्हणजेच आशय विश्लेषण तंत्रात सर्व प्रथम विषयाशी संबंधित तथ्यांची निवड करणे आवश्यक असते. उदा. सुप्रसिद्ध साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील उपलब्ध तथ्यांचे विश्लेषण हा विषय निवडता येईल. कादंब-याची संख्या अधिक असल्यामुळे नमुना निवड पद्धतीद्वारे निवडक कादंब-याचे अध्ययन करता येईल.

**२. अध्ययन एककांची निवड (Selecting the Units of Study)**

अध्ययन विषयाशी संबंधित तथ्य सामुग्रीची निवड आणि संकलन करून त्याचा अभ्यास केल्यानंतर एककाची निवड करणे आवश्यक असते. हे एकक शब्द, वाक्य, प्रसंग, पात्र, स्थान व वेळेचे मापन इत्यादी कोणतेही असू शकतात.

उदा. अण्णाभाऊ साठे यांच्या कादंब-यांचे विश्लेषण हा विषय निवडल्यानंतर त्या कादंब-यातील केवळ अस्पृश्य जातीच्या पात्रांना एकक मानून त्याचे अध्ययन करता येईल.

**३. आशयाच्या वर्गाचे विभाजन (Classification of the Content into Categories)**

एककांची निवड केल्यानंतर सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे या एककांचे काही निश्चित वर्गामध्ये विभाजन करणे होय. उदा. अण्णाभाऊ साठे यांच्या कांदब-यातील अस्पृश्य जातीचे पात्र हे एकक आहे. या पात्राचे त्यांच्या जातीच्या आधारावर महार, अस्पृश्य, मातंग अस्पृश्य इत्यादी वर्गामध्ये विभाजन केले जाऊ शकेल.

**४. वर्गाचे परीक्षण (Verifcation Categories)**

आशय विश्लेषण हे वस्तुनिष्ठ व्हावे याकरिता एककाच्या वर्गाचे परीक्षण करणे आवश्यक आहे. हे वर्गीकरण विश्वसनीय आणि यथार्थ आहे काय□हे लक्षात घेण्यासाठी वर्गाचे परीक्षण केले जाते. वर्गाचे निर्धारण काही मान्य प्रमाणांच्या आधारावर करून नंतर त्या वर्गांना अंतिम स्वरूप देण्यात येते.

**५. पद्धतीचा योग्य उपयोग (Proper Use of the Method)**

शास्त्रीय अध्ययनात केवळ पद्धतीची निश्चिती करणे पुरेसे नसते तर त्या पध्दतीचा अध्ययनात योग्य उपयोग होणे आवश्यक असते. म्हणून आशय विश्लेषण तंत्राचा अवलंब करताना संशोधनकर्त्याने संपूर्ण अध्ययनात समान पद्धतीचा उपयोग होतो की नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे पद्धती ही अध्ययन विषयाशी अनुरूप असली पाहिजे.

**६. अध्ययनाची रूपरेषा तयार करणे (Preparing the out Lines of the Study)**

वरील सर्व गोष्टींची निश्चिती झाल्यानंतर अध्ययनाची रूपरेषा तयार केली जाते. कोण कोणत्या विषयावर लक्ष केंद्रित करायचे आहे हे अध्ययनाच्या रूपरेषावरून निश्चित होते. त्यामुळे अध्ययन कार्य व्यवस्थितपणे केले जाते.

**७. आशयाच्या एककाचे मापन (Measuring the Units of the Study)**

या पायरीमध्ये निश्चित पध्दतीनुसार संशोधन कार्यास प्रारंभ केला जातो. सांख्यिकीय पदधतीद्वारे आशयाच्या एककांचे मापन केले जाते. ही पायरी अतिशय महत्वाची आहे. कारण या परिणामात्मक मापनाच्या आधारावर आशयाचे योग्य विश्लेषण आणि मूल्यांकन करणे शक्य होते.

### ८. विश्लेषणात्मक निर्वचन (Analytic Inter-Pretation)

आशयाच्या एककांचे योग्य आणि परिमाणात्मक मापन केल्यानंतर त्याचे विश्लेषणात्मक निर्वचन केले जाते. परिमाणात्मक मापन केल्यामुळे तथ्यांचे योग्य वर्गीकरण आणि सारणीकरण करणे सुलभ होते. या सारणीतील तथ्यांमध्ये आढळून येणारी समानता आणि भिन्नता स्पष्ट होते आणि त्यांच्या आधारावर विश्लेषणात्मक निर्वचन केले जाते.

### ९. अहवाल तयार करणे (Prepartion of the Report)

आशयाचे विश्लेषणात्मक निर्वचन केल्यानंतर संपूर्ण अध्ययनाच्या संदर्भात एक व्यवस्थित अहवाल तयार केला जातो. अहवालत सारणी, ग्राफ, चित्रे इत्यादींचा अवलंब केला जातो. कशाप्रकारे अध्ययन केले□ अध्ययनांचे निष्कर्ष कोणते□ या विषयीची सर्व माहिती अहवालात नमूद केली जाते.

### आशय विश्लेषण तंत्राचे महत्त्व (Importance of content Analysis Technique)

संशोधनात आशय विश्लेषण तंत्राचे आगळे वेगळे असे महत्त्व आहे. ते पुढील प्रमाणे –

### १. गुणात्मक विषयाचे परिमाणात्मक अध्ययन ः

आशय विश्लेषण तंत्राच्या सहाय्याने गुणात्मक विषयाचे परिणामात्मक अध्ययन करणे शक्य होते. भाषणे, लेख, कादंब-या संपादकीय हे सर्व गुणात्मक विषय आहेत. परंतु आशय विश्लेषण तंत्रात गुणात्मक विषयाचे स्वरूप आणि वैशिष्टयांची परिणामात्मक व्याख्या, सारणी, आलेख इत्यादी माध्यमातून स्पष्टीकरण केले जाते.

### २. संज्ञापन साधनाचे स्वरूप स्पष्ट करणे ः

संज्ञापनाच्या विविध साधनाचे स्वरूप स्पष्ट करण्यामध्ये आशय विश्लेषण तंत्राचे विशेष योगदान आहे. पुस्तक, भाषण, वृत्तपत्रे, रेडिओ कार्यक्रम इत्यादी संज्ञापनाच्या साधनांचा

सामाजिक जीवनावर विशेष प्रभाव पडतो. परंतु त्यांचे स्वरूप आणि प्रभाव हे दोन्ही अमूर्त असल्यामूळे त्याच्या संबंधीचे योग्य ज्ञान प्राप्त होत नाही. आशय विश्लेषण तंत्राद्वारे संज्ञापनाच्या साधनाचे स्वरूप स्पष्ट केले जाते. त्याचबरोबर या साधनाचे स्वरूप व मर्यादाच्या संबंधात देखील शास्त्रीय ज्ञान प्राप्ती होते.

**३. संज्ञापनाच्या आधाराचे तुलनात्मक अध्ययन** ः

आशय विश्लेषण तंत्राच्या सहाय्याने संज्ञापनाच्या आंतरराष्ट्रीय आधाराचे तुलनात्मक अध्ययन केले जाते. प्रत्येक देशातील संज्ञापन साधनांचा आशय एकसारखा नसतो. परंतु त्यांचा विस्तार आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत असू शकतो. त्यामुळे त्यांचा प्रभाव इतर देशावर पडण्याची शक्यता असते. म्हणून विविध देशाच्या संज्ञात्मक साधनांचे तुलनात्मक अध्ययन करणे आवश्यक असते.

**४. प्रचार साधनाच्या प्रभावाचे अध्ययन** ः

प्रचाराच्या साधनांचा लोकांवर प्रभाव पडतो. या प्रभावाच्या स्वरूपाच्या संबंधात आशय विश्लेषण तंत्राद्वारे शास्त्रीय अध्ययन करणे शक्य होते. या प्रकारच्या अध्ययनामुळे प्रचार साधने अधिक प्रभावी बनविणे आणि प्रचारांची नवीन साधने आणि तंत्राचा शोध लावण्यास मदत होते.

**५. लोकमत जाणून घेण्यास मदत** ः

आशय विश्लेषण तंत्राद्वारे लोकमत जाणून घेण्यास मदत होते. वृत्तपत्रांच्या संपादकांना लोकांनी पाठविलेल्या पत्रांचे आशय विश्लेषणावरून लोकमताचा कल स्पष्ट करणे शक्य होते.

**६ . व्यक्तिमत्वाच्या अध्ययनासाठी सहाय्यक ः**

आशय विश्लेषणाद्वारे एका व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे अध्ययन करणे शक्य होते . भाषणे, लेख, पुस्तके इत्यादींचे आशय विश्लेषण करून त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अंतर्भूत विचार, आदर्श, मूल्य, मनोवृत्ती, संवेग इत्यादींचे अध्ययन करणे शक्य होते .

**७ . समूहाचा मानसिक कल स्पष्ट करणे ः**

आशय विश्लेषणाद्वारे समूह किंवा समुदायाचा मानशास्त्रीय कल स्पष्ट करणे शक्य होते . वृत्तपत्रे आणि पत्रिकांमध्ये (साप्ताहिके व मासिके) प्रकाशित लेख, कथा इत्यादी तसेच रेडिओ कार्यक्रम, जाहिराती इत्यादी विषयाच्या आशयाचे विश्लेषण करून एका समूहाचा मानसिक कल कोणत्या दिशेने आहे हे स्पष्ट केले जाते .

## आशय विश्लेषण तंत्राच्या मर्यादा (Limitations of Content Analysis Technique)

१ . आशय विश्लेषणाचा अध्ययन विषय हा गुणात्मक स्वरूपाचा असल्यामुळे त्याचे परिणामात्मक परिणाम काढणे कठीण असते .

२ . अध्ययन एककाचे स्वरूप गुणात्मक असल्यामुळे त्या संबंधित तथ्यांच्या विश्वसनीयतेचे परीक्षण करणे कठीण असते .

३ . या तंत्रात विश्लेषणात्मक निर्वचन आणि निष्कर्षांना यथार्थता प्राप्त करणे कठीण आहे . कारण अध्ययन विषयात विषयाचे स्वरूप गुणात्मक असते .

४ . संज्ञापन साधनात खूप भिन्नता आहे . म्हणून एका अध्ययनाच्या आधारावर काढलेले निष्कर्ष समान विषयांना लागू करता येतील किंवा नाही हे सांगणे कठीण जाते .

५ . संज्ञापन साधनाच्या आशयामध्ये शीघ्र गतीने परिवर्तन होत असते . म्हणून आज काढलेले निष्कर्ष काही काळानंतर निरर्थक ठरतात .

६. क्षेत्र अध्ययन कार्याकरिता आशय विश्लेषण तंत्राचा उपयोग करता येत नाही. ही देखील या तंत्राची एक मर्यादा आहे.

## ३.५ प्रस्तुत संशोधनातील संशोधन पद्धती ः

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे विचारात घेता प्रस्तुत संशोधन हे 'वाड्.मय विश्लेषण' (Literary Research) या प्रकारचे संशोधन आहे. (Literary Research बद्दल माहिती परिशिष्ट 'डी' मध्ये आहे.) म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी वाड्.मय विश्लेषण पद्धती (Analysis of Literature Method) वापरण्यात आली आहे.

या वाङ्मय विश्लेषण पद्धतीचे वाङ्मयीन आशय विश्लेषण पध्दती असे स्वरूप आहे. वाङ्मयामध्ये विशिष्ट आशय असतो आणि वाङ्मयाचे विश्लेषण म्हणजेच या वाङ्मयीन आशयाचे विश्लेषण होय. म्हणून आशय विश्लेषण पद्धती ही वाङ्मय विश्लेषण पद्धतीला लागू होते. या अर्थाने आशय विश्लेषण पद्धतीचा संशोधकाने एक तंत्र म्हणून अवलंब केला आहे.

वाड्.मय विश्लेषण पद्धतीचे पृथक्करण पद्धती असेही स्वरूप असते. या पृथक्करण पद्धती बद्दल डॉ.दु.का.संत आपल्या 'संशोधन पध्दती प्रक्रिया व अंतरंग' या ग्रंथात लिहीतात की "विविध पध्दतींना पायाभूत असणारी संशोधनात प्रमाणभूत मानली जाणारी शास्त्रीय दृष्टींशी एकरूप झालेली पध्दती म्हणजे पृथक्करण पध्दती (ॲनॅलिटिकल मेथड) होय. संशोधनाचा पाया पृथक्करण होय. संशोधन म्हणजे हया पृथक्करण पध्दतीच्या अवलंबाचे मूर्त स्वरूप आहे. हे पृथक्करण विविध प्रकारचे असते. ते योजण्यात संशोधकाच्या विविध गुणांची कसोटी लागते. अवलोकन, चिकित्सकता, सावधानता, ऐतिहासिकता, वस्तुनिष्ठता इ. सर्व गुणांनी संस्कारित झालेली पृथःक्करणात्मक पद्धती हेच संशोधनाचे मूलधारस्वरूपी हत्यार आहे. ते आत्मसात करून घेण्याचा व सदैव तयार ठेवण्याचा प्रयत्न करणे हे संशोधनातले मुल सूत्र आहे."[११]

### ३.५.१ संशोधनाची साधने ः

प्रस्तुत संशोधनासाठी 'वाङ्मय विश्लेषण' ही संशोधन पद्धती वापरली आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या माहिती संकलनासाठी व विश्लेषणासाठी आवश्यक असलेले तक्ते कोष्टके हे संशोधन साधन म्हणून उपयोगात आणले आहे. त्यासाठी संशोधकाने स्वयंनिर्मित कोष्टके, तक्ते तयार केलीत.

१. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाचे वाचन करतांना निरीक्षण केलेल्या नोंदी करण्यासाठीचा तक्ता.

२. नैतिक मुल्यांच्या संदर्भातील संख्यात्मक माहिती नोंदविण्यासाठीचे कोष्टक.

३. नैतिक मूल्यांची अध्यापनातील उपयुक्तता दर्शविणारी कोष्टके.

संपूर्ण संशोधनात डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील 'बोध कथा मधील नैतिक मूल्यांच्या अनुषंगाने नोंद करण्यासाठी आणि त्यांचे संख्यात्मक विवरण करण्यासाठी वर उल्लेखित तक्ते, कोष्टके तयार करण्यात आली. संशोधनातील विश्लेषण करण्यासाठी आणि निष्कर्ष काढण्यासाठी या कोष्टकांमध्ये माहिती भरण्यासाठी आशय विश्लेषण या संशोधन तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

### ३.५.२ माहिती संकलनाचे संदर्भ / स्त्रोत ः

डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाचा शैक्षणिक अभ्यास करतांना संशोधनासाठी विविध प्रकारच्या सामग्रीचा वापर करण्यात आला. त्यामध्ये प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत कोणते ते पुढील प्रमाणे विचारात घेतले आहे.

**१. प्राथमिक संदर्भ / स्त्रोत ः**

डॉ.न.म.जोशी यांनी स्वतःलिहिलेली आणि प्रसिध्द झालेली बाल कुमार वाड्मयांतर्गत येणारी एकूण १०१ बोधकथा हीच प्राथमिक संदर्भ स्त्रोत म्हणून विचारात घेतले आहे.

**२. दुय्यम संदर्भ / स्त्रोत ः**

प्रस्तुत संशोधनात दुय्यम संदर्भ म्हणून पुढील स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

१. डॉ.न.म.जोशी यांच्यावर लिहिलेले विविध लेख व नियतकालिकांचे गौरवपर विशेषांक डॉ.न.म.जोशी यांच्या वाड्मयावरील संशोधन व समीक्षण.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील महाराष्ट्र शासनाने शालेय स्तरावर निश्चित केलेली १० नैतिक मूल्ये यांच्याशी संबंधित साहित्य.

३. इयत्ता १ ली ते १२ वी ची मराठी विषयांची प्रचलित पाठयपुस्तके.

## ३.६ प्रस्तुत संशोधनाची कार्यपध्दती ः

१. प्रस्तुत संशोधनासाठी वाड्मय विश्लेषण ही पध्दती वापरली असल्याने संशोधकाने सर्वप्रथम डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाड्मयातील पुस्तके विविध प्रकाशने व वाचनालये यांच्या माध्यमातुन मिळविली.

२. सर्व सस्त्रोतांमधून उपलब्ध झालेल्या पुस्तकांचे सोद्देश सखोल वाचन करण्यात आले.

३. बोधकथा या वाड्मय प्रकारात १० नैतिक मूल्यांशी संबंधित आशय शोधून त्याला आहे त्या स्वरूपात लिहिण्यात आले आहे. प्रत्येक आशय हा कोणत्या नैतिक मूल्याशी निगडीत आहे हे शोधून त्याचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. संकलीत माहितीमध्ये आशयांची मांडणी करतांना तो आशय कोणत्या कथेतील / प्रसंगातील आहे इत्यादी माहिती नमूद करण्यात


आली आहे. आशयाचे स्पष्टीकरण करतांना प्रत्येक आशय हा संदर्भ साहित्य म्हणून नैतिक मूल्य स्पष्ट करण्यासाठी अध्यापनात कसा उपयुक्त आहे याचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे.

४. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाड्मयातील जी पुस्तके आहेत त्यातील शब्द, वाक्य आणि परिच्छेद निवडून नैतिक मूल्याशी कसे संबंधित आहेत ते शोधले. प्रत्येक पुस्तकातील शब्द, वाक्य आणि परिच्छेद हे आशय विश्लेषणातील एकक आहेत. ती एकके शोधण्यासाठी आशय विश्लेषण या संशोधन तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे.

५. संकलन केलेल्या माहितीचे संख्यात्मक विवरण विविध कोष्टकांमध्ये करण्यात आले. ही कोष्टके उद्दिष्टांनुसार करण्यात आलीत.

६. कोष्टकांमधील संख्यात्मक माहितीचे नैतिक मूल्यांच्या अनुषंगाने विश्लेषण करण्यात आले.

७. विविध कोष्टकांचे विश्लेषण करून उद्दिष्टांनुसार निष्कर्ष काढण्यात आले. प्रस्तुत संशोधनातील कार्यपध्दतीच्या पाय-या सारांशरूपात पुढील प्रवाह आकृतीमध्ये दाखविता येतील.




### ३.६.१ संशोधन माहिती व विश्लेषण साधने ः

प्रकरण ४ मध्ये संकलित संशोधन माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन सविस्तरपणे देण्यात आले आहेच. त्यासाठी कोणती पध्दत, विश्लेषण साधने आणि वश्लेषणाचा क्रम कसा आहे त्याची माहिती इथे देण्यात आली आहे.

१. संपूर्ण संशोधनातील माहिती संकलनासाठी आशयांचे वर्गीकरण करतांना प्रत्येक कथांचा व त्यांतील नैतिक मूल्यांचा सुध्दा क्रमाक्रमाने विचार करण्यात आला आहे.

२. संकलित केलेल्या आशयांची संख्यात्मक माहिती प्रत्येक उद्दिष्टांनुसार विविध कोष्टकांमध्ये केली आहे.

नैतिक मूल्यांची संख्या दर्शविणारी कोष्टके तयार केली. तसेच सर्व नैतिक मूल्यांशी संबंधित आशयांचे एकत्रित संख्यात्मक विवरण दर्शविणारे कोष्टक तयार केले आहे.

या सर्व कोष्टकांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

## ३.६.२ संख्याशास्त्रीय तंत्र ः

प्राप्त तथ्यांचे गुणात्मक तसेच संख्यात्मक वर्गीकरण केले. गाभा घटकांना आणि नैतिक मूल्यांना पूरक असणा-या आशयांचे एकूण उपलब्ध आशयांशी टक्केवारी शोधून काढली. आलेल्या टक्केवारीचा अभ्यास केला आणि निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध कोष्टकांमधील माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी या परिमाणाचा वापर करण्यात आला आहे.

## ३.७ समारोप ः

कोणतेही संशोधन पूर्णत्वास नेण्यासाठी एक संशोधन पद्धती ठरविली जाते. त्यातही शैक्षणिक आणि सामाजिक संशोधनात विविध संशोधन पद्धतींचा समावेश आहे. त्या सर्वांचा विचार करून आपल्या संशोधनासाठी नेमकी कोणती संशोधन पद्धती लागू पडते याचा विचारही संशोधकाला करायचा असतो.

प्रस्तुत संशोधनात जी वाङ्मय विश्लेषण पद्धती वापरण्यात आली तिच्या कार्य वाहीतील पाय-यांचा क्रमाक्रमाने विचार केला आहे. एकदा संशोधन कार्यातील पाय-यांची निश्चिती झाली की संशोधनाला नेमकेपणा आणि सुसूत्रता येते. संशोधनाची कार्यपध्दती निश्चित संकलित सामग्रीचे विश्लेषण करणे आणि उद्दिष्टांनुसार निष्कर्ष काढणे सोपे गेले.

*****

**संदर्भ ः**

१. घोडमोडे के.यु. आणि घोरमोडे कला (२००८) **'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे'** विद्या प्रकाशन नागपूर ०२, प्रथमावृत्ती जानेवारी २००८ पृष्ठ क.२६८

२. तत्रैव पृष्ठ क.२७४

३. तत्रैव पृष्ठ क.२५२

४. तत्रैय पृष्ठ क.२८३

५. तत्रैय पृष्ठ क.२८३

६. कर्डिले भूषण वसंतराव (२००७) **'ज्ञानकवी कुसुमाग्रजांच्या काव्यातील शिक्षण व मूल्यविचारांचा चिकित्सक अभ्यास'**, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव येथे सादर केलेले व मान्य झालेला पीएच. डी. प्रबंध (२००७) (प्रकरण ३. संशोधन पध्दती मुद्दा ३.२.३)

७. तत्रैव, प्रकरण ३ ः संशोधन पद्धती मुद्दा ३.२.३

८. आगलावे प्रदिप (२०००) **'संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे'** विद्या प्रकाशन नागपूर ०२ प्रथमावृत्ती ः १ जानेवारी २००० (पृष्ठ क. ३६०)

९. तत्रैव पृष्ठ क.३६७

१०. तत्रैव पृष्ठ क.३६७

११. संत दु.का. (१९८८) **'संशोधन पद्धती प्रकिया व अंतरंग'** पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे ३०. द्वितीयावृत्ती १९८८ (पृष्ठ क. ११९)

१२. खर्चे नितीन २०१२ "डॉ.न.म. जोशी यांच्या बालकुमार वाङ्मयाचा शेक्षणिक अभ्यास."

*****

# प्रकरण 4

# संकलित माहितीचे वर्गीकरण विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

## ४.१ प्रस्तावना ः

प्रस्तुत संशोधनात संशोधन पध्दतीनुसार संशोधकाने डॉ.न.म.जोशी यांच्या कथा प्रकारातील बोधकथा या प्रकारातील सर्व कथांचे आशय विश्लेषण केले आहे. त्याच बरोबर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नूसार दिलेल्या नैतिक मूल्यानूसार त्या कथांचे वर्गीकरण करून संख्यात्मक विश्लेषण केलेले आहे. त्यानुसार प्रस्तुत संशोधनाचा अध्यापान करताना कोठे व कसा उपयोग होईल हे ही स्पष्ट केलेले आहे.

## ४.२ डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील मूल्यांशी संबंधी 'कथा' या वाङ्मय प्रकारातील आशयांचे विश्लेषण ः

१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः सरता संचिताचे शेष

मूल्य ः स्वावलंबन, सहकार्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

सकाळी श्रीधर उठला भावाची झोपमोड करू नये म्हणून तो बाहेर फिरण्यासाठी जाणार एवढयात त्याला चिंतामणीची प्रचंड तगमग तडफड जाणवली घालमेल दिसली. दिवा लावला. हॉटेलमध्ये अंधार होता. ह्दयविकाराचा तीव्र झटका आला होता. चितामणीचं मस्तक श्रीधरने आपल्या हाती धरल आणि चितामणीनं भावाच्या मांडीवर शेवटच श्वास घेतला. श्रीधर एकटाच पण हॉटेल मालक इंदूरकर मित्र यांच्या माणुसकीचं अभूतपूर्व दर्शन त्याला घडले. पुढील

सर्व गोष्टी पार पाडल्या. त्याला आठवलं...... सरता संचिताचे शेष □नाही क्षणाचा अवकाश......!

वरील आशय हा 'सरता संचिताचे शेष' या कथेतील आहे. चिंतामणी या कथेतील प्रमुख पात्र आहे. चिंतामणी हा इतरांची चिंता घालविणारा प्रत्येकाला सहकार्य करणारा आपला त्रास इतरांना होणार नाही याची दक्षता घेणार असा हा चिंतामणी माणुसकीचं अभूतपूर्व दर्शन घडविणारा. त्याने स्वतः शेवटचा श्वास भावाच्या मांडीवर सोडला. या कथेतील हा आशय स्वावलंबन व सहकार्य हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः चांडालची अमृतवाणी

मूल्य ः समतोल विचारसरणी नितिमत्ता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

त्यांनी मायाब्रम्ह द्वैताद्वैत यावर खूप विचार केला आणि त्याला चांडालाच्या त्या अमृतवाणीमुळेच अद्वैततत्व ज्ञानाचा साक्षात्कार त्या अमृतवाणीमुळेच अद्वैतत्व साक्षात्कार झाला. पुढं त्याने तत्वज्ञानाचा एक मोठा ग्रंथ सिद्ध केला. त्यांच नाव शंकरभाष्य. त्याचे कर्ते आदय शंकराचार्य . तो तरूण संन्यासी म्हणजेच आदय शंकराचार्य आणि त्याला चांडालरूपात अद्वैताचा साक्षात्कार घडविणारे साक्षात भगवान शंकर. पुढे शंकराचार्यांनी अद्वैतमनाचा प्रसार केला आणि स्तोत्र लिहिली. त्यांची अनेक स्तोत्र आज लोकांच्या ओठांवर आहेत.

वरील आशय हा डॉ. न.म.जोशी मधील चांडालची अमृतवाणी या कथेतील आहे. चांडाल या कथेतील प्रमुख पात्र आहे. त्यानं संन्याशाल आपल्या अमृतवाणीने निःशव्द केलं होते. संन्याशी म्हणजे आदय शंकराचार्य आणि त्यांना चांडालरूपात अद्वैताचा साक्षात्कार

घडविला. हया कथेतील आशय समतोलविचरसरणी व नितिमत्ता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आशय आहे.

३. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः कोमागातामारू

मूल्य ः निर्भयता न्याय

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

जहाजावरील हे हिंदी बांधव समुद्र सफरीच्या कैदेतून मोकळे झाले. पण मेंढरासारखे मुकाटयानं पंजाबच्या गाडीत जाऊन बसले. त्यांच्या खाण्यापिण्याची कुणीही चौकशी सुद्धा केली नाही. मग प्रवाशी आणि पोलिस यांच्यात तुंबळ रणकंदन झाले. पोलिसांनी पाशवी हल्ला केला. यात किती ठार झाले . कित्येक जखमी झाले. भावा गुरूदत्तसिंग विजनवासात गेला. कोमागा तामारू हे प्रकरण अशा त-हेनं अनेकांना विव्हल करून गेलं.

वरील आशय डॉ. न.म.जोशी यांच्या 'कोमागातामारू' या कथेतील आहे. निर्भ यतेने कोमागातामारूवरील हिंदी प्रवाशांनी हाल्यांना न घाबरता निर्भिडपणे आल्या त्या प्रसंगाला तोंड देत भारताच्या किना-यावर आले. तेव्हा लोकांना हत्यारबंद पोलिसांनी थेट पंजाबचा रस्ता दाखविला. भारताच्या त्या प्रवाशांना कुठल्याही प्रकारची न्यायी भावना न दाखवता पोलिसांनी पाशवी हल्ला केला. हा कथेतील आशय 'न्याय' व 'निर्भयता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः चामाबिना देहा किनकी बनाई

मूल्य ः श्रद्धा, वैचारिक व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

एका कुंभमेळयाच्या वेळी रोहिदास आपल्या शिष्यगणांसह प्रयाग तीर्थावर गेले होते.

गर्वानं पछाडलेल्या पंडितांनी त्यांना आव्हान दिलं. पूजेतील शाळिग्राम गंगेत फेकला तर तरेल काय! रोहिदास आपल्या हातातील शाळीग्राम लगेच गंगेत फेकला आणि काय आश्चर्य तो शाळिग्राम तरून गेला. बुडाला नाही मत्सरी पंडितांनी डोळे विस्फारले.

सिंकदर लोदी हा दिल्लीच्या तख्तावर होता. त्यानं इतरांच्या सांगण्यावरून संत रोहिदासांना कारावासात डांबल पण लोदीला सदबुद्धी झाली. असे हे रोहिदास तथा संत रविदास उत्तरेतून महाराष्ट्रात आले आणि विठ्ठलभक्तीत दाखल झाले.

वरील आशय हा डॉ. न.म.जोशी यांच्या चामाबिना देह किनकी बनाई या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र संत रोहिदास हे आहेत. त्यांचा वैचारिक व्यासंग व मनापासूनची श्रद्धा पण अंधश्रद्धा नाही या बळावर शाळीग्राम पाण्यावर तरंगून दाखवला. तसेच सिकंदर सद्बुध्दी जागृत केली व महाराष्ट्रात येऊन निस्सिम विठ्ठल भक्तीत रममाण झाले. हा आशय ‘श्रद्धा’ व ‘वैचारिक व्यासंग’ ही मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५.वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः एक परी आणि तीन राक्षस

मूल्य ः वस्तुनिष्ठता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

'एक परी आणि तीन राक्षस' महोत्सवानंतर 'नादब्रम्ह' या वास्तूत कलाकारांच्या मोकळया गप्पा चालल्या होत्या. यशवंत देव मंगेश पाडगांवकर आणि गंगाधर महाम्बरे यांनी छोटया सावनीला मध्ये बसवून राजन लाखे या फोटोग्राफरला पोझ दिली. फोटो सुरेख आला होता तेव्हा मंगेश पाडगांवकर म्हणाले, 'एक परी आणि तीन राक्षस' सारे हास्यकल्लोळात आकंठ भिजले. 'नादब्रम्हा'ची ही अशी किमया.

वरील आशय हा डॉ.न.म.जोशी यांच्या 'एक परी आणि तीन राक्षस' या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र 'रविंद्र' हे आहेत. त्यांची कन्या सावनी ही देखील वडीलांसारखीच सुंदर गायची त्या सावनीला पाहून मंगेश पाडगांवकरांनी वरील ओळी यशवंतदेव पाडगांवकर आणि गंगाधर राजन लाखे यांना फोटोची पोझ देताना उद्गारले होते. सावनी खरेच खूप लाघवी गोंडस होती. त्या तिघांमध्ये बसून सावनीचा फोटो सुंदर आला होता. तेव्हा विनोदात्मक वृत्तीन पाडगांवकरांनी वरील उद्गार काढले सारे हास्यकल्लोळात आकंठ बुडाले. हा आशय वस्तुनिष्ठपणा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६.वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः प्रकटले नरसिंह स्तंभातूनी

मूल्य ः भूतदया, करूणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

त्यांनी हिरण्यपश्यपूला आपल्या बाहूत घेतले आणि राजवाडयाच्या उंबरठयावर आपल्या मांडीवर आडवा टाकून आपल्या तीक्ष्ण नखाग्रांनी त्याचा कोथळा बाहेर काढला.

दुष्ट हिरण्यकश्यपूचा नरसिंहानं वध केला. सकाळी नाही रात्री नाही संध्याकाळी नाही बाहेर नाही आत नाही उंबरठयावर माणसांकडून नाही पशूकडून नाही नरसिंहाच्या रूपात......

खननिर्दालन आणि सज्जन रक्षण यासाठी परमेश्वराला नृसिंह अवतार घ्यावा लागला.

वरील आशय डॉ. न.म.जोशी. यांच्या 'प्रकटले नरसिंह स्तंभातुनी' या कथेतील आहे. यातील प्रमुख पात्र 'हिरण्यकश्यपू' हा आहे. हिरण्यकश्यपूला भगवान विष्णूनीं वर दिला. त्यावराने हिरण्यकश्यपू बेफाम वर्तन करू लागला. त्याने स्वतःच्या मुलाला प्रल्हादालाही देवाचे नामस्मरण केल्याने कठोर शिक्षा केली. त्याचा वध करण्यासाठी माणसांचे पशूचे रक्षण करण्यासाठी परमेश्वराला नरसिंह अवतार घ्यावा लागला व हिरण्यकश्यपू सारखा नराधमाचा परमेश्वराने वध केला. वरील आशय 'करूणा' व 'भूतदया' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : प्रभाकराची वैकुंठसेवा

मूल्य : सहकार्य, सर्वधर्म समभाव, सहानुभूती

कथानामक : डॉ. न.म. जोशी

ज्या काळात विदयुतवाहिनी नव्हती त्या काळात चितेवर अग्नी दिली जायचा. चितारचणे हे एक शास्त्र असते. चिता पेटविणे हे ही शास्त्र असते. नुसती लाकडे ठेवून चिता रचली जात नाही ती कोसळू नये म्हणून लाकडांच एकमेकांनाा गुतलेलं अडवे उभे थर प्रभाकर भट

यामध्ये तरबेज होते. ओळखीचा असो वा नसो, नात्या गोत्याचा असो वा नसो, परिचित परिवानला असो वा नसो, जाता, धर्म, वंश, रक्त, वय, लिंग, परिस्थिती यापैकी कशाचाही विचार न करता प्रभाकर भटांनी पुढं होऊन अंत्यविधी केले.

वरील आशय 'प्रभाकराची वैकुंठसेवा' या कथेतील आहे. यातील प्रमुख पात्र 'प्रभाकर भट' हे आहेत. लहाणपणापासून अंत्यविधीचे दृश्य पाहून प्रभाकर अंतर्मुख झाले. मग प्रभाकरांनी अंत्यविधीच्या कार्याचा वसा घेतला. कोणत्याही जातीचा, वंशाचा, धर्माचा, रक्ताचा कोणत्याही लिंगाचा असो या कशाचाही विचार न करता माणुसकी, सहकार्यवृत्ती, प्रेम, आपुलकी या नात्याने अखंड समाजसेवावृत्तीने त्यांनी अंत्यविधीचे काम सुरू ठेवले. हा आशय सहकार्य, सर्वधर्मसमभाव, सहानुभूती हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७ अ. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः प्रभाकराची वैकुंठसेवा

मूल्य ः सौजन्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पुण्य नावाची काही चीज असलेच तर प्रभाकराचा जीवनकुंभ या पुण्याने काठोकाठ भरलेला आहे आणि पुण्य जोडणारा माणूस मोक्षालाच जातो अशी भावना खरी असेल तर प्रभाकराचे मोक्षातील स्थान परमेश्वरानेच राखीव आसन म्हणून आधीच पक्के केले असेल. अनेकांना मोक्षमार्गाची वाटचाल करताना मार्गदर्शक करणारा कृतिशील समाजसेवक प्रभाकर यांची वैकुंठसेवा कोणत्याही तथाकथीत समाजसेवेपेक्षा खूपच मोलाची मोक्षमार्गाचा हा वाटाडया दीर्घकाळ संस्मरणीय.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'प्रभाकराची वैकुंठसेवा' या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र 'प्रभाकर भट' हे आहेत. प्रभाकर भट यांनी माणुसकी प्रेमापोटी व

समाजसेवेच्या नात्याने त्यांनी हजारपेक्षा अधिक मृतांवर अंत्यसंस्कार केले. अनेकांना मोक्षाची वाटचाल करून देताना मार्गदर्शन करणारा कृतिशील समाजसेवेपेक्षाही खूप मोलाचा आहे. हा आशय 'सौजन्य' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः चिमणी का उडाली

मूल्य ः भूतदया, करूणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

"आजोबा वाघोबा एवढा भयंकर प्राणी . तो आला तरी चिमणी खेळत होती. त्याला ती नाही घाबरली. रानरेडा सुद्धा चांगला गलेलठ्ठ होता. त्याच्या पाठीवर ती चिमणी बसली. पण उडून घाबरून पळून नाही गेली. मग माणूस पोहायला आला तर चिमणी घाबरून गेली. हे कसं."

"बाळा वाघ काय किंवा रानरेडा काय त्यांच्या वाटेला गेलं तरच ते प्राणी इतरांना त्रास देतात. माणूस मात्र स्वतःला त्रास झालेला नसला तरी इतरांना त्रास देतो हे त्या चिमणीला माहीत होतं म्हणून चिमणी पळाली बरं."

वरील आशय डॉ. न.म. जोशी यांच्या 'चिमणी का उडाली' या कथेतील आहे. या कथेतील चिमणी हे प्रमुख पात्र आहे. चिमणी वाघोबा आला तरी खेळत होती. रानरेडा आपली शिंगे हलवून गेला तरी चिमणी खेळत होती. परंतु भला मोठा दांडगा माणूस आला तर त्याला घाबरून चिमणी पळाली. माणूस स्वतःला त्रास दिला नाही तरी इतरांना त्रास देतो. माणसाजवळ भूतदया व करूणा ही ती गरजेप्रमाणे वापरतो. वरील आशय भूतदया व करूणा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९.वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः होत्याचे नव्हते झाले

मूल्य ः सभ्यता दयाळूपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बालपणी रमणबागेत शिकलेला आशोक ...... फर्ग्युसनमध्ये अभ्यास करणारा अशोक ...... इंजिनिअरींग कॉलेजमध्ये सतत वरची श्रेणी मिळवणारा अशोक नॅशनल टेक्सस्टाईल कार्पोरेशनचा एक कर्तबगार उच्चपदस्थ अधिकारी असलेला अशोक थोरले बंधु श्रीकृष्ण यांना लक्ष्मणासारखी साथ करणारा अशोक ...... नेहमीच विविध ठिकाणी प्रवास करणारा अशोक ...... त्यादिवशी नेहमीप्रमाणे लोकलमध्ये बसताना कुणाला तरी असं वाटलं असेल का ...... की यानंतर ...... या क्षणानंतर अशोक आहे ...... याचं रूपांतर अशोक नाही ...... यामध्ये होणार आहे. होत्याचं नव्हते झाले.

वरील आशय डॉ. न.म. जोशी यांच्या 'होत्याचे नव्हते झाले' या कथेतील आहे. 'अशोक' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. अशोक हे स्थापत्य अभियांत्रिकीनी वाक्‌बगार होते. परंतु बॉबस्फोटच्या प्रचंड हादरांनी मुंबापुरी हादरली आणि या बॉम्बस्फोटांनी अशोक सारख्या प्रामाणिक कष्टाळू व्यक्तीचा दुर्दैवी अंत झाला आणि असा ऑलराऊडर कष्टाळू नातेवाईकांना साथ देणारा अशोक काळाच्या पडदया आड कायमचा निघून गेला. हा आशय 'सभ्यता' व 'दयाळूपणा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१०. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः जैत रे जैत

मूल्य ः कर्तव्यदक्षता, संयम, महत्त्वकांक्षा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

खरं तर आधारासाठी स्मिता पाटील पडू नये म्हणून रानडयांच्या गळयात हातही टाकू शकत होती. चिंधी मरण पावलेली होती ना मग अशीही तडजोड शक्य नव्हती...... श्रीराम रानडे यांनी आपली सर्व प्राणशक्ती एकवटली. त्यांचे दोन्ही हात म्हणजेच जणू त्यांचा सारा देह झाला होता. घरंगळत्या चिंधीच्या मृतदेहाला त्यांनी सारी प्राणशक्ती एकवटून पेलले तरीही व्हायचं तेच झालं......

स्मिता पाटील खाली पडल्या ... मग रिटेक आलाच नंतरच दृश्य इतर कुणाला घेऊन चित्रित झालं. खरं तर राम रानडे यांची जैत झाली नव्हती. त्यांची जी आकांक्षा होती तिची जैत झाली होती आणि काही काळापुरते तरी का होईना स्मिता पाटील यांच्याबरोबर त्यांना कॅमे-यासमोर उभं राहता आलं होतं. त्यांच्या महत्त्वकांक्षेची जैत झाली होती. हार होऊनसुद्धा त्यांच्या दृष्टीनं लाखमोलाची होती.

वरील आशय डॉ. न.म. जोशी यांच्या 'जैत रे जैर' या कथेतील आहे. श्रीराम रानडे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. श्रीराम रानडे यांना 'जैत रे जैत' या चित्रपटात काम करण्याची व स्मिता पाटील या अभिनेत्री समवेत काम करण्याची संधी मिळाली. परंतु त्यातील एक प्रसंगात स्मिता पाटील यांना खाली पडू दयायचे नव्हते . त्यांचा देह रानडे यांना पेलवेना कारण चिंधी पुरेशी वजनदार होती. परंतु स्मिता पाटील पडल्या. पुन्हा रिटेक झाला. परंतु त्यात रानडे नव्हते. त्यांच्या महत्त्वकांक्षेची जित झाली होती. वरील आशय महत्त्वकांक्षा संयम व कर्तव्य दक्षता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

११.वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः साठीतील शूर सेनापती

मूल्य ः प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

फतेखान पुरंदरवरल्या भल्या मोठया सैन्यानिशी चालून आला. स्वतःबाजी पाचशे सैनिकांना घेऊन फतेखानावर तुटून पडले. खानाच्या सैन्याची दाणादाण झाली. पण वेळसर गावाजवळच्या घनघोर चकमकीत बाजींची बलदंड शरीरावर तलवारीचा घाव पडला. बाजी धारातीर्थी पडले. महाराजांचा साठीतील सेनापती वीरमरण येऊन अमर झाला.

वरील आशय डॉ. न.म. जोशी यांच्या ‘साठीतील शूर सेनापती’ या कथेतील आहे. ‘बाजी पासलकर’ हे या कथेतील मुख्य पात्र आहे. मोरे खो-यावर आदिलशहाच्या सरदारांनी चढाया केल्या. फतेखान पुरंदरवर भल्या सैन्यानिशी चालून आला. बाजीने स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता शत्रुवर तुटून पडला. यात बाजीच्या बलदंड शरीरावर तलवारीचा घाव पडून बाजींना वीरमरण आले. महाराजांच्या हाताला हात लावून शेवटपर्यंत बाजींनी महाराजांना साथ दिली. वरील आशय ‘प्रामाणिकपणा’ व ‘कर्तव्यदक्षता’ हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१२.वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः दरीदरीतून नाद गुंजला

मूल्य ः देशप्रेम, श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

मुक्तिनाटय नावाचा एक प्रकार शाहीर कृष्णराव साबळे यांनीच लोकप्रिय केला. 'यमराज्यात एक रात्र' आंधळं दळतयं यासारखी नाटके तुफान गाजली. मग शाहीर साबळे यांनी मोबाइल थिएटरची कल्पना लढवली. गावोगावी प्रयोग केले. पुत्र देवदत्त कन्या चारूशीला नातू केदार शिंदे हे ही कृष्णरावांचा वारसा चालवू लागले. पसरणीचा कृष्णा साबळे रशियाला 'प्राग' मध्ये गेला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यानं महाराष्ट्र पिंजून काढला. मराठी मातीत प्राण फुंकण्याच काम या शाहीरानं केलं आणि शाहिराचे महाराष्ट्रातील म्हणजे मराठी मनाचा मानदंड ठरला. आजही या गीतानं लोकांची मनं प्रफुल्लित होतात आणि द-याखो-यात स्वर उमटतो......

"सहयाद्रीचा सिंह गर्जतो शिवशंभू राज दरीदरीतून नाद गुंजतो महाराष्ट्र माझा."

वरील आशय 'दरीदरीतून नाद गुंजला महाताष्ट्र माझा' या डॉ.न.म.जोशी यांच्या कथेतील आहे. 'कृष्णा साबळे' प्रसिद्ध शाहीर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. त्यांचे देशावरील प्रेम व अभिमान हे त्यांनी त्यांच्या शाहीरी काव्यातून व्यक्त केले व ती शाहीरी लोकप्रिय झाली. हे करण्यासाठी त्यांना खूप कष्ट व हालअपेष्ठा सोसाव्या लागल्या. त्यांचे पोवाडे जगप्रसिद्ध झाले. वरील आशय 'श्रमप्रतिष्ठा' व 'देशप्रेम' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१३.वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः विशाखा मधील वॉल्टअर

मूल्य ः समतोल विचारसरणी

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

"तुम्ही लिहलेला मजकूर मला कदाचित मान्य नसेल पण तो मजकूर लिहिण्याचे तुम्हाला स्वातंज्य आहे आणि ते कुणी हिरावून घेणार असेल तर त्यासाठी मी प्राणपणानं लढेल"

हेच तत्वज्ञान शिरवाडकर यांचेही आहे. चार कन्या जावई नातवंडे देशापरदेशात आहेत. पण 'विशाखा' मधील हा ८० वर्षाचा 'वॉल्टअर' अजूनही लेखन, वाचन चिंतनात मग्न आहे.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'विशाखा मधील वॉल्टअर' या कथेतील आहे. वि.वा.शिरवाडकर हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. आणीबाणीच्या कालखंडात देखिल शिरवाडकरांनी गव्हर्नेर साहेबांना धाडसाने प्रश्न विचारला होता. त्यासाठी त्यांनी 'वॉल्टेअर'चे उदाहरण समर्पक पद्धतीने देऊन गव्हर्नेरला विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा करायला लावला होता. वरील आशय 'समतोल विचारसणी' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१४.वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः मुलांची पाखरबाग

मूल्य ः सौजन्य, प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

या पाखरबागेत धन्यानं पाखरांसाठी अनेक उपक्रम तिथं राबवले. तिथं मुलं हसली, खेळली, बागडली पंख पसरून नाचली आणि तेच मुलांचे विश्व भा.रा.यांच्या लेखणीतून साकार झालं. भा.रा.भागवत नावाची पाखरबाग जन्माला आली त्याला शंभर वर्षे होत आहेत.

वरील आशय डॉ.न.म.जोशी 'मुलांची पाखरबाग या कथेतील आहे. भा.रा.भागवत हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. निवृत्त आयुष्य पुण्यनगरीत काढण्यासाठी त्यांनी सिंहगड रोडवर आनंदनगरमध्ये पाखरबाग सुरू केली. त्यांनी मुलांना खेळायला बागडायला मिळावे म्हणून त्यांनी मुलांचे बालपण टिकून राहण्यासाठी प्रेमाने व जिव्हाळाने हया पाखरबागेची निर्मिती व स्थापना केली. आज त्या पाखरबागेला शंभर वर्षे पूर्ण झाली. वरील आशय 'सौजन्य' व 'प्रेम' ही मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१५ .वाङ्मय प्रकार ः  कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः तळेगावकरांचा खटाटोप

मूल्य ः ज्ञानलालसा, सौजन्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बक्षी, पाळंदे, बलदोटा, अरूण पटवर्धन, सुहास भोळे या समविचारी मित्रांच्या संवादात रममाण होणारे तळेगावकर बालगंधर्व कॅन्टिनमध्ये राया पटवर्धन विजय काळे आणि अण्णा जोशी यांच्या मेळाव्यात एखादं जुनं पुस्तक उलगडून दाखवतात. पण त्याचवेळी त्यांच्या मनाला हुरहुर लागलेली असते की शि.प्र.मंडळींच्या दत्ता वामन पोतदार ग्रंथसंग्रहाचं काम आजून म्हणावं तसं मार्गी लागलेलं नाही तिथली धूळ हातांवर झेलत अजूनही ते तिथं उत्साहानं काम करतात.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'तळेगावकारांचा खटाटोप' या कथेतील आहे. 'अरूण तळेगावकर' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. तळेगावकर खटाटोप करून पुस्तके खरेदी करायचे जपायचे वागवायचे लोकांना वाचायला दयायचे आणि ती परत मिळवायचे जिज्ञासू वाचकांना त्यांची ज्ञानाची भूक भागविण्यासाठी सौजन्यपूर्वक हे काम नित्याने करत असत आणि ते हे काम उत्साहानं करत. वरील आशय 'सौजन्य' व 'ज्ञानलालसा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१६ .वाङ्मय प्रकार ः  कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः नर्मदेश्वरामध्ये न्यायाधीश

मूल्य ः वस्तुनिष्ठता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पलीकडं गाडीतील वायरलेसवर कौन्सिल हॉल मधून मेसेज आला होता. दिल्लीहून चंद्रचूडशी महत्तवाच्या व्यक्तींना बोलायचं होते. मग चालकानं धावपळ केली. तो शेजारच्या पेरूगटच्या पोलीस चंद्रचूडांना शोधण्यासाठी मोकाशींच्या दुकानात गेला. तिथल्या माणसानं नर्म देश्वरकडं बोट दाखवलं ......

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'नर्मदेश्वरमध्ये न्यायाधीश' या कथेतील आहे. 'यशवंतराव चंद्रचूड' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. भारताचे सरन्यायाधीश होणारे सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश चंद्रचूड ही त्रिमुर्ती नर्मदेश्वर भुवनवनध्ये अमृत तुल्याचा आस्वाद घेत. स्वतःच्या बालपणीच्या सवंगडयाबरोबर मित्रांबरोबर साध्या साध्या गोष्टींचा आनंद घेत न्यायाधीश पदाचा त्यांना कुठलाही अभिमान नाही. ही वस्तुनिष्ठता आहे . वरील आशय 'वस्तुनिष्ठता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१७.वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः नांगर चरक आणि झाड

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा, सहकार्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

रयत शिक्षण संस्थेचे मानचित्र झाड हेच आहे. महाराष्ट्रातील कृषीक्रांतीला वेग देणा-या लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचा नांगर लोकप्रिय करणारे भाऊराव पाटील यांनी नंतर महाराष्ट्रात विदयेची क्रांती घडवून आणली आणि ...... एक उदयोगमहर्षी आणि एक कर्मवीर.

नांगर आणि झाड... महाराष्ट्राच्या क्रांतीची दोन प्रतिके

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'नांगर आणि झाड' या कथेतील आहे. भाऊराव पाटील हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. भाऊरावांनी शिक्षणाची बंद कवाडे सर्वांना खुली केली. 'कमवा व शिका' ही योजना त्यांनी सुरू केली. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राला वेग

देणा-या भाऊराव पाटलांनी महाराष्ट्रात सहकार्याने व श्रमाने क्रांती घडवून आणली. महाराष्ट्रात नांगर आणि झाड ही दोन प्रतिक क्रांतीची प्रेरक ठरली. वरील आशय श्रमप्रतिष्ठा व सहकार्य ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१८.वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः लोकमान्यांचा वारसदार

मूल्य ः सौजन्य, प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

त्या गृहस्थांकडे चार दिवसांनी एक पार्सल आलं. त्यात दोन ताटांसह वाटया दोन पेले अशी सुंदर चांदीची भांडी होती ...... तेव्हा त्या गृहस्थांना समजलं की आपल्याकडे शेठ वालचंद जेवून गेले आहेत. 'लोकमान्यांचा स्वातंत्र्याचा वारसा आर्थिक क्षेत्रात चालवणारे उदयोगपती असा वालचंदजींचा त्यावेळी गौरव करण्यात आला.'

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'लोकमान्यांचा वारसदार' या कथेतील आहे. 'वालचंद' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. एकदा एका खेडयात एका गृहस्थाश्रमी व्यक्तीकडे त्यांची जेवणाची सोय केली. त्याच सौजन्याच्या प्रेमापोटी त्यांनी त्या गृहस्थांची चौकशी केली. उदयोगपती वालचंद शेठ यांनी त्यांना चांदीच्या भांडयांचे पार्सल भेट दिले. वरील आशय 'सौजन्य' व 'प्रेम' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१९.वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः धन्य हा निधडा वैष्णव वीर सारंगधर आणिला

मूल्य ः श्रद्धा, प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

मग भानुदास विजयनगरात आले. देवालयातील कडी कुलुपात पांडुरंगाला पाहून त्यांचं मन व्यथित झालं. त्यांनी पाडुरंगाष्टक म्हणण्यास सुरूवात केली आणि पांडुरंगानं भानुदासांना साक्षात्कार घडविला. भानुदासांसाठी पांडुरंगानं स्वतः लघुरूप घेतलं आणि भानुदास शेकडो भक्तांच्या मांदियाळीत विठ्ठलमूर्ती घेऊन पंढरीस आले. पंढरीचे लाखो वारकरी नाचू लागले आणि म्हणाले ......

"धन्य हा निधडा वैष्णव वीर सारंगधर आणिला"

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'धन्य हा निधडा वैष्णव वीर सारंगधर आणिला' या कथेतील आहे . भानुदासांनी अज्ञानी लोकांसाठी परमार्थाचं निरूपण केले. कुलुपात पांडुरंगाना पाहून भानुदासांचं मन व्यथित झाले. त्यांनी पांडुरंगाष्टक म्हणण्यास सुरूवात केली आणि पाडुरंगानं लघुरूप धारण केले. असेही संत भानुदास सदैव विठ्ठल नामस्मरणात भक्तीत तल्लीन असतं. वरील आशय भक्तप्रेम म्हणजेच श्रद्धा व प्रेम ही मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२०.वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः सांगली ते सानव्हितो व्हाया कोथरूड

मूल्य ः प्रेम, आपुलकी, देशप्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

वर्षातून पाच ते सात वेळा युरोपची वारी करणारा हा इंटरनॅशनल पांडुरंग आपली नातवंडे रोहित, वेदांग, अथर्व, आदित्य, गौरी यांच्या मेळाव्यात रमलेला असतो. मानसी आणि सविता या सुना त्यांच्या लेकिच. जामात श्रीपाद तारे पुत्रवत जेनीफर पॅटन ही डॉ.कुलकर्णी यांची रूग्ण त्यांना देवच मानते. जगभर हवेतून फिरणा-या या पांडुरंगाची नजर मात्र आपल्या मातृभूमीवर आहे.

वरील आशय डॉ.न.म.जोशी 'सांगली ते सानव्हितो व्हाया कोथरूड' या कथेतील आहे. पांडुरंग हरी कुलकर्णी हे या कथेतील प्रमुख प्रात्र आहे. पुण्याचे हे आयुर्वेदाचर्य होते. रूग्णांची नाडी परीक्षा करता करता समाजाचीही नाडी परीक्षा करण्याचा छंद जडला आणि समाजसेवेच्या माध्यमातून प्रेम आपुलकीने समाजातील अनेक तळागाळातील लोकांना निरनिरळी आयुर्वेदिक औषधे देऊन त्यांचे आजार रोग बरे करता जगभरातून फिरणा-या या पांडुरंगाची नजर मात्र आपल्या मातृभूमीवर होती. वरील आशय 'प्रेम' 'आपुलकी' व 'देशप्रेम' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२१.वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः बोकीलांच्या शाळेत शन्ना

मूल्य ः ज्ञानलालसा, अवधानक्षमता, नियमितपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बोकील मास्तरांनी शन्ना नांवाच्या शिष्याला हा धडाच दिला. मग शन्ना यांनी बोकील मास्तरांचा तीस कथांचा लेखन कोर्स पूर्ण केला आणि त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यातील तीन कथा निवडून मासिकाकडं पाठविल्या. कथा छापून आल्या. लेखक म्हणून शं.ना.नवरे हे नाव शन्नांनी पाहिलं तेव्हा उरी आनंद दाटून आला आणि बोकील मास्तरांच्या कथा शाळेत शिकण्याचं सार्थक वाटलं.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'बोकीलांच्या शाळेत शन्ना' या कथेतील आहे. 'श.ना.नवरे' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. 'बोकील' हे जगातील नामवंत लेखक होते. त्यांची भाषा साधी सोपी व नैसर्गिक असे. कथा लिहिण्याच्या लालसेपोटी बोकीलांकडून कथा लिहिण्याचे धडे त्यांनी घेतले. त्यांनी पंचवीस तीस कथा लिहिल्या आणि नंतर त्यातील तीन चांगल्या कथा निवडून मासिकाकडं पाठविल्या. त्या छापून आल्या. तेव्हा त्यांचा आनंद गगनातमावेना बोकीलांकडून घेतलेल्या मार्गदर्शनाचे सार्थक झाल्याचे समाधान मिळाले. असे हे प्रसिद्ध लेखक श.ना.नवरे.

वरील आशय ज्ञानलालसा, अवधान क्षमता, नियमितपणा ही मुल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२२.वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः ये लम्हा फिलहाल जी लेने दे

मूल्य ः निर्भयता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

'ये लम्हा फिलहाल जी लेने दे' हे तिचं अत्यंत आवडतं गाण. या गाण्यात अश्विनी सांगितल्याप्रमाणे स्वतःच ते गाणं जगली. कधीही उदयाची वाट न पाहणा-या अश्विनीनं आप आपल्या मुठीत ठेवून उदयावर हसत खेळत स्वार होण्याची तयारी ठेवलेली होती.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'ये लम्हा फिलहाल जी लेने दे' या कथेतील आहे. 'अश्विनी' ही एक चिमुरडी मुलगी या कथेतील प्रमुख पात्र आहे. गोड गाणं गाणारी, रिलीफ सेंटरला भेट देणारी, गाडीवर लिफ्ट देणारी, इतरांना प्रेरणा देणारी अशी ही अश्विनी तरूण वयातच 'नेत्रदान' आणि 'देहदान' करण्याची इच्छा बोलून दाखवणारी अश्विनी सर्व वाहनं सफाईदारपणे आत्मविश्वासानं चालवायची. अशी ही निर्भयपणे जीवन जगणारी अश्विनी अपघातात मृत्यू पावते. वरील आशय 'निर्भयता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२३.वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः अक्षरांच आकित

मूल्य ः प्रामाणिकपणा, श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

त्यांच्या कथा म्हणजे आईच्या हृदयावर हुकार असतो. त्यांच्या कथा म्हणजे मसूरच्या मातीचा मृदगंध असतो. 'गुंजेचा पाला' आणि 'आफिका' हे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले. त्यांच्या आवृत्या निघाल्या. पोतभर पुरस्कार मिळाले. शरदचंद्र मुक्ती पुरस्कार सातारा जिल्हा साहित्य रत्न पुरस्कार हे त्यातले काही पुरस्कार. 'आफिका' मधल्या काही कथांचं हिंदीत भाषांतर झालं. अनेक कार्यशाळांमधून 'आफिका' कथांचं वाचन झालं निवृत्त झालेले पोतदार अजूनही लेखणी सरसावून आहेत. या त्यांच्या यशाचं गुपित कशात आहे तर ते त्यांच्या सुंदर हस्ताक्षरात. कारण त्या सुंदर हस्ताक्षरांनच पुढील जीवनाच्या वाटा उलगडून दिल्या. अक्षरानं घडवलं आकित.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'अक्षरांचं आकित' या कथेतील आहे. 'बबन पोतदार' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. मसूरच्या सभेत यशवंतराव चव्हाणांसमोर एका छोटया मुलाने उत्स्फूर्तपणे भाषण केले. पुस्तके घेऊन स्वतः सुंदर अक्षरात धडे लिहून काढून

अभ्यास करणे हस्तलिखित तयार करणे. सर्व फलकांवर सर्व सूचना बातम्या निवेदने लिहून फी माफ केली. ते खूप हालअपेष्टा सहन करून, कष्ट करून आयकर अधिकारपदावर विराजमान झाले. अनेक साहित्य कथांचे लेखन केलं हे सगळं घडलं सुंदर हस्ताक्षर प्रामाणिकपणा व श्रमामुळे. वरील आशय 'प्रामाणिकपणा' व 'श्रमप्रतिष्ठा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२४. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः आनंदबनातील निर्मल गोपाळ

मूल्य ः समतोल विचारसरणी, सहकार्य

कथानामक ः डॉ. न. म. जोशी

माधुरी बेन यांच्या अश्या असण्यामुळं किराणे पती पत्नींना आपण खरोखरीच आनंद बनात आहोत असं वाटलं मग आनंदबन प्रकाशनाची दमदार वाटचाल सुरू झाली. किराणे दाम्पत्याने मुलांच्या वाचनाच्या आनंदबनात उत्तम विहार करता यावा म्हणून पुस्तकांच्या किंमती अत्यल्प ठेवल्या होत्या...१९६६ मध्ये प्रकाशित झालेल्या लालबहादूर शास्त्री या पुस्तकाची किंमत तर त्यांनी एक रूपया ठेवली होती.

आनंदबन प्रकाशनाच्या या धोरणामुळे अगदी गरीब मुलांनाही स्वतः पुस्तक घेऊन वाचण्याचा आनंद मिळाला. आनंदबनातील निर्मल गोपाळ यांचे जीवन कृतार्थ झालं. गोपाळराव गेले. निर्मलाताई आता पुण्यात धन्यतेचे जीवन अनुभवत आहेत.

वरील आशय डॉ. न. म. जोशी यांच्या 'आनंदबनातील निर्मल गोपाळ' या कथेतील आहे. निर्मल गोपाळ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. म. न. पा. च्या शिक्षणाधिकारी माधुरी बेन यांच्या आश्वासानं किराणे पती पत्नींची पुस्तके अत्यल्प दरात असल्यामुळे खपत परंतु हया पुस्तकांची किंमती अत्यल्प ठेवण्यापाठीमागे किराणे पती पत्नींचा हेतू हा होता की आनंदबनच्या

प्रकाशन पुस्तके अगदी गरीब मुलांनाही वाचता यावीत व मुलांनाही स्वतः पुस्तक विकत घेऊन वाचण्याचा आनंद मिळावा हा होता. त्यामुळे निर्मल गोपाळ यांचे जीवन कृतार्थ झाले.

२५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः संरक्षणमंञ्याची स्वप्नपूर्ती

मूल्य ः वैचारिक व्यासंग, ज्ञानलालसा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

क-हाडच्या टिळक हायस्कूलध्ये असताना एक आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्यासाठी मी नूतनमराठी विदयालय या शाळेत आलो होतो. नू.म.वि. चा केवढा मोठा दबदबा होता. या भव्य व प्रशस्त विदयामंदिरात मला शिकायला मिळालं असतं तर ... असा विचार माझ्या मनात तेव्हापासून येत असे आणि मग वाटलं केव्हा ना केव्हा या संस्थेचा या वास्तूचा या विदयमंदिराचा पवित्र स्पर्श आपल्याला व्हायला हवा. हे माझं स्वप्न होतं. त्या स्वप्नाची पूर्ती आज स्नेह संमेलनाचा अध्यक्ष या नात्यानं झाली. मी स्वतःला धन्य समजतो. यशवंत रावजींच्या या उद्गारामुळे सारा सभा मंडप रोमांचित झाला होता.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘संरक्षणमंञ्याची स्वप्नपूर्ती या कथेतील आहे. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण या कथेतील प्रमुख पात्र आहेत. यशवंतरावांचे स्वप्न होते की नू.म.वि. सारख्या प्रशस्त विदयामंदिरात शिक्षण घ्यावयास मिळावे या संस्थेचा, या वास्तूचा, या विदयामंदिराचा पवित्र स्पर्श व्हावा. त्या स्वप्नाची पूर्ती स्नेहसंमेलनाचा अध्यक्ष या नात्यानं झाली. मी स्वतःला धन्य समजतो. असे यशवंतराव चव्हाण म्हणाले.

वरील आशय ‘वैचारिक व्यासंग’ व ‘ज्ञानलालसा’ हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२६ . वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः आणि त्याला घर मिळालं

मूल्य ः सहकार्य, सौजन्य

कथानामक ः डॉ . न . म . जोशी

सरांचा तो प्रश्न म्हणजे आधीच उत्तर मिळालेला प्रश्न होता . ते आश्वासन होतं . तो प्रश्न म्हणजे प्रचंड दिलासा होता . त्या प्रश्नात जीवन व्यवहाराचे अनेक कुंभ एकवटले होते . त्या तीन शब्दांनी अनेक समस्या सोडविल्या होत्या . पुढं तीन वर्ष तो दिलीप गोगटे यांच्या घरचाच एक सदस्य म्हणून राहिला... गुरू शिष्य एवढंच एक निशब्द नातं होतं . त्या तीन शब्दांनी आणि त्यापुढील प्रश्नचिन्हानं त्याला घर मिळवून दिलं होतं . घरटयातल्या पाखराला पंख फडफडण्यासाठी खुलं आभाळ मिळावं तसं झालं . त्याला घर मिळालं घर मिळालेला हा दिलीप गोगटेसरांचा विदयार्थी पुढे एका वृत्तपत्राचा संपादक झाला .

वरील आशय डॉ . न . म . जोशी यांच्या ......आणि त्याला घर मिळालं या कथेतील आहे . 'दिलीप गोगटे' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे . गोगटे सरांना भविष्यात कुठे जावे, काय करावे, कुठे रहावे सुचत नव्हते . त्यापुढे मोठा प्रश्न होता . परंतु गोगटे सरांच्या प्रश्नांनी मोठा दिलासा दिला आणि जीवन व्यवहारांचे अनेक कुंभ उलगडले आणि त्या तीन शब्दांनी अनेक समस्या सोडविल्या पुढे तीन वर्षे गोगटे सर त्यांच्या कुटुंबातील एक सदस्य म्हणून राहिले . त्यांना घर मिळाले होते . हा विदयार्थी पुढे मोठा संपादक झाला .

वरील आशय 'सौजन्य सहकार्य' व 'समतोल विचारसरणी' ही मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे .

२७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः सहा टिबांची किमया

मूल्य ः ज्ञानलालसा, श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

१९५२ साली त्यांची कबर उकरून त्यांचे हात पॅंथियॉन या महान व्यक्तीच्या कबरीजवळ नव्या कबरीत ठेवण्यात आले. फ्रान्समधील त्यांच्या घराचे संग्रहालय करून लोकांनी त्यांची स्मृती चिरंतर ठेवली. कुप्रे येथे लुईचा पुतळाही आहे. आता जगभरातील अंध व्यक्ती शिकतात. ते लुई ब्रेल यांच्या लीपीच्या आधारे सहा टिबांच्या या लीपीनं अंधांच्या जीवनात प्रकाश आणला आहे.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'सहा टिबांची किमया' या कथेतील आहे. 'लुई ब्रेल' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. 'लुई ब्रेल' यांनी अंधव्यक्तींना वाचता यावे त्यांची शिक्षणाची इच्छा पूर्ण व्हावी यादृष्टीने चौदा टिबांची गुप्त लिपी ऐवजी १९२९ मध्ये लुई ब्रेल यांनी सहा टिबांच्या लिपीत रूपांतर केले आणि त्यांची इच्छा होती की सहा टिबांच्या लिपीनं अंधांना शिक्षण दयावे. यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले.

वरील आशय 'ज्ञानलालसा' व 'श्रमप्रतिष्ठा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२८. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः सर्वांभूती नारायण

मूल्य ः संवेदनशीलता, अवधानक्षमता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

“गुरूवर्य आपणच सांगितलं होतं ना की सर्वाभूती परमेश्वर आहे. ती आज्ञा प्रमाण मानली हत्तीच्या ठायीही परमेश्वर आहे नारायण आहे. असं मानून मी त्याच्यासमोर हात जोडून उभा राहिलो” “अरे वेडया हत्तीच्या ठायी नारायण आहे हे असं खरं तसेच त्या माहुताच्या ठायीही नारायण आहेच ना. त्यामाहुत नारायणाची आज्ञा तू मोडलीस. त्याचं ऐकलं नाहीस. तो पळापळा म्हणत होताच. त्या माहुत नारायणाचं ऐकल असतं तर हा प्रसंग तुझ्यावर ओढवला नसता.सर्वाभूती नारायण याचा अर्थ असा समजून घ्यायचा असतो.”

वरील आशय न.म.जोशी यांच्या ‘सर्वाभूती नारायण’ या कथेतील आहे. ‘एक शिष्य’ हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. शिष्याने प्रवचनातील ‘सर्वाभूती परमेश्वर’ हे वाकय लक्षात ठेवले.परंतु त्याप्रमाणे आचरण व त्यातील गांभीर्य लक्षात न घेता संकटाला समोरे गेल्यामुळे हत्तीने त्याला उडवले. गुरू त्याला उपदेश करतात की माहुत नारायणाची आज्ञा तू मोडलीस. त्याचं ऐकल नाही. त्यामुळे तुझ्यावर हा प्रसंग ओढवला ‘सर्वाभूती परमेश्वर नारायण याचा अर्थ समजून घ्यायचा असतो. तो समजून घेतला नाही.’

वरील आशय ‘संवेदनशीलता’ व ‘अवधान क्षमता’ हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२९. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः ‘मी’ ची वेलांटी

मूल्य ः समाधान, समाजसेवा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पण वानप्रस्थाची हाक एवढी टिपेची होती की बाकीचे सारे कर्जात उतरून हवेत विरून गेले. साठये यांनी मग मागं वळून पाहिलं नाही. ते दापोलीचे ‘श्रीसुशील’ निवासी झाले.नव्या जगाचे रहिवासी झाले आणि आनंदाचा ठेवा यांच्या ओंजळीत. ठिबकू लागला.

'मी' ची वेलांटी हे त्यांचं बोलकं आत्मचरित्र त्यावर विंदा यांच्या ओळी आहेत." 'मी' च्या वेलांटीचा सुटो सुटो फास वेढा क्षितिजास नको त्याचा."

वरील आशय न.म.जोशी यांच्या 'मी' ची वेलांटी या कथेतील आहे. 'प्रकाश साठये' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. प्रदुषणमुक्त हवामान आणि सुशिक्षितांच प्रमाणही अधिक. या दापोलीत स्वतःच घर नव्हत. मग आंबराईतली जागा घेऊन स्वतःच 'श्रीसुशील' ही वास्तू बांधली. साठये यांनी अपार कष्ट केले. प्रसिद्ध कवी विंदा करंदीकर लेखक विश्राम बेडकर यांनी सर्वानी मिळून सांस्कृतिक व समाजकार्यात स्वतःला ओढून घेतले. सर्व पुणे म्हणजे गणगोत व त्यांचा परिवार होता. त्यानंतर त्यांनी 'मी' ची वेलांटी हे बोलक आत्मचरित्र लिहिले. ते पाहून त्यांना समाधान वाटले.

वरील आशय 'समाधान', 'समाजसेवा' ही मूल्ये रूजवण्यासाठी उपयुक्त आहे.

३०. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : नकोशी झाली हवीशी

मूल्य : कर्तव्य दक्षता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

एकाच बहरलेल्या झाडाला टवटवीत सुगंधी फुलं यावीत तशी नात्यांची फुलं तिच्या जीवनवृक्षाला आली. मधुची सहचारी मालती, कुमुदिनीची जाऊ मालती, कृष्णकन्या मालती, दिगंबराची बहिण मालती, आबासाहेब अत्रे यांची आवडती शिक्षिका मालती, सुरेखा करमकर विमल कुलकर्णी निलिमा नगरकर प्रभा रत्नपारखी यांची मैत्रीण मालती, अमेरिकेतील मीरा फाटकची आत्याही मालती.

क्रिडांगणावरील चपळ मालती थोरात, पटवर्धन, पावसकर, आगाशे, काटदरे या सर्व कुटुंबाच्या गोकुळाची उत्साही गवळण मालती. अशी अनेकविध रूपे असलेली मालती थोरात हिने मग लेखणी उचलली. आयुष्याचा सारीपाट आता शब्दबद्ध करायचा असं तिनं ठरवलं. पंचाहत्तरी आली हा अमृतयोग तर मुला नातवंडांनी, पतवंडांनी साजरा केलाच पण मालतीने 'मधुमालती' नावाचा शब्दांचा नजराणा सर्वाना आपल्या अमृतमहोत्सवानिमित्त भेट दिला आणि नको असलेल्या मुलीचा हवाहवासा जीवनप्रवास सर्वांच्या समोर आला.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'नकोशी झाली हवेशी' या कथेतील आहे. मालती ही या कथेतील प्रमुख पात्र आहे. मालती ही जन्मतः कोणालाच नको होती. परंतु तिच्या चांगल्या गुणांनी ती सर्वांची आवडती झाली. तिने अपरंपार कष्ट करून जीवनातील सर्व कर्तव्य व्यवस्थित पार पाडली आणि जीवनातील सर्व चांगले वाईट अनुभव 'मधुमालती' या नावाच्या पुस्तकांनी आयुष्याचा सारीपाट शब्दबद्ध केला आणि नको असलेल्या मुलीचा जीवनप्रवास सगळयांना हवाहवासा वाटला.

वरील आशय 'कर्तव्यदक्षता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः राख श्रीमंताची आणि गरिबाची

मूल्य ः सर्वधर्मसमभाव, समता, धर्मनिरपेक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

"ठेवा ती दोन्ही पात्रं आता मला सांग पहिल्या पात्रातील राख त्या धनाढय गर्भ श्रीमंताची आहे. दुस-या पात्रातील राख निर्धनाची आहे. ही दोन्ही पात्रे निरखून बघ. या राखेत कोणत फरक आहे?" राखेत कोणताच फरक नाही. स्वामीजी साधक म्हणाला "हे बघ हाच

माझा तुझ्यासाठी जीवनभराचा आदेश. उच्च-नीच, काळा-गोरा, स्त्री-पुरूष, श्रीमंत-गरीब सर्वांची राख एकच. हे तत्व जाण."

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'राख' श्रीमंतीची आणि गरीबाची या कथेतील आहे. या कथेत 'स्वामीजी' व 'साधक' ही दोन प्रमुख पात्र आहे. स्वामीजींनी प्रत्यक्ष अनुभवातून साधा, सोपा जीवनव्यवहार कसा असतो हे सांगितले. ते सांगण्याचा अर्थ असा की कोणीही उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असला तरी मेल्यानंतर सर्वांचीच राख सारखी असते त्यात कोणताही फरक नसतो. परंतु जीवनव्यवहारात माणूस या धर्मजालात अडकल्यामुळे जातीभेद करतो व दुःखाला आमंत्रण देतो. त्यामुळे स्वामीजींनी उपदेश केला की धर्मनिरपेक्ष, जाती, वंश, पंथ, धर्म या सांस्कृतिक वारसाला धुडकावून लावून 'सर्वधर्मसमभाव' या नात्याने सर्वांनी जीवन जगले तर सर्वांचे जीवन आनंदी होईल.

वरील आशय 'सर्वधर्मसमभाव', धर्मनिपेक्षता', 'समता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३२. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः गंजण्या पेक्षा झिजणे बरे

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा, कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

वयाच्या ८५ व्या वर्षीही प्रयागअक्का अजून पहाटे उठतात. तासभर व्यायाम करतात. घरात सर्वप्रकारे वैभव आणि समृध्दी असूनही त्यांची कष्टाची कामं पहाटेच्या भूपाळीबरोबर सुरू होतात आणि रात्रीला भैरवीलाच त्या धरणीला पाठ टेकतात. असे अविरत कष्ट करणा-या आणि भावाच्या शैक्षणिक कार्याला विश्वशांती केंद्राला आपला सबळ आशीर्वाद

देणा-या प्रयाग अक्कांना कुणी कष्टाबद्दल विचारलं तर त्या अंमळ हसून मोजक्या शब्दात 'मंजुळवाणीनं' उत्तर देतात ... 'गंजण्यापेक्षा झिजलेलं बरं.'

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'गंजण्यापेक्षा झिजणं बरं' या कथेतील आहे. प्रयाग अक्का हया या कथेतील प्रमुख पात्र आहे. अक्कांनी आपल्या भावंडांसाठी स्वतःच्या संसाराचा त्याग करून संन्यासी होऊन शांतपणं आपल्या सर्व विकारांवर मात करून वडीलांच्य खांदयाला खांदा लावून धाडसानं काम केलं. आपल्या घराच्या अंगणाची शिंपण करण्यावरोवर अपार कष्ट करून इतर अनेकांच्या जीवनात सुखाचे शिपण केले.

वरील आशय 'श्रमप्रतिष्ठा' व 'कर्तव्यदक्षता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३३. वाड्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : 'रूग्ण माझे ग्राहक'

मूल्य : श्रमप्रतिष्ठा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

कांतीलालला खूप शिकायचं होतं. पण कष्टाला पर्याय नव्हता.बारावी झालेला कांतीलाल पुढं मेडिकलला गेला. पण घरकाम व व्यवसायाचा भाग सांभाळावाच लागत होता.पहाटे चारला उठायचं. सकाळपर्यत हॉटेलात काम करायचं अगदी मालाच्या पुडया बांधण्यापासून तो वजन काटयावर मालाचे योग्य वजन करेपर्यंत सर्व कामं कांतीलालनं केली. श्रमाचं फळ मिळालं कांतीलालला एम.बी.बी.एस. झाला.

वरील आशय न.म.जोशी यांच्या "रूग्ण माझे ग्राहक" या कथेतील आहे. 'कांतीलाल' हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. कांतीलाल यांनी शिक्षण घेण्यासाठी खूप कष्ट घेतले. हॉटेलात काम करण्यापासून ते दुकानात पुडया बांधेपर्यंत कोणत्याही कामाची लाज न

बाळगता खूप कष्ट करून शिक्षण घेतले व पुढे एक ख्यातनाम डॉक्टर झाले. त्यांना त्यांच्या श्रमाच फळ मिळाले.

वरील आशय 'श्रमप्रतिष्ठा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३४. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः 'परमानंद माधवम्'

मूल्य ः करूणा, भूतदया, समाजसेवा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

तत्कालीन राष्टपती डॉ. राधाकृष्णन यांनी कात्रे यांचा गौरव करणारे एक प्रशस्तिपत्रक पाठवलं आणि सोबत एक हजार रूपयांची वैयक्तिक देणगीही पाठविली. दिवस पालटले. कात्रेजींच्या भारतीय कृषनिवारक संघाला देशाच्या सर्वोच्च व्यक्तीची प्रशंसा प्राप्त झाली होती. 'परमानंद माधवम्' हा मंत्र सफल झाला होता. आश्रमाचा पसारा वाढला. धरमतरी या गावी श्रमदानातून माधव सागर तलाव बांधण्यात आला. असा हा 'परमानंद माधवम्' मंत्राचा चमत्कार

वरील आशय न.म.जोशी यांच्या 'परमांनद माधवम्' या कथेतील आहे. 'कात्रे सदाशिवराव' हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. कात्रेजींचा कुष्ठरोग बरा झाला आणि त्यानी कुष्ठ रोगांच्या सेवेचा संकल्प केला. त्यासाठी त्यांनी त्यांचे गुरूजी कै. माधवराव गोळवलकर यांच्या 'परमानंद माधवम्' या जपाचा सहाय्यतेला मनात जिद्द निर्माण करून आश्रम उभारला. उदारमनस्क लोकांनी आश्रमातील त्रुटी दूर केल्या. इमारती शेती गोशाळा तयार केली. कुष्ठनिवारक संघाला देशाच्या सर्वोच्च व्यक्तीची देणगी प्राप्त झाली. त्यांचा हा मंत्र सफल झाला.

वरील आशय करूणा, भूतदया, समाजसेवा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः 'आणखी एक बागवान'

मूल्य ः वस्तुनिष्ठता, नितीमता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

ससून मधल्या जळक्या वार्डात काम करताना आपल्या आईला किती यातना होत असतील याची मुलांना पुरेपुर कल्पना होती. यथावकाश मुलांची लग्न झाली. शरद, क्षमा कृतार्थानं जीवन जगत आहेत. अठ्ठावीस वर्ष दीपवती होऊन आईनं अंधारातून प्रकाशवाट निर्माण केली. याची मुलांना जाणीव आहे. मग त्यांनी ठरवले. आपल्यापुरता आपण वेगळा बागबान साजरा करायचा.

वरील आशय न.म.जोशी यांच्या 'आणखी एक बागवान' या कथेतील आहे. 'शरदराव व क्षमा' हे दोघे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. जीवघेण्या लढाईत देखील आपल्या पिलांना कुठं जखमा होऊ नयेत किंवा त्यांच्या चोची कधी रिकाम्या राहू नयेत म्हणून शरद व क्षमा यांनी कसरतीची व श्रमाची पराकाष्ठा केली आणि त्याची जाणीव म्हणून त्यांच्या मुलांनी आईच्या मैत्रिणी, वडिलांचा मित्रपरिवार, नातेवाईक यांनी बागवान साजरा केला.

वरील आशय वस्तुनिष्ठता व नितिमत्ता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३६. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः 'प्रतिभाक्षर'

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा, संयम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

संसाराच्या काटेरी वाटेवर हिरवळ उगवली आणि आता दोघांनी मुला नातवंडासह, सुखानं वाटचाल करायची या दिवसात प्रतिभाताई कालवश झाल्या आणि विनायकरावांचा सुखाचा कलश थोडासा कलला. पण गीताभ्यासी डॉ.विनायकराव स्थितप्रज्ञ आहेत. कारण 'वारांसि जीर्णींनी यथा विहाय' या गीता श्लोकाचा अन्वयार्थ त्यांनी पचविला आहे.

वरील आशय न.म.जोशी यांच्या 'प्रतिभाक्षर' या कथेतील आहे. 'विनायकराव व प्रतिभाताई' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. संसारांच्या सारीपाटावर दुःखालाही सुखाचा उखाण घालून संसाराची सुरूवात केली. आणि ओढग्रस्त संसारात अनेक श्रम करून संसाराची काटेरी वाट हिरवळ वेलींनी बहरून टाकली आणि त्याच सुखाचा उपभोग घेण्यासाठी प्रतिभाताई राहिल्या नाहीत.

वरील आशय 'श्रमप्रतिष्ठा' व 'संयम' ही मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहेत.

३७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः रिक्षा परीक्षा आणि शिक्षा

मूल्य ः प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

नाना कुणाचा पालक, कुणाचा सखा, कुणाचा शिक्षक आणि कुणाचा खास मित्र तर कुणाचा खमंग शत्रू होता. नू.म.वि.च्या शिक्षक आराम शाळेत मधल्या सुट्टीतील वादचर्चेमध्ये टिकेचा आवाज नानाचा असायचा. कोधाचा वडवानळ असणारा नाना कधी कधी डोळयांतून झरा पाझरणारा हळवाही व्हायचा हाताचा पंजा उंचावून विदयार्थ्यांच्या डोक्यावर झिणझिण आणणारी टप्पल मारणे ही नानाची शिक्षा. नाना नू.म.वि.चा परीक्षा प्रमुख होता. आठ शब्दांची ओळ असणा-या हजार ओळी लिहून आणा अशी शिक्षा विदयार्थ्यांना देणारा परीक्षाप्रमुख असलेला हा रिक्षा ड्रायव्हर म्हणजे एक शापीत यक्ष होता असे त्यांचे घट्ट मित्र रा.चिं.ढेरे म्हणतात.

वरील आशय न.म.जोशी यांच्या 'रिक्षा, परीक्षा, शिक्षा' या कथेतील आहे. 'जोशी' सरांचा मुलगा नाना या कथेतील प्रमुख पात्र आहे. तो मध्यमवर्गीय असून त्याच्या जीवनात तो दोन्ही भूमिका बजावत होता. नाना प्रत्येकाला मदत करतो. तो नू.म.वि चा परीक्षा प्रमुख होता रीक्षा ड्रायव्हर होता व शिस्त न पाळणा-या मुलांचा शिक्षा प्रमुख होता.

वरील आशय 'प्रामाणिकपणा' व 'कर्तव्यदक्षता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३८. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः 'आम्ही वारिक वारिक करू हजामत बारीक'

मूल्य ः श्रद्धा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

थोडयाच वेळात सेना पुन्हा परत आला. राजाला आश्चर्य वाटलं. यावेळी सेनाचा चेहरा उतरला होता. राजानं विचारलं 'काय झालं सेना' "महाराज संत मंडळींशी संवाद करताना मला भान राहिलं नाही. चला आता कामाला लागतो. बसा मी अंगाला तेल लावून देतो." "अरे आत्ताच तर येऊन गेलास ना मी तुझ्या धोकटीत मोहोरा टाकल्या." "महाराज मी आलो होतो" सेना चमकला सेनासाठी स्वतः पांडुरंग सेनारूप घेऊन आला. मग सेना गाऊ लागला.

'आम्ही वारिक वारिक करू हजामत बारिक'

वरील आशय न.म.जोशी यांच्या 'आम्ही वारिक वारिक करू हजामत बारीक' या कथेतील आहे. 'संत सेना महाराज' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. सेना महाराज विठ्ठलाचे परमभक्त सतत विठ्ठल नामात मग्न असतं. राजा वीरसिंहाच्या सेवेत जाण्यास सेना महाराजांना

उशिर झाला सेना पारमार्थिक संवादात रममाण होता. त्याच्या भक्तीमुळेच स्वतः विठ्ठलाने सेनाचे रूप घेऊन राजाची सेवा केली. केवळ सेना महाराजाच्या भक्ती व श्रदधेपोटीच.

वरील आशय 'श्रदधा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३९. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः बै-यागाचा आशीर्वाद

मूल्य ः नितिमत्ता, वैचारिकता, व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

रामजी तडक नदीवर गेले. सारेच बैरागी सारखे पण अंतरीची खूण पटली आणि त्या काकांना रामजींनी ओळखलं. घरी चला म्हणाले... बैरागीकाकांनी नकार दिला. पण एक तोंडभरून आशीर्वाद दिला... "जा बेटा सुखानं घरी जा. लवकरच तुझ्या घरी नवा अवतार येणार आहे. हा मुलगा तुझं नाव करील." रामजी घरी आले. १४ एप्रिल १८८१... भीबाईना मुलगा झाला. हा मुलगा म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. बैराग्याचा आशीर्वाद खरा ठरला.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'बै-यागाचा आशीर्वाद' या कथेतील आहे. रामजी अंबवडे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. रामजींचे काका लहानपणी बैरागी होऊन कोकणात निघून गेले. महूला ब-याच वर्षांनी साधू बैराग्याचा मेळा भरला होता. त्यात त्यांचे काका भेटले. त्या काकांनी तोंडभरून आशीर्वाद दिला आणि तो आशीर्वाद खरा ठरला. रामजींना एक मुलगा झाला. तो मुलगा म्हणजेच भारतरत्न व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर'.

वरील आशय 'व्यासंग', नितिमत्ता', 'वैचारिकता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४०. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः आय.एन.एस.शिवाजी

मूल्य ः राष्ट्रप्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

'दैवतात दुःखे भरता दोष ना कुणाचा पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' या ओळीतील अर्थ स्वतःच्या जीवनात सामावून घेणारे यशवंतराव मग निष्ठेने समाजकार्यात सहभागी होऊ लागले. ग्राहकपंचायतीच्या ग्राहकपेठेच्या कामात त्यांचा सहभाग होता. त्यांची राहती सोसायटी व पेंडसे स्नेहवर्धीनी सभा यामध्ये ते आपलं योगदान देतात.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'आय.एन.एस.शिवाजी' या कथेतील आहे. यशवंत गोपाळ पेंडसे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. यशवंतराव यांच्या सुखी संसाराला काळभैरवाच्या छायेनं ग्रासलं. त्यांनी स्वतःला समाजकार्यात सहभागी करून घेतले. सर्वजण मित्र एकत्र येऊन ग्राहकपेठेतील कामे समुद्रसफरी यांचा आनंद लुटतात व देशाचे आपण काहीतरी देणे लागतो म्हणून सर्वांनी समाजकार्यात देशप्रेमापोटी झोकून दिले.

वरील आशय 'राष्ट्र प्रेम' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः देवासी केले एकेदेशी

मूल्य ः सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

धर्मवेडे लोक एकमेकांना त्यांच्या त्यांच्या धर्मातील कर्मानूसार नावे ठेवून भांडतात. त्यावर नाथ लिहितात ः कुणास म्हणता पूजिता उत्तरे तुम्ही का ठेवि प्रेतावर फुले. केवळ जे का मेले मढे त्याची जतन करता हाडे. असे परखड प्रश्न विचारून हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी धर्माबाबत जे लोक धर्मवेडेपणाने इतरांना कमी लेखतील त्यांना एकनाथांनी बजावलंः देवासी केले एकेदेशी असं करू नका.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या देवासी केले एकेदेशी' या कथेतील आहे. 'एकनाथ' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. जनार्दन स्वामी यांना प्रवासात जे अनुभव आले ते एकनाथांना सांगतात. धर्मवेडे लोक धर्म वंश हा भेद मानत नाही. मानवता हाच खरा धर्म असे ते सांगतात. 'जे का रंजले गांजले त्यासाी म्हणे जो आपुले तोची साधु ओळखावा देव तेथेची जाणावा. या त्यांच्या अभंगाप्रमाणे जे लोक धर्मवेडेपणाने इतरांना कमी लेखतात त्यांना एकनाथांनी वरील परखड शब्दात बजावले.

वरील आशय 'सर्वधर्मसमभाव' व धर्मनिरपेक्षता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः नन्ही दुनियॉं चा मोठा शिल्पकार

मूल्य ः चिकित्सा, प्रामाणिकपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आणि हे आव्हान प्रमोद कांबळे यांनी प्रत्येक प्राण्याची शरीररचना स्वभाव यांचा तपशीलवार अभ्यास करून त्यांनी प्रथम प्राण्यांचे सांगाडे बनविले. चिकणमातीतील आकार तयार करून मग फायबरमध्ये त्याचे मोल्ड घेतले. हे चित्रकूटसाठी तयार होत असलेले प्राणी नगरच्या कांबळे यांच्या स्टुडिओत साकारत होते तेव्हा स्टुडिओशी जणू काही प्राणिसंग्रहालय उभे राहिले

आणि मग कांबळे यांनी त्रिकूट इथं उभी केली. 'नन्ही दुनियॉ' म्हणजे दृष्टीसुखाचा आनंद सोहळा आणि पुनःप्रत्ययाचा अनुभवी साक्षात्कार. 'नन्ही दुनियॉ' मधले वाघ, मगर, हत्ती, जिराफ हे प्राणी बघून आबालवृद्ध प्रभावित होत असतात. ही नन्ही दुनिया साकारणारे सृजनशील हात होते प्रमोद कांबळेचे. राष्ट्रपती अब्दुल कलामही नन्ही दुनिया बघतांना लहानाहून लहान झाले.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'नन्हीं दुनियॉ चा मोठा शिल्पकार या कथेतील आहे. 'प्रमोद कांबळे' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. त्यांनी प्रत्येक प्राण्याचा स्वभाव यांचा तपशीलवार अभ्यास केला आणि प्राण्यांचे फायबर मोल्ड तयार केले. त्यांनी चित्रकूट येथे यावरचे प्राणीसंग्रहालय उभे केले. ते पाहतांना दृष्टीसुखाचा आनंद मिळतो. अब्दुल कलामही ही नन्ही दुनियॉ पाहताना लहान झाले.

वरील आशय 'सृजनशिलता', 'चिकित्सा' व 'प्रामाणिकपणा' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४३. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः कापसाचा दोरा आणि दो-याचा कापूस

मूल्य ः करूणा, भूतदय

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

कुमार विठ्ठलाच्या प्रश्नावर गाडगेबाबाही अंतर्मुख झाले. त्यांचा राग तर मावळला होताच पण हा प्रश्न म्हणजे अंतरीची खूण आहे. असं त्यांना वाटलं. श्री. गाडगेमहाराजांनी विठ्ठलाला आपुलकीनं जवळ घेतलं. मृदू स्वरात म्हणाले "होईल बरं बाळा या दो-यांचाही पूर्ववर कापूस होईल. कसा आणि केव्हा ते लवकरच तुला कळेल. माझा तुला आशीर्वाद आहे." श्री. गाडगेमहारांजांचा कृपाशीर्वाद मिळालेला हा कुमार विठ्ठल म्हणजेच भविष्यात ख्यातनाम झालेले सदगुरू दिगंबरदास महाराज.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘कापसाचा दोरा आणि दो-याचा या कथेतील आहे. ‘दिगंबरदास महाराज’ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. विठ्ठल या नावाने दिगंबरदास यांना संबोधले जाता होते. त्यांनी लहानपणी गाडगेमहाराज यांना प्रश्न विचारून अंतर्मुख केले होते. त्यांनी विठ्ठल यांना आपुलकीनं जवळ घेऊन आशीर्वाद दिला आणि कृपाशीर्वादाने कुमार विठ्ठलाचे ख्यातनाम ‘सदगुरू दिगंबरदास महाराज’ बनले.

वरील आशय ‘करूणा’ व ‘भूतदया’ ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४४. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः तत्वज्ञ मार्गदर्शक आणि मित्र

मूल्य ः सहकार्य, सौजन्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

“थांबा वाळवेकर” वाळिंबे सर करडया आवाजात उद्‌गारले. “काही राहिलं का सर” वाळवेकरांनी खालच्या आवाजात विचारलं. “हो बरंच काही राहिलं आहे” सर पुन्हा तार स्वरात म्हणाले. आत गेले आणि एक कागद घेऊन आले. ती पावती होती विदयापीठाची...परीक्षा विभागाची फी भरलेली पावती... “ हे राहिलं होत. ही तुमची फी भरलेली पावती आहे. आता निश्चित मनानं पुढचा अभ्यास करा. पुढचं प्रकरण आठवडयानं दाखवा.” वाळवेकर भारावले. श्री. जमदग्नीची कृपा त्यानी अनुभवली होती. शिक्षक हा तत्वज्ञ मार्गदर्शक आणि मित्र असतो. असं त्यांनी वाचलं होत. त्याचा रोकडा प्रत्यय वाळवेकरांना आला होता.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या तत्वज्ञ, मार्गदर्शक आणि मित्र या कथेतील आहे. ‘डॉ.रा.श.वाळिंबे’ हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. पीएच.डी.चे संशोधन दाखविण्यासाठी ते वाळिंबे सरांकडे गेले तेव्हा वाळवेकर यांना पीएच.डी.ची फी भरण्यासाठी मदत केली. डॉ.रा.श.वाळिंबे हे कडक शिस्तीचे होते. परंतु वाळवेकर यांना या जमदग्नीची

कृपा अनुभवास आली आणि खरंच 'शिक्षक' या शव्दाचा खरा अर्थ त्यांना समजला शिक्षक हा उत्तम तत्वज्ञ, मार्गदर्शक आणि मित्र असतो. याचा प्रत्यक्ष अनुभव आला.

वरील आशय 'सहकार्य' आणि 'सौजन्य' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः करूणा आणि कौर्य

मूल्य ः शिष्टाचार, सभ्यता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

जेम्सनं त्याला अग्रिम म्हणून दहा हजार रूपये दिले. तो बसू लागला. चित्र पूर्ण झालं. चित्र छान झालं होतं. गुरूजीनी जेम्सची पाठ थोपटली. तुझं हे येशु ख्रिस्ताच चित्र जगात गाजेल. असा आशीर्वाद दिला. पण तो क्रूर कर्मा उरलेले पैसे न घेताच गेला होता. शेवटी जेम्सनं त्याला हुडकून काढलं आणि उरलेले पैसे देऊ केले. "साहेब" मी तुम्हाला आधी ओळखल नव्हतं म्हणून पंचवीस हजार मागितले. साहेब आता मी तुम्हाला ओळखलं "जेम्सल तो म्हणाला. मग पैसे घे ना." " नाही साहेब तुमच्याकडून दोनदा पैसे नकोत. करूणेचं चित्र माझंच होत. कौर्याचंही माझचं" जेम्सचे डोळे उघडले.

वरील आशय न.म.जोशी यांच्या 'करूणा आणि कौर्य' या कथेतील आहे. 'एक सामान्य माणूस' या कथेतील प्रमुख पात्र आहे. क्रूर चेह-याचं व करूणादायी माणसाच चित्र जेम्स्न काढलं त्या दोन्ही चित्रांना छान प्रसिद्धी मिळाली. या भोगवादी चंगळवादी जगाची खरी ओळख नसलेल्या जेम्स्ने दोन्हीही चित्र एकाच माणसाची काढून देखील त्याने त्या माणसाला ओळखलं व पैसे घेण्याचे नाकारले कारण 'कौर्य व करूणा' ही दोन्ही चित्र त्या माणसाचीच होती.

वरील आशय 'शिष्टाचार' व 'सभ्यता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४६. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः ओळखलं नाहीस देवाला?

मूल्य ः समयसूचकता, विज्ञाननिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

देवबा स्वर्गात देवाजवळ गेला होता आणि त्यानं देवाच्या पायाशी बसून तक्रार केली काय हे देवा मी एवढा तुझा भक्त तुझा सदासर्वकाळ धावा करणारा... पण पाण्यान गटांगळया खाऊन मरावं लागलं. तू मला वाचवलं नाहीस. मला वाटलं तू माझ्यासाठी येशील. 'देवबा मी तीन वेळा तुझ्यासाठी आलो होतो.' "कसं? कधी?" देवबानं आश्चर्यानं विचारलं. "प्रथम एका लहान मुलाच्या रूपात मग एका नावाडयाच्या रूपात आणि शेवटी तू बूडू लागलास तेव्हा कडब्याच्या पेंढीच्या रूपात पण तूच मला तिन्ही वेळा दूर लोटलसं. देवबा देवालाच ओळखलं नाहीस. मग तुझा मृत्यू अटळ होता."

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'ओळखलं नाहीस देवाला?' या कथेतील आहे. 'देवबा' हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. देवबा हा देवाचा परमभक्त प्रत्येक संकटाच्या वेळी देव वेगवेगळी रूपे बदलून देवबाच्या मदतीला धावून येतो. परंतु देवबा त्याला ओळखू शकला नाही व देवबाचा अंत झाला.

वरील आशय 'समयसूचकता' व 'विज्ञाननिष्ठा' ही मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४७. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः सद्‌गुणांचे संमेलन

मूल्य ः वैचारिक व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

एक कृश पण तेजस्वी व्यक्ती आश्रमाच्या प्रवेशद्वारातून आत आली. त्या सद्‌गुणी व्यक्तीला बघून गुरूजींना खूपच आनंद झाला. पण भक्तांना व इतर सद्‌गुणांनाही कळेना की हा शुद्र, कृश, तेजस्वी पण शांत सद्‌गुण कोणता? गुरूजींनी त्या सद्‌गुण मूर्तीचं स्वागत केलं आणि ते समाधानानं म्हणाले "भक्तजनहो हा सद्‌गुण म्हणजे कृतज्ञता" टाळयांचा कडकडाट झाला आणि संमेलनाला सुरूवात झाली.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'सद्‌गुणांचे संमेलन' या कथेतील आहे. श्री. संत गुणीदास महाराज हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. एका महाराजांना वाटलं सद्‌गुणांचे संमेलन आश्रमात घ्यावे व सारे सद्‌गुण भक्तगणांना मूर्तीमंत दाखवावे. म्हणून त्यांनी स्त्रीपुरूष सद्‌गुणांना आश्रमात निमंत्रित केले. नम्रता साहस परोपकार सर्वात शेवटी 'कृतज्ञता' हा सद्‌गुण असल्याशिवाय सद्‌गुणांना अर्थ नाही. हे महाराजांनी आश्रमातील भक्तजनांना समजावून मूर्तीमंत उदाहरण देवून समजावून सांगितले.

वरील आशय 'वैचारिक व्यासंग' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४८. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः भूक पोटाची आणि ज्ञानाची

मूल्य ः ज्ञानलालसा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

लोकांना समजलं दुकानात डॉ.बाबासाहेब आंबेडकर आले आहेत. लोक गर्दी करू लागले. बाहेर लोकांचा लोंढा होता. पोलिसांनाही गर्दी हटवता हटवता नाकेनऊ आले आणि डॉ.बाबासाहेब मात्र पुस्तकांच्या कोंडाळयात एकांग्रतेनं पुस्तंक चाळत होते. लोकांसाठी बाबासाहेब बाहेर आले. मात्र त्यांचं मन अजूनही दुकानातील ग्रंथाभोवतीच रूंजी घालत होतं.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'भूक पोटाची आणि ज्ञानाची' या कथेतील आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कथेतील प्रमुख पात्र आहे. ज्ञानाच्या भुकेसाठी पोटाची भूक मारणारा हा डॉ.आंबेडकर पुस्तकांच्या कोंडाडयात एकाग्रतेनं पुस्तकं चाळत. दुकानातील ग्रंथाभोवती ज्ञानाची भूक भागविण्यासाठी त्यांचे मन अजूनही दुकानातील ग्रंथांभोवती रूंजी घालत असतं.

वरील आशय 'ज्ञानलालसा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४९. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः स्वप्नपराग

मूल्य ः दयाळूपणा, सहकार्य

कथानामक ः डॉ.न.म. जोशी

मुंबई विद्यापीठात अर्ज वळेवर दाखल होणं आवश्यक होतं. मग त्या मुलींना मनिषाताईनीं स्वतःच्या घरी ठेवून घेतलं. आईच्या मायेनं त्या गारठलेल्यांना उब दिली. पेज प्यायला देऊन त्यांचा पोटोबा शांत केला. आता मुंबईला त्या मुली प्रवेशपत्र देण्यासाठी जाणं शक्यच नव्हते. माधवरावांनी त्या मुलींच्या सहया घेतल्या आणि ते स्वतः तडक मुंबईला जाऊन वेळ संपण्याच्या शेवटच्या क्षणी त्यांनी त्या तीन मुलींचे प्रवेश अर्ज परीक्षा विभागात दाखल केले. त्या मुलींच वर्ष वाचलं. पोतदार परत आले तेव्हा त्यांनी एक अभूतपूर्वदृश्य बघितलं तिघींचे डोळे पागोळया गळाव्यात तसे गळत होते. माधव मनिषा यांच्याविषयीच्या कृतज्ञतेनं.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘स्वप्नपराग’ या कथेतील आहे. ‘मनिषा माधव’ दाम्पत्य हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. या दोन्ही दाम्पत्यांनी शिक्षणाची व ज्ञानाची लालसा असलेल्या तिघीं मैत्रिणींचे परीक्षेचे अर्ज स्वतः मुंबई विद्यापीठात जाऊन वेळ संपण्यापूर्वी दिले. ते परत आल्यानंतर त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल व दयाळूपणाबद्दल तिघींच्या डोळयातून अश्रू गळत होते. कृतज्ञतेने वरील आशय ‘सहकार्य’ व दयाळूपणा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५०. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः सात रूपये ते साता समुद्रपार

मूल्य ः ज्ञानलालसा, श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

सुरेल गायकाला संवादिनीची साथ उत्तम असावी लागते. भरतची संवादिनी म्हणजे लता. देखणं हस्ताक्षर असलेली भावूक लता आपल्या विद्यार्थ्यात प्रिय झालीच पण आपल्या ऋजू स्वभावामुळे तिने सा-यांना जिंकून घेतलं आणि भरताची मैफल रंगू लागली. लता ही दिघीपासून लक्ष्मीरोडवरच्या स्वाध्याय महाविद्यालयात आठवडयाला एम.ए. वर्गाला येत. आता भरतची पीएच.डी.च्या मार्गावर तर लता एम.ए. होत आहे. भरतंचा एक प्रोजेक्ट आतामान्य होऊन लवकरच त्याला साता समुद्रापार निमंत्रण आलं आहे. सात रूपयांचा मजूर सातासमुद्रापार जात आहे. केळेवाडीची कूस धन्य झाली आहे.

वरील आशय डॉ.न.म.जोशी लिखित सकाळ वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेल्या कथापैकी ‘सात रूपये ते साता समुद्रापार’ या कथेतील आहे. ‘भरत’ हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. भरत ने अपार कष्ट करून पीएच.डी. संपादन केली. सात रूपये मजूरी पासून त्याने कष्ट करून शिक्षणाची त्याची लालसा त्याने पूर्ण केली. तसेच आपल्या पत्नीला देखील एम.ए.

पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यास मदत केली. त्यांचे एक प्रोजेक्ट मान्य होऊन तो आता परदेशात जाणार आहेत.

वरील आशय 'ज्ञानलालसा' व 'श्रमप्रतिष्ठा' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५१. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : त्या केशांते का हो चरचर नापित हस्ते कापविता

मूल्य : समाजवाद, विज्ञाननिष्ठा, स्त्रि-पुरूष समानता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

एकदा अशाच एका सभेत विधवाविवाह विषय होता. अण्णा भाषण करीत होते. श्रोते तल्लीन झाले होते. आणि श्रोत्यांना अण्णांच्या तोंडून एकच पद ऐकायला मिळाले. हे पद सीतारामपंत देवधर यांनी तयार केलेलं होतं. पदाचे बोल असे होते :

'माता श्रमली प्रतिदिनी ज्याते न्हाउनि माखुनी वाढविता त्या केशांते का हो चरचर नापित हस्ते कापविता' पुरे गांजणूक कींव येऊ दया अनाथ भगिनींची आतां पुनर्विवाह संमति दया हो सोडूनि मनिची निर्दयता टाळयांचा कडकडाट झाला विधवांना केशवपन करावे लागे. अशा क्रूर चालीरीतीबद्दल घृणा निर्माण करण्यात अण्णा यशस्वी झाले आणि लोक ती ओळ गुणगुणतच घरी गेले.

वरील आशय न.म.जोशी यांच्या 'त्या केशांते का हो चरचर नापित हस्ते कापविता' या कथेतील आहे. 'धोंडूकर्वे' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. त्यांची उच्चविचारसरणी होती. ते कर्ते सुधारक होते. विधवा विवाहामध्ये अण्णा भाषण करीत असताना समाजाच्या जुन्या चालीरीती, रूढी, परंपरांना पायबंद घालत त्यांनी विधवांचे केशवपन

करू नये यासाठी समाजपरिवर्तन पर आपल्या भाषणात काही ओळी पद बोलले. त्यात क्रूर चालीरिती विरूद्ध घृणा निर्माण करूण जनजागृती घडवून आणली.

वरील आशय 'समाजवाद', 'विज्ञाननिष्ठा', 'स्त्रि-पुरूष समानता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५२. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : दिगूचा अवतार

मूल्य : सौजन्य, प्रामाणिकपणा, सभ्यता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

प्रामाणिकपणा हा केशवचा तथा दिगूचा अप्राप्य व दुर्मिळ गुण आहे. त्याला लोक जे पैसे देतात ते किंवा त्याला देऊळ झाडताना जे पैसे सापडतात ते सर्व पैसे देवळाचे एक धनी तथा श्यामराव जोशी यांच्याकडे देतो आणि श्यामरावांनीही ते स्वतंत्रपणे गुंतवून ठेवलेले आहेत. या भाबडया जीवाला भूतकाळाची जाण नाही. वर्तमानाची जाणीव नाही. भविष्याची चिंता नाही पण त्यांची चिंता इतर लोक करतात. काहींना तर वाटतं भालचंद्र पेंढारकरांनी 'दुरितांचे तिमीर जावो' मधल्या दिगू साकारताना केशवला बघितलं असावं. असा हा दिगू अवतार.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'दिगूचा अवतार' या कथेतील आहे. केशव कुलकर्णी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. केशवचा प्रामाणिकपणा हा दुर्मिळ गुण होता. देवळात त्याला मिळालेले पैसे तो समाजसेवेसाठी वापरतो. त्याला भूतकाळाची वर्तमान काळाची जाणीव नाही. भविष्याची चिंता नाही. एका नाटकात भालचंद्र पेंढारकरांनी दिगूची भूमिका केशव तथा दिगूच्या प्रामाणिकपणा व सभ्यता सौजन्यासारखी निभावली.

वरील आशय 'सभ्यता' 'सौजन्य' व 'प्रामाणिकपणा' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५३. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः भूप शंकरा आणि भैरवी

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा, समाधान

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

सप्तपदीची साथ संपली आणि सहचरीला मागे ठेऊन सहचर काळभेटीस निघून गेला. मग प्रतिभाताईंनी ठरवलं मुलं आपआपल्या मार्गी लागतील . रमेश तर ख्यातनाम प्राध्यापक व पुस्तकांचा लेखक आहे. भारती मधुकर यांचा गोडबोले संसार फुलून प्रज्ञा सौरभ आणि वृंदा भूषण आहेत.शिरीष संगीताची श्रद्धा आणि रमेश या पतवंडानाही मांडीवर खेळवलंय. आता पुण्यात अमृतमहोत्सवी वयात प्रतिभाताई शांतपणे भैरवी आळवीत आहेत. त्यांना दीर प्रभाकरराव व कुटुंबीय यांची सावली आहे. भूप ते भैरवी द्वारा शंकरातील तराणा हा प्रतिभाताईंचा संगीत प्रवास श्रवणीय आहे.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'भूप शंकरा आणि भैरवी' या कथेतील आहे. यातील 'केळकर कुटुंब' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. प्रतिभाताई यांनी अपार कष्ट करून परिस्थितीशी अनेक संकटांशी झुंज देऊन मुलांना मार्गी लावले.ख्यातनाम गायक जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत शिक्षिका म्हणून त्यांचा गौरव केला. आता पुण्यात नातवंड व पतवंडानांही मांडीवर खेळवलय. अमृतमहोत्सवी वयात आजही प्रतिभाताई शांतपणे भैरवी आळवीत आहेत. भूप व भैरवी द्वारा शंकरातील तराणा प्रतिभाताईंनी आळवला प्रतिभाताईंचा संगीत प्रवास श्रवणीय आहे. त्यात त्या समाधानी आहेत.

वरील आशय श्रमप्रतिष्ठा व समाधान ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५४. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः हुस्ना ना तु ?

मूल्य ः धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बावीस वर्षाची 'ताज' मधील ऐटबाज नोकरी सोडून उदय सहकुटुंब पुण्यात आले. स्वतःची राहती जागा अपुरी होती म्हणून तो पेरूगेट इमारतीत रहायला आला. मनप्रीत आणि अमेय दोघंही मुलं मराठी माध्यमाच्या शाळेत शिकतात. उदय तर या मातीतला आहे. पण हुस्नासुद्धा इतकी रूळून गेली आहे की फक्त भाषेचा प्रश्न सोडल्यास ती सर्वांशी मिळून मिसळून वागते. धर्मांतर न करता धर्मांचं अवडंबर न माजवता हुस्ना उदय मनप्रीत अमेय यांच्यासह एक आगळे वेगळे उदाहरन घालून दिले आहे. म्हणून तर कुणी विचारलं "हुस्ना ना तू?" तर हुस्ना हसून आणि ठासून सांगते "हो मी हुस्ना नातू."

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'हुस्ना ना तू' या कथेतील आहे. 'हुस्ना' ही या कथेतील प्रमुख पात्र आहे. 'हुस्ना' व 'उदय' यांच्या प्रेमाची कहाणी सांगत होता. 'हुस्ना' ही मुसलमान उदय हा ब्राम्हण त्यांनी प्रेमात पडल्यानंतर पळून जाऊन लग्न करायचे ठरवले पण हुस्नाच्या घरून परवानगी मिळाली त्यांचे लग्न झाले. मनप्रीत आणि अमेय दोन मुलं झाली हुस्ना संसारात रमून गेली. धर्मांतर न करता धर्माचे अवडंबर न माजवता हिंदू धर्माचे सर्व सोपस्कार व्यवस्थित पार पाडत. जेव्हा तीला कोणी विचारले तर मी अभिमानाने सांगते "हुस्ना ना तू" कोणताही धर्मभेद न मानता त्यांचा सुखी संसार छान चालू आहे.

वरील आशय धर्मनिरपेक्षता' व 'सर्वधर्मसमभाव' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः लक्ष्मी स्तोत्र

मूल्य ः भूतदया, करूणा, श्रद्धा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

भाषेतल्या त्या स्तोत्राचे शब्द त्याने सांगितले. वडील भाषातज्ज्ञ होते... ते म्हणाले "आनंदा तू फार चांगलं काम केलंस. त्या माऊलीचे आशीर्वाद तुला मिळाले. ती साक्षात लक्ष्मीच असली पाहिजे...तिनं तुला लक्ष्मी स्तोत्राचा आशीर्वाद दिला." पुढं आनंदानं धाडस केलं. नोकरी सोडून तो स्वतंत्र व्यवसायात गेला. एका कंपनीचा मार्केटींग मॅनेजर झाला. आयुष्याच्या अर्धशतकाच्या टप्प्यावर त्याला लक्ष्मीचा सुखद सहवास मिळतो आहे. जीवनाची माधुरी चाखता येत आहे.

वरील आशय डॉ. न.म.जोशी यांच्या 'लक्ष्मी स्तोत्र' कथेतील आहे. 'भालचंद्र देव हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. लक्ष्मी स्तोत्र 'एका प्लॅट फार्मवरच्या स्त्रीला मदत केल्याने तीनं त्याला ते भेट दिले व त्याचा परिणाम असा झाला की आनंदानं नोकरी सोडून स्वतंत्र व्यवसाय केला. त्या कंपनीचा मॅनेजर झाला आणि लक्ष्मीच्या सुखद सहवासाने त्याने जीवनातील खरा आनंद अनुभवला.

वरील आशय 'श्रद्धा, करूणा व भूतदया ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५६. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः अगतिक महिला दिन

मूल्य ः सत्यता, चिकित्सा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

एक मुलगी वेटोळे घालून पडलेली होती. अंगावर वाकळ घेऊन ती लोकांपासून तोंड लपवून राहत होती. तिच्यावर बलात्कार झाला होता. पण अब्रू जायला नको म्हणून केस नोंदवली नव्हती. एवढंच नव्हे तर तिच्या बापानंच बलात्कार  करणा-याकडून पैसे घेऊन पोलिसांतली तक्रार मागं घेतली होती आणि वर तो त्या मुलीलाच दोष देत होता. महिलांच्या स्वातंत्र्याबाबत, स्वाभिमान रक्षणाबाबत, अत्याचार प्रतिबंधाबाबत सभेत टाळयांच्या कडकडात ठराव पास झाला आणि त्याचवेळी त्या झोपडपट्टीतील एका नव-याने चारित्र्याच्या संशयाने बायकोच्या डोक्यात पाटा घातला होता. सभेत पसायदान सुरू झालं आणि झोपडपट्टीतलं वातावरण लाव्हारसासारखं उसळीत होतं. त्यातल्या अगतिक महिला जागतिक महिला दिनाच्या दिवशी जास्तच अगतिक झाल्या होत्या.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘अगतिक महिला दिन’ या कथेतील आहे. जागतिक महिला दिनानिमित्ततच्या भाषणातील स्त्रियांच्या आत्मसन्मानाबद्दल सांगत असतांना महिलांवर, अत्याचारांवर, पायबंद घालण्यासाठी कायदयाचे महत्व सांगत असणारे प्रमुख पाहुणे व दुसरीकडे झोपडपट्टीतील ‘अगतिक मुलगी’ ही या कथेतील प्रमुख पात्र आहे. स्वतःच्या वडीलांने बलात्कार करणा-यांकडून पैसे घेतले व तक्रार मागे घेतली. महिलांच्या स्वातंत्र्याबाबत स्वाभिमान रक्षणाबाबत अत्याचार प्रतिबंधाबाबत सभेत टाळयांचा कडकडाट झाला. परंतु जागतिक महिला दिनाच्या दिवशी या अगतिक स्त्रियांचा प्रश्न वा-यावर राहिला.

वरील आशय ‘सत्यता’ व ‘चिकित्सा’ ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५७. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : लोभ आहे जहर मोठे

मूल्य : नितिमत्ता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

अंधारी रात्र ... अमावस्या होती. ती काळरात्रच ठरली. त्यादिवशी एक वेगळयाच प्रकारचं पार्सल मिळालं... पार्सलच्या खालच्या बाजूला बारीक जाळी ठेवली होती. वरून किंतान होतं. आत काहीतरी खुडबूड होती. पार्सलवर लिहलं होतं. Handle with care: Position for Urgent Delivery पार्सल आणलं ... चौधरी चौधरींची दोन्ही मुलं बायको भोवती बसले होते. शंकर प्रसादनं पार्सल मध्ये ठेवलं. आज काय मिळणार अशी उत्सुकता होती. शंकर प्रसादनं पार्सलच्या वरच्या टोकाचं कितान काढलं. जाळीवरचं टोक उचकटलं... आणि काय... दोन तीन भयंकर विषारी नाग फुत्कार सोडत त्यातून बाहेर पडले... आधीच खवळलेल्या त्या नागांनी सर्वांना दंश केला... केरळमधून मुंबईला हाफकीन इस्टिटयूटसाठी हे पार्सल पाठवलं होतं... थोडयाच वेळात पाच सहा काळीठिक्कर पडलेली प्रेतं तिथं इतरांना दिसली. लोक म्हणाले "लोभ आहे जहर मोठं" नाव मोठं लक्षण खोटं."

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'लोभ आहे जहर मोठे' या कथेतील आहे. यातील प्रमुख पात्र 'शंकर प्रसाद व रणसिंग चौधरी' ही आहेत. चौधरी व शंकरप्रसाद पार्सल फोडण्यात तरबेज व चटावलेले होते. 'अती तिथे माती' या उक्तीप्रमाणे पार्सल फोडण्यास पटाईत झालेला होता. त्याचा परिणाम असा की दोन तीन भयंकर नागांचे पार्सल फोडल्यानंतर त्या नागांनी दंश केला व पाच सहा जणांची प्रेतं काळीठिक्कर पडली. शंकरप्रसाद व चौधरी व यांच्या लोभापायी सर्वांना प्राण गमवावे लागले. यावरून असे समजते अती लोभ हा प्राणावर ही बेततो. वरील आशय 'नितिमत्ता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५८. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः त्यांनी थोडा उजेड दयावा.

मूल्य ः समता, समतोलविचारसरणी

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

अनंतचतुर्दशीला अनंताची पोथी कवी वाचतात त्यात एक कथा आहे. या कथेवरून कविलाही कविता सुचली आणि मग तर या कवितेनं अनेकांची ह्दय यंत्र काबीज केली. रोटरी क्लबसारख्या संस्थांनी या कवितेचं वाचन त्यांच्या मुख्य अधिवेशनात केलं. सोलापूरजवळच कारंबा या गावी वेश्यांच्या मुलामुलींच पुनर्वसन करण्यासाठी स्नेहालय ही संस्था काम करते. या संस्थेच्या आवारातही ही कविता ठळकपणे रंगवून लावली होती अशी ही कविता कुठं कुठं पोहचली आणि तिनं अनेकांचं भावजीवन उजळून टाकलं. दत्ता हलसगीकर यांनी असंख्य कविता केल्या आहेत. पण या कवितेला ते भाग्यवती कविता म्हणतात आणि वाचकांच्या दृष्टीनं त्या भाग्यवती कवितेचे भाग्यवान कवी आहेत.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘त्यांनी थोडा उजेड दयावा’ या कथेतील आहे. ‘हलसगीकर’ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. अनंतचतुर्दशीला अनंतची पोथी वाचत होते. त्यात एक कथा होती. त्या कथेवरून त्यांना ही कविता सुचली आणि वेश्यांच्या मुला मुलींच्या पुनर्वसन करण्यासाठी जी संस्था काम करते त्या संस्थेच्या आवारात त्यांनी ही कविता लिहीली. हसलगीकर या कवितेला भाग्यवती कविता म्हणतात स्वतःला भाग्यवान कवी सजतात.

वरील आशय समतोल विचार सरणी व वैचारिकता ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५९. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः पहा माझा ग्रंथ नीट

मूल्य ः ज्ञानलालसा कर्तव्यनिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

वीज महामंडळातील कर्तव्य चुकू नये असं असेल तर दासबोध बाजुलाच ठेवावा लागला असता. पण घर संसार वीजमंडळ दैनंदिन व्यवहार हा सर्व कर्तव्याचा भार उचलूनही समासांवरील प्रासादिक भाष्याचं लेखन झालं ते एका वृत्तपत्रानं क्रमशः प्रकाशित करायचं ठरवलं. सहाशे पानांचा ग्रंथ सिध्द झाला. कुणाल हजेरी यांचे वडील मदन हजेरी हे ही साहित्यिक आहेत. ग्रंथाचं नाव ठेवण्याची चर्चा झाली. नाव ठरलं 'पहा माझा ग्रंथ नीट...' आणि हा ग्रंथ श्री.सुनील चिंचोळकर आणि आणखी एक ख्यातनाम साहित्यिक यांच्या उपस्थितीत प्रकाशित झाला.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'पहा माझा ग्रंथ नीट' या कथेतील आहे. 'कुलकर्णी' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. काका देसमुखांचे दासबोधावरील प्रवचन ऐकल्यावर कुलकर्णी यांनी दररोज एका समासावर लिखाण करायचं ठरवलं. ऑफिसमधील कर्मकांड पचवत दासबोध वाचवा असे असताना समर्थांची एक ओळ डोळयासमोर येत असे 'कर्तव्यास चुको नये' कुणाल हजेरी यांनी पुस्तक प्रकाशित करायचं ठरवलं. सहाशे पानांच्या ग्रंथाचे नाव ठेवण्याची चर्चा झाली आणि ग्रंथाचे नाव 'पहा माझा ग्रंथ नीट' हे ठेवलं.

वरील आशय 'ज्ञानलालसा' व 'कर्तव्यनिष्ठा' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६0. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः कस्तुरी मृग

मूल्य ः प्रेम कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

प्रयोग सुरू झाला. मोहनचे डोळे प्रयोगाच्या वेळी पहिल्या रांगेतील सरांना शोधत होते. सर त्याला दिसले नाहीत. सराईत अभिनेता असल्यामुळे त्यानं आपली निराशा चेह-यावर

दिसू दिली नाही. पण पहिला अंक संपल्यावर त्यानं आपल्या परिचितांना तसं बोलून दाखवलं कारण त्याची भूमिका खूपच रंगली होती आणि सरांनी ती पाहून कौतूक करावं अशी त्यांची इच्छा होती. सर मागे होतेच. नाटक संपलं आणि सर रंगमंचावर गेले. 'सर नाटक संपल्यावर आलात तुम्ही.' मोहन काहीशा रागाने म्हणाला. "होय बेटा नाटक संपल्यावर आलो." मग कशाला आलात? "तुला सांगायला शाब्बासकी दयायला. मोहन मी मुद्दाम मागे बसलो. माझ्या मोहनच्या भूमिकेबद्दल सामान्य प्रेक्षक काय म्हणतात हे मला ऐकायचं होतं." छान ऐकायला मिळालं. रोमांचित झालो. तुझ्यापार्यंत घेऊन आलोय. नाही तरी कस्तुरीमृगाचा सुगंध दूरवरूनच दरवळतो ना? मोहन भारावल्यासारखा सरांच्या पाया पडला. मोहननं फार लवकरच या जगाचा निरोप घेतला. सर कस्तुरीमृगाचा गंध अजून आठवतात.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'कस्तुरी मृग' या कथेतील आहे. 'मोहन गोखले' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. मोहनचे वडील बापूसाहेब गोखले यांनी त्यांच्या अभ्यासाविषयी व उपकमांविषयी चौकशी केली. शिक्षकांनी सांगितले तुमचा मुलगा रंगभूमी चित्रपट क्षेत्रात नाव काढणार. आयुष्यात एका वळणावर मोहन अडखळला तो सरांशी बोलला. 'कस्तुरी मृग' नाटकाच्या वेळी त्याला वाटत होत की सरांनी माझा प्रयोग पहिल्या रांगेत बसून पहावे असे त्याला वाटले. परंतु सरांना गोखले विषयीचे इतरांचे मत जाणून घ्यावयाचे होते.

वरील आशय 'प्रेम' व 'कर्तव्यदक्षता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः बिनमांगे मिले तो अमृतसमान

मूल्य ः सौजन्य शिष्टाचार

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

न्यु इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक असणारे नाडगौडा पुढं B.M.C.C. कॉलेजचे प्राध्यापक झाले आणि यथावकाश ते उपप्राचार्य झाले. या प्रगतीच्या वाटा अनेक वळणांनी भरून गेलेल्या होत्या. पण त्या कष्टातही समाधानाची हिरवळ होती. श्रीकांत नाडगौडा आता अनेक संस्थांना व्यक्तींना उत्तमोत्तम ग्रंथांच्या भेटी देतात. आपणाला जशी चांगली माणसं भेटली आणि त्यांनी आपल्याला सुखद आश्चर्याचे धक्के दिले. तसेच ते सुखद धक्के इतरांनाही बसून त्यांच्या जीवनात सुखशांतीची शिंपण व्हावी यासाठी अशा ग्रंथभेटीचा उपक्रम नाडगौडा करतात. कारण त्यांनी डी.डी. पानसे यांनी ऐकवलेल्या त्या चार ओळी उपनिषदासारख्या स्मरणात साठवून ठेवलेल्या आहेत आणि नाडगौडांना त्यांचा असा सुखद प्रत्यय येतो की एखादी व्यक्ती त्यांना सांगते... "सहज मिले तो दूधसमान... बिन मॉगे मिले तो अमृतसमान" या ओळी ऐकून आम्ही कोर्टकज्जे थांबवलेले आहेत. या परत्वे तो आनंद कोणता.

वरील आशय 'न.म.जोशी' यांच्या 'बिन मांगे मिले तो अमृतसमान' या कथेतील आहे. 'श्रीकांत शैलजा' हे जोडपे या कथेतील प्रमुख पात्र आहे.ते दोघे जुने दिवस आठवतात कष्ट प्रद जीवनातील सुखद आठवणींनी ते मोहरून जातात.नाडगौडांचा प्रवास शिक्षक प्राध्यापक उपप्राचार्य व प्राचार्य झाला असला तरी प्रगतीच्या वाटा अनेक वळणांनी भरून येत होत्या. कष्टातही समाधानाची हिरवळ होती. जीवनात सुख शांती यावी म्हणून ते ग्रंथभेटीचा उपक्रम करतात. त्या ग्रंथातील उपनिषदाच्या चार ओळी स्मरणात ठेवून त्यांना जीवनाच्या सुखाचा प्रत्यय येतो. वरील आशय 'सौजन्य' व 'शिष्टाचार' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः मातीची अक्षर पूजा

मूल्य ः ज्ञानलालसा, वस्तुनिष्ठता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

काही गोष्टी आणि आख्यायिकाही सांगतात. मध्येच उंच मनो-याच दर्शन घ्या म्हणून सांगतात. विठाबाईच्या ओव्याही ते या प्रदक्षिणेच्या मार्गावर आपल्याला गुणगुणून दाखवतात आणि शेवटी करहाटक नगरीचा सुंदर नकाशा प्रसाद म्हणून तळहातावर ठेवतात. गोखले देशपांडे यांची ही अक्षरपूजा म्हणजे 'क-हाड समग्रदर्शन' हा सुंदर ग्रंथ गोखले देशपांडे या शब्दब्रम्हाच्या उपासकांनी मातीची बांधलेली पूजा वाचकभक्तांना दीर्घकाळ आनंद देणारी आहे.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'मातीची अक्षरपूजा' या कथेतील आहे. विठाबाईच्या ओव्याही ते या प्रदक्षिणेच्या मार्गावर आपल्याला गुणगुणून दाखवतात आणि शेवटी करहाटक नगरीचा सुंदर नकाशा प्रसाद म्हणून तळहातावर ठेवतात. गोखले देशपांडे यांची अक्षरपूजा म्हणजे 'क-हाड समग्रदर्शन' हा सुंदर ग्रंथ गोखले देशपांडे या शब्दब्रम्हाच्या उपासकांनी मातीची बांधलेली पूजा वाचकभक्तांना दीर्घकाळ आनंद देणारी.

वरील आशय 'ज्ञानलालसा' व 'वस्तुनिष्ठता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६३. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः खुर्ची आणि व्यासपीठ

मूल्य ः संयम समंजसपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पुण्यात फार मोठा गाजावाजा होऊन ब्राम्हण सभेचे बहुभाषिक संमेलन पार पडले. त्याच्या स्मरणिकेत डॉ. कुलकर्णी यांचा लेख आहे. पण संपादक अनुक्रमणिकेत त्यांच नाव टाकायला विसरले. एका वाचकानं आणि त्यांच्या प्रवचनाला येणा-या भक्तानं ही गोष्ट कुलकर्णी यांच्या नजरेस आणून दिली. तेव्हा कुलकर्णी हसून एवढेच म्हणाले अंक शेवटपर्यंत वाचावा म्हणून माझं नाव टाकलं नसेल अस समजा आणि दुसरं अस की अनुक्रमणिकेत नाव नसताना लेख

वाचायला मिळेल तेव्हा वाचकाला वाटेल 'अरे यांचाही लेख आहे वाटतं' हा आश्चर्याचा धक्का आनंददायी आहे. अशा विधायक भूमिकेतून काम करणा-या डॉ. अजित कुलकर्णी यांना विविध वीस संस्थांकडून गौरव व पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. गीतेच्या अधुनिक विचारांवर 'श्रीमद्भगवद्गीता एक जीवनप्रणली' संशोधन करीत त्यांनी पुणे विदयापीठाची पीएच.डी मिळवली.

वरील आशय न.म.जोशी यांच्या 'खुर्ची आणि व्यासपीठ' या कथेतील आहे. डॉ.अजित कुलकर्णी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. त्याना विविध संस्थेकडून गौरव व पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. गीतेच्या आधुनिक विचारांवर 'श्रीमद्भगवतगीता एक जीवनप्रणाली' यावर संशोधन करून पीएच.डी. मिळविली.

वरील आशय संयम व समंजसपणा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६४. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः पर्वती ते पार्लाद्वारा प्रभुपाखर

मूल्य ः वस्तुनिष्ठता प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

'प्रभूपाखर' मोकळे राहता कामा नये. आईची स्मृती कायम राहिली पाहिजे. नव्या काळाला अनुलक्षून कॅनॉलच्या कडेला असलेल्या 'प्रभूपाखर' च्या जागी मग 'इन्ना अपार्टमेंट' तयार झाली. आयुष्याचा पूर्ण पूर्वाध 'प्रभुपाखर' मध्ये घालवलेलं विजय कर्वे यांच कुटुंब 'इन्ना' हे आईचेच नाव नव्या इमारतीला देऊन तिच्या स्मृती चिरंतन जागवल्या आहेत. कारण 'प्रभुपाखर' नावापासून आईनंच त्यांच्याचर मायेची पाखर घातली होती.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'पर्वती ते पार्लीद्वारा प्रभुपाखर या कथेतील आहे. 'विजय कर्वे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. पर्वतीच्या पायथ्याशी 'प्रभुपाखर' नावाचं

त्यांच घर असल्यामुळे पर्वतीवर येणारे जाणारे या घराकड कुतुहलानं बघत असत. त्या नावाशी सर्वजण घोटाळत. 'प्रभुपाखर' याचा अर्थ 'रक्षण' या अर्थातं प्रभुपाखर अन्वर्थक नाव त्यांनी आपल्या घराचं ठेवले. कर्वे यांचे दोन्ही बंधू व त्यांचे कुटुंब परदेशात स्थायिक झालेत. पण प्रभुपाखर घराबद्दल तेवढीच ओढ आजही आहे. 'प्रभुपाखर' नावापासून आईनंच त्यांच्यावर मायेची पाखर घातली आहे.

वरील आशय 'वस्तुनिष्ठता' व 'प्रेम' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६५. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : गिडवाणीचं गणित

मूल्य : श्रमप्रतिष्ठा, निर्भयता, प्रामाणिकपणा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

"हे बघा सात तासाला मालाचा उठाव होऊन मला पंधरा टक्के फायदा मिळतो. उधारी नाही. शिवाय लोक माझी वाटं बघतात हे तर आहेच. पण आणखी एक गणित आहे." "कोणतं?" "रिकाम्या दोन पोत्यांचे पैसे ... प्रत्येकी तीस रूपयाप्रमाणे साठ रूपये हे मालच सुटतात. तेवढे पैसे ठोक व्यापारी माझ्या खरेदीतून वजा करतो. आता सांगा..." माझा तोटा होतो का? गिडवाणीचं गणित बरोबर होतं. दहा वर्षात गिडवाणीनं दुकान घेतलं. आता तो भल्या मोठया "गिडवाणी आणि कंपनी" या फर्मचा मालक आहे.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'गिडवाणीचं गणितं' या कथेतील आहे. गिडवाणीनं मोठया धाडसानं एक हातगाडी भाडयानं घेऊन रोज दोन पोती साखर सकाळी चार तास संध्याकाळी चार तासात विकायचा. भांडवल शून्य. पंधरा टक्के फायदा उधारी नाही. शिवाय दोन पोत्यांचे ६० रू. सुटतात. असे पै ला पै जोडून कष्ट करून प्रामाणिकपणे गिडवाणीनं दुकान घेतलं आणि भल्या मोठया कंपनीचा मालक आहे.

वरील आशय 'श्रमप्रतिष्ठा' व निर्भयता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६६. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः संध्येची लावणी

मूल्य ः वैचारिकता, व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

"आपल्या मनात आपली संध्या सुरू असतानाही आपला हत्ती आजारी आहे त्याल काय औषध दयावे असा विचार जेव्हा आला तेव्हा मी तुमच्यामागे येऊन बसलो." राम जोशींच्या या उत्तराने शंकराचार्य चकित झाले. कारण ते सत्यच होते. राम जोशी साक्षात्कारी असले पाहिजेत. हे शंकराचार्यांना पटले. मग शंकराचार्य म्हणाले "एवढी शक्ती परमेश्वरानं आपणालाही दिली आहे. मग आपण असे अस्वच्छ असंस्कृत का वागता." मला संध्या येते म्हणून दाखवू . राम जोशी म्हणाले "दाखव" "कशी दाखवू" तुमच्यासारखी पळीपंचपात्री घेऊन संध्या करू की आमच्यासारखी डफझांज घेऊन करू? राम जोशींनी मग सूर लावला... "केशवकरणी नारायणचरणी अद्भूत लीला..." संध्येची चोवीस नांव लावणीत गुंफून लावणी म्हटली आणि संध्येची लावणी जन्माला आली.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'संध्येची लावणी' या कथेतील आहे. 'राम जोशी' हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. शंकराचार्य संध्येला बसले होते व राम जोशी आले. शंकराचार्यांनी रामजोशीनां अस्वच्छ व असंस्कृत का वागता तुम्ही ब्राम्हण मग तुम्हांला संध्या येते का? यावर राम जोशींनी उत्तर दिले तुमच्यासारखी पंचपाळी घेऊन संध्या म्हणून की आमच्यासारखी डफझांज घेऊन. राम जोशींनी संध्येची चोवीस नांवे लावणीत गुंफून लावणी म्हटली व 'संध्येच्या लावणीचा' जन्म झाला.

वरील आशय 'वैचारिकता' व 'व्यासंग' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः उपयोगी आणि निरूपयोगी

मूल्य ः वस्तुनिष्ठता, समतोल विचारसरणी, समयसूचकता, अनुभवजन्य शिक्षण

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

"मागच्या वेळी तुम्ही अनुपयुक्त वनस्पती शोधण्याचं काम केलं. आता उपयुक्त वनस्पती...पण लहानात लहान...अशी आणून दाखव..." एक शिष्य अत्यंत चतुर होता... तो म्हणाला "महात्मन...सर्वच वनस्पती उपयुक्त आहेत." मग त्यानं एकं गवताची काडी हातात धरली... तो म्हणाला "या गवताच्या काडयांची झोपडी होऊ शकते याच गवताच्या काडयांच घरटं करून पक्षी त्यात राहतात. याच गवताच्या काडयांच्या पेंढया तयार करून वैरण जनावरांना घालतात. या एवढया अश्या गवताच्या काडीचे किती तरी उपयोग आहेत. गौतम बुद्ध संतुष्ट झाले. त्यांच्या शिष्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून उपयुक्त व अनुपयुक्त याबाबतचे ज्ञान संपादन केले होते.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'उपयोगी आणि निरूयोगी' या कथेतील आहे. 'गौतम बुद्ध व त्यांचे शिष्य' हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. गौतम बुद्धांनी आपल्या शिष्यांना उपयुक्त वस्तूचा शोध घेण्याचं काम दिले. एका शिष्याने समयसूचकता दाखवून एका गवताच्या काडीचे अनेक उपयोग तात्काळ सांगितले. गौतम बुद्ध संतुष्ट झाले. प्रत्यक्ष अनुभवातून उपयुक्त व अनुपयुक्त याचे ज्ञान त्यांच्या शिष्यांनी संपादन केले.

वरील आशय 'वस्तुनिष्ठता', 'समयसूचकता', 'समतोल विचारसरणी' व 'अनुभवजन्य शिक्षण' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६८. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः 'दिव्या दिव्या चमत्कार'

मूल्य ः एकात्मता, समता.

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आणि मग त्याच वर्षीच्या दिवाळीला ती गल्ली एकाच प्रकारच्या आकाशकंदिलांनी सुशोभित झाली. दृश्य एकदम सुंदर होते. गल्लीच्या एका टोकाला उभं राहून नजर टाकली की सुंदर आकाशदिव्यांची रांग नजरेत भरे. शेवटी तो पन्नास फुटी आकाश दिवा... एकतेचा सुंदर चमत्कार काय असतो ते श्रीधरनं आणि त्यांच्या सवंगडयांनी सिध्द केलं. शेकडो लोक पाहून सुखावले. मनात म्हणत गेले. "दिव्या दिव्या चमत्कार."

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'दिव्या दिव्या चमत्कार' या कथेतील आहे. 'श्रीधर' हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. दिवाळीला गल्ली एकाच प्रकारच्या आकाश कंदिलांनी सुशोभित झाली. ते दृश्य एकदम सुंदर होते. पन्नास फुटी आकाशकंदिलाने एकतेचा सुंदर चमत्कार केला. श्रीधरनं आणि त्याच्या सवगंडयांनी सिध्द केलं शेकडो लोक तो आकाशकंदिल पाहून सुखावले.

वरील आशय 'एकता' व 'समता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६९. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः कोठारींचा धडा

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

हे ऐकल्यावर तो मुलगा काहीसा हिरमुसला. त्याला टेबलावरचं काम हवं होतं. हे रस्त्यावरचं काम मिळालं. पण हरकत नाही म्हणून तो ते अंक घेऊन निघाला... त्याला वाटलं आपल्याकडून कोण अंक घेणार? नेमका तो दिवस होता मुंबईला एस.एम.जोशी यांनी खवळलेल्या जनसमुदायाला अडवून एका इन्स्पेक्टरला वाचविल्याचा सर्वच वृत्तपत्रांना त्या सकाळी खूप मागणी होती. हा मुलगा ओरडत निघाला. एक दोन अंक विकले गेले. पण पुढं कोण घेणार? हा काही व्यावसायिक विकेता नव्हता. एवढयात बुधवार चौकातल्या जोशी एजंटचा एक माणूस समोर आला नि म्हणाला "आज प्रभातला खूप मागणी आहे" 'प्रभात' च्या कार्यालयातही अंक शिल्लक नाहीत. तुझ्याकडे किती अंक आहेत ते सर्व मला दे. या मुलाकंड ४५ अंक होते. ते सर्व अंक त्यानं कमिशन देऊन घेतले आणि हा मुलगा हरणासारखा उडया मारत एक तासाच्या आत सर्व अंकांचे पैसे घेऊन 'प्रभात' मध्ये आला. त्याच्या खिशात ५0 अंकाचं कमिशन पडलं. कोठारी हसून म्हणाले "बघ दिलं ना काम तुलां" कोठारींनी घालून दिलेला धडा त्याला उपयोगी पडला.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'कोठीरांचा धडा' या कथेतील आहे. 'वालचंद कोठारी' हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. तरूण पिढीला अचूक मार्गदर्शन करणारे एक व्यावसायिक म्हणून त्यांचे वैशिष्टये होते. एका एस.एस.सी. झालेल्या मुलाला कामाची गरज होती तेव्हा कोठारी यांनी त्याला 'प्रभात' पेपरच्या वितरणाचे काम दिले आणि त्या मुलाने एका तासात प्रभातचे ४५ अंक विकले. कोठारींनी घालून दिलेला श्रमप्रतिष्ठेचा धडा त्याला उपयोगी पडला.

वरील आशय 'श्रमप्रतिष्ठा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७०. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः जेथ जो संपत्ती आणि दया

मूल्य ः सहानुभूती, प्रेम, सहकार्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

"लक्ष्मीबाई ज्या किर्तनकारांचा प्रपंच एवढयावरच असतो त्यांना या गोष्टीची आवश्यकताच असते. माझं काही तसं नाही. तुम्ही अडचणीत आहात आजपासून ताटात जे धान्य जमेल ते घरी नेऊन साठवा. फळंही घरी न्या. आरतीचे पैसेही घरी न्या." तुमच्या प्रपंच्याच्या कारणी ते लावा. त्यानंतर कोणत्याही मंदिरात पुष्पलताबाईंच किर्तन असलं तरी लक्ष्मीबाई येतं आणि कीर्तन सेवेची सर्व जबाबदारी स्वीकारून व्यवस्था लावून त्या आरती घेऊन जात. रोजच्या आरतीतल्या पैशातून आपल्या कच्च्या बच्च्यांना त्या दूध आणि पाव आणत. सकाळची भुकेची वेळ भागत असे. जमलेलं धान्य एकत्र करून शिजवत. त्यांचा स्वयंपाक होत असे उरलेल्या किरकोळ पैशातून भाजी आणत.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'जेथे जो संपत्ती आणि दया' या कथेतील आहे. या कथेतील 'पुष्पलताबाई हया प्रमुख पात्र आहेत. त्या किर्तनकार होत्या. त्यांचे कीर्तन ज्या ठिकाणी होईल त्या ठिकाणी आरती, धान्य, फळे, पैसे ते लक्ष्मीबाईंना देत. कारण लक्ष्मीबाईच्या प्रपंचाला त्याची आवश्यकता होती. त्या पैशातून मुलांना दूध, पाव व भाजी आणत. पुष्पलताबाईंना कीर्तनाच्या पैशाची आवश्यकता नव्हती. त्यांना अडचणीत असणा-या लक्ष्मीबाईंना सहकार्य व प्रेम या नात्याने कपडे, फळे, धान्य, पैसे देत.

वरील आशय सहानुभूती, सहकार्य, प्रेम ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः ठेविले सोवळे घालुनी घडी

मूल्य ः समतोल विचारसरणी, व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बापूनं उघडउघड तमाशाची वाट धरली. अनेक तमासगीर अनेक फडकरी आवतण देऊ लागले. बापूंच्या शब्दांवर घुंगरू नाचू लागले. सनातनी लोकांनी बापूला वाळीत टाकायंचं ठरवलं. हरिपंतांची अवस्था मोठी विकट झाली होती. केव्हा तरी बापूला चांगला खडसावून संपूर्ण गावासमोर त्याची हजेरी घेण्याचं ठरवलं. बापूनं डफावर थाप मारली आणि तो गरजला.

“श्रेष्ठ वर्ण मी ब्राम्हण असुनी □ठेविले सोवळे घालूनी घडी □

मशाल धरिली हाती तमाशाची □लाज लावली देशोधडी □

लोक अवाक झाले □पठ्ठे बापूराव ख्यातकीर्ती झाले □”

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘ठेविले सोवळे घालुनी घडी’ या कथेतील आहे. ‘पठ्ठेबापूराव’ हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. पठ्ठे बापूराव हे जातीने ब्राम्हण होते. बापूंनी कुलकर्णी नावाचा राजीनामा देवून तमाशाचा फड स्वीकारला. तमाशाची वाट धरली. सनातनी लोकांनी बापूला वाळीत टाकलं. तेव्हा बापूनं डफावर थाप मारून वरील लावणी म्हटली व लोक अवाक झाले. त्यांना ख्यात किर्ती मिळाली.

वरील आशय ‘समतोल विचारसरणी’ व ‘व्यासंग’ ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः अंधाराचे डोळे

मूल्य ः ज्ञानलालसा, वस्तुनिष्ठता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

मग पटवर्धनांनी सखोल अभ्यास करून योजनापूर्वक एक स्लाईड शो तयार केला. त्याची कॉमेंट्री तीन भाषांत तयार केली. ज्येष्ठ नागरिक संघ, शाळा, मंडळे या ठिकाणी अशोक पटवर्धन आपला हा स्लाईड शो करतात. या स्लाईड शोला नाव दिलं आहे 'आपले डोळे'. आतापर्यंत पटवर्धनांनी असे सहाशे स्लाईड शो केले आहेत आणि डोळयाविषयी डोळसांनाही नवी दृष्टी देण्यांच कार्य ते करीत असतात. गॅरेजमध्ये यंत्राशी खुडबूड करणारा एक तांत्रिक आता लोकांच्या दृष्टीची काळजी घेतो हे विलक्षण नव्हे काय? डोळे देण्याचं अज्ञानांधकार घालविण्याचं काम पटवर्धन करीत आहेत.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'अंधाराचे डोळे' या कथेतील आहे. 'अशोक पटवर्धन' हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. पटवर्धन आपले डॉ.मित्र (नेत्रतज्ञ) सुधीर काळे यांच्याकडे जात. त्यांचे काम पाहून पाहून पटवर्धन सखोल अभ्यास करून योजनापूर्वक एक स्लाईड शो तयार केला. त्याची कॉमेंट्री तीन भाषांत केली. सहाशे स्लाईड शो केले. डोळयांविषयी डोळसांनाही नवी दृष्टी देण्याचे कार्य ते करीत. गॅरेजमध्ये यंत्राशी खुडबुड करणारा एक यांत्रिक आता लोकांच्या दृष्टीची काळजी घेतो अंधारालाही डोळे देण्याचे काम पटवर्धन करीत.

वरील आशय 'ज्ञानलालसा' व 'वस्तुनिष्ठता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७३. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः गोडबोले आजोबांची जर्मन प्रेयसी

मूल्य ः प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

अखेर एक विलक्षण कायदा आला. सुवर्णनियंत्रण कायदा हे त्याचं नाव. या कायदयात यांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावरच घाला आला आणि नाइलाजानं गोडबोले यांना आपल्या या प्रियसीचा विरह सहन करावा लागला. तीस पस्तीस वर्षे सुखानं गोडबोले यांच्याबरोबर राहिलेली. त्यांची ती जर्मन प्रेयसी म्हणजे एक सुंदर वस्तू होती. ती मेड इन जर्मनी वस्तू म्हणजेच गोडबोले आजोबांची जर्मन प्रेयसी.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'गोडबोले आजोबांची जर्मन प्रेयसी' या कथेतील आहे. गोडबोले यांचा सराफीचा व्यवसाय. गोडबोऌे यांनी जर्मनीहून तराजू आणला. त्याच्यावर ते प्रेयसी प्रमाणे जीवापाड प्रेम करायचे सुवर्णनियंत्रण कायदयाअंतर्गत नाइलाजाने गोडबोले यांच्याबरोबर राहिलेली. त्यांची ती जर्मन प्रेयसी म्हणजे एक सुंदर तराजू होता. ती मेड इन जर्मनी वस्तू म्हणजेच गोडबोले आजोबांची जर्मनी प्रेयसी.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'गोडबोले आजोबांची जर्मन प्रेयसी' या कथेतील आहे. गोडबोले यांचा सराफीचा व्यवसाय. गोडबोऌे यांनी जर्मनीहून तराजू आणला. त्याच्यावर ते प्रेयसी प्रमाणे जीवापाड प्रेम करायचे सुवर्णनियंत्रण कायदयाअंतर्गत नाइलाजाने गोडबोले यांना आपल्या या प्रेयसीचा विरह सहन करावा लागला. ते आपल्या प्रेयसीला फुलामाळांनी सजवीत ते आपल्या प्रेयसीवरील दृष्टी क्षणभरांनाही विचलित नाही.

वरील आशय 'प्रेम' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७४. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः एक आण्याचा एक रूपया

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा प्रामाणिकपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

फर्स्ट क्लासच्या डब्यातून आवाज आला. अरे तो केळीवाला कुठं आहे. बोलवा त्याला मगं. लोकांनीच त्याला हुडकला. मघाशी ज्यांनी त्याचा तिरस्कार केला होता तेच त्याला बोलावू लागले. लोकांनी त्याला घेराव घातला. अरे मला पाच केळी दे मला दहा दे मला दोन दे... साहेब एक रूपयाला एक केळ पडेल. असू दे. गरजेनं वस्तूची किंमत वाढते. तसंच झालं. त्याची पाच डझन केळी खपली. साठ रूपये त्याने खिशात टाकले आणि आनंदाने तो रूळ ओलांडून गेला. अर्ध्या तासात गाडी सुटली पण त्यांच काम झालं होत. एक आण्याचा एक रूपया त्याला नियतीनं दिला होता.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'एक आण्याचा एक रूपया' कथेतील आहे. 'एक केळीवाला' हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. केळींवाल्याने केळी घेण्याची लोकांना विनंती केली. सकाळपासून केळीवाल्याची केळी खपली नव्हती. भुसावळ स्टेशनच्या अलीकडं अपघात झाल्यानं लोकांना खाणं जेवण मिळणार नव्हते. त्यामुळे लोकांना केळीवाल्याची आठवण झाली. सर्वांनी केळी विकत घेतली परंतु गरजेनुसार केळीवाल्याच्या केळींची किंमत वाढली. एका आण्याच केळ त्यांने एक रूपयाला ठेवले. तरीही लोकांनी त्याच्याकडील पाच डझन केळी खरेदी केली. त्यानंतर अर्ध्या तासांनी गाडी सुटली.

वरील आशय 'श्रमप्रतिष्ठा' व 'प्रामाणिकपणा' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७५ . वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः काळी माया

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ . न . म . जोशी

अपत्य प्राप्तीची स्त्री सुलभ स्वप्नं बाळगणा-या अनुराधा ताईंनी जीवनपूर्ती साधण्यासाठी एक निर्णय घेतला होता . एका मुलीला सन्मानानं कुटुंबात आणलं पण त्या बद्दलचा काहीसा मनःस्तापच सोसावा लागला . आज त्याचा जीवनवृक्ष एका बाजूला फळा फुलांनी डवरलेला आहे . सुखा समाधानाची सावली तो देत आहे . पण तरूण वयातच अनुभवलेली 'काळी माया' त्यांना विसरता येत नाही म्हणून तर त्यांनी पुस्तकाला नाव दिलं 'काळी माया'

वरील आशय 'न . म . जोशी' यांच्या 'काळी माया' या कथेतील आहे . "अनुराधा वैदय" हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत . आपल्या पुत्र प्राप्तीची स्वप्नं बाळगणा-या अनुराधाताईंनी जीवनपूर्ती साधण्यासाठी एक निर्णय घेतला . एका अनाथ मुलीला दत्तक म्हणून कुटुंबात आणलं . पण त्या बद्दल काहीसा मनःस्ताप सोसावा लागला . त्यांनी खूप कष्ट करून जीवनवृक्ष बहरवला . परंतु तरूण वयात अनुभवलेली "काळी माया" त्यांना विसरता आली नाही . त्यांनी त्यांच्या पुस्तकाला 'काळी माया' हे नाव दिलं . वरील आशय 'श्रमप्रतिष्ठा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे .

७६ . वंङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः बॅंकेत भर आणि विसरून जा .

मूल्य ः सहकार्य, प्रेम

कथानामक ः डॉ.न.म. जोशी

“आत सत्तरीला आलास धावपळ कमी कर लेखनवाचन वाढव.” मग शांताराम लिहलं. “सर अजून काही वर्षे तरी तुमचा सल्ला मानता येणार नाही. कारण जिवंत राहण्यासाठी केलेल्या कर्जाचा डोंगर मी हलका करतोय... काही दिवसांनी डॉ.वि.दा.करंदीकरांचं नागपूरहून पत्र आलं. पत्रासोबत वीस हजार रूपयांचा ड्राफ्ट होता. डॉ.करंदीकरांनी लिहिलं होतं... “बॅंकेत भर आणि विसरून जा.” शांतारामाचे डोळे त्या पत्रावर ओघळले. तो करंदीकरांविषयी जो मनाचा कोपरा झाकोळला होता तो उजळला आणि त्यांच्या मनाच्या मोठेपणांन शांताराम भारावला. त्यानं आपल्या मनाच्या बॅंकेत त्यांची आठवण भरून ठेवली.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘बॅंकेत भर आणि विसरून जा’ या कथेतील आहे. ‘शांताराम’ हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. डॉ.करंदीकर प्रसिद्ध कवी यांचा शांताराम विद्यार्थी. करंदीकर व त्यांची भेट होत असे. शांतारामने जीवन जगण्यासाठी जो कर्जाचा डोंगर उभा केला होता तो उतरावा व प्रेमाची सहकार्याची जाणीव राहावी यासाठी गुपचूप करंदीकरांनी शांतारामाच्या खात्यात एक लाख चाळीस हजारांचा चेक भरला व शांतारामला म्हणाले “बॅंकेत भर व विसरून जा.” त्यांच्या मनाच्या मोठेपणानं शांताराम भारावला. त्यानं आपल्या मनाच्या बॅंकेत त्याची आठवण भरून ठेवली.

वरील आशय ‘प्रेम’ व ‘सहकार्य ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः बोलणे झाले सहज निरोपाचे

मूल्य ः नितिमत्ता, वस्तुनिष्ठता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

असा हा कृष्ण आता निःसंग झाला होता. या देहाचे भवसागर त्याला तोडायचे होते. तो शेतावर गेला. नि त्रिगुणी वृक्षाच्या ओढयावर त्यानं हातातल्या पिशव्या ठेवल्या. त्यावर बरालेतली शाल ठेवली. दत्ताच्या व शिवाच्या तसबिरीसमोर आपण लिहिलेल्या अभंगाच्या वहया ठेवल्या. अभंगांच्या ६ व्या वहीत ५00 अभंग होते. मग ५0१ या कळसाचा अभंग लिहायला सुरूवात केली.

"कळसाचा अभंग लिहितो आज बोलणे झाले सहज निरोपाचे"

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'बोलणे झाले सहज निरोपाचे' या कथेतील आहे. 'कृष्णा' हा हया कथेतील प्रमुख पात्र आहे. कृष्णाने अभंग लिहिला व स्वतःची चिता स्वतः रचून तीवर पद्मासन घालून तो बसला. कृष्णाचे अग्नि समाधी स्थळ म्हणून प्रसिध्द आहे.

वरील आशय 'वस्तुनिष्ठता' व 'नितिमत्ता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७८. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : नाथांची लेखणी आणि तलवार

मूल्य : निर्भयता, निर्णयक्षमता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

काही क्षणांपूर्वी हातात तळपती तलवार घेऊन शत्रुसैन्यावर त्वेषानं चाल करून जाणारा हा योध्दा शांतपणे ज्ञानेश्वरीचा पुढचा अध्याय वाचत बसला. ध्यानस्थ पंत ध्यानसमाधीतून जागे झाले. त्यांना काहीच कल्पना नव्हती. ते बघतात तर वाडयाच्या अवतीभोवती कैदी सैनिकांची गर्दी आणि त्यांच्या स्वतःच्या सैनिकांचे उत्साही बोलणे "कसली गडबड आहे? हे कैदी कोण? " जनार्दनपंतांनी विचारलं आणि मग त्या सैनिकांनी पंतांना घडलेली सर्व हकीकत सांगितली. "आज्ञा कोणी दिली?" "एकनाथांनी" सैनिक म्हणाले आणि जनार्दन स्वामी एकनाथांच्या कतृत्वानं आनंदून गेले.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'नाथांची लेखणी आणि तलवार' या कथेतील आहे. 'एकनाथ महाराज' हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. एकनाथ महाराज जनार्दन पंत यांच्या सद्‌गुरू सेवेत सदैव असत. जनार्दन पंत ध्यानस्थ बसले असताना शत्रूंनी हल्ला केला. एकनाथ महाराजांनी तळपती तलवार घेऊन शत्रुसैन्यावर त्वेषाने चाल करून विजयी मुद्रेने माघारी आले. जनार्दन पंतांनी याची कल्पना नव्हती. जेव्हा त्यांना कळाले तेव्हा जनार्दन स्वामी एकनाथांच्या कर्तृत्वाने आनंदून गेले.

वरील आशय 'निर्भयता' व 'निर्णयक्षमता' ही मुल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७९. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः मातृभूमीचा मृदगंध

मूल्य ः राष्ट्रप्रेम, देशप्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आपल्या प्रिय मातृभूमीपासून दूर जायचं होतं मग त्यांन मूठभर मातीच घेतली. 'वासुदेव बळवंत की जय' आभाळं निनादून गेलं. एडनच्या तुरूंगातून तुरूंगाची लोखंडी दारं उचकटून आपली मुक्तता वासुदेवरावांनी करून घेतली. पण दुदैव इग्रंजांनी पुन्हा पकडलं आणि खंगलेल्या शरीराच्या या महान देशभक्तानं एडनच्या तुरूंगात १७ फेब्रुवारी १८८३ रोजी देह ठेवला. त्यावेळी त्यांच्या उशाशी भारत भूमीची मूठभर माती होती. मातृभूमीचा हा पवित्र मृदगंध घेऊनच त्यांनी शेवटचा श्वास घेतला.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'मातृभूमीचा मृदगंध' या कथेतील आहे. 'वासूदेव बळवंत फडके' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. आपल्या प्रिय मातृभूमीपासून दूर जायचं होतं मग त्यांनी मूठभर मातीच घेतली एडनच्या तुरूंगाची लोखंडी दारं उचकटून आपली मुक्तता वासूदेवांनी करून घेतली. त्यांनी जेव्हा एडनच्या तुरूंगात देह ठेवला त्यावेळी त्यांच्या

उशाशी भारत भूमीची मूठभर माती होती. मातृभूमीचा हा पवित्र मृदगंध घेऊनच त्यांनी शेवटचा श्वास घेतला.

वरील आशय 'देशप्रेम' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८०. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः अमृतकुंभ शुद्ध झाला

मूल्य ः श्रद्धा, प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

"मी इंद्र मला पांडुरंगानं तुम्हाकडं पाठवलंय अमृतकलशासाठी." 'जोहार मायबाप' पांडुरंगानं आमच नाव सांगितलं. "हो" मी तर महार पांडुरंगान माझ्यावर हे काय सोपवलं. यावेळी चोखोबांचे डोळे भरून आले. त्यांच्या डोळयतले दोन अश्रूमौतिक अमृतकुंभात पडले आणि काय चमत्कार अमृत शुद्ध झाले... नासलेलं अमृत शुद्ध झाले ते घेऊन इंद्र समाधानाने स्वर्गी गेला. अशी चोखोबांची थोरवी.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'अमृतकुंभ शुद्ध झाला' या कथेतील आहे. 'संत चोखोबा' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. भक्त चोखामेळा पाडुरंगाचे निस्सिम भक्त होते. त्यांच्या भक्तित एवढी ताकद होती की इंद्रदेवाकडे नाशवंत झालेले अमृत पांडुरंगाने चोखोबाकडे जाऊन शुद्ध करण्यास सांगितले. चोखोबांचे डोळे भरले. त्यातील दोन अश्रू नासलेल्या कुंभात पडले व अमृत शुद्ध झाले. एवढे प्रेम व श्रद्धा पांडुंरंगाबद्दल चोखोबांकडे होती.

वरील आशय श्रद्धा व प्रेम ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः साधू आणि कांतिकारक

मूल्य ः समतोल विचारसरणी, देशप्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

भाऊ खानखोजे यांनी यावरून असा निष्कर्ष काढला की आपण साधू होऊन स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणे हे श्रीरामाला मान्य नाही. स्वातंत्र्यासाठी लढत दयायला हवी. म्हणून नागोबाला नमस्कार करून ते झोपडीतून बाहेर पडले आणि सशस्त्र कांतीकारकांच्या कार्यात सामील झाले आणि साधूचा कांतीकारक झाला.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'साधू आणि कांतीकारक' या कथेतील आहे. 'भाऊ खानखोजे' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. जेव्हा ते चटईवर बसून ध्यानधारणा करीत होते तेव्हा एक भला मोठा नाग फणा काढून बसला होता. त्यांनी त्यावरून असा निष्कर्ष काढला की आपण साधू होऊन स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणे हे देवाला मान्य नाही. म्हणून ते नागोबाला नमस्कार करून झोपडीतून बाहेर पडले आणि सशस्त्र कांतीकरकांच्या कार्यात सामील झाले. वरील आशय 'समतोल विचारसरणी' व 'देशप्रेम' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः याचं कसं होणार

मूल्य ः प्रामाणिकपणा, श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

गोड नातीच्या सहवासात श्रीपाद आशा आजी आजोबांचा छान वेळ जातो. तीनही मुली उत्तम शिकल्या. मार्गी लागल्या. श्रीपादरावांना वयानुसार निवृत्ती घ्यावी लागली. तरी घरी गणिताचे अध्यापन ते करतच. मधुमेहाच्या त्रासानं आता त्यांच्या देहावर वस्ती केलीयं. मित्रांना वाटलं मुलीच्या काळजीनं पण त्यांना तेव्हा कळलं की एखादं अवघड गणित सरसर सुटावं तशा तीनही मुली शिकल्या. मार्गी लागल्या. लग्न झाली. नातवंड झाली आणि अशा कष्टाच्या खेळात आशाताई अमेरिकेलाही जाऊन आल्या. मोदी गणपतीच्या देवळात भेटलेल्या प्रौढ बाई आता त्यांना भेटल्या. त्यांच्या हाती काठी होती. आशाताई मनात म्हणाल्या "आमचं झालं आता तुमचचं कसं होणार बघा."

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'याचं कसं होणार' या कथेतील आहे. श्रीपादराव हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. श्रीपादरावांनी खूप कष्टाने व प्रामाणिकपणाने संसार चालवला. नातवंडाबरोबर खेळताना वेळ छान जातो. वयानुसार निवृत्ती घेतल्यानंतर घरी गणिताचे अध्यापन करत. मधुमेह झाल्यानंतर आशाताई नातवंडासाठी अमेरिकेला जाऊन आल्या.

वरील आशय 'प्रामाणिकपणा' व 'श्रमप्रतिष्ठा' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८३. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले

मूल्य ः श्रद्धा, नितिमत्ता, सत्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

“एकदा मी पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचं दर्शन घेते आणि मग तुमच्या बरोबर बादशहाकडे येते.” शिपायांनी तिला संमती दिली. कान्होपात्रा पंढरपूरला विठ्ठल मंदिरात आली. गळयात वीणा हाती चिपळया घेऊन ती देवा समोर बसून आळवू लागली,

‘नको देवराया अंत आता पाहू | प्राण हा सर्वथा जाऊ पाहे □

हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले □मजलागी जाहले तैसे देवा □’

खरोखरच विठ्ठलानं या हरिणीच्या पाडसाच्या बादशहारूपी व्याघ्राच्या तावडीतून सोडवलं. गाता गाता कान्होपात्रानं प्राण सोडले. ती विठ्ठलरूपी झाली. तिचा अचेतन देह समोर होता. बादशहाचे शिपाई हताश होऊन निघून गेले.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले’ या कथेतील आहे. संत कान्होपात्रा ही या कथेतील प्रमुख पात्र आहे. पायात चाळ बांधून नाचण्याऐवजी एका नाईकिणीची मुलगी गळयात वीणा अडकवून भजन करू लागली. बिदर बादशहाला कान्होपात्राच्या सौंदर्याची भुरळ पडली. इतरांच्या वासनेचा बळी होण्याचं कान्होपात्रानं साफ नाकारलं. बादशहाच्या शिपायांना विनंती करून पंढरपूरला गेली. तिथे देवासमोर बसून विठ्ठलाला आळवू लागली आणि विठ्ठलाने या हरिणीच्या पाडसाची बादशहारूपी व्याघ्राच्या तावडीतून सुटका केली. गाता गाता कान्होपात्राने प्राण सोडले. बादशहाचे शिपाई हताश होऊन परत गेले. वरील आशय ‘श्रद्धा’, ‘नितिमत्ता’, ‘सत्य’ ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८४. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः आधी साहित्यकार मग पत्रकार

मूल्य ः वस्तुनिष्ठता, सौजन्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

त्यांच्या गप्पा सरू होतात न होतात तोच... प्रख्यात टी.व्ही.पत्रकार करण थापर तिथं आले. शत्रुघ्न सिन्हा यांनी तशी खबर दिली. करण थापर यांच्या बरोबर टी.व्ही. ची कॅमेरामनसकट संपूर्ण टीम होती. करणजी आले. त्यांनी अटलजींना चरणस्पर्श केला आणि अत्यंत विनयानं ते म्हणाले "आपली मुलाखत हवी आहे. म्हणून सर्व टीम घेऊन आलोय." अटलजी प्रसन्न स्मितवदनाने म्हणाले "करणजी अच्छा हुआ आप आए"मगर अभी मुलाकात नही हो सकती आप शामको आयिए याफिर कभी... 'मगर अटलजी...मेरे साथ हमारी पुरी टीम है..." "मेरे सामने भी साहित्यकारोंकी टीम है"अटलजी म्हणाले आणि मग ते मृदू आवाजात करण थापर यांना म्हणाले "आधी साहित्यकार मग पत्रकार" रतनलाल सोनग्रा व लहू कानडे भारावून गेले.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'आधी साहित्यकार मग पत्रकार' या कथेतील आहे. यातील प्रमुख पात्र अटलबिहरी वाजपेयी आहेत. अटलजींची मुलाखत घेण्यासाठी करणजी यांनी सर्व टीम बरोबर आणली. अटलजी म्हणाले माझ्यासमोर साहित्यकार टीम आहे. नंतर करण थापर यांना म्हणाले "आधी साहित्यकार मग पत्रकार" त्यांच्या या वाक्याने रतनलाल सोनग्रा व लहू कानडे भारावुन गेले.

वरील आशय 'सौजन्य' व 'वस्तुनिष्ठता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः बुलबुल आणि कुंचला

मूल्य ः ज्ञानलालसा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

मग दादासाहेबांनी अर्थपूर्णरीतीनं बाळाकडं बघितलं आणि ते म्हणाले "श्री बुलबुल छान वाजतोय...पण मी तुला दिलं होतं..." होय दादा तुम्ही मलाच दिलं होतं पण माझ्यापेक्षा श्रीला ते अधिक आवडलं. मी त्याला देऊन टाकलं...दादा मला बुलबुलपेक्षा हा कुंचलाच अधिक

आवडतो." दादांनी प्रेमभरानं बाळाच्या पाठीवर थोपटलं आणि ते समाधानानं म्हणाले "हरकत नाही माझा एक मुलगा कुंचला घेईल दुसरा बुलबुल घेईल. दोघेही आपल्या क्षेत्रात मोठे होतील." शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे भविष्यात महान व्यंगचित्रकार आहेत.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'बुलबुल आणि कुंचला' या कथेतील आहे. 'केशव सीताराम ठाकरे' हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. केशवरावांची दोन्ही मुलं बुलबुल व कुंचला घेऊन काम करत. त्यातील लहान मुलगा म्हणजे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे ते पुढे मोठे व्यंगचित्रकार झाले आणि त्यांचे लहान बंधु बुलबुल वाजविण्यात तरबेज झाले. लहानपणापासून त्या दोघांना बुलबुल व कुंचला आवडले त्यांच्या या आवडीला केशवरावांनी प्रोत्साहन दिले व दोघेही आपआपल्या क्षेत्रात यशस्वी झाले.

वरील आशय 'ज्ञानलालसा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८६. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः थुंकणे आणि पाया पडणे

मूल्य ः वस्तुनिष्ठपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

काल तुम्ही थुंकलात तेव्हा मला रागवायला सांगत होता. तोच तुम्हाला पश्चाताप झाला तेव्हा क्षमा करायला सांगत आहात. तुम्ही काहीतरी सांगायचं आणि मी त्याप्रमाणे वागायचं म्हणजे गुलामीच पण महाराज तुमच्या मनानं तुम्हाला पश्चातापाची जाणीव दिली आहे. मग ती पुरेशी आहे. कोध प्रकट करतानाही तुम्ही विचार करायला हवा होता. तुम्ही विकाराचे गुलाम झालात. असे सांगून होऊ नका. स्वतंत्रपणे विचार करा मला बघा. तुम्ही राजे व्हाल. स्वतंत्र विचार हेच आपलं साम्राज्य.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'थुंकणे आणि पाया पडणे' या कथेतील आहे. 'गौतमबुध्द' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. थुंकणा-या व्यक्तीत गौतम बुध्दांच्या विचारांनी परिवर्तन झाले. दुस-या दिवशी त्याने गौतमबुध्दांची क्षमा मागितली त्याला पश्चातापाची जाणीव झाली. तो स्वतंत्र विचार करायला लागला.

वरील आशय 'वस्तुनिष्ठपणा' हा आशय रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः वेडात खरोखर जग जगते

मूल्य ः कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

मग वाईकरांना आपले शाळेतले तास दिसू लागले. विद्यार्थ्यांचे प्रफुल्ल चेहरे काही तरी नवीन समस्यांना त्यांच्या चेह-यावरचं समाधान, वर्गात निमार्ण होणारी सुंदर संवादी लय, ...तास संपताना विद्यार्थ्यांचे दिसणारे आनंदी समाधानी चेहरे, ...या सर्व आंदोलनाला विरजन घालून ठेवावे लागणार आणि त्या आनंदाच्या मोबदल्यात मिळणार काय मुख्याध्यापक पदाची प्रतिष्ठा तीही जातीच्या आधारावर...सोमनाथ वाईकरांनी विचार केला. 'मी खरा जंगम आहे.' मला कागदोपत्री जंगम व्हायचं नाही. माझ्या विद्यार्थ्यांना आनंद देणारा मी जंगमच आहे. लोक मला वेडा म्हणतील म्हणून देत वेडात खरोखर जग जगते आणि वाईकरांनी मुख्याध्यापकपद नाकारलं.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'वेडात खरोखर जग जगते' या कथेतील आहे. 'सोमनाथ वाईकर' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. मुख्याध्यापकपद त्यांनी नाकारलं कारण मुख्याध्यापक पदाची प्रतिष्ठा जातीच्या आधारावर मिळणार होती. ते खरे जंगम होते. कागदोपत्री जंगम व्हायचे नव्हते. त्यांना विद्यार्थ्यांना आनंद देणारा जंगम व्हायचे होते.

वरील आशय 'कर्तव्यदक्षता' व 'प्रामाणिकपणा' हे मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८८. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : देव झाला पंडित

मूल्य : आत्मविश्वास, निर्णयक्षमता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

तो भिंतीवर कोरलेल्या हनुमानाकडे अनिमिष नेत्रांनी बघत होता. आधीचे संवाद त्याने शांतपणे आत्मविश्वासाने ऐकले होते. मग जगन्नाथला पुढं बोलावलं...तु पुढं होणार कोण लोकमान्यांनी विचारलं जगन्नाथ उत्तरला एवढं म्हणून तो दादासाहेबांच्या मांडीवर जाऊन बसला देखील. लोकमान्य त्यांच्याकडं कौतुकानं बघत होते. ते एकदम म्हणाले "ठरलं दादासाहेब हाच मुलगा योग्य आहे. हा तुमच्या मांडीवर आत्मविश्वासानं येऊन बसला यालाच आता पंडिताच्या मांडीवर देऊ आणि मग जगन्नाथाला पंडिताकडं दत्तक दयायचं ठरलं.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'देव झाला पंडित' या कथेतील आहे. 'जगन्नाथ' हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. जगन्नाथ हा आत्मविश्वासानं पंडिताच्या मांडीवर येऊन बसला. त्याचा आत्मविश्वास पाहून जगन्नाथला दत्तक घ्यायचं ठरलं आणि जगन्नाथाचा जगन्नाथ महाराज झाले. लोकमान्य टिळकांचं ऋण अंशतः फेडले. देव असलेल्या पंडितांनी समाजमनावर आपली नाममुद्रा उमटवली.

वरील आशय 'आत्मविश्वास' व 'निर्णयक्षमता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८९. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः दिलूचे भाग्य

मूल्य ः नितिमत्ता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पन्नास रूपये म्हटल्यावर शिलूची आई पाघळली आणि तिनं दिलूला त्या बाईकडे देऊन टाकलं. शिलू हिरमूसली. पण काय करणार आणि दिलूला त्या जीन्सवाल्या बाईनं उचलून आपल्या इंडिका गाडीत ठेवलं. आपल्या गुबगुबीत मांडीवर त्याला घेऊन बसली. गाडी सुसाट पुढं गेली आता दिलू मोठा झाला आहे. उकिरडयावरचा दिलू आता मोठया बंगल्यात राहतो.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'दिलूचे भाग्य' या कथेतील आहे. दिलू हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. कचरा गोळा करणारी शालू हिने एका व्यक्तिनं दिलूला दत्तक घेण्याचा विचार सांगितला फक्त पन्नास रूपयांसाठी शालूने दिलूला दत्तक दिले. दिलूच्या बंगल्यात शालू कचरा गोळा करण्याचे काम करते. वरील आशय 'नितिमत्ता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९०. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः अमर भूपाळी

मूल्य ः प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

एके दिवशी वसंतराव देसाई अशीच एक मैफल आटोपून येत होते. हातात त्यांच्या आवडता मोग-याचा गजरा होता. तोंडाने ते गाणे गुणगुणत होते. मनान सूर रूंजी घालत होते.

आता घरी यायचं आणि पुन्हा तानपुरा ओढून बसायचं असं जणू त्यांनी ठरवलंही होते. काळ टपून बसला होता. त्यानं आपला फास सज्ज ठेवला होता. वसंत देसाई नामक अजरामर संगीतकाराचा वार त्यांच्या लेखी त्यानं राखुन ठेवला होता. वसंतरावांना त्याची सुतराम कल्पना नव्हती वसंतराव आपल्या राहत्या इमारतीच्या तळाशी आले. त्यांनी लिफ्टचा दरवाजा उघडला. आत शिरणार शरीर आत जाण्याआधीच लिफ्ट सुरू झाली आणि करवतीने कापावं तसे चिरले गेले. अमर भूपाळीचा कर्ता गतप्राण झाला. त्याच्या भूपाळीचे सूर मात्र अजरामर झाले.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'अमर भूपाळी' या कथेतील आहे. वसंत देसाई हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. संगीताचा कलांचा सगळा गुणमेळ असलेले वसंत देसाई एक मैफल आटपून येत होते ते लिफ्टमधून येताना शरीर आत जाण्याआधीच लिफ्ट सुरू झाली आणि करवतीनं कापावं तसा चिरला आणि अमर भूपाळीचा कर्ता गतप्राण झाला.

वरील आशय 'प्रामाणिकपणा' व 'कर्तव्यदक्षता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः तलावातले चांदणे

मूल्य ः श्रमदान, श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बंडा फणसळकर नावाचा एक कार्यकर्ता या कामात अत्यंत उत्साहानं आणि तडफेनं काम करीत होता. त्याला सर्व लोक 'तळेश्वर' असंच म्हणत. ७0 – ८0 लोक एकावेळी काम करीत होते. श्रम विसरण्यासाठी गाणी, गोष्टी, नकला, पोवाडा, देशभक्तीपर गीते होतीच आणि मग तलाव स्वच्छ झाला. तात्या बवरे यांच्या प्रेमळ हक्काचा आणि सुशीलाताईच्या अगत्याचा प्रभाव तलावातलं चांदणं सर्वांना सुखावून गेलं.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'तलावातले चांदणे' या कथेतील आहे. 'बंडा फळसणकर' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. सर्व लोक त्याला 'तळेश्वर' असं म्हणत. तो एका वेळी ७० – ८० लोकांचे काम करीत श्रम विसरण्यासाठी गाणी म्हणत. असा हा तळेश्वर तलाव स्वच्छ झाला की त्यांच्या प्रेमळ हक्काचा आणि सुशीलाताईंच्या अगत्याचा प्रभाव पडे.

वरील आशय 'श्रमदान' व 'श्रमप्रतिष्ठा' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः समाज वादाचा त्रिशूल

मूल्य ः वस्तुनिष्ठता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

डॉ.एस.एम.जोशी यांनी समाजवादी पक्षाच्या या त्रिशूलाचा यथायोग्य उपयोग केला. सानेगुरूजी सेवापथक सुरू करून शेकडो तरूणांना फावडे वापरून विधायक काम करायला लावले. धान्य वाढीच्या विरोधात अनेक वेळा आंदोलने सत्याग्रह करायला लावले. धान्य वाढीच्या विरोधात अनेक वेळा सत्याग्रह करून शेकडो कार्यकर्त्यांना घेऊन एस.एम. तुरूंगात गेले आणि आताच्या पोटनिवडणुकीत लोकशिक्षण करून ते मतपेटीद्वारा लोकप्रतिनिधी झाले. आपला हा विचार या एस.एम. यांनी साकार केला. डॉ. लोहिया व एस.एम.जोशी यांच्या रूपाने नवभारताच्या निर्मितीची तीन हत्यारेच तरूणांना मिळाली. ही तीन हत्यारे म्हणजे फावडे, तुरूंग व मतपेटी.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'समाज वादाचा त्रिशूल' या कथेतील आहे. डॉ.एस.एम.जोशी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. डॉ.एस.एम.जोशी यांनी समाजवादी पक्षाच्या या त्रिशुलाचा यथायोग्य उपयोग केला. त्रिशूलाचे पहिले टोक फावडे त्रिशुलाचे दुसरे

टोक तुरूंग त्रिशुलाचे तिसरे टोक मतपेटी. एस.एम.जोशी यांच्या रूपाने नवभारताच्या निर्मितीची तीन हत्यारेच तरूणांना मिळाली.

वरील आशय 'वस्तुनिष्ठता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९३. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः मोटारीचे बलिदान

मूल्य ः अवधान क्षमता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आश्चर्य म्हणजे सुरूवातीच्या काही क्षणातच ज्या चार माणसांनी प्रभाकर नरहरी विनायक तात्या यांना उलट झालेल्या गाडीतून सुखरूप बाहेर काढलं. ती चार माणसं अचानक कुठं गेली ते त्यांन कळलंच नाही. त्यांच नाव गाव पत्ता फोन नं. विचारायचं राहून गेलं आणि त्या माणसांनाही आपली विशेष ओळख दाखवली नाही. जणू काही ते एवढयाचं कारणासाठी अवतलेले देवदूत होते. उर्से नाक्याजवळ गाडी पूर्णपणे उलटया अवस्थेत पडली होती. टप फाटला होता. असं वाटत होतं की अपघाताचे धक्के स्वतःच्या अंगारात झेलत या माऊलीनं आपल्या प्रवासी बाळांना वाचवल होतं. गाडीनं स्वतःच बलिदान करून यांना वाचवलं होतं. नरहरीनं गाडीला हळदकुंकू वाहून ती गाडी विभाग कंपनीच्या हवाली केली. असं मोटारीचं बलिदान.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'मोटारीचे बलिदान' या कथेतील आहे. 'प्रभाकररावांची गाडी' ही या कथेतील प्रमुख पात्र आहे. उर्से नाक्याजवळ गाडी पूर्णपणे उलटया अवस्थेत पडली. इंजिन नादुरूस्त झालं पुराणातल्या अष्टावक्रासारखी गाडीची स्थिती झाली. त्या माऊलीने गाडीतील सर्वांना वाचवलं. नरहरीनं गाडीला हळदकुंकू वाहून ती गाडी विमा कंपनीच्या हवाली केली.

वरील आशय 'अवधान क्षमता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९४. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः समतेची समस्या

मूल्य ः समता, न्याय, वैचारिकता.

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पण प्रमुख परीक्षक म्हणाले हा तसा अन्यायच आहे. त्यांनी पूर्णपणे गुणवत्तेने स्थान प्राप्त केले आहे. इतरांना स्थान देताना कुणाचे तरी स्थान बळकावण्याची आवश्यकता नाही. मग काय करायचं? त्यांनी उपाय शोधला. त्यांनी संस्थेलाच विनंती केली की यावेळी अपवादात्मक स्थिती म्हणून आणखी एका अधिक पारितोषिकाची योजना करा. संस्थेनं ती आनंदानं मान्य केली आणि तिढा सुटला. खालच्याला वर आणण्यासाठी वरच्याला खाली खेचण्यापेक्षा खालच्यासाठी सुविधा निर्माण करणं आणि त्याला वरच्या रांगेत सन्मानानं बसवणं ही खरी समानता. शेतकरी आणि त्यांची पोरं आनंदित झाले.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'समतेची समस्या' या कथेतील आहे. 'एका शेतक-याचा मुलगा' हा हया कथेतील प्रमुख पात्र आहे. परीक्षकांनी निकाल जाहीर केले. एका शेतका-याच्या मुलाने पहिल्या तीन क्रमांकावरील मुलांपेक्षा थोडसं पण छान वक्तृत्व केले. पण नियमानुसार त्याला पारितोषिक देता येत नव्हते. खालच्याला वर आणण्यासाठी सुविधा निर्माण करणं आणि त्याला वरच्या रांगेत सन्मानानं ही खरी समानता.

वरील आशय 'समता' व 'वैचारिकता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः शाब्बास सुनबाई

मूल्य ः प्रसंगावधान, समयसूचकता.

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पाच सहा दरोडेखोर घाईघाईने बाहेर पडले आणि तेलामुळे घसरून आपटले. त्यांची अंगं तेलमय झाली पुन्हा उठून चालू लागले तर पुन्हा आपटले. अंगं तेलानं निथळत होती. तोपर्यंत मोबाईल फोनवरून सुनबाईंनी शेजा-यांना आणि पोलिसांना कळवलं होतं. पोलिसांची गाडी आली. सहाही दारोडेखोर तेलानं माखलेले पोलिसांना मिळाले. ऐवज मिळाला. तेलाचे डबे गेले पण एक ऐवज वाचला. सुनबाईंच्या या प्रसंगावधानानंतर त्यांना कधीही कुणी काही बोललं नाही उलट सासू सासरे म्हणाले शाब्बास सुनबाई.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'शाब्बास सुनबाई या कथेतील आहे. सुनबाई या कथेतील प्रमुख पात्र आहे. पाच सहा दरोडेखोर घरात घुसल्यानंतर प्रसंगावधाने सुनबाईने तेलाचे डबे ओतले. संगमरवरी रस्ता सगळा तेलमय झाला. त्यावरून दरोडेखोर घसरून आपटले. तोपर्यंत सुनबाईंनी फोनवरून शेजारी व पोलिसांना कळवले. पोलिसांनी चोरांना पकडले. ऐवज मिळाला. सुनबईच्या प्रसंगावधानंतर त्यांना कधीही कुणी बोलले नाही. वरील आशय 'प्रसंगावधान व समयसुचकता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९६. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः सचिवाालय ते शाळा

मूल्य ः ज्ञानलालसा, समाजसेवा, व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

वाकणकरांचा हा भाषा लौकिक त्याकाळी उच्च शिक्षणासाठी असलेले बोकील यांच्या कानी गेला आणि मग बोकीलांनी शिक्षकांच्या भाषा प्रशिक्षणाची योजनाच वाकणकरांसमोर ठेवली. औरंगाबाद महाबळेश्वर इथं शिक्षकांसाठी इंग्रजी भाषेच्या प्रशिक्षणाची शिबीरं घेतली. ती खूपच यशस्वी झाली. मग पुण्याच्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद या शासकीय संस्थेने शेकडो वर्गांसाठी वाकणकरांना पाचारण केलं.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'सचिवालय ते शाळा' या कथेतील आहे. 'वाकणकर' हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. वाकणकर निवृत्त झाले तरी स्वस्थ बसले नाही. त्यांच्या डोक्यावर लोकांनी इंग्रजी अध्यापनाचा जो मुकूट चढवला तो उतरवू देईनात. दयावयाच्या ७५ व्या वर्षी एखादया खेडयात इंग्रजीचा वर्ग घेताना वाकणकर दिसतात. कलेक्टर शाळा मास्तर झाले. पण ते समाजशाळेचे मास्तर झाले. त्यांच्या समाधानाचा 'अमृतकुंभ' भरभरून वाहतोय.

वरील आशय ज्ञानलालसा समाजसेवा व व्यासंग ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः मुख्याध्यापकांचा कोट

मूल्य ः न्याय, समता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

मग भैय्यासाहेबांनी या तकारीबाबत कसून तपास केला आणि त्यांना असं आढळलं की तकारीमध्ये थोडं तथ्यं असलं तरी बरंच तिखट मीठ लावून तकारी केल्या आहेत. मग भैय्यासाहेबांनी त्या कर्मचा-याला प्रेमळ सूचना दिल्या. तो कर्मचारीही ओशाळला. तकार करणारे नमलेली. तेव्हा दोघांनीही भैय्यासाहेबांना विचारले तेव्हा ते हसून एवढंच म्हणाले

“मुख्याध्यापकाच्या कोटाचे खिसे खूप मोठे असतात कारण त्याला अनेकांच्या तक्रारी सांभाळून ठेवायच्या असतात.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘मुख्यध्यापकांचा कोट’ या कथेतील आहे. ‘वा.म.दवडघाव’ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. मुख्याध्यापकाकडे कोणी तक्रार केली तर ते तक्रारीचा कसून तपास करत व चूक असणा-याची व चूक नसणा-याची या दोघांनाही समजाऊन सांगत व दोघांनाही योग्य न्याय देत ते म्हणत मुख्याध्यापकांच्या कोटाचे खिसे खूप मोठे असतात. कारण त्यात अनेकांच्या तक्रारी सांभाळून ठेवायच्या असतात.

वरील आशय ‘न्याय’ व ‘समता’ ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९८. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : मुख्याध्यापकांचा कोट

मूल्य : स्वच्छता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

म. गांधी जयंतीला शाळेत सफाईचा कार्यकम असे. सर्व विद्यार्थी आपापले वर्ग झाडीत पण मुख्याध्यापकांचं कार्यालय व शाळेचं कार्यालय हे कोण साफ करणार...शाळेचे सेवक शिपाई बाकडयावर बसून होते. भैय्यासाहेब दबडघाव आले. सुटाबुटात होते. त्यांनी शाळेचे कर्मचारी दि.द.तांबे यांच्याकडे एक लांब काठी व केरसुणी काठीला बांधुन घेतली आणि मुख्याध्यापक व्हरांडयातील जळमंट साफ करू लागले.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘मुख्याध्यापकांचा कोट’ या कथेतील आहे. वा.मा.दबडघाव हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. दबडघाव यांचे प्रशासन क्षमाशील वृत्ती पात्र आहे. दबडघाव यांचे प्रशासन क्षमाशील वृत्ती व राष्ट्रभक्त, संवेदनशील अंतकरण यासाठी त्यांचा

मोठा वाटा होता. म. गांधीजींच्या जयंतीनिमित्त स्वच्छता कार्यक्रम असतो. त्यावेळी स्वच्छता केली नाही तर हे मुख्याध्यापक स्वतः व्हरांडयाची व स्वतःच्या कार्यालयाची स्वच्छता करत. वरील आशय 'स्वच्छता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९९. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : दरवळला स्मरणगंध

मूल्य : ज्ञानलालसा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

मुलींना वर्गात रंगून शिकवता शिकवता राजकुॅंवरबाई स्वतः अध्ययनात रंगून गेल्या होत्या. एम.ए.एम.एड्. झाल्या. नवोपक्रम स्पर्धा आणि कृतिसंशोधन सत्रे यात भाग घेऊ लागल्या. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या मराठी परीक्षा समितीच्या अध्यक्षा झाल्या. शिक्षणाचं ध्येय तर त्यांनी काबीज केलंच होतं पण आता शारदेच्या दरबारातही त्यांचा संचार सुरू झाला तो लेखिका म्हणून.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'दरवळला स्मरणगंध' या कथेतील आहे. राजकुॅंवरबाई हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. कोवळया वयात लग्न झालेल्या राजकुॅंवरबाई शिक्षणाची आवड होती. त्यांच्या पतीने व सासूने त्यांना पुढे शिक्षण घेण्याची परवानगी दिली व शिक्षणाच्या ध्येयापोटी पछाडून जाऊन त्यांनी एम.ए.एड्. केले. नवोपक्रम व संशोधन सत्रे यात सहभागी झाल्या. त्यांना प्रसिध्द साहित्यिक रावसाहेब यांचे हस्ते पारितोषिक देण्यात आले.

वरील आशय 'ज्ञानलालसा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१00. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः दिघे यांची तीर्थ यात्रा

मूल्य ः कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आता मातृसेवा हीच त्यांची तीर्थ यात्रा. घरातले इतर सर्व कुटुंबीय मदत करतात. कधी कधी अर्चना, अमिता या सुनाही सासूला आंघोळ घालतात. लहानग्याला तीट काजळ करावं तसं त्यांना कपडे घालून सजवतात. बाहेरच्या माणसांना एकदम पाहिलं तर मुळीच कळणार नाही या बाईची अवस्था अशी आहे ते... अशी दिघे यांची मातृतीर्थ यात्रा सुरू आहे आणि हो महत्वाची गोष्ट म्हणजे सुन सुप्रिया आणि जे नी याही तीर्थयात्रेत आपलीही ओंजळ वाहते. मुक्या प्राण्याची ही अंजली मानवतेच्या विश्वास वाढवणारी आहे.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'दिघे यांची तीर्थयात्रा' या कथेतील आहे. या कथेत 'विजयाताई हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. विजयाताई एके दिवशी त्यांच्या एका कौटुंबिक शोकप्रसंगातून घरी आल्या आणि सुन्न बसल्या त्यांच्या जाणीव थंडावल्या. त्यांच्या मुलांनी, सुनांनी व नातवंडांनी त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास न देता त्यांची मनापासून सेवा केली. वरील आशय 'कर्तव्यदक्षता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१0१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

कथेचे नाव ः रानवा-याचा गंध

मूल्य ः संस्कृती विषयी आदर

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बाबांनी आता कोरेगावातून पुण्यात यावं. पुण्याच्या सांस्कृतिक जीवनातही त्यांना हवी ती ऊर्जा मिळेल. सर्वांना जवळ राहता येईल. मुलांनी मनोदय बोलून दाखविला. पण श्रीनिवास कात्रे यांनी काहीच प्रतिक्रीया दिली नाही. एका मुलांनी फारच आग्रह केला तेव्हा कात्रे हसून म्हणाले “माझी कर्मभूमी कोरेगाव आहे. हयात इथं गेली. आता या वयात दुसरीकडं जाऊन जान निर्माण करणं म्हणजे कठीण माझी नाळ या भूमीशी जोडलेली आहे. इथला रानवारा पिऊनच मी जगलो वाढलो. हा रानगंध ही माझी ऊर्जा आहे. पण तिथं काय उणं. पण त्या रानगंधाची उणीव भासेल. नाळ कशाला तोडू.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या ‘रानवा-याचा गंध’ या कथेतील आहे. ‘श्रीनिवास कात्रे’ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. त्याचं कौटुंबिक आयुष्य सुखासमाधानाचं आहे. सलग तीन तपे साता-यातले कोरेगावात सेवा केल्यानं तेथील संस्कृती विषयी त्यांना आदर व ओढ वाटू लागली. वयाच्या ७५ वर्षी मुलांनी आग्रह केला तरी ते कोरेगाव सोडून यायला तयार नाही. त्यांची नाळ त्या भूमीशी जोडलेली असल्याने ते दुस-या ठिकाणी जाऊन नवे नाते निर्माण करायला तयार नव्हते. साता-यातील रानमेवा खाऊन ते जगले. हा रानगंध त्यांची ऊर्जा आहे.

वरील आशय ‘संस्कृतीविषयी आदर’ हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१०२. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

कथेचे नाव : प्रजासत्ताक दिन

मूल्य : वैचारिकता, प्रेम

कथानामक : डॉ. न.म. जोशी

आनंद आता मोठा झाला होता. एका रात्री रक्ताची उलटी होऊन रोहणी ताईचा अध्याय संपला. निरवानिरव झाली. रोहिणीताईच्या खोलीत दिवा लागला होता. त्या रात्री

आनंद आपल्या आजोबांना म्हणाला "आजोबा तुम्ही आता तुमच्या खोलीत एकटं नाही झोपायचं. तुम्ही माझ्या जवळ माझ्या खोलीत झोपा. आता तुम्हाला मला सांभाळायचंय ..." आजोबा मनातलं दुःख मनात दाबून म्हणाले. आनंद आता खरचं मोठा झाला. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी श्रध्दांजली दिन आला.

वरील आशय डॉ.न.म.जोशी यांच्या 'प्रजासत्ताक दिन' या कथेतील आहे. 'आनंद व त्याची आजी रोहिणीताई हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. आपल्य तरूण मुलाच्या अकाली मृत्युचं दुःख उरी खोलवर बाळगून त्या आनंदाचा सांभाळ आनंदाने करीत. परंतु जेव्हा रोहिणीताईंना प्रजासत्ताक दिनी दिल्लीला जावं असं वाटत होते. तेव्हाच त्यांचे निधन झाले आणि आनंद आपल्या आजोबांना म्हणाला तुम्हाला आता मला सांभाळायचं. तुम्ही एकटे नाहीत. परिस्थितीने 'आनंद' ची वैचारिकता प्रगल्भ झाली. आजीने केलेल्या प्रेमामुळेच आजोबांवर तो आजी गेल्यावर तितकेच प्रेम करू लागला.

वरील आशय 'प्रेम' व 'वैचारिकता' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

**आशयाचे वर्गीकरण ः**

१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः सॉक्रेटिसची कसोटी

मूल्य ः सौजन्य, क्षमा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

दुरून त्यांनी झांटिपीला येताना बघितलं. ती जाताना तरातरा चालत जात होती. तशीच ती येताना चालत होती. उलट येताना पावलं जास्त आपटत होती. रागाने लाल लाल झालेले डोळे ती गरागरा फिरवत होती. तिच्या हातात कसली तरी टोपली होती. भली मोठी टोपली......झांटिपी आली आणि तिनं ती टोपली सॉक्रेटिसच्या अंगावर पालथी केली. ती कच-

याची टोपली होती. तीन निरनिराळया प्रकारचा कचरा होता. कागदाचे कपटे भाजीची देठं जुन्या खराब वस्तू.

एका क्षणात झांटिपीनं ही टोपली रिकामी केली. हे दृश्य पाहून सर्व शिष्य अवाक झाले ते शहारले... पण सॉक्रेटिस शांत होते. त्यांनी शांतपणे आपल्या अंगावरचा कचरा दूर केला. पुन्हा त्याच टोपलीत टाकला. (पृष्ठ क्र.५)

वरील आशय हा 'सॉक्रेटिसची कसोटी' या कथेतील आहे. सॉक्रेटिस हा या कथेतील प्रमुख पात्र असून कच-याची टोपली अंगावर टाकलेली असताना क्षमाशील, सौजन्य कसे असते हा आशय आला आहे. पुढे हाच सॉक्रेटिस एक महान तत्वज्ञानी म्हणून ओळखला गेला.

या कथेतील आशय 'क्षमा' व 'सौजन्य' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१.अ. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : सॉक्रेटिसची कसोटी

मूल्य : सौजन्य, क्षमा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

कुंभार आपल्या मडक्याची परीक्षा घेतो. ठिकठिकाणी टिचक्या मारून मडक कच्चं नाही ना हे बघतो. त्याप्रमाणे ती माझी परीक्षाच होती. पण महाराज त्या परीक्षेला मी उतरलो. सॉक्रेटिस म्हणाले आणि मग त्यांनी शिष्यांना एक महान तत्वज्ञान सांगितले. "जो माणूस स्वतःच्या रागाला स्वतःच सामोरं जातो तो दुस-यांच्या रागापासून सुरक्षित राहतो."

वरील आशय हा 'सॉक्रेटिसची कसोटी' या कथेतील आहे. सॉक्रेटिस हा या कथेतील प्रमुख पात्र आसून रागापासून वंचित राहून स्वतःच्या रागावर नियंत्रण ठेवण्याचा संयम

कसा ठेवावा हा आशय आला आहे. पुढे हाच सॉक्रेटिस महान तत्वेता होतो व लोकांवर संयम, क्षमा, सौजन्य हे संस्कार घडवतो.

या कथेतील आशय 'संयम' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : भगवान ख्रिस्त

मूल्य : सर्वधर्मसमभाव

कथानामक : डॉ. न.म. जोशी

नाव प्रभुदयाल मिश्रा आहे. ख्रिस्ती पाद्री आणि वस्त्रे भगवी...हा काय प्रकार आहे आणि मग एका साधकाने धाडस करून प्रभूदयाल मिश्रा यांनाच जरा भीत भीतच विचारले. "आपण ख्रिस्ती असून भगवे वस्त्रे कसे वापरता."

वरील आशय हा नमगोष्टी मधील 'भगवान ख्रिस्त' या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र प्रभुदयाल मिश्रा आहे. मिश्रा जातीधर्म मानत नसे. यात सर्व धर्मसमभाव हा आशय आला असून प्रभूदयाल मिश्रा त्यांची ईश्वर भगवान येशूवर अपार श्रद्धा होती. या श्रद्धेतून या कथेतील सर्व धर्मसमभाव हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२ अ. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : भगवान ख्रिस्त

मूल्य : राष्ट्रीय एकात्मता धर्मनिरपेक्षता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

“हे पहा मी योगाभ्यासही करतो. जातीभेदावर माझा विश्वास नाही. पण योगाभ्यासासाठी मी काही पथ्य पाळतो. मी स्वतः स्वयंपाक करून हविष्यान्न ग्रहण करतो आणि योगसाधना मी पूर्ण करतो.”

वरील आशय हा नमगोष्टी मधील ‘भगवान ख्रिस्त’ या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र प्रभुदयाल मिश्रा ईश्वरप्रेमी असल्याने जातीभेद मानत नाही रामकृष्ण परमहंस हेच साक्षात येशू आहेत ही त्यांची परमश्रद्धा होती. राष्ट्रीय एकात्मता व धर्मनिरपेक्षता ही मूल्ये रूजविण्यासी या कथेतील हा आशय उपयुक्त आहे.

३. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : माकडांची ध्यानधारणा

मूल्य : विश्वबंधुता, सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

भारतात अध्यात्मिक क्षेत्रात ईश्वरीय उपासनेचे अनेक संप्रदाय आहेत. प्रत्येक संप्रदायाची पद्धत वेगळी. रामकृष्ण परमहंस हे असे साधक होते की कोणत्याही संप्रदायाच्या व्यक्तीला ते नेहमीच जवळ करत. जात धर्म पंथ संप्रदाय याविषयी रामकृष्णांना तिटकारा होता. ईश्वरोपासना हा एकच विश्वसंप्रदाय आहे असे ते मानत.

वरील आशय हा नमगोष्टी मधील माकडांची ध्यानधारणा या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र रामकृष्ण परमहंस आहेत. ते जातीभेद मानत नाही. या कथेतून विश्वबंधुता हे मूल्य रूजविणे उपयुक्त आहे.

३ अ. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : माकडांची ध्यानधारणा

मूल्य : चारित्र्य, सभ्यता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

एकदा केशवचंद्र आणि ठाकूर यांचा संवाद चालला होता. केशवचंद्र समाजसुधारणा हे तत्व डोळयासमोर असावेच त्यावरोबर भोगपासना तृप्ती येते ती गाळून टाकली पाहिजे. असे ठाकूर यांनी सांगितले.

वरील आशय हा नमगोष्टी मधील माकडांची ध्यान धारणा या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र रामकृष्ण परमहंस असून त्यांच्यातील केशवचंद्र यांच्या संवादातून चारिज्य व सभ्यता हे मूल्य रूजविणे उपयुक्त आहे.

४. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : शिक्षकांची संपत्ती

मूल्य : कर्तव्यदक्षता, प्रामणिकपणा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

शिक्षकानं आपली नोकरी इमानेइतबारे केली. वर्गात मन लावून शिकवलं. विद्यार्थ्यांवर प्रेम केल. शिकवण्या घेतल्या नाहीत पण शिकवण दिली. मिळेल त्या पगारात समाधानानं राहून संसार केला.

वरील आशय हा नमगोष्टी मधील 'शिक्षकांची संपत्ती' या कथेतील असून या कथेत शिक्षक हे मुख्य पात्र आहे. त्यांचे काम प्रामाणिकपणे व कर्तव्य दक्षतेने केल्यास त्यांना त्याच्या कामात यशस्विता मिळते.

हा आशय कर्तव्यदक्षता व प्रामाणिकपणा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४ अ. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः शिक्षकांची संपत्ती

मूल्य ः शिष्टाचार नितिमत्ता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

वेटरनं बील आणून ठेवलं आणि पैसे देण्याआधीच त्यावर पेड असा शिक्का होता. इजिनिअर आश्चर्यचकित झाला. सारेच चकित झाले. काऊटरवरून एक माणूस पटकन पुढे आला आणि शिक्षकाच्या पाया पडला आणि म्हणाला सर आमच्या हॉटेलात प्रथम आलेले आहेत कधीच येत नाही. माझं भाग्य आज सर आले. मी त्यांचा विद्यार्थी. शिक्षक तर भारावून गेलेच पण इंजिनिअर व्यापारी हेही भारावले.

वरील आशय हा नमगोष्टी मधील शिक्षकांची संपत्ती या कथेतील असून या कथेत शिक्षक हे प्रमुख पात्र आहे. त्यांच्या विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे महत्व, प्रेम शिक्षकांच्या मित्रांसमोर या प्रसंगातून मांडले.

हा आशय नितिमत्ता व शिष्टाचार ही मूल्ये रूजविण्यासाठी योग्य आहे.

५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः ताजमहाल वाचला

मूल्य ः प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आणि २६ मार्च १८३० रोजी ताजमहालाच्या आवारात काही यंत्र येऊन धडकली. कसली होती ती यंत्र ? इमारत नेस्तनाबूत करण्याची यंत्र. ताजमहाल पाडून त्याचा संगमरवरी दगड जहाजातून इंग्लंडला पोहचविण्याचा घाट असावा. पण अचानक कुठून कळ फिरली कुणास ठाऊक. लंडनहून एक अध्यादेश आला आणि ताजमहालाच्या आवारातील यंत्र थंड झाली. बाहेर गेली. ताजमहाल वाचला. अमर प्रेमाचे प्रतिक अमर झालं.

वरील आशय नमगोष्टी मधील 'ताजमहाल वाचला' या कथेतील असून मुमताज हे त्यातील प्रमुख पात्र आहे. या प्रसंगातून बादशहाचे मुमताज वरील अमर प्रेम दिसून येते.

हा आशय प्रेम हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः नोटेपेक्षा कागद महाग

मूल्य ः वस्तुनिष्ठता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

हॅन्सचा परिचय बॅंकेतील खजिनदाराशी होता. मग हॅन्सला साधारणपणे एक तास आधीच पगार मिळायचा. पगार मिळाला की हॅन्स बाजारात आपल्या जरूरी वस्तू खरेदीसाठी

जायचा पगार विनारंग लवकर मिळाला हा तर ओळखीचा फायदा त्यापेक्षा महत्वाचा फायदा म्हणजे त्यानंतर वस्तू दहा, बारा टक्के भाववाढ झालेली असायची.

वरील आशय नमगोष्टी मधील नोटेपेक्षा कागद महाग या कथेतील असून माइस्का हे प्रमुख पात्र आहे. वेळेची बचत, श्रम व समय सूचकता हे गुण त्याकडे असल्याने त्याला चलनवाढीतील भाववाढ समजत असे. हा आशय वस्तुनिष्ठता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६ अ. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः नोटेपेक्षा कागद महाग

मूल्य ः अवधान क्षमता, वैचारिकता, प्रसंगावधानता, समयसुचकता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

जेव्हा वस्तूची भाववाढ झाली तेव्हा मदयपी भावाने मोकळया बाटल्या बाजारात विकल्या मोकळया बाटल्यांची किंमत त्याला दारूच्या बाटल्यांहून अधिक मिळाली. तो आपल्या निर्व्यसनी भावापेक्षा अधिक मालदार झाला होता.

वरील आशय नमगोष्टी मधील नोटेपेक्षा कागद महाग या कथेतील असून प्रमुख पात्र माइस्का हा जर्मन लेखक असून त्याने व्यवहार ज्ञानातून प्रसंगावधान, समय सूचकता, वैचारिकता कशी असवी हे सांगितलेले आहे.

हा आशय प्रसंगावधानता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : निःस्पृह न्यायमूर्ती

मूल्य : कर्तव्यदक्षता, नितीमत्ता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

मला लाच देण्याचा प्रयत्न तुम्ही दोघांनीही केला आहे.पण लक्षात ठेवा हे बरोबर नाही.मी समतोल न्यायाधीश आहे. खुशालराव तुमच्या पुडकयात पन्नास हजार रूपये होते. विशालराव तुमच्या पुडकयात साठ रूपये होते. हे तुमचे दहा हजार रूपये परत घ्या. आता दोघांचेही समान पैसे माझ्याजवळ आहेत. मी निःस्पृहपणे समतोल न्याय दयायला मोकळा न्यायमूर्तीच्या या निःस्पृह समतोल न्यायामुळं दोन्ही वकील आश्चर्याने थिजून गेले.

वरील आशय नमगोष्टी मधील निःस्पृह न्यायमूर्ती या कथेतील असून न्यायमूर्ती रामचंद्र भागोजीराव माहुलीकर हे गाजलेले न्यायाधीश प्रमुख पात्र असून या आशयातून न्याय देताना समतोलपणा व नीतीमत्ता चांगली ठेवून समान व योग्य न्याय कसा दयावा हे सांगितले आहे.

हा आशय कर्तव्यदक्षता व नितिमत्ता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : पाणिनीचा निश्चय

मूल्य : श्रमप्रतिष्ठा, नियमितता, सातत्य

कथानामक : डॉ. न.म. जोशी

पाणिनीचा आणि वाणिनीचा विदयाभ्यास सुरू झाला. पाणिनी इतर सर्व शिष्यांआधीच उठत असे. रामप्रहराच्या आत सर्व कामे उरकून तो पोथी काढून बसत असे.त्याची वाणी शुद्ध स्वच्छ होती.

वरील आशय नमगोष्टी मधील पाणिनीचा निश्चय या कथेतील असून पाणिनी हे त्यातील प्रमख पात्र आहे. या प्रसंगातून पाणिनीचा नियमितपणा व कष्टाळूपणा दिसून येतो.

हा आशय श्रमप्रतिष्ठा व नियमितता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८ अ. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : पणिनीचा निश्चय

मूल्य : ज्ञानलालसा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

पाणिनी रात्री फक्त तीन तास झोपत असे. आश्रमाची सर्व कार्य करून तो पाठांतराला बसे. दहा वर्ष कठोर तपश्चर्या केली. गुरूवर्यांनीही पाणिनीला वेळोवेळी मार्गदर्शन केले. पाणिनी महान व्याकरणकार झाला.त्याने आपली भाग्यरेषा बदलून टाकली. कठोर निश्चयाचं गोड फळ पाणिनीला मिळालं.

वरील आशय नमगोष्टी मधील पाणिनीचा निश्चय या कथेतील असून पाणिनी हा त्यातील प्रमुख पात्र आहे. या प्रसंगातून पाणिनीची ज्ञानासाठी चिकाटी, जिद्द दिसून येते.

हा आशय ज्ञानलालसा हे मूल्य रूजविण्यास उपयुक्त आहे.

९. वाड्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : पोळलेले हात तापलेली मने

मूल्य : निर्भयता, देशप्रेम

कथानामक : डॉ. न.म. जोशी

हातांनीच तापलेलं भांड चुलीवरून उतवलं. मदनलालचे हात चांगलेच पोळले. बोटं भाजली कातडी काळी ठक्कर पडली. प्रचंड आग होऊ लागली पण स्फोट होण्याचं टळलं. हात पोळले पण मन तापलेलं होतं... म्हणूनच हे धाडस शक्य झालं.

वरील आशय नमगोष्टी मधील 'पोळलेले हात तापलेली मने' या कथेतील आहे. मदनलाल धिंग्रा या कथेतील प्रमुख पात्र असलेले बॉम्ब तयार करण्याची कला हस्तगत करण्यासाठी व तयार बॉम्ब स्वातंत्र्य लढयात वापरण्याचे ठरवले.

या आशयातून धाडस देशाबद्दलचा अभिमान व निर्भय प्रेम दिसून येते. हा आशय देशप्रेम, निर्भयता व धाडस ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१०. वाड्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : धुंदी : मद्याची आणि कवितेची

मूल्य : वस्तुनिष्ठता, वैचारिक, व्यासंग

कथानामक : डॉ. न.म. जोशी

वोरकर गंभीर होत म्हणाले पाडगांवकर माझ्या मनात मरणाचे विचार आले हे तुमचे म्हणणे अगदी सत्य आहे. पण मरणाच्या विचाराला तुम्ही अशुभ का मानता? छेड अशीच शरीर सतार या कवितेने मी आनंद भैरवीची सुरूवात केली की शरीरसतार वाजवणारा परमेश्वर आहे.

कधी मृदुल कधी कठीण प्रहार असे मी परमेश्वराच्या संगीत निर्मितीच वर्णन केलं आहे. ज्याला तुम्ही मरण म्हणता तो सतारीवर त्याच्या हाताने केलेला कठीण प्रहार आहे असे मी मानतो. प्रहार मृदूल असो कठीण असो परमेश्वरानं तो केला आहे आणि त्याने सुरेल संगीताचीचं निर्मिती होते. मग ही निर्मिती अशुभ कशी असेल?

हा आशय नमगोष्टी मधील धुंदीः मदयाची आणि कवितेची या कथेतील आहे. कविवर्य बोरकर या कथेतील प्रमुख पात्र असून बोरकर व पाडगावकर यांच्यातील संवाद जीवन जगण्याची कला व परमेश्वराचे जीवन हे बहुमूल्य वरदान आहे. त्यातून जीवनाचा खरा अर्थ समजतो.

हा आशय वस्तुनिष्ठता व वैचारिक व्यासंग हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

११. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः शेवटचा शालीवाहन

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

इतका अंतर्वाहय शरीरानं, मनानं, आत्यानं आणि बुध्दीनं विचारानं आणि भावनेनं ओतप्रोत कवी मराठीत किंवा अन्य भाषांमध्ये दुर्मिळचं.

वरील आशय नमगोष्ठी मधील शेवटचा शाली वाहन या कथेतील आहे. बा.भ.बोरकर या कथेतील प्रमुख पात्र आहे. पु.ल.देशपांडे यांनी बोरकरांच्या सर्वांग व्यक्तिमत्वाचे व कष्टाळूपणाचे उल्लेखनीय वर्णन केलेले आहे.

हा आशय श्रमप्रतिष्ठा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः खड्डा, धोंडा आणि पाणी

मूल्य ः प्रेम, कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

सांगतो तर हे माझं नाटक नाही. हा माझा स्वभाव आहे. आपण शिक्षण क्षेत्रातील माणसं. सर्वांनी सर्वांशी संवाद साधला पाहिजे. मी माझ्या जीवनाच तत्वज्ञान पाण्याप्रमाणे ठेवलं आहे. पाणी वाहतं असावे वाटते. खड्डा आला भरून पुढं जातं धोंडा आला तरी वळसा घालून वाहत राहतं. आपण धोंडा आणि खड्डा व्हायचं का पाणी व्हायचं ते ज्याचं त्यानंच ठरवावं. प्राचार्य थक्क झाले.

वरील आशय नमगोष्टी मधील खड्डा धोंडा आणि पाणी या कथेतील आहे. प्राध्यापक हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. प्राचार्यांच्या अहम्‌पणावर प्रेमाने शाब्दिक संवादातून मात केली आणि आपल्या कामातील कर्तव्य तत्परता प्राचार्यांना सांगितली.

हा आशय प्रेम व कर्तव्यदक्षता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१३. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः मावळत्यानं केलं उगवत्याचं कौतुक

मूल्य ः समता, बंधुता, देशप्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

वकिमचंद्र म्हणाले मावळत्या सूर्यापेक्षा उगवत्या सूर्याला आदरानं आणि सन्मानानं वंदन केलं पहिजे. म्हणून मी हा हार तरूण कवी रविंद्रनाथ टागोर यांच्या गळयात घातला.

वरील आशय नमगोष्टी मधील मावळत्यानं केल उगवत्याच कौतुक या कथेतील आहे.बंकिमचंद्र हे त्या कथेतील प्रमुख पात्र आहे. तरूणपिढीला स्वातंत्रयाची जाणीव करूण देण्यासाठी व समाजकार्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून हे उद्गार काढले.

हा आशय समता, बंधुता, देशप्रेम व समाजकार्य हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१३ अ. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः मावळत्यानं केलं उगवत्याचं कौतुक

मूल्य ः आदर

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पोर्तुगीज राजवटीच्या राजकवींच्या अध्यक्षतेखाली एक कविसंमेलन भरलं होतं. या कविसंमेलनात पीटर लॉरिएट या तरूण कवीनं एक कविता वाचली.कविता प्रभावी झाली. राजकवी खूश झाले. त्यांनी आपला मानाचा पट्टा आणि कमरेची तलवार काढून तरूण लॉरिएटच्या कमरेला लटकवली आणि त्यांनी तिथल्या तिथं त्यांचा गौरव केला.हा ही प्रसंग असाच......

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'मावळत्यानं केलं उगवत्याच कौतुक' या कथेतील आहे.या कथेत पीटर लॉरिएट हे प्रमुख पात्र आहे. त्याच्या कवितेच्या वाचनाबद्दल व पामाणिकपणाने वाचन केल्याने राजाने त्याचा गौरव केला.

हा आशय आदर हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१४. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः इमाम अली एसेम

मूल्य ः संयम, शिष्टाचार

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

चवताळलेल्या जमावानं अडवाणींना घेरा घातला. जमाव काहीही करणार होता. अडवाणी व्यूहात अडकले होते. एवढयात ... एसेम पुढे आले अडवाणींना पाठीशी घातलं. खबरदार पुढं याल तर मला ठार मारल्यावरच अडवाणी तुमच्या हाताला लागतील. काय आश्चर्य जमाव निवळला पांगला अडवाणी पोलीस व्हॅनमध्ये सुरक्षित बसले आणि गेले.

वरील आशय नमगोष्टी मधील इमाम अली एसेम या कथेतील आहे. एसेम हे यातील प्रमुख पात्र आहे. अडवाणींचा संयम तसेच एसेम यांचा शिष्टाचाराने जमाव पांगला व अडवाणी निघून गेले.

हा आशय संयम व शिष्टाचार हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१५. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः बुडल्या बोटीतील जलदेवता

मूल्य ः सहकार्य, निःस्वार्थीपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

एक तरूण स्त्री म्हणाली 'मी परत बोटीवर जाते' पण त्या मुलाला घ्या. त्याचे आई वडील जीवननौकेत आहेत.त्याप्रमाणे बाळाची आईची भेट झाली. ती तरूण स्त्री पुन्हा बोटीवर गेली. तिचं नाव एडिथ इव्हान्स. एडिथनं स्वतःचं बलिदान देऊन आई बाळाची भेट घडविली

होती. आता जीवन नौका संपल्या टिटॅनिक शेवटची घटका मोजू लागली. सर्व प्रवासी आणि कर्मचारी जीवन नौकेतून गेले होते...आणि टिटॅनिकनं शेवटचा श्वास घेतला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'बुडत्या बोटीतील जलदेवता' या कथेतील आहे. एडिथ इव्हान्स ही स्त्री या कथेतील प्रमुख पात्र आहे. कठिण प्रसंगी स्वतःच्या प्राणांची आहुती देवून आई व मुलांची भेट घडविली.

हा आशय सहकार्य व निःस्वार्थीपणा हे मूल्य रूजविण्यासाठी योग्य आहे.

१६. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : नाथ आणि जगन्नाथ

मूल्य : प्रेम, श्रद्धा, भूतदया

कथानामक : डॉ. न.म. जोशी

"अगं तुझा नाथ म्हणजे मी. तुला गोळी घालणार नाही. तसाच आपल्या सर्वांचा नाथ जगन्नाथ परमेश्वर आपल्याला मारणार नाही. अशी मला खात्री होती म्हणून मी शांत होती. परमेश्वराची लीला अगाध आहे."

वरील आशय नमगोष्टी मधील नाथ आणि जगन्नाथ या कथेतील आहे. एकनाथ हा या कथेतील पात्र आहे. त्याची देवावर अपरंपार श्रद्धा प्रेम आहे. या श्रद्धेमुळेच त्यांनी कठीण प्रसंगी सर्वांचे प्राण वाचवले.

हा आशय प्रेम, भूतदया, श्रद्धा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः चौदा महिने तेरा दिवस

मूल्य ः सौजन्य, विश्वबंधुता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आपल्या जीवनात काही वर्षे त्यासाठी त्याला गजाआड घालवावी लागली. हा कालावधी होता चौदा महिने तेरा दिवस. त्यानं अनेकांच्या अंधा-या जीवनात प्रकाश आणला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'चौदा महिने तेरा दिवस' या कथेतील आहे. ज्ञानेश्वर हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. प्रामाणिकपणानं जीवन जगणा-या ज्ञानेश्वराला जेलमध्ये असंख्य संकटांना सामोरे जाऊन भटक्या विमुक्तांच्या उन्नतीसाठी त्याने कार्य केले.

हा आशय सौजन्य, विश्वबंधुता हे मूल्य रूजविण्यासी उपयुक्त आहे.

१८. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः बाळ तू टाकीत जा

मूल्य ः वैचारिक व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बाळ तू टाकीत जा असे सांगणारा राज म्हणजे औंधचे पंतप्रतिनिधी झाले. टाकीत जाऊन ख्यातनाम झालेला बळ म्हणजे आधुनिक वाल्मीकी कै.ग.दि.माडगूळकर.

वरील आशय नमगोष्टी मधील 'बाळ तू टाकीत जा' या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र ग.दि.माडगूळकर आहेत. ग.दि.माडगूळकरांनी आपल्या वैचारिकतेतून कविता नाटक चित्रपट संवाद लिहून हास्याचे डोंगर उत्पन्न केले.

हा आशय वैचारिक व्यासंग हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१९. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः सोय बघणारा तो सोयरा

मूल्य ः सौजन्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

दाजीकाका गाडगीळ हे असे अनेकांचे सोयरे आहेत. केवळ रक्ताच्या नात्यानेच नव्हे तर समाज संबंधातही तेही सोयरीक पाळतात.

वरील आशय नमगोष्टी मधील 'सोय बघणारा तो सोयरा' या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र दाजीकाका गाडगीळ आहेत. दाजीकाका यांनी आपल्या कर्तृत्वशलाकातून अनेक सगेसोयरे जोडले.

हा आशय सौजन्य हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१९ अ. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः सोय बघणारा तो सोयरा

मूल्य ः बंधुता, समता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

यांचं वचन दाजीकाकांनी आपल्या मनोभूमीत जोजवलं आहे. म्हणून तर ते दुःखाच्या हेलकाव्यांना झोपाळयाचे हेलकावे मानून सामोरे जातात. विद्याधरचे प्रिय पिताजी असणारे दाजीकाका यांची अनेक क्षेत्रातील सोयरीक आहे. शतमहोत्सवाकडे वाटचाल करणारा त्यांचा जीवनादित्य पूर्ण प्रकाशित होऊन कुटुंब व समाज यांच्या वृक्षांना पल्लवित करीत आहे. अशी सर्वांची सोय बघणारा तो सोयरा म्हणजे दाजीकाका.

वरील आशय नमगोष्टी मधील 'सोय बघणारा सोयरा' या कथेतील आहे. दाजीकाका गाडगीळ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. आपल्या निर्मळ स्वभावानेच व गोड सांषणानाने व सहकार्य दाजीकाका अनेक सगे सोयरे समाजात निर्माण केले व यशाचे उत्तुंग शिखर गाठले. हा आशय 'बंधुता' व 'समता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२०. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः घोडा परत घेऊन जावा

मूल्य ः सभ्यता, निर्भयता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

त्यानं घोडा परत केला आणि दुस-या दिवशी आपले दूत पुन्हा पाठवले. त्याच्याबरोबर त्याने मोबदला पाठवला. एक घोडा एक हजार रूपये आणि उंची पोशाखंही. अर्थातच हा मोबदला त्यानी राजीखुशीनं दिला नव्हता. मिर्झा मुकीमचे वेड अदयाप गेलेले नाही. असं मनुचीने दरबारात सांगितले असते आणि मग नोकरी गेली असती म्हणून कंजूष मुकीमने मोबदला वाढवला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'घोडा परत घेऊन जावा' या कथेतील आहे. मनूची हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. राजाच्या कंजूषपणाला हजर जबाबीपणाने व सभ्यपणे उत्तर

देऊन स्वतःचा मोबदला मनूचीने, युक्तीने व निर्भयतेने मिळविला. हा आशय सभ्यता व निर्भयता ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२१. वाड्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : व्हेनिस ते सुरत

मूल्य : श्रमप्रतिष्ठा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

जयसिंगानं दक्षिणेत विजापूरवर जी चढाई केली त्यात मनुचीने भाग घेतला होता. मग वसई गोवा या ठिकाणी तो गेला. मनूचीच्या अनेक भूमिका होत्या. तो वैदय होता. तो राजकारणी होता. तो मुत्सदी होता. अनेक ठिकाणी त्यानं शिष्टाई केली. मिसेस क्लार्क या विधवा बाईशी १६८६ मध्ये मनुचीने विवाह केला. तो उच्चशिक्षण घेतलेला विद्वान नव्हता. पण त्याची निरीक्षण शक्ती, इच्छाशक्ती जबरदस्त होती. म्हणूनच व्हेनिसहून पळून आलेला सुरत शहरात उतरलेला हा मुलगा हिंदुस्थानात अनेक हुदयांवर काम करीत होता. त्यानं लिहिलेली प्रवासवर्णने गाजलेली आहेत.

वरील आशय नमगोष्टी मधील 'व्हेनिस ते सुरत' या कथेतील आहे. मनुची हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. अनेक कष्ट करून अनेक कठिण प्रसंगाना सामोरे जाऊन मनुचीने हिंदुस्थानात स्वतःच नाव कमावले व तो प्रसिद्ध व्यक्ती म्हणून ओळखला जाऊ लागला.

हा आशय श्रमप्रतिष्ठा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२२ . वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः भाजी, विज्ञान आणि अध्यात्म

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा, सृजनशीलता

कथानामक ः डॉ . न .म . जोशी

सागर लाटांवर ऊर्जानिर्मिती . त्याचं घरीच मॉडेल तयार केलं . त्या जनित्रावर पंखे बसवून पवनचक्क्या चालतील आणि त्यातून दुहेरी ऊर्जानिर्मीती होईल असं त्यांनी प्रयोग शाळेत सिद्‌ध केलं . हा प्रयोग बघायला मा .विजय भटकर डॉ .वसंतराव गोवारीकर हेही येऊन गेले . आता हा प्रयोग त्यांनी शेगावच्या गजानन महाराज संस्थानाला देऊन टाकला आहे . पाटील यांनी आपल्या मनाची ऊर्जा या ऊर्जानिर्मितीच्या प्रयोगासाठी वापरली आहे .

वरील आशय नमगोष्टी मधील भाजी विज्ञान आणि अध्यात्म या कथेतील आहे . पांडुरंग दयाराम पाटील हा भाजी विक्रेता हे यातील प्रमुख पात्र आहे . त्यांच्या प्रयोगशीलतेच्या आवडीमुळे व सृजनशील वृत्तीमुळे केलेल्या श्रमाचे फळ म्हणजे ऊर्जानिर्मितीचा प्रकल्प .

हा आशय सृजनशील व श्रमप्रतिष्ठा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे .

२३ . वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः गुराख्याचा झाला महाकवी

मूल्य ः ज्ञानलालसा

कथानामक ः डॉ . न .म . जोशी

मग पती म्हणाले अस्ति कश्चित वाग् विशेष . या तीन शब्दांनी सुरूवात या गुराख्याने म्हणजे कालिदासानं तीन महाकाव्य लिहिली . अस्ति हा कुमार संभवाचा आरंभ कश्चिन

हा मेघदूताचा आणि वाग् हा रघुवंशाचा... ही महाकाव्ये खूप गाजली. गुराख्याचा पोर महाकवी कालिदास झाला.

वरील आशय नमगोष्टी मधील गुराख्याचा झाला महाकवी या कथेतील आहे. या कथेतील गुराख्याचे पोर म्हणजे महाकवी कालिदास हे प्रमुख पात्र आहे. वररूची ऋषींनी दिलेल्या गुरूमंत्रानी व ज्ञान लालसेमुळे त्यांच्या वाणीवर विशेष संस्कार झाले व त्यांनी कुमारसंभवाचा आरंभ व कश्चिन ही महाकाव्ये लिहिली व ते महाकवी झाले.

हा आशय ज्ञानलालसा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२४. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : उपमहापौरांचा बंगला

मूल्य : नितिमत्ता, कर्तव्यदक्षता, वस्तुनिष्ठता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

घरात असलेल्या समोरासमोरच्या दोन लोखंडी पलंगावर स्वच्छ चादरी अंथरलेल्या बैठया घरासमोर रांगाळी काढली आणि मध्ये रानफुलांचा गुच्छ असलेली एक फुलदाणी बैठया टेबलावर ठेवली. उपमहापौराचा बंगला सुमित्राराजे यांच्या स्वागतासाठी सिद्ध झाला. राणी साहेबांची गाडी थेटपर्यत येणंच शक्य नव्हत. मग त्याही पायउतार झाल्या आणि पुलाच्या वाडीतील उपमहापौर निवासात त्या सांत्वनासाठी दाखल झाल्या. राजघराण्याचा संपन्न वारसा असलेली एक सत्वशील माता एका झोपडीवजा जागेत समाचारासाठी आली होती. हे दृश्य ज्यांनी ज्यांनी बघितलं. त्यांचे डोळे भरून आले.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'उपमहापौरांचा बंगला' या कथेतील आहे. या कवितेतील प्रमुख पात्र सुरेश नाशिककर आहे. नाशिककर हे पुण्याचे उपमहापौर होते. परंतु त्यांच्यातील वस्तुनिष्ठपणा, नितिमत्ता व कर्तव्यदक्षता यामुळे साता-याच्या श्रीमंत सरकार सुमित्रा

राजे त्यांच्या सात्वनासाठी त्यांच्या पुनवडीतील झोपडीवजा घरात गेल्या होत्या व त्यांनी आपल्या भाषणातून उपमहापौर यांच्या बंगल्याची गोष्ट उदा. म्हणून सांगत होत्या.

हा आशय वस्तुनिष्ठता, नितिमत्ता व कर्तव्यदक्षता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२५. वांड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः मायेचं अन्न

मूल्य ः प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बल्लवानं आधी इतर अन्नाचा फडशा पाडताच आणि मग हे पाच लाडू खाल्ले... समाधानानं त्यानं ढेकर दिला. आणि म्हणाला "आता पुरे". यजमानपत्नी धनिक यजमान सारे चकित झाले. मायेच्या अन्नाची पोटभर किमया त्यांनी अनुभवली.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'मायेचं अन्न' या कथेतील आहे.या कथेत पांडव हे प्रमुख पात्र आहेत.बल्लवानं सर्व अन्न खाल्ले तरी त्याचे पोट भरले नव्हते. परंतु मातेने दिलेल्या पाच लाडूनी बल्लवानचं पोट भरले.

हा आशय प्रेम हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२६. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः माधुकरी आणि मातेरे

मूल्य ः देशप्रेम, समाजकार्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

याच काळात दादा न्यू इंग्लिश स्कूलमधे शिक्षक म्हणून नोकरी करीत. परंतू नोकरीचा पगार दादा संस्थेतच जमा करीत असतं. संस्थेतील गरीब आणि अनाथ मुलांवर दादांनी स्वतःच्या मुलांपेक्षा अधिक माया केली.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'माधुकरी आणि मातेरे' या कथेतील आहे. दादा केतकर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. पुणे विदयार्थी गृहाचे आधारवड असलेले दादा केतकर हे माधुकरी मागून पंचवीस तीस मुलांचे जेवण सहज भागवत असत.

हा आशय देशप्रेम व समाजकार्य हे मूल्य रूजविण्यास उपयुक्त आहे.

२७. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : परदेशींचा 'पेनकिलर'

मूल्य : श्रमप्रतिष्ठा, प्रामाणिकपणा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

परदेशी इंग्रजी शाळेत गेला. पेपर टाकणं दुकानात काम करणं शाळेत जाणं... अशा अनेक आघाडयांवर तो लढत होता. त्याचे कष्ट आणि तरीही त्याची अभ्यासातली चिकाटी पाहून त्याचे शाळेतील शिक्षक खैरेगुरूजी यांनी त्यावर्षी परदेशीला शाळेतील आदर्श विदयार्थी म्हणून घोषित केलं आणि पारितोषिक म्हणून त्याला एक फाऊंटन पेन बक्षिस दिलं.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील परदेशीचा ' पेनकिलर' या कथेतील आहे. परदेशी आडनावाचा मुलगा या कथेतील प्रमुख पात्र आहे. आदर्श विदयार्थी म्हणून परदेशीला मिळालेला पेन पाहून परदेशीच अंग दुखायच ठणकायचं या सारखी दुखणं दूर पळून जायची. त्याचा प्रामाणिकपणा व कष्टाळू वृत्तीमुळे हे पेन त्याला मिळाले होते. त्यामुळेच तो जीवनात एक यशस्वी माणूस म्हणून प्रसिद्ध झाला.

हा आशय प्रामाणिकपणा व श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

२८. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : महात्माजींना गुरूदेवांची भिक्षा

मूल्य : कर्तव्यदक्षता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

महात्माजी स्वतः गुरूदेवांना भेटायला आले. शांतिनिकेतनात दोन महात्म्यांचा संवाद सुरू झाला. पहिली विचारपूस झाली. इतर सर्व प्राथमिक बोलणं झाल्यावर मग अत्यंत प्रेमभराने गुरूदेवांना म्हणाले टागोरजी या देशकार्यात मी अनेकांजवळ काही मागत असतो हे तुम्हाला माहित आहे. अनेक जण मला भिक्षा घालतात.

वरील आशय नमगोष्टी मधील 'महात्माजींना गुरूदेवांची भिक्षा' या कथेतील आहे. गुरूदेव टागोर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. गुरूदेव आजारी असताना देखील आश्रमाचा कारभार अध्ययन लेखन भेटीसाठी या गोष्टी सुरूच ठेवल्या होत्या. डॉक्टरांनी विश्रांती सांगितली तरी त्यांनी घेतली नाही. त्यांचे अविश्रांत काम सुरूच होते.

हा आशय कर्तव्यदक्षता' हे मूल्य रूजविण्यासीठी उपयुक्त आहे.

२९. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : तैलबुद्धी जवाहर

मूल्य : सहकार्य, निर्भयता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

एक कळशीभर पाणी आणा ते वरून या ढोलीत ओता. चेंडू असला तर तरंगुन वर येईल. नाग साप असेल तर फुत्कारत बाहेर येतील. हे आधी आपल्याला कळेल. मग आपण दूर जायची युक्ती चांगली होती. मुलांनी मग कळशीभर पाणी त्या ढोलीत ओतलं. चेंडू तरंगून वर आला. मुलांनी आनंदानी टाळया वाजवल्या. जवाहरच्या तैलबुद्धीचं लोकांनी कौतुक केलं.

वरील आशय नमगोष्टी मधील 'तैलबुद्धी जवाहर' या कथेतील आहे. पंडित जवाहर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. पंडित जवाहर यांनी युक्तीने आपल्या सहकार्यांना मदत करून त्यांचा चेंडू त्यांना परत मिळवून दिला.

हा आशय 'निर्भयता' व 'सहकार्य ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३०. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः रामायणाचे रामायण

मूल्य ः भूतदया, निसर्ग प्रेम, दयाळूपणा, संवेदनशीलता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पारध्यानं बरोबर नेम धरला. त्या जोडप्यापैकी नराला तो बाण लागला. नर रक्तबंबाळ होऊन मरून खाली पडला. त्याची मादी विलक्षण आक्रोश करू लागली. दुःखानं पंख फडफडू लागली. मादीचा आक्रोश व्याकूळ करणारा होता. हृदय अतिशय हेलावणारे होते. वाल्मिकी ऋषींचे अंतःकरण गलबलले आणि त्यांच्या मुखातून अचानक शब्द बाहेर पडले.

वरील आशय नमगोष्टी मधील 'रामायणाचे रामायण' या कथेतील आहे. वाल्मिकी ऋषी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. एका पारध्यानं नर मादी पैकी नराला बाण मारल्यानंतर मादीचा आक्रोश पाहून ऋषीमुनीचे अंतःकरण गलबलले आणि त्या वेदनेतून त्यांच्या रामायण रचले. हा आशय भूतदया, संवेदनशीलता, दयाळूपणा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः ईश्वराचा साक्षात्कार

मूल्य ः श्रद्धा, वैचारिक व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

अरे मित्रा मोरीतलं पाणी आणि गंगाजल हे एकच आहे अशी दृष्टी तुला येईल तेव्हा माझ्याकडे ये. मी तुला साक्षात्कार घडवतो. मित्रा ईश्वर दर्शनासाठी मनातील घृणा काढून टाकली पाहिजे. जा भक्त अचंबित झाला त्याला ईश्वरी साक्षात्काराचं रहस्य समजलं होतं.

वरील आशय नमगोष्टी मधील 'ईश्वराचा साक्षात्कार' या कथेतील आहे. रामकृष्ण परमहंस हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. एक भक्त रामकृष्णांना ईश्वराचा साक्षात्कार व्हावा म्हणून मागे लागतो. तेव्हा त्या दोघांमध्ये जो संवाद झाला त्यातून रामकृष्णांची वैचारिक क्षमता किती विशाल आहे हे समजते. हा आशय श्रद्धा व वैचारिक व्यासंग ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः माता आणि भिकारीण

मूल्य ः देशप्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

होय गाढवाचा नांगर फिरलाय. उजाड झालीय भूमी पण याविषयीचं माझं प्रेम कसं उजाड होईल. अहो सर त्या वैराण भूमीच्या प्रेमाचं किती कौतुक कराल पांडे म्हणाले. भूमी वैराण असेल पण ती माझी मातृभूमी आहे. माता आहे. तिचं प्रेम? संवाद तिथेच थांबला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'माता आणि भिकारीण' या कथेतील आहे. या कथेत प्राध्यापक दिवाणजी हे प्रमुख पात्र आहेत. प्राध्यापक व पांडे यांच्यात भाषा वाद चालला असताना प्राध्यापकांचे आपल्या मातृभूमीवरील देशावरील प्रेम उत्स्फूर्तपणे पाहावयास मिळवते.

हा आशय देशप्रेम हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३२ अ. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः माता आणि भिकारीण

मूल्य ः धर्मप्रेम, भाषाप्रेम

कथानामक ः डॉ. न. म. जोशी

मित्रानो माझ्या सिधी प्रेमाचं तसंच आहे. माझी मातृभूमी कदाचित वैराण असेल...पण आज तिथून येऊनही चाळीस वर्ष झाली. मी ही कदाचित तसाच असेन...पण माझं प्रेम तेथल्या आईच्या दुधासारखं आहे. स्वच्छ निर्मळ...पोषक.

वरील आशय नमगोष्टी मधील 'माता व भिकारीण' या कथेतील आहे. यातील प्रमुख पात्र प्राध्यापक वरियाणी हे आहेत. भाषेतील वादातून त्यांचे आपल्या सिंधी धर्मावर व सिंधी भाषेवर किती प्रेम आहे हे समजते.

हा आशय 'धर्मप्रेम' व 'भाषाप्रेम' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३३. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः खुशवंतसिंग आणि हो चि मिन्ह

मूल्य ः संस्कृती विषयी आदर, सांस्कृतिक देवाण घेवाण

कथानामक ः डॉ. न. म. जोशी

अर्धा तास गुरूजींची आणि खुशवंतसिंग यांची मुलाखत सुरू होती. यावर खुशवंतसिंग लिहितात "मी यामुळे प्रभावित झालो काय? याचे उत्तर नक्कीच हे की होय. मी प्रभावित झालो त्यांनी आपले विचार माझ्यावर लादण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. त्यांनी माझ्या हृदयात हीच भावना निर्माण केली की कोणतीही गोष्ट समजून घेण्यात त्यांचे अंतःकरण मोकळे आहे." अशी ही खुशवंतसिंग आणि भारतीय हो चि मिन्ह यांची भेट.

वरील आशय नमगोष्टी मधील 'खुशवंतसिंग आणि हो चि मिन्ह' या कथेतील आहे. गुरूजी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. गुरूजी व प्रसिद्ध पत्रकार खुशवंतसिंग यांच्यातील संवादातून सांस्कृतिक विचारांची देवाण घेवाणातून त्यांचे अंतःकरण मोकळे केले

हा आशय सांस्कृतिक विचाराची देवाण घेवाण व सस्कृतीविषयी आदर ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३४. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः पत्रावळ आणि तांदळाचे दाणे

मूल्य ः वैचारिक व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

हा लहानसा तांदळाचा दाणा म्हणजे इतक्या सर्व गोष्टीचे प्रतिक आहे.तांदळाचा दाणा वाया घालविणे . सूर्यप्रकाशाला न आठवणे आणि एक म्हणजे भूमातेची कृतज्ञता न मानणे होय गुरूजी".

"मग म्हणून मी हे तांदळाचे दाणे वेचतो आहे". आणि शिष्य अंतर्मुख झाला.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'पत्रावळ आणि तांदळाचे दाणे' या कथेतील आहे. रमण महर्षी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. रमण महर्षी व शिष्य यांच्यात संवाद झाला. त्यातून रमण महर्षीनी आपल्या वैचारिक व्यासंगातून उपदेश केला.

हा आशय वैचारिक व्यासंग हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३५. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः 'लाल तांदूळ शुभ्र तांदूळ'

मूल्य ः नितिमत्ता, सैजन्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

दुस-या कुणाला काही दयायचं असेल तर आपल्याजवळ जे आहे त्यातील चांगल्यातल चांगलं दयावं. निकृष्ट कधी देऊ नये. आपण घरी लाल तांदळाचा भात खातो. पण इतरांना देताना मात्र शुभ्र तांदळाचा देतो.ही खरी सेवा आहे. हे खरं दान आहे. आपल्याजवळील टकाऊ माल दुस-याला देणं म्हणजे दान नव्हे.आजी म्हणाली सुधाला दानाचा खरा अर्थ कळला.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'लाल तांदूळ, शुभ्र तांदूळ' या कथेतील आहे. सुधा मुर्ती हया या कथेतील प्रमुख पात्र आहे. आजीनं दानाचा अर्थ उदाहरणासह सांगितल्यानं आजीच्या विचारातील नितिमत्ता व सौजन्य समजले.

हा आशय नितिमत्ता व सौजन्य ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३६ . वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः न्यायमूर्तीचा न्याय

मूल्य ः न्याय

कथानामक ः डॉ . न . म . जोशी

“आई माझा खेळ मी उजव्या हातानं खेळतो माझ्याच डाव्या हातानं या भिडूचा खेळ खेळतो . आता हा माझा भिडू जिंकला . म्हणून मी ‘जिंकला जिंकला’ असे ओरडलो . आईला आपल्या मुलाचं भारी कौतुक वाटलं . निर्जीव खांबालाही भिडू करणं तो जिंकल्यावर त्याच त्याला श्रेय देणं” .

द्यारील आशय ‘नमगोष्टी’ मधील ‘न्यायमुर्तीचा न्याय’ या कथेतील आहे . माधव हा या कथेतील प्रमुख पात्र आहे . आपल्या मुलाची न्यायप्रवृत्ती पाहून आईला आनंद वाटले . हा मुलगा मोठेपणी न्यायाधीश झाला त्याचे नाव न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे .

हा आशय ‘न्याय’ हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे .

३७ . वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः महिष बंधन तिलकाष्ठम्

मूल्य ः निर्भयता

कथानामक ः डॉ . न . म . जोशी

तेलीराम चौरंगावर आपला महिषबंधन तिलकाष्ठम् ग्रंथ मखमली कापडात गुंडाळून बसला होता आणि प्रति हारीन वर्दी दिली . महापंडित पराभव मान्य करून पळून गेले आहेत .

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'महिषवंधन तिलकष्ठम्' या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र तेनालीराम हे आहेत. तेनालीरामच्या तैलबुद्धीने महा पंडित यांच्या अहंकारावर मात केली.

हा आशय निर्भयता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३८. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : "बांगडया पितळेच्या नाहीत"

मूल्य : सहकार्य, समता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

नाना साहेबांनी जी घोषणा केली होती वर्गणी ऐच्छिक उपस्थिती आवश्यक ... ती अत्यंत यशस्वी झाली होती. त्यावर्षी संमेलनाच्या आनंदाचं समान वाटप झालं. घोरपडे सरांना मात्र नाना साहेबांचे उद्गार पुनःपुन्हा आठवत होते. 'तुमच्या मुख्याध्यापकांच्या बायकोच्या बांगडया पितळेच्या नाहीत' आणि नानासाहेबांच्या थोरवीनं ते अधिक भारावले.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'बांगडया पितळेच्या नाहीत' या कथेतील आहे. नानासाहेब नारळीकर हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. नानासाहेबांच्या सहकार्य व समता या गुणांमुळे शाळेतील सर्व मुलांना वार्षिक स्नेह संमेलनाचा आनंद घेता आला.

हा आशय सहकार्य व समता ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

३९. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः 'गुरवे नमः'

मूल्य ः सौजन्य, शिष्टाचार

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

"ये अच्छे साहित्यकार है, शिक्षक है इतनाही नही ये शिक्षकोंके शिक्षक हैं" असं म्हणताच अभिनेत्री हेमामालिनी यांनी वाकून त्यांच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. प्रा. थक्कं झाले. एवढी मोठी अभिनेत्री आपण कोण? प्रा.संकोचून म्हणाले आप यह क्या कर रही है मैं तो एक अध्यापक हूँ हमारे नृत्य क्षेत्र में गुरूओं का हम बडा सन्मान करते है आप तो गुरूणाम गुरू है □

वरील आशय नमगोष्टी मधील गुरवे नमः या कथेतील आहे. प्राध्यापक हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. प्राध्यापक हे शिक्षकांचे शिक्षक असल्याने शिक्षकांचा आदर करणे सन्मान करणे हे प्रत्येक व्यक्तीचा शिष्टाचार आहे. हाच शिष्टाचार प्रसिद्ध अभिनेत्री हेमामालिनी यांनी आपल्या सौजन्यशील स्वभावातून निदर्शनास आणला. हा आशय शिष्टाचार व सौजन्य हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४०. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः थर्डक्लास बाबा

मूल्य ः सहकार्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बाबा कॅन्सरनं गेले. मरणोत्तर धार्मिक विधी दिवसं बाहेरून जेवण मागवायचं ठरवलं. एका वेटरला ऑर्डर दिली. जेवणं आलं पण त्यानं पैसे घेण्याचे बिलाप्रमाणे नाकारले. “माझा व्यवसाय सुरू केला तेव्हा मला पहिलं भांडवल तुमच्या बाबांनी दिलं.” असं त्या वेटरनं सांगितलं.

वरील आशय नमगोष्टी मधील ‘थर्डक्लास बाबा’ या कथेतील आहे. अनिल कुमार चक्रवर्ती हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. अनिल कुमारांच्या सहकार्य वृत्तीमुळे मरणोत्तर देखील त्यांच्या मुलांना त्यांचा खूप उपयोग झाला.

हा आशय सहकार्य वृत्ती हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४० अ. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः थर्डक्लास बाबा

मूल्य ः वैचारिक व्यासंग

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बाबा सर्व परीक्षांमध्ये फर्स्टक्लासमध्ये पास झाले होते. केवळ मुलीला धीर देण्यासाठी त्यांनी आपण थर्ड क्लासमध्ये पास झालो असं सांगितलं होतं. आपले थर्डक्लास बाबा किती मोठे सुपरक्लास आहेत हे बेबीला जाणवलं आणि ती भारावून गेली.

वरील आशय नमगोष्टी मधील ‘थर्डक्लास बाबा’ या कथेतील आहे. अनिल कुमार चक्रवर्ती हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. अनिल कुमारांनी आपल्या मुलांवर चांगले संस्कार घडविण्यासाठी स्वतःची खरी ओळख न करून देता त्यांना प्रेरणा देण्यासाठी आपले परिवर्तनशील विचार मुलांना समजावून सांगितले.

हा आशय ‘वैचारिक व्यासंग’ हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः गरूड होऊन सोडवू तिजला

मूल्य ः स्वातंत्र्य, देशप्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पोलिस यांच्या मागावर आले. पाहतात तर छोटी छोटी पोरं...पोलिसांचा डाव फसला. एकही क्रांतिकारक हाताला लागला नाही. शे पन्नास पोरं मात्र होती सदूच्या हातात मशाल होती. या सार्जंटनं चिडून सदूला गोळी मारली. पोलिस गेले. सदूच्या हातातील मशाल खाली पडली सदू गेला. पण क्रांतिकारक वाचले. पोरं म्हणाली "केला पोत बळेचि खाले ज्वाला तरी ती वरती उफाळे.

वरील आशय नमगोष्टी मधील 'गरूड होऊन सोडवू तिजला' या कथेतील आहे. क्रांतीकारक हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता भूमिगत होऊन स्वातंत्र्यासाठी चळवळी निर्माण करण्यासाठी नियोजन करताना पोलिसांना भूमिगतांनी हुलकावणी दिली.

हा आशय 'देशप्रेम' व 'स्वातंत्र्य' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः आव्हान आणि आवाहन

मूल्य ः स्वातंत्र्य, बंधुता, न्याय

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

'लोकशाहीची मागणी करणे हे लोकशाही तत्वांशी सुसंगत आहे'. 'पण हे विदयमान राजवटीला आव्हान आहे'. बारवाडे नाही हे आवाहन आहे. आव्हान यात फार फरक आहे. होवो येवो असो ही आवाहने आहेत आव्हाने नाहीत. आवाहन कोणीही करू शकतो.पंचपोर, वकील, न्यायमूर्तीनी हा युक्तीवाद मान्य केला आणि हर्षे सुटले.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'आव्हान आणि आवाहन' या कथेतील आहे. द.स.हर्षे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. लोकांनी राष्ट्रविरोधी कृत्ये केलेली नसून राजवटीला विरोध दर्शविला आहे. लोकशाही मागणी करताना हर्षे यांना अटक झाली. युक्तीवादातून न्यायमूर्तीनी त्यांची सुटका केली.

हा आशय न्याय, समता, स्वातंत्र्य ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४३. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः माती आणि मोहरा

मूल्य ः सौजन्य, प्रामाणिकपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

"तूम्ही या धनाचं काय करीत होता" पुरून ठेवल होतं. "मग पुरलेल्या धनाची माती आणि मोहोरा काय ते धन तुमच्या तरी उपयोगी आणलं का तुम्ही" कौडीमलचे डोळे उघडले आचार्यांनी त्यांच्या मोहोरांची जपून ठेवलेली थैली त्याला परत दिली.कौडीमलला पश्चाताप झाला होता. त्यानं त्या सर्व मोहोरा आश्रमाला दान केल्या.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'माती आणि मोहरा' या कथेतील आहे. कौडीमल हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. आचार्यांनी कोडीमलचा कंजूषपणा कमी करण्यासाठी व त्याचे

डोळे उघडण्यासाठी थैली रिकामी दिली. परंतु नंतर मोहरांची थैली परत दिली.हा आशय सौजन्य व प्रामाणिकपणा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४४. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : 'मोठेपणाच्या कानामात्रा'

मूल्य : नितिमत्ता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

ऐलार निमंत्रित लेखक तळवलकर शेजारी बसले. मग तळवलकरांनी पुस्तकाचं प्रकाशन केलं. समोर व शेजारी बसलेल्यांनी टाळया वाजवल्या. फोटो झाला आणि मग शरद तळवलकर यांचाच चहा पिऊन समारंभ संपला. शेलार भारावून गेले.मोठेपणाचा कानामात्रा नसलेला हा साधा नटवर्य 'पुलं'चे उद्गार खरे होते.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'मोठेपणाच्या कानामात्रा' या कथेतील आहे. तळवलकर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. तळवलकर यांनी पुस्तकाचे प्रकाशन करण्यासाठी खर्च नको म्हणून स्वतःच्याच घरात प्रकाशन सोहळा पार पाडला.

हा आशय नितिमत्ता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४५. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : 'कविता आणि भूगोल'

मूल्य : ज्ञानलालसा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

आता या वहयांमधील कोणत्याही पानावरचा कोणताही मजकूर तुम्ही मला विचारा. मी तुम्हाला उत्तर देतो. शिक्षण संचालकांनी खरोखरीच एक दोन प्रश्न विचारले. ठोकळांनी ताडकन उत्तरं दिली संचालकांचा संशय फिटला कवी ठोकळांमधील भूगोल शिक्षक सप्रमाण सिद्ध झाला.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'कविता आणि भूगोल' या कथेतील आहे. ग.ल.ठोकळ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे .ग.ल.ठोकळ यांना शिक्षण संचालकांनी भूगोल विषयासंदर्भात प्रश्न विचारले त्याची उत्तरे त्यांनी पटकन दिली. कारण कवितेमुळे त्यांनी भूगोल विषयाचा सखोल अभ्यास केला.

हा आशय ज्ञानलालसा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४६. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : 'प्राजक्त, निशिगंध आणि झेंडू'

मूल्य : वस्तुनिष्ठता व समता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

आमच्या हातांना आणि मनाला सवय असू दे. आमच्या नाव-यांनाही जाणीव असु दे की आपल्या आई बाबांचेच नाही तर बायकोच्या आई बाबांचेही आपण कुणीतरी आहोत.या सुंदर विचारांनी विजयाताईच्या संसाराची फुलबाग फुलली आहे. प्राजक्ता, निशिगंधा आणि नवरा झेंडू

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'प्राजक्त निशिगंध आणि झेंडू' या कथेतील आहे. विजया वाड हया या कथेतील प्रमुख पात्र आहे. विजया वाड यांनी आपल्या मुलींना संस्कृतीतून संस्कार घडविले.त्याच संस्काराचे प्रतिक म्हणून लग्न झाल्यावरही त्यांच्या मुली आपल्या आई

वडिलांना निवृत्ती वेतन देतात. मुलगा व मुलगी हा भेद न मानता विजयाताईंनी आपल्या संसाराची फुलबाग ही सुसंस्कारांनी घडविली.

हा आशय वस्तुनिष्ठ व समता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः 'शहारे आणि रोमांच'

मूल्य ः शिष्टाचार

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

रात्रीच्या भयाण अंधारातला जीवघेणा प्रवास अंगावर शहारे आणणारा होता. पण आता लोकमान्यांच्या दीडशेव्या जंयतीला मला प्रमुख अतिथी या नात्याने त्यांच्या पुतळयाला हार घालताना जी धन्यता वाटते त्याने अंगावर रोमांच उभे राहिले. एकाच प्रसंगात शहारे आणि रोमांच यांचा अनुभव देणारा हा प्रसंग.

वरील आशय नमगोष्टी मधील 'शहारे आणि रोमांच' या कथेतील आहे. लेखक हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. प्रवासातील अनेक संकटांना सामोरे जाऊन मृत्युच्या दाढेतून बाहेर पडल्यावर प्रमुख पाहुणे यांचे जिथे आमंत्रण होते तेथे गेल्यावर तेथील आदरातिथ्य व प्राचार्य यांचे लोकमान्यांच्या जीवन प्रसंगातील रोमहर्षक क्षण ऐकल्यावर त्यांच्या अंगावर शहारे आणि रोमांच उठले.

हा आशय 'शिष्टाचार' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४८. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः खॉसाहेब टिपू खॉ

मूल्य ः श्रमप्रतिष्ठा, नियमितपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

तंबोरे आणि सतारी जुळवल्या गेल्या. खॉसाहेब येऊन बसले आणि खॉसाहेबांनी हाक दिली. आओ टिपूमियॉ. टिपू ऐटित आला आणि खॉसाहेबांच्या आधी टिपू गायला. सर्क शीचे मालक थक्क झाले ते मनातल्या मनात म्हणाले असतील खॉसाहेब अव्दुल करीम खॉ आणि त्यांच्याशिवाय खॉसाहेब टिपूमियॉ...

वरील आशय नमगोष्टी मधील खॉसाहेब टिपू खॉ या कथेतील आहे. संगीतरत्न अव्दुल करीम खॉसाहेब हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. खॉसाहेबांनी आपले लाडके कुत्रे टिपू हयाच्याकडून नियमित सराव व कष्टाने संगीतचा रियाज करून घेतला. त्यामुळे एका कार्यक्रमात टिपू खॉसाहेबांच्या आधीच गायला व लोकांची वाहवा मिळविली यावरून कष्ट व नियमित सराव केल्याने कोणत्याही प्राणी व मानव यांना अशक्य गोष्ट साध्य होते.

हा आशय प्रेम व सहकार्य हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

४९. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः डेरवण ते दिल्ली

मूल्य ः प्रेम, सहकार्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

तेव्हा...तेव्हा दिगंबरदास महाराजांचा प्रसादच त्यांच्या कामी आला. एक महिन्यानंतर हरिद्रनाथांनी हॉस्पिटलचा निरोप घेतला. घरी गेले पण त्यांच्या मनात वारंवार रूंजी घालणारी आठवण येत होती ती डेरवण ते दिल्ली प्रवासाची. कुठं डेरवण कुठं दिल्ली. पण डेरवणचा प्रसाद दिल्लीत उपयोगी आला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'डेरवण ते दिल्ली' या कथेतील आहे. चटोपाध्याय हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. डेरवण मधील एका चटोपाध्याय हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. डेरवण मधील एका कार्यक्रमातील प्रेमाची भेट प्रसाद त्यांना दिल्लीला हॉस्पिटलसाठी उपयोगी पडला. हरिद्रनाथांनी केलेले पैशाचे सहकार्य अडचणींच्या वेळी चटोपाध्याय यांना उपयोगी पडले.

हा आशय प्रेम व सहकार्य हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५०. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः फटया बापू चा डायनिंग हॉल

मूल्य ः दयाळूपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

तुम्ही फार जवळ येऊ नका...ही माझी बाळं भित्यात...दुरून बापूला पाहिलं की झाडांवर आणि फाटयांवर वाट बघत बसलेले हे पक्षी खडकावर गोळा होत. आलो रे माझ्या बाळांनो असं बापू म्हणे आणि मग ते अन्न खडकाच्या ताटावर वाढून ठेवी. मग पक्ष्यांचे भोजन सुरू होई.

वरील आशय नमगोष्टी मधील 'फटया बापूचा डायनिंग हॉल' या कथेतील आहे. यातील प्रमुख पात्र फटया बापू हे आहेत. त्यांचे पक्ष्यांबद्दलचे प्रेम त्यांच्याबद्दलची आपुलकी व

दयाळूपणा हे हया प्रसंगातून दिसून येते. गावातून मागून आणलेले अन्न पक्ष्यांना देत व नंतर स्वतः खात .

हा आशय दयाळूपणा व भूतदया ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५१. वाड्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : जगन्नाथे केले मज सकळ लोकांत बरवे

मूल्य : समतोल विचारसरणी

कथानामक : डॉ. न.म. जोशी

द.सा.मिरासदार प्रथमपासून मिस्किल स्वभावाचे ...कोटीबाज... पुन्हा एकदा गदिमा यांनी ही ओळ गुणगुणली जगन्नाथे केले मज सकल लोकांत बरवे दमा हसले. तेव्हा गदमांनी विचारलं... का हसलात तुम्हाला काय कळलं मला एवढेच कळलं की कोणीतरी उपवर मुलीचं लग्न जगन्नाथ बर्वे या नावाच्या मुलाशी झालं आणि ती ...उखाणा घेताना म्हणाली जगन्नाथ केले मज सकल लोकांत बरवे आणि हास्याचा प्रचंड स्फोट झाला.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'जगन्नाथे केले मज सकळ लोकांत बरवे' या कथेतील आहे. माडगूळकर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. कथानकाच्या एका दौरयावर असताना मिरासदार यांनी गदिमा हयांच्या कोटीबद्ध ओळ गुणगुणली .

हा आशय समतोल विचारसरणी हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५२. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : 'बर्फी नको पण कवी आवर'

मूल्य : वस्तुनिष्ठपणा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

अण्णासाहेब तुम्हीच त्यांना फार मोठ केलात अहो रविद्रनाथांचा उजवा हात आहे. आता या उजव्या हातानं दिलेली बर्फी घेत जा आणि दर रविवारचे दोन तास घालवत जा. मजा आहे... दोघेही जण फोनवरूनच मनसोक्त हसले आणि बर्फीचा संवाद संपला.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'बर्फी नको पण कवि आवर' या कथेतील आहे. कविवर्य व माडगूळकर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. गदिमा व शिक्षक हयांच्यातील संवादातून वस्तुनिष्ठ परिस्थितीला सामोरे कसे जायचे हे समजते. हा आशय 'वस्तुनिष्ठपणा' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५३. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : 'प्रधानाचं उत्कृष्ठ चित्र'

मूल्य : श्रमप्रतिष्ठा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

महाराज यानं माझा भूतकाळ आठवला. मी हि-याच्या शोधत होतो. म्हाणून दगड फोडत होतो. परिश्रम एकाग्रता व ध्येय याची आठवण या चित्राने होते. राजेसाहेबांनी प्रधानाचं कौतुक केलं. चित्रकाराचा मोठा सत्कार केला.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'प्रधानाचं उत्कृष्ठ चित्र' या कथेतील आहे. प्रधान हा या कथेतील प्रमुख पात्र आहे.

वरील प्रसंग प्रधान व महाराज याच्यातील संवाद असून प्रधानानं आपल्या हुशारीनं राजासाहेबांची शाब्बासकी मिळविली एक दगड फोडया प्रधानाच्या पदापर्यंत खूप परिश्रम करून पोहोचला.

हा आशय श्रमप्रतिष्ठा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५४. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : 'समाधानाची खरेदी'

मूल्य : न्याय

कथानामक : डॉ. न.म. जोशी

ज्या कुळाकडं अठराविश्व दारिद्रय होत. त्यांना दिवाणजींनी कर्ज माफ करून टाकलं. ज्यांची परिस्थिती बेताची होती त्यांना व्याज माफ करून टाकलं आणि अशा रीतीनं त्यांनी लोकांचा दुवा घेतला. कुळं आनंदली. त्यांच्या कष्टी चेह-यावर समाधान दिसू लागलं

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'समाधानाची खरेदी' या कथेतील आहे. सावकार व दिवाणजी हे हया कथेतील प्रमुख पात्र आहे. दिवाणजीने गरीब लोकांचे कर्ज माफ केलं आणि व्याज माफ केलं. या घटनेनंतर त्या गरीबांच्या चेहरयावर समाधान दिसते.

हा आशय न्याय हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५४.अ. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः 'समाधानाची खरेदी'

मूल्य ः समाधान, प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

महाराज कुळांना मी कर्ज माफ केलं. त्यांच्या जवळचा आनंद आणि मी त्यांना कर्ज माफ करून मिळाला आणि तुमच्याकडं तो आणून पोहोचवला. तुमच्याकडे समाधान नव्हतं. ते तुम्हाला मी अशा रीतीने आणून दिलं. मी प्रेमाची आणि समाधानाची खरेदी केली. ती तुमच्याकडे नव्हती. सावकाराने दिवाणजीचा सत्कार केला.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'समाधानाची खरेदी' या कथेतील आहे. सावकार व प्रधान हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत.सावकाराला आपली चूक लक्षात आल्यावर प्रधानाचा सत्कार करतो व कुळातील लोकांचे भरभरून प्रेम पाहून सावकाराला समाधान वाटलं.

वरील आशय समाधान व प्रेम ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५५. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः 'पाण्यासाठी दाही दिशा'

मूल्य ः कष्टाळू वृत्ती व संयम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

राम बक्षणी ज्या काळात दुबईल गेले त्या काळात बदाऊनी पाण्यासाठी पैसे मोजत होते. वापरायच्या पाण्यासाठी चार आणे तर पिण्याच्या पाण्यासाठी आठ आणे पैसे देत होते. त्यातही कधी कधी मेलेल्या माशा झुरळ माती असायची. पाणी उकळून गाळून घ्यायचे. त्यावेळी

वीज ही मुबलक प्रमाणात नव्हती. अशा कठीण काळात उध्योगपती राम बक्षणी यांनी अन्नासाठी दाही दिशा आणि पाण्यासाठी दाही दिशा भ्रमंती केली.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'पाण्यासाठी दाही दिशा' या कथेतील आहे. या कथेतील प्रमुख पात्र 'राम बक्षणी' हे आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ही संयम ठेऊन सातत्याने कष्ट केले तर निश्चितच त्याचे फळ हे चांगलेच मिळते.

वरील आशय कष्टाळू वृत्ती व संयम ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५६. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : 'रंग माझा वेगळा'

मूल्य : सौजन्य

कथानामक : डॉ. न.म. जोशी

जनरल करिअप्पांच्या हातून वीस रूपयांची नोट घेताना मला जसा आनंद झाला होता. तसाच आनंद मी तुम्हाला देतो अनंतराव चित्रकार आहेत. रंगरेषांनी लयकारी आहेत. ते म्हणतात 'सत्यपुरूषांची चित्रं काढून मी कृतार्थ झालो आहे' 'रंगुनी रंगात सा-या रंग माझा वेगळा ... असेच त्यांच्या विषयी म्हणता येईल.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'रंग माझा वेगळा' या कथेतील आहे. या कथेत अनंत हे प्रमुख पात्र आहे. अनंतरावांच्या सुदंर हस्ताक्षर व चित्रकलेमुळे त्यांना लहानपणी करिअप्पांनी वीस रूपयांची नोट बक्षीस म्हणून दिली. त्यांनी त्याच पद्धतीनी शाळेतील मुलांना कौतुकाची बक्षीसं दिली . वरील आशय 'सौजन्य' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५७. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः लिमलेटच्या दोन गोळया

मूल्य ः वस्तुनिष्ठता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आणि काय आश्चर्य श्रीरामला एकदम अवसान आले. भीषण आठवले आणि टाळयाला चिकटलेली जीभ सुटून तो भडाभडा बोलायला लागला. मग काय श्रीरामची गाडी भरधाव सुटली त्यानं स्वतःचेच नव्हे तर इतरांचेही संवाद फाडफाड म्हटंले. टिळक त्यांच्याकडे आ वासून बघत होते. मुंडले सरांचे डोळे विस्फारले नाटिका संपली टाळयांचा कडकडाट झाला. पडदा पडला. श्रीराम ताठ मानेनं उभा होता. मुंडलेसर आले. त्यांनी मोठी शाबासकी दिली. छान काम केलं. म्हणाले आणि प्रत्येकाला दोन दोन लिमलेटच्या गोळया दिल्या.

वरील आशय नमगोष्टी मधील 'लिमलेटच्या गोळया' या कथेतील आहे. डॉ.श्रीराम लागू हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. गोखले नाटिकेतील संवाद विसरल्यानंतर त्यांना दोन लिमलेटच्या गोळया दिल्यानंतर त्यांनी सर्वांचे संवाद फाडफाड म्हणून दाखविले. हे गोखले म्हणजे प्रसिद्ध अभिनेता व नटवर्य श्रीराम लागू. त्यांनी त्यांच्या वस्तुनिष्ठपणामुळे सर्वांचे लक्ष केंद्रित केले व शाब्बासकी मिळविली. वरील आशय वस्तुनिष्ठपणा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५८. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः सखु आजीचा दरारा.

मूल्य ः सौजन्य, प्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

गावात पंचायत समितीची निवडणूक होती. दोन पाटया तयार झाल्या. मतदानाच्या दिवशी म्हातारीला कसला तरी वास लागला. दोन घरांत दारूनं भरलेली पिंप होती असं कळलं. वाकलेली म्हातारी ताठ झाली. म्हातारी घरात घुसली. दारू होती रबरी फुग्यांमध्ये ते सगळे फुगे म्हातारीने आणि तिच्या मैत्रिणींनी रस्त्यावर गल्लीत पोरांना फुगे फोडायला लावले. एवढयात एक पुढारी समोर आला. म्हातारीच्या डोळयात अंगार होता. हातात काठी होती. म्हातारीनं पोरांना आज्ञा केली. "धरा रं त्याला" मग तो पोरांच्या तावडीत सापडला. दोन्ही पाटर्यांनी म्हातारीला विनवलं म्हणून पुढारी सुटला. म्हातारीचा असा दरारा होता. अशी आजी आता कुठं मिळेलं?

वरील आशय नमगोष्टी मधील 'सखु आजीचा दरारा' या कथेतील आहे. सखु आजी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. गावातील मंडळींना सखु आजीचा आदरपूर्वक व प्रेम पूर्व क दरारा होता. तिच्या दरा-यामुळे गावाचा विकास झाला. गावातील लोकांची दारू देखील या आजीमुळे सुटली.

वरील आशय 'सौजन्य' व 'प्रेम' हा आशय रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

५९. वाड्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : दोन वेळा संदेश

मूल्य : ज्ञानलालसा, समाजसेवा

कथानामक : डॉ. न.म. जोशी

त्यांचा साधेपणाचा त्याला साक्षात्कार झाला पण एक अडचण ही होती त्या स्मरणिकेत त्यांच्या हस्ताक्षरातील संदेश जसाच्या तसा छापायचा होता म्हणून मग रेघा नसलेला कोरा कागदच लिहिण्यासाठी घ्यायला हवा होता. सांगणार कसं? पण बालाजीनं अडचण सांगितली आणि काय आश्चर्य प्राचार्य वाघमारे सरांनी त्याला दुस-यांदा लिहून दिला. पण

लेटरपॅड वापरलं नाही. प्राचार्य वाघमारे यांच्या साधेपणातील थोरवी आणि त्यांच्या थोरवीतील साधेपणा यांचा प्रत्यय बालाजीला आला आणि तो भारावून गेला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'दोन वेळा संदेश' या कथेतील आहे. प्राचार्य वाघमारे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. प्रा.वाघमारे यांनी समाजप्रबोधन व समाजकार्य तसेच समाजविकास चळवळीचे कार्यही केले. त्यांची साधी राहणी व उच्च विचारणी यामुळेच ते लोकांना आपल्या साधेपणातील थोरवीने संदेश दयायचे एवढा त्यांचा विचार व्यासंग व गाढा अभ्यास होता.

वरील आशय ज्ञानलालसा व समाजसेवा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६0. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः शंकरावांचा कलात्मक निर्णय

मूल्य ः कर्तव्यदक्षता, कष्टाळूपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

उषा चव्हाण ही अभिनेत्री लोककला जलसे आणि तमाशा यांच्या फडातून आलेली आहे. मेळयास रस्त्यांवर गाऊन नाचून तिनं आपली कलेची सुरूवात केली. पुढं ती अभिनेत्रीच नव्हे तर सिने दिग्दर्शकही झाली. ही गोष्ट गौरवास्पद आहे. शासनाने तिला पारितोषिक देऊन गौरवलं आहे. अशा लोक कला निपुण स्त्रीचं कलात्मक चित्र विचार भारतीवर आहे. यानं काही बिघडलं नाही. मिरंगुंडे यांनी रोखलेला श्वास सोडला. शंकररावांचा कलात्मक निर्णय त्यांच्या बाजूचा होता.

वरील आशय नमगोष्टी मधील 'शंकररावांचा कलात्मक निर्णय' या कथेतील आहे. शंकर खरात हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. प्रसिद्ध अभिनेत्री उषा चव्हाण यांच्या कलेचे

कौतुक करताना शंकररावांनी वरील उद्गार काढले. वरील आशयातून उषा चव्हाणांची कष्टाळू वृत्ती व कर्तव्यदक्षता या गुणांमुळेच त्या प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून प्रसिद्ध झाल्या.

वरील आशय कर्तव्यदक्षता व कष्टाळूपणा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः नादानसिंहाचे परिवर्तन

मूल्य ः नितिमत्ता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

मग परम आणि गोवर्धन यांना आणण्यात आलं त्यांना राजेंद्रसिंहाच्या हवाली केलं. परम आणि गोवर्धन राजेंद्रसिंहांना कडाडून भेटले. विनाशस्त्र लढाई जिंकली होती. परम गोवर्धन आणि राजेंद्रसिंह यांनी जणू या लुटारूंसाठीच भावनांचं जोहड बांधलं होतं. नादानसिंहाचं मतपरिवर्तन झालं होतं.

वरील आशय नमगोष्टी मधील 'नादानसिंहाचे परिवर्तन' या कथेतील आहे. नादानसिंह हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. नादानसिंह हा एक डाकू होता. परतु राजेंद्रसिंहानी जे समजावून सांगितल्यावर डाकूमध्ये मतपरिवर्तन झाले व तो समाजात ताठ मानाने जीवन जगू लागला. वरील आशय नितिमत्ता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः तिचा मी बाळ नेणता

मूल्य ः समाधान

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

हा संवाद १९१५ सालचा. मध्ये पंधरा वर्षे गेली. मग विनोबांनी हे काम मनावर घेतलं आणि गीताई लेखनाला सुरूवात झाली. ६ फेब्रवारी १९३१ ला गीताईच लेखन पूर्ण झालं. विनोबांना कृतकृत्य वाटलं. आईची इच्छा पूर्ण झाली होती. २४जुलै रोजी गीताईची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. महात्मा गांधी यांनी गीताई बद्दल विनोबांच खूप कौतुक केलं. पण जिनं गीताई निर्मितील प्रोत्साहन दिलं ती आई गीताईचं लेखन पूर्ण झालं तेव्हा नव्हती. गीताईच्या रूपानं विनोबांच्या आई अजरामर झाली. म्हणूनच विनोबा म्हणतात. गीताई माऊली माझी तिचा बाळ मी नेणता.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'तिचा मी बाळ नेणता' हया कथेतील आहे. वि.दा.सावरकर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. विनोबांनी आपल्या आईचे स्वप्न 'गीताई' हा ग्रंथ लिहून पूर्ण केले. आज जरी विनोबा व विनोबांची आई हयात नसल्या तरी 'गीताई' हा ग्रंथ अजरामर आहे.

वरील आशय समाधान हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६३. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः 'पाकिस्तानात शंकर भिडे'

मूल्य ः देशप्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

जाळपोळीच्या बातम्या निर्वासितांचे लोंढे रक्तपात या गोष्टी वृत्तपत्रातून येत होत्या. तरी शंकर भिडे पाकिस्तानात कराचीत गेले. शंकर भिडे यांना तिथं जाऊन आपलं गांधीवृत्त सिध्द करायचं होतं. पण लवकरच त्यांन वेगळा निर्णय घ्यावा लागला. शंकर भिडे उद्विग्न झाले. आता कायदयानुसार त्यांना पुन्हा याच कार्यालयात घेण. कठिणं होतं. तरीही

शंकर भिडे यांनी केलेलं धाडस लक्षात घेऊन कानिटकर व सहस्त्रबुध्दे यांनी खटपट केली आणि भिडे पुन्हा परतले. असे हे पाकिस्तानी शंकर भिडे.

वरील आशय नमगोष्टी मधील 'पाकिस्तानात शंकर भिडे' या कथेतील आहे. शंकर भिडे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. शंकररावांचे देशावरील प्रेम तसेच सर्वधर्मसमभाव या वृत्तीमुळे कठिण परिस्थितीत देखील पाकिस्तानातील कराचीत जाऊन आपले समाजकार्य केले.

वरील आशय देशप्रेम हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६४. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः अळवावरचे पाणी

मूल्य ः निर्णयक्षमता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

पुढं श्रीनिवास पाटील कलेक्टर झाले. कर्तबगार अधिकारी झाले. निवृत्तीनंतर हे खासदारही झाले. पण यशवंतरावांनी घालून दिलेला धडा त्यांनी पाळला आणि अळवावरचं पाणी सोडून ते डेप्युटी कलेक्टर म्हणून कोल्हापूरला रूजू झाले.

वरील आशय नमगोष्टी मधील 'अळवावरचे पाणी' या कथेतील आहे. श्रीनिवास पाटील हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. अपार कष्ट व प्रामाणिकपणा चिकाटी व अचूक निर्णय यामुळे श्रीनिवास पाटील एल.एल.बी ते कलेक्टर पर्यंत परिस्थितीवर मात करून शिक्षण घेतले व यश संपादन केले.

वरील आशय निर्णयक्षमता हे रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६५. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः चाळ माझ्या पायात

मूल्य ः कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

चाळ माझ्या पायात या चित्रपटाची नायिका उषा किरण नाचून नाचून आधीच तिचे पाय दुखावले होते. पायाला खूप चिरा पडल्या होत्या आणि पायांचा क्लोजअप घेणं तर आवश्यक होतं. मग सराफ यांनी स्वतःच्या पायात चाळ बांधून क्लोजअप घेतले. त्यांच्या पॉझिटिव्ह उषा किरणच्या दृश्यांवर घेऊन नाच उषा किरणचा पण चाळ बांधलेले पाय सराफांचे असा चित्रपट पूर्ण केला. सारं आयुष्याचं नाचरं झालं. त्याचं हे बोलकं प्रतिक होतं. सराफांकडे अशा आठवणींच्या मोहरा खूप आहेत.

वरील आशय नमगोष्टी मधील 'चाळ माझ्या पायात' या कथेतील आहे. बाळ सराफ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. बाळ सराफांनी आपली चित्रपटातील भूमिकेची आवड जोपासण्यासाठी प्रसंगी पायात चाळ बांधले. वाटेल ती कामे केली व आपली कर्तृव्यतत्परता दाखवली. वरील आशय कर्तव्यदक्षता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६६. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः शेवग्याच्या शेंगा चांदीच्या

मूल्य ः सौजन्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आणि त्या थोर लेखकाच्या डोळयात पाणी तरारले...जेवणाचा बेत तर उत्तम होताच शेवग्याच्या शेगांच्या पिठल याचाच पण जेवणानंतर तिथं जमलेले साहित्यिक निमंत्रित नातेवाईक प्रत्येकजण त्या चांदीच्या शेवग्याच्या शेंगा हाताळून बघून चकित होत होता. शेवग्याच्या शेगांची कौटुंबिक भावुकता याही कृतज्ञ भेटीमध्ये वैभवशाली रीतीने साकारली होती.

वरील आशय नमगोष्टी मधील शेवग्याच्या शेंगा चांदीच्या या कथेतील आहे. य.गो.जोशी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. भोजनाच्या बेतानंतर य.गो.जोशी यांना भेट म्हणून शेवग्याच्या चांदीच्या शेंगा भेट म्हणून दिल्या. यावरून विजयराजे यांची मैत्रीपूर्वक दिलदार वृत्ती दिसून येते. वरील आशय सौजन्य हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः खरेदी अक्षय्य तृतीयेची

मूल्य ः वस्तुनिष्ठपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

अक्षय्य तृतीयेला सोनं खरेदी करण्याचा मोह दूर ठेवला म्हणून तिनं घेऊन दिलेल्या पुस्तकातन मी शहाणा झालो. सोन्यापेक्षा सोन्यासारखं शहाणपण चांगल म्हणून प्रत्येक अक्षय्य तृतीयेला माझ्या दुकानात कितीही सोन्याची खरेदी झाली. तरी मी मात्र त्या दिवशी मुद्दाम सगळं काम संपल्यावर पुस्तक खरेदी करतो. मुलांना फुकट पुस्तक देतो. ग्रंथालयांना भेटी देतो. जिज्ञासूंना वाचायला पुस्तक देतो. माझ्या स्वतःच्या घरी तिजोरी नाही. पण समृद्ध ग्रंथालय आहे. काकासाहेब मित्राचे हे शब्द ऐकून अंतर्मुख झाले.

वरील आशय नमगोष्टी मधील 'खरेदी अक्षय्य तृतीयेची' या कथेतील आहे. नानासाहेब हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. नानासाहेबांनी सोने घेण्यापेक्षा पुस्तक खरेदी करून

ती गरजू व्यक्तिंना भेट म्हणून दयायचे कारण त्यांच्या लहानपणी त्यांच्या आईने सोने खरेदीचे पैसे त्यांच्या पुस्तकांसाठी खर्च केले. त्यामुळेच ते आज यशस्वी जीवन जगत आहेत.

वरील आशय वस्तुनिष्ठपणा हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६८. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : स्वातंत्र्य ही ईश्वरी आज्ञा

मूल्य : देशप्रेम

कथानामक : डॉ. न.म. जोशी

पॅरिसच्या रस्त्यातून पांढरी शुभ्र साडी नेसलेल्या मादाम कामा जात तेव्हा लोक अत्यंत आदरानं त्यांना न्याहाळत त्याच्या इच्छेप्रमाणेच त्यांना त्यांच्या निधनापूर्वी फारसी जनरल हॉस्पिटलमध्ये मुंबईला आणलं होतं. आपल्या दहनभूमीवर पुढील वाक्य कोराव अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. अन्यायी व जुलमी सत्तेचे तुकडे करणे ही ईश्वराची आज्ञा पाळणेच होय. १२ ऑगस्ट १९३६ रोजी ही दीप ज्योत निमाली.

वरील आशय नमगोष्टी मधील 'स्वातंत्र्य ही ईश्वरी आज्ञा' या कथेतील आहे. मादामा कामा हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. मादामा यांनी देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून देशसेवा केली व जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा त्यांची शेवटची इच्छा म्हणून काही ओळी दहनभूमीवर कोरण्यास हे केवळ देशावरील प्रेमामुळेच.

वरील आशय देशप्रेम हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

६९. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : अचूक निवड

मूल्य : कर्तव्यदक्षता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

या देशात लोक पादत्राणे वापरत नाहीत. पण त्यांना पादत्राणे वापरण्याची सवय लावून त्यांचे महत्व पटवून दिले तर आपला व्यवसाय खूप चालेल. येथील लोकांना पादत्राणे वापरण्याची सवय लावण्याची जबाबदारी घ्यायला मी तयार आहे. म्हणूनच मग मलाच या कामावर नेमणूक दयावी. बाळकृष्ण व गणपत दोघांनीही हे अहवाल वाचले. राघवच्या अहवालात त्यांना नकारात्मकता दिसली. रघुवीरच्या अहवालात परिस्थिती तीच असूनही सकारात्मकता होती. अर्थातच रघुवीर आफ्रिकेतील कारखान्याचा व्यवस्थापकीय संचालक झाला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'अचूक निवड' या कथेतील आहे. गणपत आबनावे व त्यांचे मित्र व मुलगे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. आपल्या कामातील तत्परता व कर्तव्यदक्षता यामुळे बाळकृष्ण व गणपत या दोघे व रघुवीर त्यांच्या आंतरिक गुणांमुळे व चतुराईने आफ्रिकेतील कारखान्यांचा व्यवस्थापकीय संचालक झाला.

७०. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : कर्मवीरांची माया

मूल्य : करूणा, प्रेम

कथानामक : डॉ. न.म. जोशी

लोक हे अभूतपूर्व दृश्य अनिमिष नेत्रांनी बघत होते. मग कर्मवीरांनी आपल्या भाषणात सांगितलं या कोवळया मुलासारख्या शेकडो मुलांनी माझी गाडी ओढली. आता शिक्षणाची गाडी वेगानं धावणारं. लोकांनी टाळयांचा कडकडाट केला. कर्मवीरांच्या मायेनं तो मुलगा धन्य झाला होता.

वरील आशय नमगोष्टी मधील 'कर्मवीरांची माया' या कथेतील आहे. कर्मवीर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. कर्मवीरांची शाळेतील मुलांनी गाडी ओढली त्यामुळे त्यांचे कौतुक करण्यासाठी मुलांचे कौतुक केले.

वरील आशय करूणा व प्रेम ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः प्रा.बर्वे वन्स मोअर

मूल्य ः वैचारिक व्यासंग, ज्ञानलालसा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

बर्वे सर वन्स मोअर मग बर्वे अधिक गंभीर चेहरा करून उभे राहिले. सर्व विदयार्थी विदयार्थिनी उत्सुकतेनं त्यांच्याकडे बघत होते...बर्वे म्हणाले आपली इच्छा फलद्रुप होई ल. वन्समोअर पुढचा जन्महो रेडयाच्या योनीचाच लाभेल वन्समोअर. वर्गात प्रचंड हास्यकल्लोळ. तो टारगट विदयार्थीही त्यात सामील झाला होता.

वरील आशय नमगोष्टी मधील 'प्रा.बर्वे वन्स मोअर' या कथेतील आहे. प्रा.बर्वे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. यांच्या ज्ञानलालसेमुळे त्यांना शाब्दिक फेक व अपमानास्पद शब्दांचे प्रतिउत्तर शाब्दिक पद्धतीने केले व वर्गात हास्यकल्लोळ झाला. त्यांच्या वाचनामुळे वैचारिक समतोल साधला व त्यांचे विचार विनोदात्मक झाले.

वरील आशय 'वैचारिक व्यासंग' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७२. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः भोगणे जे दुःख त्याला......

मूल्य ः समाजकार्य, कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

सुलभा नीलकंठ यांचा जीवनाचा निवृत्तीचा अध्याय आता या सेवेच्या ओव्यांनीच भरून गेला. ५० वर्षापूर्वी स्वीकारलेले फ्लारेन्स नाइटिंगेलचे कार्य आजही त्यांना त्याच उमेदीने करावे लागत आहे. भोगणे जे दुःख त्याला सुख म्हणावे लागते. असे सरोज तथा सुलभाताई आणि नीलकंठराव हसतमुखानं म्हणतात.

वरील आशय नमगोष्टी मधील 'भोगणे जे दुःख त्याला...'या कथेतील आहे. सरोजताई हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. रूग्णांची सेवा करणे हा त्यांचा धर्म. सेवेच्या निवृत्तीचा अध्याय ओव्यांनीच भरून गेला होता. समाज कार्य करताना दुःख सुद्धा हसत मुखाने भोगत होते.

वरील आशय समाजकार्य व कर्तव्यदक्षता ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७३. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः योगक्षेमम् वहाम्यहम्

मूल्य ः समाधान

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

ही कांदबरी त्यांनी त्यांच्या विहंग प्रकाशनाच्या वतीने प्रकाशित केली. विहंग प्रकाशनाचा विहंग प्रकाशन विश्वात गरूडभरारी माऊ लागला. एकापाठोपाठ एक उत्तमोत्तम पुस्तकं प्रसिद्ध होऊ लागली. मराठीत तर या पुस्तकांनी विक्रम केला. पण गुजराथी आणि इंग्रजी भाषेतही विहंग प्रकाशन डौलानं विहार करू लागले. नोकरी सोडण्याचा निर्णय करताना डळमळणारं मन योगक्षेमम् वहाम्यहम् या आश्वासक शब्दांनी स्थिर झालं आणि त्याला समाधानाचं वैभव प्राप्त झालं.

वरील आशय नमगोष्टी मधील 'योगक्षेमम् वहाम्यहम्' या कथेतील आहे. राजेद्रं हा कथेतील प्रमुख पात्र आहे. या कथेतून समाधान हे मूल्य प्रतित होते.

७४. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः कुणाच्या खांदयावर कुणाचे ओझे

मूल्य ः नितिमत्ता, वैचारिक व्यासंग, सहकार्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

शेवाळकरांच्या शबनम पिशवीत अशी अनेकांची ओझी त्यांनी घेतलेली असत. कुणाच्या संग्रहाच्या प्रस्तावनेसाठी आलेली कविता, संग्रह कुणाचा कुठंतरी शब्द टाकण्यासाठी पत्रं त्यांच्या डायरीत अनेकांचे फोन नंबर होते. कुणाच्या खांदयावर कुणाचे ओझे□अशी ओझी, ओझी न वाटता वागवणारे शेवाळकर होते.

वरील आशय नमगोष्टी मधील 'कुणाच्या खांदयावर कुणाचे ओझे' या कथेतील आहे. शेवाळकर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. त्यांच्याकडे आपुलकी प्रेम भरभरून आहे. प्रत्येकाची ते काळजी घेतात. प्रत्येकाला मदत करत. त्यांच्या शबनम पिशवीत असे अनेकांचे फोन असत व समाजकार्य व समाजाची सेवा म्हणून ते जमेल तशी सर्वांना मदत करत.

वरील आशय सहकार्य चांगली नितिमत्ता व इतरांबद्दलचा चांगला वैचारिक व्यासंग ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः कलावंत शास्त्रज्ञ

मूल्य ः प्रयोगशीलता, समतोल विचारसरणी

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

डॉ.भाभा प्रयोगशील होते. मग त्यांनी एक अभिनव प्रयोग करण्याचं ठरवलं. त्यांनी आपल्या काही सहका-यांना व कार्यकर्त्यांन पाचारण केलं. तो महाकाय वृक्ष ज्या जागी होता त्याला त्यांनी त्यांच्या सहकार्यांच्या मदतीनं मुळापासून जसा होता तसाच भूमीतून अलग केला आणि मग आणखी आकित घडवलं. तो महाकाय वृक्ष जसाच्या तसा तुर्भेच्या अणुशक्ती परिसरात आणि त्याला तिथं पुन्हा भूमीत रूजवला. त्याकाळी तरी हे आश्चर्यच होतं. तुर्भेच्या परिसरात आज तो महावृक्ष इतमामानं स्थानापन्न झालेला आहे.

वरील आशय नमगोष्टी मधील 'कलावंत शास्त्रज्ञ' या कथेतील आहे. डॉ.भाभा हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. डॉ.भाभा यांच्या प्रयोगशील वृत्तीने व झाडांवरील प्रेम कलासक्त मन समतोल विचारणी यामुळे रस्त्यात येणारा महावृक्ष पाडणार होते. परंतु त्यांनी तो वृक्ष जसाच्या तसा तुर्भे मध्ये लावला व वाढवला व तो आजही आपणास पहावयास मिळतो. त्याला महावृक्ष असे म्हणतात. हे केवळ डॉ.भाभा यांच्या प्रयोगशील वृत्तीनेच साध्य झाले.

वरील आशय समतोल विचारसरणी व प्रयोगशीलता ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७६. वाड्मय प्रकार  ः कथा

कथा प्रकार  ः बोधकथा

नमगोष्टी कथा  ः न रागावण्याचे कारण

मूल्य  ः वैचारिक व्यासंग

कथानामक  ः डॉ. न.म. जोशी

छान हे बघा सुरेश परेश मला राग आला नाही. कारण सांगतो मी नाटय, साहित्य, शिक्षण, समाजकारण या सर्व क्षेत्रात वावरतो. माझे वाढलेले केस पाहून माझे विदयार्थी मला ऋषी म्हणतात. नाटकातले लोक मला नट म्हणतात. त्यावरून त्यांचं क्षेत्र मला कळतं तुम्ही तमासगीर म्हणालात यावरून तुमचं क्षेत्र मला कळलं. हे ऐकून दोघंही मित्र भुईसपाट झाले.

वरील आशय नमगोष्टी मधील 'न रागावण्याचे कारण' या कथेतील आहे. रमेश, परेश, सुरेश हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. परेश सुरेश हे चांगले मित्र परंतु दोन मित्रांचे विचार रमेशला पटत नाही व तो त्यांना शाब्दिक स्वरूपात समज देतो.

वरील आशय वैचारिक व्यासंग हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७७. वाड्मय प्रकार  ः कथा

कथा प्रकार  ः बोधकथा

नमगोष्टी कथा  ः कात्री आणि सुई

मूल्य  ः वैचारिक व्यासंग

कथानामक  ः डॉ. न.म. जोशी

दादासाहेब आश्रमात आम्ही जोडण्याचं काम करतो तेव्हा आम्हाला भेट दयायची तर सुई भेट दया. कात्री फाडण्याचं म्हणजेच विघटनांच काम करते. ती तुमच्या सारख्याला लखलाभ. दादासाहेब खाली मान घालून कात्री घेऊन निघून गेले.

वरील आशय नमगोष्टी मधील ‘कात्री आणि सुई या कथेतील आहे. दादासाहेब व अण्णा महाराज हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. दादासाहेबांनी अण्णा महाराजांना सोन्याची कात्री दिली. तेव्हा अण्णा महाराजांनी दादासाहेबाची कान उघडणी मवाळ भाषेत केली.

वरील आशय वैचारिक व्यासंग हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७८. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः आम्ही हात पसरत नाही

मूल्य ः सौजन्य, शिष्टाचार

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

एवढयात पालखी आली. राजासाहेबांनीही हा संवाद ऐकला. राजे स्वतःच पालखीतून पायउतार झाले. त्यांनी संन्याशाला प्रणाम केला तेव्हा संन्याशानं सैनिकांच्या मुजोरीची व्यथा राजांना सांगितली. राजानं त्वरीत फर्मान काढलं. मजुराला मदत मिळाली. त्या मुजोर सैनिकाला शिक्षा झाली. हात न पसरताच साधूचं नैतिक सामर्थ्य हे असं असतं.

वरील आशय नमगोष्टी मधील ‘आम्ही हात पसरत नाही’ या कथेतील आहे. संन्यासी व राजेसाहेब हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. संन्याशी व राजेसाहेब यांच्यातील संवाद. सैनिकाला शिक्षा झाली व संन्याशाच्या नैतिक सामर्थ्यामुळे होते. वरील आशय ‘सौजन्य’ व ‘शिष्टाचार’ हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

७९. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः देवदूत आणि यमदूत

मूल्य ः संयम, श्रद्धा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

महात्मन् ही कुलटी असली तरी तिच्या जीवनाबद्दल तिला खंत होती. ती शरीरानं पापं करायची पण मनानं तुमचं ध्यान करून तुमच्यासारखं पवित्र जीवन जगता यावं असं तिला वाटायचं आणि तुम्ही? तुम्ही शरीरानं सर्व धर्माचरण करीत होतात पण तुमचा आत्मा त्या कुलटेच्या कृत्यात गुंतला होता. म्हणून पश्चातापानं दग्ध अशा कुलटेला स्वर्गात स्थान आहे आणि सदाचरणी असूनही दुर्विचार करणा-याला नरक आहे. देवदूत आणि यमदूत यांनी आपापलं काम केलं.

वरील आशय नमगोष्टी मधील 'देवदूत आणि यमदूत' या कथेतील आहे. साधू हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. कुलटा व साधू यांच्यातील वर्तनासंबंधी देवदूत व यमदूत यामध्ये संवाद झाला. कुलटेचे मन पवित्र व साधूला सदाचरणी असून नरक यातना भोगाव्या लागतात. म्हणून श्रद्धा असावी अंधश्रद्धा नसावी.

वरील आशय श्रद्धा व संयम हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८०. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः स्वा.सावरकर आणि श्री.म.माटे

मूल्य ः कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

ना.स.फरांदे यांनी तर अशी सूचना केली की प्रत्येक शाळकरी मुलांनं इथं येऊन हे पत्र वाचलं पाहिजे. अनेक वृतपत्रांनी अगदी इंग्रजी वृत्तपत्रांनीही श्रीकांतच्या मुलाखती छापल्या. अशा पद्धतीने स्वा.सावरकर यांनी दिलेलं सन्मानपत्र श्री.म.माटे यांनी आपल्या दुकानात गौरवचिन्ह म्हणून लावल. श्री.म.माटे म्हणजे माटे हेअर कटिंग सलूनचे श्रीकांत महादेव माटे.

वरील आशय नमगोष्टी मधील स्वा.सावरकर आणि श्री.म.माटे या कथेतील आहे. श्री.म.माटे हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. सावरकरांनी श्री.म.माटे यांना केशकर्तनाला उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानपत्र दिले त्याचा अभिमान म्हणून आपल्या प्रामाणिक कामाची पावती म्हणून त्यांनी ते सन्मानपत्र गौरव चिन्ह म्हणून आपल्या केशकर्तनालय दुकानात लावले.

वरील आशय 'प्रामाणिकपणा' व 'कर्तव्यदक्षता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८१. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः पुण्यासाठी पाप

मूल्य ः समता, सहकार्य

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

मग ती म्हणाली... ओंडका माझा आहे. अर्थात कळसही माझाच आहे. पण या कामात स्त्रियांची मदत घ्यायची नाही असं बोधिसत्वांनी ठरवलंय. आम्हाला तर या कामात भाग घेऊन पुण्य मिळवायचं आहे. ते मिळविण्यासाठी कळस न देण्याचं पाप करायला मी तयार आहे हे सर्वांना समजल. तेव्हा त्या परिसरातील सर्व स्त्रियांना या कामात भाग घेण्याची अनुमती मिळाली. सराईवर कळस बसला. एका स्त्रीनं पुण्यकर्मासाठी कळस चोरण्याचं पाप केलं होतं आणि कळस देऊन पुण्यकार्य जोडलं होतं.

वरील आशय नमगोष्टी मधील ‘पुण्यासाठी पाप’ या कथेतील आहे. एक स्त्री ही या कथेतील प्रमुख पात्र आहे. स्त्री ने आपल्या बुध्दीचातुर्याने स्त्री पुरूष समानता दाखवून स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने स्थान मिळाले पाहिजे यासाठी लोकांचे डोळे उघडले.

वरील आशय ‘समता’ व ‘सहकार्य ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८२. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः देवाचा शोध

मूल्य ः निर्णयक्षमता, चिकित्सा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

उंट शोधण्यासाठी राजमहालाबाहेरच जावं लागेल. राजा म्हणाला तू देवाचा शोध घेतोस तो सिंहासनावर बसून, राजमहालात राहूनच ना मग मला उंटाचा शोध या छतावर का घेता येणार नाही. राज चमकला काय समजायचा तो समजला. त्यानं सूफी संताचे पाय धरले आणि सांगितलं महाराज देवाचा शोध घेण्याचा मार्ग सापडला.

वरील आशय नमगोष्टी मधील ‘देवाचा शोध’ या कथेतील आहे. सूफी संत हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. राजाचे डोळे उघडण्यासाठी, उंटाचा शोध छतावर घेत होता. त्यानं राजाला ईश्वरप्राप्तीचा मार्ग या प्रसंगातून सांगितला. राजाची परीक्षा घेऊन सूफी संताने राजाला उपदेश केला.

वरील आशय निर्णयक्षमता व चिकित्सा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८३. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः जगदंबेच्या परडीत भरपूर आहे.

मूल्य ः संयम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

औंधच्या कुलदेवतेसमोर राजा भक्तिभावानं उभा असायचा. गंगाराम छबिलदास यांची येवला इथं पेढी होती. या पेढीच्या काही शाखाही महाराष्ट्रात होत्या. गंगाराम अत्यंत सालस व सुसंस्कृत होते. दरवर्षी सुगीनंतर ४ ते ६ दिवस त्याचा मुक्काम औंधला असे मग गंगाराम छबिलदास यांनी संस्थानच्या आर्थिक स्थितीविषयी ऐकलं आणि गंगारामनी अल्प व्याजाने संस्थानला कर्ज दिलं. कर्ज काढून देण्याची व्यवस्था ऋण काढून सण राजा गंगारामला विनोदानं म्हणायचा तुमची लक्ष्मी आमच्याकडे नांदण्यासाठी तुम्ही ठेवली आहे. आम्ही तिची नीट काळजी घेऊ. मग सुकाळ आला सारा वाढला जगदंबेच्या परडीत भरपूर आहे राजा म्हणाला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'जगदंबेच्या परडीत भरपूर आहे या कथेतील आहे. राज हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. संस्थानाच्या आर्थिक स्थितीविषयी सांगताना संयमाने बोलत.

हा आशय संयम हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८४. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः पुढील जन्म फुलांचा

मूल्य ः सौजन्य, शिष्टाचार

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

काही लोक फुलांचा औषधी उपयोग करतात. फुलांचे हार, फुलांच्या माळा, फुलांचे गुच्छ यामुळे फुले किती उपयुक्त आहेत. हे कळून येते. काही फुले देवाच्या चरणी आणि देवांच्या माथ्यावर आरूढ होतात. तर काही फुले प्रेतांवरही वाहिली जातात. पण फुलांची तक्रार नसते. ती विनातक्रार आपले कर्तव्य बजावीत असतात. अर्थात फुल म्हणजे सदगुण, फुल म्हणजे नम्रता, फूल म्हणजे समर्पण, फूल म्हणजे शालीनता. म्हणून मला फुलांचा जन्म हवा. अर्थातच हा निंबध उत्कृष्ट ठरला हे वेगळं सांगायला नको.

वरील आशय नमगोष्टी मधील 'पुढील जन्म फुलांचा' या कथेतील आहे. शाळेतील गुरूजी हे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. निबंध लिहिताना विदयार्थ्यांनी मांडले फुलांविषयीच विचार, मत अत्यंत सौजन्याने व प्रामाणिकपणाने मांडले आहे. फुलांविषयी प्रेम, आपुलकी यासारख्या भावना व्यक्त केल्या आहेत.

वरील आशय सौजन्य व शिष्टाचार ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः बाकडयावर झोपलेला उदयोगपती

मूल्य ः सहकार्य, वस्तुनिष्ठता, कष्टाळूवृत्ती

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

खिशात एक पैसा नव्हता. भूक लागली होती. मध्यरात्र उलटून गेली होती. रात्री या बाकावरच झोपलो. सकाळी पाणी पिऊन निघणार एवढयात त्या वडेवाल्याचं लक्ष माझ्याकडं गेलं. त्यानं मला एक वडा फुकट दिला. तो खाल्ला. मग एक ट्रक मिळाला. निघालो पुढं... मग नियतीचे चक्र बदललं. मला यश आलं. अंधाराचा प्रकाश झाला. आज मी एक उदयोगपती आहे. शेकडो माणसं माझ्या व्यवसायात काम करतात. पण या बाकानं आणि त्या

वडेवाल्यानं मला आसरा दिला नसता तर... श्री.चंद्रन मेनन या उदयोगपतीचे डोळे पाणावले होते. शेख भारावले होते. हे बाकडं म्हणजे मेनन यांच्यासाठी निजानंदाचा ठेवा होता.

वरील आशय नमगोष्टी मधील 'बाकडयावर झोपलेला उदयोगपती' या कथेतील आहे. श्री.चंद्रन मेमन प्रसिद्ध उदयोगपती बनले.

वरील आशय 'सहकार्य, 'कष्टाळूवृत्ती' व 'वस्तुनिष्ठता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८६. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः अजून गाणे ऐकू या

मूल्य ः समाधान

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

आरतीताईनी पुन्हा सूर आळवायला सुरूवात केली आणि पुन्हा मैफल जमली. नतंर दोन अडीच तास सुरेख मैफल जमली. शिवाजीराव भावे ध्यान लावून बसले होते. लालचंदशेठ एकाग्रतेनं ऐकत होते. एखादा जलप्रपात मध्येच क्षणभर गोठल्यासारखा थांबावा आणि पुन्हा त्याचं कोसळणं सुरू व्हावं तसा चमत्कार झाला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'अजून गाणे ऐकू या' या कथेतील आहे. आरतीताई या कथेतील प्रमुख पात्र आहे. आरतीताईनी मैफलीची जय्यत तयारी केली. मैफलीत आपल्या सुरांनी रंगत भरली. त्यांच्या सूरांनी एक प्रकारे समाधान मिळाले. हा आशय समाधान हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८७. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः कस्तुरी गोरटी वाल काळा

मूल्य ः सत्यता, समतोल विचार

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

सावळा वर वरा गौर वधूला असं ते गाणं होतं. पुढची ओळ होती रूक्मिणी गोरटी कृष्ण काळा. गाता गाता रतनचंदजींनी थोडा बदल केला आणि ते म्हणाले कस्तुरी गोरटी वाल काळा... सभामंडपात हास्यस्फोट सामील झाले.

वरील आशय नमगोष्टी मधील 'कस्तुरी गोरटी वाल काळा' या कथेतील आहे. रतनचंदजी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. रतनचंदजी आपल्या बुद्धी कौशल्याने हजरजबाबीपणाने विनोद निर्माण केला.

हा आशय 'सत्यता' व 'समतोल विचार' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८८. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः नमस्कार मी फार्जेंटशास्त्री

मूल्य ः निर्भयता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

नाना भिक्षुकासमोर येऊन उभे राहिले. त्यांनी निरखूंन पाहिलं आणि आपला हात हस्तांदोलनासाठी पुढं करीत ते म्हणाले "नमस्कार मि. फार्जंट शास्त्री आज कसं येणे झालं?" साहेब थक्क झाला. त्याचे पितळ उघडं पडलं त्याच्या हाती काहीच लागल नाही.

वरील आशय नमगोष्टी मधील 'नमस्कार मी फार्जेंटशास्त्री' या कथेतील आहे. जगन्नाथ शंकरशेठ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. वेशांतर केल्यानंतरही नानासाहेबांनी फार्जेट साहेबांना त्वरीत ओळखले :

हा आशय 'सत्यता' व 'निर्भयता' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

८९. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : वाघिणीची महत्वकांक्षा

मूल्य : कर्तव्यदक्षता, समाधान

कथानामक : डॉ. न.म. जोशी

वाघ वाघिणीचा सुरभी संसार उत्तम चालला आहे. वाघीण उदार आहे. तृतीयपंथी लोकांनाही मोकळेपणानं दान देणारी आशा कुणालाही निराश करीत नाही. गणपती नागा नाईक त्यांचा कामगाार नाही. त्यांच्या कुटुंबाचा घटक आहे. लोकांना चवीनं खायला लावणारं हे वाघ दाम्पत्य आता ज्येष्ठ नागरिक वयोगटात गेलं आहे. वाघिणीनं आपली महत्वकांक्षा पूर्ण केली आहे आणि ती कृतार्थ जीवन जगत आहे.

वरील आशय नमगोष्टी मधील 'वाघिणीची महत्वकांक्षा' या कथेतील आहे. वाघ दाम्पत्य हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. दाम्पत्यांनी आपल्या कर्तव्यदक्षतेने व कष्टानं आपला संसार फुलवला व आपल्या मुलामुलींना देखील त्यांच्या जीवनात स्थीर स्थावर केले.

वरील आशय 'कर्तव्यदक्षता' व 'समाधान' ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९०. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः इथं ओशाळला शंकर

मूल्य ः नियमितपणा, श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

नात शीतल नातू अजिंक्य दुसरी नात शिल्पा यांना आजोबा शंकरराव थत्ते बालभारतीतल्या गोष्टी गमतीनं सांगतात तेव्हा ही हकीगत त्यांनी नातवंडांना सांगितली. नातवंडेही पु.ल.यांना ओळखत होती. 'त्यांच वयम मोठम् खोटम्' हे नाटक त्यांनी बघितलं होत. नातवंडाचा चमूही आजोबांना गमतीनं म्हणतो "पु.ल.ना न ओळखणारे आमचे आजोबा." आणि आजोबां कौतुकानं ओशाळे होतात.

वरील आशय नमगोष्टी मधील 'इथे ओशाळला शंकर' या कथेतील आहे. शंकरराव थत्ते हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. स्वतःच्या सर्व जबाबदा-या पूर्ण पार पाडून नातवंडामध्ये रममाण होणारे पु.ल व त्याचे व्यक्तिमत्व या कथेतून व्यक्त झालेले आहे.

वरील आशय नियमितपणा व श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९१. वाड्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः निर्भय गोपालजी

मूल्य ः सत्य, प्रामाणिकपणा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

" हे पहा. मी ट्रॅफिकच्या नियमानुसारच चाललो आहे. हे नियम मी कुठेही मोडलेले नाहीत. नियम न मोडणा-यांना पोलिस काहीही करू शकत नाहीत. मी चाललो. मग त्यांनी

त्यांचा गाडी नंबर लिहून घेतला. गोपालजी पुढ गेले. पुढ काहीही झाले नाही. कारण गोपालजींनी कोणताही नियम मोडलेलाच नव्हता. कायदा पाळला होता."

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'निर्भय गोपालजी' या कथेतील आहे. गोपालजी हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. ट्रॅफिकचे नियम न मोडताही त्यांच्यावर आरोप केल्यानं त्यावर चिडून त्यांनी उत्तर दिले. हा आशय सत्य व प्रामाणिकपणा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९२. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : ग्रंथालयातील 'भावे' प्रयोग

मूल्य : सहकार्य व सहानुभूती

कथानामक : डॉ. न.म. जोशी

मित्र भारावून गेले. विदयार्थी, सहकारी, जिज्ञासू, वाचक, पुस्तकप्रेमी या सर्वांना वेळप्रसंगी नियमांचा अपवाद करून ग्रंथधन वाटणारे भावे यांनी आपल्या जीवनात जपलेला भावे प्रयोग कधीही न विरता येण्यासारखा

वरील आशय 'नमगोष्टी' मधील ग्रंथालयातील भावे प्रयोग या कथेतील आहे. शशी भावे या कथेतील प्रमुख पात्र आहेत. ग्रंथालयातील भावे यांनी त्यांच्या सहकार्यवृत्तीने सगळयांची मने जिंकली.

हा आशय सहानुभूती हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९३. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः कळीचं बारस

मूल्य ः निसर्गप्रेम

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

मुलांनी टाळया वाजविल्या आणि मग गुरूजी भावभरल्या आवाजात सर्व मुलांना म्हणाले मुक्या कळयांवर असं प्रेम करायला शिका. त्यांना जगवा वाढवा जोजवा फुलवा तरच ती पुढं फुलं होऊन तुम्हाला सुगंध देतील आनंद देतील. आणि कळीच बारसं असं यथासांग साजर झालं

वरील आशय 'नमगोष्टी'मधील 'कळीच बारसं' या कथेतील आहे. 'मेढेकर' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. मेढेकरांनी सर्व पशु, पक्षी, वृक्ष, निसर्ग हयांच्या वर खरे प्रेम कसे करावे हयांचे प्रत्यक्ष अनुभव देऊन अध्यापन करत असतं. हा आशय निसर्गप्रेम व पर्यावरण संरक्षण हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९४. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः देणं दुखण आणि दारिद्रय

मूल्य ः बचत व श्रमप्रतिष्ठा

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

त्यावेळी मिळणारया तुटपुंज्या पगारातील सात आठ रूपये संसाराला खर्च करून ते एक रूपया शिल्लक टकित असत. ते स्वतः व्यत्पन्न शास्त्री होते.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'देणं दुखण आणि दारिद्रय' या कथेतील आहे. 'वासुदेव अभ्यंकर' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. तुटपुंज्या पगारात ही एक रूपया बचत म्हणून बाजूला ठेवत भविष्यकाळाची तरतूद म्हणून .

वरील आशय बचत व श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९४ अ. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः देणं दुखण आणि दारिद्रय

मूल्य ः कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

अशा या लक्ष्मीनं चार सारस्तवतांना जन्म दिला. त्यातला धाकटा शंकर त्यानं आई वडिलांची जीन्स पुरेपुर उचलले आणि तोही मिरज ने मॅसाच्युलेट्स व्हााया पुणे असा प्रवास करीत विदयावाचस्पती शंकर अभ्यंकर झाला. देणं देखणं आणि दारिद्रय या तीन 'द' कारांशी हसतमुखानं सामना करणरया या वासुदेव पत्नींन जितेंद्र या नातवाच्या मुंजीचा मांडव उतरल्यावर कृतार्थ शांततेने देह ठेवला.

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'देणं, दुखणं आणि दारिद्रय' या कथेतील आहे. 'वासुदेव अभ्यंकर' हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. कठीण परिस्थितीला सामोरे जाताना दारिद्रय दुःख याची कधी तमा केली नाही. स्वतःच्या प्रामाणिक कष्टाने प्रत्येक परिस्थितीला सामोरे गेले व समाधानी मनानं देह सोडला.

वरील आशय कर्तव्यदक्षता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९५. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः 'कथा पुंडलिका भेटी परब्रम्ह आले.'

मूल्य ः कर्तव्यदक्षता

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

त्यावेळी पुंडलिक आई वडिलांची सेवा करीत होता. पाय चेपत होता. पुंडलिकाची ही सेवा बघून भगवंत आनंदले त्यांनी साक्षातस्वरूप धारण केलं. आता देवाला बसायला सांगायचं. पण कुठं आई वडिलांच्या सेवेत व्यत्यय नको म्हणून पुंडलिकानं जवळची एक वीट देवासमोर फेकली आणि तो कळवळयानं देवाला म्हणाला "देवा एवढी सेवा पूर्ण करतो आणि मग तुमच्या दर्शनाला येतो. तोवर इथं उभे रहा."

वरील आशय 'नमगोष्टी' मधील 'कथा पुंडलिका भेटी परब्रम्ह आले' या कथेतील आहे. 'पुडलिक' हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. पुंडलिकाने आई वडिलाच्या सेवेत व्यत्यय नको म्हणून देवालाही वीटेवर उभे राहण्यास सांगितले. देवापेक्षा आई वडीलांची सेवा सर्वश्रेष्ठ .

वरील आशय कर्ताव्यदक्षता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९५ अ. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः 'कथा पुंडलिका भेटी परब्रम्ह आले.'

मूल्य ः प्रेम, भूतदया

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

“देवा माझ्या साठी या विटेवर तु उभा राहिलास आता असाच तुझ्या भक्तांसाठी इथं उभा रहा त्यांना दर्शन देऊन आनंद दे.” मग पांडुरंग स्वरूपात श्री कृष्ण तिथेच राहिले. तेच पंढरपूर जिथ पुंडलिका भेटी परब्रम्ह आले ते पंढरपूर.

वरील आशय ‘नमगोष्टी’ मधील ‘कथा पुंडलिका भेटी परब्रम्ह आले’ या कथेतील आहे. ‘पुंडलिक’ हा या कथेतील प्रमुख पात्र आहे. आई वडिलांचे निःस्सिम प्रेम त्यांची मनोभावे सेवा पाहून व आपल्या भक्ताच्या प्रेमासाठी पांडूरंग विटेवर उभे राहिले. वरील आशय प्राणिमात्रांवरील व मानवावरील निस्सिम प्रेम व भूतदया ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९६. वाङ्मय प्रकार ः कथा

कथा प्रकार ः बोधकथा

नमगोष्टी कथा ः ‘प्रकटे तवं तंव न दिसे’

मूल्य ः गर्वहरण

कथानामक ः डॉ. न.म. जोशी

अशा पासष्ट ओव्या एकापाठोपाठ एक ज्ञानेश्वरांनी लिहिल्या आणि ते पत्र मग शिष्यांकरवी चांगदेवांना पाठवून दिले. तीच चांगदेव पासष्ठी चांगदेव पासष्ठी वाचून कोरे पत्र पाठविण्याचा चांगदेवांचा अहंकार गळून पडला आणि त्यांना स्वरूप ज्ञानप्राप्त झाले.

वरील आशय ‘नमगोष्टी’ मधील ‘प्रकटे तवं तंव न दिसे’ या कथेतील असून ‘संत ज्ञानेश्वर’ हे या कथेतील प्रमुख पात्र आहे.चांगदेवांचा अहंमपणा स्वार्थीपणा मी पणा नष्ट करण्यासाठी संत ज्ञानेश्वरांनी कोरे पत्र पाठवले. त्यात ओव्या लिहिलेल्या होत्या. परंतू त्यांच्या अहंकारामुळे त्यांना ते पत्र कोरे दिसले व ख-या ज्ञानाची प्रचिती त्यांना झाली.

वरील आशय गर्वहरण अहंकार ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९७. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : 'होतं अस कधी कधी'

मूल्य : समतोल विचार

कथानामक : डॉ. न.म. जोशी

बाबा तुम्ही लोणावळयात गेलात आणि इकडं गंमतच झाली. आपल्याकडे आज सायंकाळी पाहुणे येणार आहेत. त्यांच्यासाठी बासुंदी आणायला आईनं सहा लीटर दूध चुलीवर ठेवलं होतं. एवढयातच तिची नेहमीची बोहारीण आली आणि तिच्याशी सौदा पटण्यात आईचा खूप वेळ गेला. चुलीवरचं दूध ऊतू गेलं. पाच लिटर दूध ऊतू गेलं त्यामुळे आईला वाईट वाटल. साठे यांनी डोळे विस्फारले. पत्नीमधील परिवर्तनाचा उलगडा झाला आणि ते मिश्किलपणे म्हणाले होतं असं कधी कधी.

वरील आशय नमगोष्टी मधील 'होतं अस कधी कधी' या कथेतील आहे. साठे हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. नेहमी साठयांच्या हातून चुका झाल्यास त्यांची पत्नी ओरडते. परंतु स्वतःच्या हातांनी चूक झाल्याने शांत बसली. या प्रसंगावरून साठे न रागावता त्यांनी विनोदबुध्दीने परिस्थिती सावरून घेतली.

वरील आशय समतोल विचार हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९८. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : श्रीमंतीचं रहस्य

मूल्य : सत्य, वस्तुनिष्ठता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

"सांगतो" मास्तर शांतपणे म्हणाले "त्यानं असं सांगितलं की माझ्याकडे दहा वीस शेरवान्या होत्या. पण रावसाहेबांकडं पार्टी असल्यामुळे सर्वच गेल्या." सर्वांचे चेहरे पाहण्यासारखे झाले. गरीब मास्तर हसत होते.

वरील आशय नमगोष्टी मधील 'श्रीमंतीचं रहस्य' या कथेतील आहे. शाळा मास्तर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. मास्तरांनी प्रामाणिकपणे स्वतःचा मूळचा जो पेहराव आहे त्याची लाज न बाळगता पार्टीला गेले. परंतु त्यांचा ज्या लोकांनी अपमान केला त्यांना हजरजबाबीने उत्तर देवून सत्य परिस्थिती कथन केली.

वरील आशय सत्य व वस्तुनिष्ठता ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

९९. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : साठ वर्षे फुकट

मूल्य : समाधान

कथानामक : डॉ. न.म. जोशी

ही नदी तरून जाण्यासाठी आपण साठ वर्षे दिलीत. ती तरून जाण्यासाठी तुम्हाला पोहणं आलं असतं. नाही तर नावाडयाला बोलावून त्याच्या नावेतून जाता आलं असतं. त्यासाठी साठ वर्षांची तपश्चर्या कशाला? तोच काळ आपण निर्विकल्प आनंदात घालविला असता तर ती आनंदसिध्दी या सिध्दीहून अधिक आनंददायी होती.

वरील आशय नमगोष्टी मधील 'साठ वर्षे फुकट' या कथेतील आहे. दयानंद हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. सिध्दी प्राप्त करून घेण्यासाठी त्यांनी साठ वर्षे घालविली. ती सिध्दी दयानंदानी दहा मिनिटांत प्राप्त केली. त्यांनी त्यांचे साठ वर्षे आनंदी जीवन जगण्यासाठी घालवले असते तर त्यांचे जीवन आनंददायी झाले असते. हा आशय 'समाधान' हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१००. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : रक्त तेव्हाचे आणि आताचे

मूल्य : नितिमत्ता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

"पहिल्या वेळी माझ्या शरीरात माझं रक्त होतं. दुस-यावेळी तुमचं दोन वेळा घेतलेले रक्त कोकणस्थी रक्त माझ्या शरीरात होतं. त्याचाच हा परिणाम." इंजिनिअर हे ऐकून सुन्न झाला.

वरील आशय नमगोष्टी मधील 'रक्त तेव्हाचे आणि आताचे' या कथेतील आहे. इंजिनिअरने स्वतःच्या चतुराईने राजाची नितिमत्ता बदलली.

हा आशय नितिमत्ता हे मूल्य रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

१०१. वाङ्मय प्रकार : कथा

कथा प्रकार : बोधकथा

नमगोष्टी कथा : कुबेर आणि फकीर

मूल्य : प्रामाणिकपणा, सत्यता

कथानामक : डॉ. न.म. जोशी

"आपण कुबेर मी संन्यासी संन्यासीचे आभार आपणाला चालतील?" दोघेही खळखळून हसले. स्वामीजींची शिष्या एम्मा कॉव्ह ही आपली मैत्रीण पॉल वेदिंयर हिला म्हणाली फकिराने कुबेराचे परिवर्तन केले.

वरील आशय नमगोष्टी मधील 'कुबेर आणि फकीर' या कथेतील आहे. डॉ.रॉकफेलर हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. फकीराने कुबेराचे परिवर्तन केले. फकिराच्या प्रामाणिकपणा व सत्यता ही मूल्ये रूजविण्यासाठी उपयुक्त आहे.

## ४.३ नैतिक मूल्यांशी संबंधित संकलित आशयांचे संख्यात्मक वर्गीकरण व विश्लेषण ः

संशोधनातील निष्कर्ष अचूक येण्यासाठी संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करणे व त्याचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणे हे महत्त्वाचे असते. वरील संख्यात्मक माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण बघता असे लक्षात येते की डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय हे नैतिक मूल्यांच्या स्पष्टीकरणासाठी संदर्भ साहित्यच आहे. त्यातही डॉ.न.म.जोशी यांनी बाल कुमारांसाठी विविध वाङ्मय प्रकार हाताळले आहेत. उदा. कथा, चरित्र कथा, नाटिका, एकांकिका, बोधकथा इत्यादी मूल्यांनूसार निष्कर्ष काढले त्यामुळे निष्कर्षामध्ये नेमकेपणा येण्यास मदत झाली.

डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील नैतिक मूल्ये यांच्याशी संबंधित आशय शोधून त्यांचे मूल्यांच्या तक्त्यांमध्ये संख्यात्मक वर्गीकरण केले. प्रत्येक तक्त्याचे मूल्यानुसार विश्लेषण केले आणि त्याचा अभ्यास करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील नैतिक मूल्यांशी संबंधित 'बोधकथा' या वाङ्मय प्रकारातील आशयांचे संख्यात्मक वर्गीकरण पुढील प्रमाणे आहे ः

| अनु.क. | मूल्ये | एकुण कथा |
|---|---|---|
| १. | संवेदनशीलता | ५३ |
| २. | नीटनेटकेपणा | २६ |
| ३. | वक्तशीरपणा | २० |
| ४. | स्त्री पुरूष समानता | १२ |
| ५. | श्रम प्रतिष्ठा | २७ |

| | | |
|---|---|---|
| ६. | वैज्ञानिक दृष्टिकोन | ६९ |
| ७. | राष्ट्रभक्ती | १४ |
| ८. | राष्ट्रीय एकात्मता | १६ |
| ९. | सौजन्यशीलता | ७0 |
| १0. | सर्वधर्मसहिष्णुता | २३ |

## ४.४ समारोप ः

संशोधनातील निष्कर्ष अचूक येण्यासाठी संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करणे व त्याचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणे हे महत्वाचे असते. वरील माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण बघता असे लक्षात येते की डॉ.न.म.जोशी यांचे साहित्य हे नैतिक मूल्यांच्या स्पष्टीकरणासाठी संदर्भ साहित्यच आहे. त्यातही डॉ.न.म.जोशी यांनी बाल कुमारांसाठीचे विविध वांङ्मय प्रकार हाताळले आहेत. उदा. कथा, चरित्रकथा, नाटिका, एकांकिका, बोधकथा इ. संकलीत माहितीच्या विश्लेषणात बोधकथा या वाङ्मय प्रकाराचे पुस्तकशः विश्लेषण केल्यामुळे त्यानुसारही निष्कर्ष काढता आले आणि निष्कर्षामध्ये नेमकेपणा येण्यास मदत झाली.

डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील नैतिक मूल्ये यांच्याशी संबंधीत आशय शोधून त्यांचे मूल्यांच्या तक्त्यांमध्ये संख्यात्मक वर्गीकरण केले.

*****

# प्रकरण 5

# सर्वेक्षणाचा निष्कर्ष

## ५.१ प्रस्तावना ः

शामाजिक संशोधनामध्ये संशोधनासाठी उपयुक्त ठरणारी माहिती आणि तथ्य गोळा करण्याचे कार्य संशोधकास करावे लागते. संशोधक जेव्हा स्वतः माहितीचे संकलन करतो तेव्हा त्यास प्रत्यक्ष माहितीचे संकलन असे म्हणतात. यामध्ये निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची आणि वैयक्तिक अध्ययन पद्धतीचा समावेश होतो.

तथ्य आणि माहिती संकलनासाठी या सर्व पद्धतीबरोबर सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग माहिती संकलनासाठी होतो. जेव्हा संशोधक संशोधन करताना स्वतःसोबत इतर तज्ज्ञांचा सहभाग घेऊन, मदत घेऊन संशोधनासाठी लागणारी माहिती गोळा करतो तेव्हा त्यास सर्वेक्षण असे म्हणतात. संशोधन विषयाचे स्वरूप आणि कार्यक्षेत्र व्यापक असेल तर सामूहिक स्तरावरून वेगवेगळया घटकांचे सर्वेक्षण केले जाते.

सर्वेक्षण ही सामाजिक संशोधनाची अभ्यास पद्धत आहे. अभ्यासपद्धतीचा उद्देश सामाजिक समस्यांचा अभ्यास हा नसून त्यासोबतच सामाजिक समस्यांचे निराकरण हा आहे. सामाजिक समस्यांचा शोध आणि समस्या सोडविण्यासाठी उपाय या उद्देशातून सामाजिक सर्वेक्षण ही पध्दत विकसित झाली आहे. या पद्धतीस वैज्ञानिक पध्दत समजले जाते कारण या पध्दतीनुसार काढलेले निष्कर्ष हे वास्तविक निरीक्षणावर आधारित असतात. सामाजिक संशोधनामध्ये "वास्तविक निरीक्षणे" ही उपयुक्त ठरतात म्हणून सामाजिक संशोधनात सर्वेक्षण ही पद्धती उपयुक्त, वस्तुनिष्ठ, वास्तविक निरीक्षणावर आधारलेली पध्दत म्हणून विचारात घेतली जाते. शिक्षणविषयक अभ्यास कामात "Value Base Education" ही संकल्पना शिकविली जाते. या संकल्पनेच प्रभाव प्रतिसाद अभ्यासण्यासाठी सर्वेक्षण पद्धत उपयुक्त ठरू शकते. या

पध्दतीचा उपयोग सामाजिक समस्येवर उपाययोजना आणि सामाजिक कल्याणासाठी धोरणात्मक निर्णय घेणे या दृष्टीने महत्त्वाचा समजला जातो.

सर्वेक्षण करण्यामागचा हेतू असा होता की,

१. संशोधकाकडून सर्वेक्षण नियंत्रित केले जात असल्याने सर्वेक्षणाचे निष्कर्ष विश्वसनीय आणि वस्तुनिष्ठ राहतात.

२. सामाजिक सर्वेक्षणाद्वारे पूर्वग्रह, आवडी निवडी आणि मनोवृत्तींना स्थान दिले जात नसल्याने सामाजिक सर्वेक्षणाद्वारे वस्तुनिष्ठ अभ्यास केला जातो.

३. सर्वेक्षण करताना संशोधकाचा संबंध इतर तज्ज्ञांची आणि अभ्यासकाशी येत असल्यामुळे सर्वेक्षणाचे निष्कर्ष विश्वसनीय राहतात.

४. सामाजिक सर्वेक्षणाद्वारे समाजातील वेगवेगळया घटकांचा आणि पैलूंचा अभ्यास होत असल्यामुळे समाजात झालेले परिवर्तन आणि त्यांचे परिणामाबाबतचे ज्ञान सामाजिक सर्वेक्षणाद्वारे प्राप्त होते.

५. सामाजिक सर्वेक्षणाद्वारे समाजातील वेगवेगळया समस्यांचे अध्ययन करून त्वरीत उपाय सुचविले जात असल्याने विघटनवादी कृत्यांना प्रतिबंध घालता येतो.

६. सामाजिक सर्वेक्षण वैज्ञानिक पध्दतीवर आधारलेले असल्याने सर्वेक्षणाचे निष्कर्ष हे उपयुक्त ठरतात.

संशोधन करत असताना संशोधकाला जे वाटते ते तर प्रस्तुत संशोधनात आहेच परंतु ज्या प्रमाणे संशोधकाचे मत आहे त्याच प्रमाणे इतर अनेक संशोधकांचे ही मत आहे. असा दुजोरा त्यांनी त्यांच्या मतावलीतून स्पष्ट केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनाची संशोधन पध्दती ही आशय विश्लेषणात्मक व सर्वेक्षणात्मक असल्यामुळे हया प्रकरणात सर्वेक्षण मते त्यांच्या मतावलीद्वारे स्पष्ट केलली आहेत.

या प्रकरणात ५ वी ते १२ वी पर्यंत भाषा पाठयपुस्तकातुन प्रतित होणारी मूल्ये सांगितली आहेत. इतकेच नव्हे तर पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक या स्तरावरील विविध शिक्षकांकडून मतावली भरून घेतली व त्यांचे अभिप्राय प्रस्तुत प्रकरणात स्पष्ट करण्यात आलेली आहेत.

## ५.२ पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचा मतावलीनूसार अभिप्राय ः

### शिक्षकांची मतावली

**पूर्व प्राथमिक शिक्षक ः**

| अ.क. | शिक्षकाचे नाव | कथा | कथेतून व्यक्त होणा-या मूल्यांची नावे |
|---|---|---|---|
| १. | संध्या भोर | सॉक्रेटिसची कसोटी | संवेदनशिलता , सौजन्यशिलता |
| | | भगवान ख्रिस्त | राष्ट्रभक्ति , नीटनेटकेपणा |
| | | माकडांची ध्यानधारणा | सर्वधर्म समभाव |
| | | शिक्षकांची संपत्ती | श्रमप्रतिष्ठा , वक्तशीपणा |
| | | ताजमहल वाचला | सौजन्य शीलता , संवेदनशीलता |
| २. | कल्पना जाधव | नोटेपेक्षा कागद महाग | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | निःस्पृह न्यायमूर्ती | वक्तशीरपणा |
| | | पाणिनीचा निश्चय | श्रमप्रतिष्ठा ,वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | पोळलेले हात तापलेली | राष्ट्रभक्ती , राष्ट्रीय एकात्मता |
| | | शेवटचा शालीवाहन | श्रमप्रतिष्ठा |
| ३. | प्रतिभा विचारे | खड्डा धोंडा आणि | सौजन्य शीलता, वक्तशीरपणा |
| | | मावळत्यानं केलं | स्त्री पुरूष समानता |
| | | बुडल्या बोटीतील जल | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | नाथ आणि जगन्नाथ | सर्वधर्म सहिष्णूता |
| | | चौदा महिने तेरा दिवस | राष्ट्रीय एकात्मता |
| ४. | छाया शिळीमकर | सोय बघणारा तो | स्त्री पुरूष समानता |
| | | घोडा परत घेऊन जावा | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | कथा व्हेनिस ते सुरत | श्रमप्रतिष्ठा |
| | | उपमहापौरांचा बंगला | सौजन्यशीलता, वक्तशीरपना |
| | | मायेचं अन्न | संवेदनशीलता |
| ५. | ज्योती न्याती | माधुकरी आणि मातेरे | राष्ट्रभक्ती, सर्वधर्मसमभाव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परदेशीचा पेनकिलर | श्रमप्रतिष्ठा, संवेदनशीलता |
| | | तैलबुध्दी जवाहर | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | रामायणाचे रामायण | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | ईश्वराचा साक्षात्कार | सौजन्यशीलता, नीटनेटकेपणा |
| ६. | शोभा दंडवते | माता आणि भिकारीण | राष्ट्रभक्ती, सर्वधर्मसहिष्णुता |
| | | खुशवंतसिंग आणि हो | राष्ट्रीयएकात्मता |
| | | न्यायमूर्तीचा न्याय | स्त्रीपुरूष समानता |
| | | बांगडया पितळेच्या नाहीत | स्त्री पुरूष समानता |
| | | गुरवे नमः | सौजन्यशीलता |
| ७. | मधुरा कुलकर्णी | थर्डक्लास बाबा | वैज्ञानिक दृष्टीकोन, संवेदनशीलता |
| | | आव्हान आणि आवाहन | स्त्री पुरूष समानता, सर्वधर्मसहिष्णुता |
| | | माती आणि मोहोरा | सौजन्यशीलता |
| | | मोठेपणाच्या कानामात्रा | संवेदनशीलता |
| | | कविता आणि भूगोल | वैज्ञानिक दृष्टीकोण |
| ८. | प्राची रेघे | शहरे आणि रोमांच | सौजन्यशीलता |
| | | खाँसाहेब टिपू खाँ | श्रमप्रतिष्ठा, वक्तशीरपणा |
| | | डेखण ते दिल्ली | संवेदनशीलता |
| | | फटया बापूचा डायनिंग | संवेदनशीलता |
| | | झगन्नाथे केले मज सकळ | संवेदनशीलता |
| ९. | शिल्पा मोरे | बर्फी नको पण कवी | सौजन्यशीलता, नीटनेटकेपणा |
| | | प्रधानाचं उत्कृष्ट चित्र | श्रमप्रतिष्ठा |
| | | समाधानाची खरेदी | स्त्री पुरूष समानता, संवेदनशीलता |
| | | पाण्यासाठी दाही दिशा | श्रमप्रतिष्ठा |
| | | रंग माझा वेगळा | सौजन्यशीलता |
| १०. | रश्मी खोपडे | लिमलेटच्या दोन गोळया | वक्तशीरपणा |
| | | सखु आजीचा दरारा | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | दोन वेळा संदेश | सर्वधर्मसमभाव |
| | | नादान सिंहाचे परिवर्तन | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | तिचा मी बाळ नेणता | सर्वधर्मसहिष्णुता |

**प्राथमिक शिक्षक ः**

| अ.क. | शिक्षकाचे नाव | कथा | कथेतून व्यक्त होणा-या मूल्यांची नावे |
|---|---|---|---|
| १. | अंजना सोनवणे | पाकिस्तानात शंकर भिडे | राष्ट्रभक्ती, सर्वधर्मसमभाव |
| | | आळवावरचे पाणी | श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | चाळ माझ्या पायात | वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा |
| | | शेवग्याच्या शेंगा | सौजन्यशीलता |
| | | खरेदी अक्षय्य तृतीयेची | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| २. | शोभा कांबळे | स्वातंत्र्य ही ईश्वरी आज्ञा | राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता |
| | | अचूक निवड | वैज्ञानिक दृष्टिकोण, नीटनेटकेपणा |
| | | कर्मवीरांची माया | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | प्रा.बर्वे वन्स मोअर | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | भोगणे जे दुःख त्याला | सर्वधर्म सहिष्णुता वैज्ञानिक दृष्टिकोण |
| ३. | प्रतिभा कोकाटे | योगक्षेमम् वहाम्यहम् | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | कुणाच्या खांदयावर | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | कलावंत शास्त्रज्ञ | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | न रागावण्याचे कारण | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | कात्री आणि सुई | सौजन्यशीलता |
| ४. | निलिमा जाधव | आम्ही हात पसरत नाही | सौजन्यशीलता |
| | | देवदूत आणि यमदूत | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | सावकार आणि श्री. म. | वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा |
| | | पुण्यासाठी पाप | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | देवाचा शोध | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| ५. | जया थोरात | जगदंबेच्या परडीत | सौजन्यशीलता |
| | | पुढील जन्म फुलांचा | सौजन्यशीलता |
| | | वाकडयावर झोपलेला | श्रमप्रतिष्ठा |
| | | अजून गाणे ऐकू या | संवेदनशीलता |
| | | कस्तुरी गोरटी वाल | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| ६. | संतोष क-हाड | नमस्कार मि. फार्जेट | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | वाघिणीची महत्त्वकांक्षा | श्रमप्रतिष्ठा, वक्तशीरपणा |
| | | इथे ओशाळला शंकर | श्रमप्रतिष्ठा, वक्तशीरपणा |
| | | निर्भय गोपालजी | सौजन्यशीलता, वक्तशीरपणा |
| | | ग्रंथालयातील भावे प्रयोग | वैज्ञानिक दृष्टिकोण, संवेदनशीलता |
| ७. | शिवाजी हजारे | कळीचं बारसं | वैज्ञानिक दृष्टिकोण, संवेदनशीलता |
| | | देणं, दुखणं आणि दारिद्रय | श्रमप्रतिष्ठा, संवेदनशीलता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुंडलिका भेटी परब्रम्ह | संवेदनशीलता, संवेदनशीलता |
| | | प्रकटे तवं तंव न दिसे | सौजन्यशीलता |
| | | होतं असं कधी कधी | संवेनशीलता सौजन्यशीलता |
| ८. | बाळू साळवे | श्रीमंतीच रहस्य | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | साठ वर्षे फुकट | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | रक्त तेव्हांचे आणि आताचे | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | खुबेर आणि फकीर | सौजन्यशीलता |
| | | सरता संचिताचे शेष | नीटनेटकेपणा, सौजन्यशीलता |
| ९. | अंजली खैरे | चांडालची अमृतवाणी | वैज्ञानिक दृष्टिकोण, संवेदनशीलता |
| | | कोमागाता माऊ | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | चामाबिना देह किनकी | सर्वधर्म समभाव वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | एक परी आणि तीन राक्षक | संवेदनशीलता |
| | | प्रकटले नरसिंह स्तंभातुनी | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| १०. | राहूल आव्हाड | प्रभाकराची वैकुंठसेवा २ | सर्वधर्म समभाव, सौजन्यशीलता |
| | | चिमणी का उडाली | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | होत्याचे नव्हते झाले | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | जैत रे जैत | सौजन्यशीलता, वक्तशीरपणा |
| | | साठीतील शूर सेनापती | राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता |

**माध्यमिक शिक्षक ः**

| अ.क. | शिक्षकाचे नाव | कथा | कथेतून व्यक्त होणा-या मूल्यांची नावे |
|---|---|---|---|
| १. | वैशाली नाकाडे | दरीदरीतून नाद गुंजला | राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता |
| | | विशाखा मधील वॉल्टेअर | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | मुलांची पाखरबाग | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | तळेगावकरांचा खटाटोप | वैज्ञानिक दृष्टिकोण, संवेदनशीलता |
| | | नर्मदेश्वरमध्ये न्यायाधीश | वक्तशीरपणा |
| २. | सुषमा दळवी | नांगर, चरक आणि झाड | श्रमप्रतिष्ठा, सर्वधर्म समभाव |
| | | लोकमान्यांचा वारसदार | सौजन्यशीलता |
| | | धन्य हा निधडा वैष्णव वीर | संवेदनशीलता |
| | | सांगली ते सानव्हितो | राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता |
| | | बोकीलांच्या शाळेत शन्ना | वैज्ञानिक दृष्टिकोण, नीटनेटकेपणा |
| ३. | किर्ती बावडेकर | ये लम्हा फिलहाल जी लेने दे | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | अक्षरांचं आकीत | श्रमप्रतिष्ठा, नीटनेटकेपणा |
| | | आनंदबनातील निर्मल गोपाळ | वैज्ञानिक दृष्टिकोण, सौजन्यशीलता |
| | | संरक्षणमंत्र्याची स्वप्नपूर्ती | वैज्ञानिक दृष्टिकोण, संवेदनशीलता |
| | | आणि त्याल घरं मिळालं | सौजन्यशीलता |
| ४. | करूणादेवी राऊत | सहा टिबांची किमया | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | सर्वाभूती नारायणा | वैज्ञानिक दृष्टिकोण, संवेदनशीलता |
| | | मी ची वेलांटी | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | नकोशी झाली हवीशी | सौजन्यशीलता |
| | | श्रीमंतीची आणि गरिबाची | स्त्री पुरूष समानता, सर्वधर्मसमभाव |
| ५. | मेघा देशपांडे | गंजण्यापेक्षा झिजणे बरं | श्रमप्रतिष्ठा, सौजन्यशीलता |
| | | रूग्ण माझे ग्राहक | श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | परमानंद माधवम् | वैज्ञानिक दृष्टिकोण, सर्वधर्मसमभाव |
| | | आणखी एक बागवान | सौजन्यशीलता |
| | | प्रतिभाक्षर | श्रमप्रतिष्ठा |
| ६. | साधना काशिद | रिक्षा, परीक्षा आणि शिक्षा | सौजन्यशीलता, वक्तशीरपणा |
| | | आम्ही वारिक वारिक | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | बैराग्याचा आशीर्वाद | सौजन्यशीलता |
| | | देवाशी केले एकेदेशी | स्त्री पुरूष समानता, सर्वधर्मसमभाव |
| | | आय.एन.एस. शिवाजी | राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | मेघा कठाळे | नन्ही दुनियॉं चा मोठा | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | कापसाचा दोरा आणि | सौजन्यशीलता |
| | | तत्वज्ञा मार्गदर्शक आणि मित्र | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | करूणा आणि कौर्य | सौजन्यशीलता, नीटनेटकेपणा |
| | | ओळखंल नाहीस देवाला□ | वैज्ञानिक दृष्टिकोण, वक्तशीरपणा |
| ८. | मेघना जाधव | सद्गुणांचे संमेलन | संवेदनशीलता |
| | | भूक पोटाची आणि ज्ञानाची | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | स्वप्न पराग | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | सात रूपये ते सात समुद्रपार | श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | त्या केशांते का हो | सर्वधर्म सहिष्णूता, वैज्ञानिक दृष्टिकोण |
| ९. | सीमा डांगळे | 'दिगूचा' अवतार | सौजन्यशीलता, नीटनेटकेपणा |
| | | भूप, शंकरा आणि भैरवी | श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रीय एकात्मता |
| | | "हुस्ना न तु ?" | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | लक्ष्मी स्त्रोत्र | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | अगतिक महिला दिन | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| १०. | मेघा देशपांडे | लोभ आहे जहर मोठे | सौजन्यशीलता |
| | | त्यांनी थोडा उजेड दयावा | स्त्री पुरूष समानता वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | पहा माझा ग्रंथ नीट | वैज्ञानिक दृष्टिकोण |
| | | कस्तुरी मृग | वक्तशीरपणा, संवेदनशीलता |
| | | विनमांगे मिले तो अमृतसमान | सौजन्यशीलता |

**उच्च माध्यमिक शिक्षक ः**

| अ.क. | शिक्षकाचे नाव | कथा | कथेतून व्यक्त होणा-या मूल्यांची नावे |
|---|---|---|---|
| १. | स्वप्ना गाडे | मातीची अक्षर पूजा | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | खुर्ची आणि व्यासपीठ | सौजन्यशीलता |
| | | पर्वती ते पार्लाद्वारा प्रभूपाखर | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | संध्येची लावणी | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | उपयोगी आणि निरूपयोगी | वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशीलता |
| २. | पुनम चव्हाण | दिव्या दिव्या ः चमत्कार | स्त्रि पुरूष समानता, राष्ट्रीय एकात्मता |
| | | कोठारींचा धडा | श्रमप्रतिष्ठा |
| | | जेथ जो संपत्ती आणि दया | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | ढेविले सोवळे घालुनी घडी | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | अंधाराचे डोळे | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| ३. | विद्या कांबळे | गोडबोले आजोबांची जर्मन | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | एक आण्याचा एक रूपया | श्रमप्रतिष्ठा |
| | | काळी माया | श्रमप्रतिष्ठा |
| | | बॅंकेत भर आणि विसरून | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | बोलणे झाले सहज निरोपाचे | वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशीलता |
| ४. | अर्चना दांगट | नाथांची लेखणी आणि | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | मातृभूमीचा मृदगंध | राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता |
| | | अमृत कुंभ शुध्द झाला | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | साधु आणि क्रांतीकारक | राष्ट्रीय एकात्मता |
| | | यांचे कसं होणार | श्रमप्रतिष्ठा |
| ५. | राणी कांबळे | हरिणीचे पाडस व्याघ्रे | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | आधी साहित्यकार मग | वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशीलता |
| | | भुलबुल आणि कुंचला | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | थुंकले आणि पाया पडले | संवेदनशीलता |
| | | वेडात खरोखर जगं जगते | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| ६. | प्रेरणा जाधव | देव झाला पंडित | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | दिलूचे भाग्य | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | अमर भूपाळी | वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशीलता |
| | | तलावातले चांदणे | श्रमप्रतिष्ठा |
| | | समाज वादाचा त्रिशुल | वैज्ञानिक दृष्टिकोन |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | प्रदिप सुरसे | मोटारीचे बलिदान | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | समतेची समस्या | स्त्रि पुरूष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | शाब्बास सुनबाई | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | सचिवालय ते शाळा | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | मुख्याध्यापकांचा कोट | स्त्रि पुरूष समानता, नीटनेटकेपणा |
| ८. | दादासाहेब भोरे | दरवळला स्मरणगंध | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | दिघे यांची तीर्थयात्रा | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | रानवा-याचा गंध | सर्वधर्म सहिष्णूता, राष्ट्रीय एकात्मता |
| | | प्रजासत्ताक दिन | राष्ट्रभक्ती, संवेदनशिलता |
| | | नोटेपेक्षा कागद महाग | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| ९. | वसुधा जावळे | निःस्पृह न्यायमूर्ती | वक्तशीरपणा |
| | | पाणिनीचा निश्चय | श्रमप्रतिष्ठा ,वैज्ञानिक दृष्टिकोन |
| | | पोळलेले हात तापलेली | राष्ट्रभक्ती , राष्ट्रीय एकात्मता |
| | | शेवटचा शालीवाहन | श्रमप्रतिष्ठा |
| | | खड्डा धोंडा आणि | सौजन्य शीलता, वक्तशीरपणा |
| १०. | स्मिता दातार | मावळत्यानं केलं | स्त्री पुरूष समानता |
| | | बुडल्या बोटीतील जल | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |
| | | नाथ आणि जगन्नाथ | सर्वधर्म सहिष्णूता |
| | | चौदा महिने तेरा दिवस | राष्ट्रीय एकात्मता |
| | | गीडवाणीचं गणित | संवेदनशीलता, सौजन्यशीलता |

## ५.३ इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या पाठयपुस्तकांचे मूल्यांनूसार वर्गीकरण ः

**इयत्ता ५ वी ः**

| अ.क्र | पाठाचे नाव | मूल्ये |
|---|---|---|
| १. | नाच रे मोरा | निसर्ग सौंदर्य |
| २. | हत्तीचे चातुर्य | चातुर्य |
| ३. | खेळूया शब्दांशी | गमंतीचे खेळ |
| ४. | ही पीसे कोणाची□ | सहकार्य, मदत, नवनिर्मिती, प्रामाणिकपणा |
| ५. | डराव डराव | प्राणीसंवर्धन, भूतदया |
| ६. | ऐकूया खेळूया | अभ्यासक्रमाची, भाषेची |
| ७. | खेळत खेळत वाचूया | अभ्यासक्रमाची, भाषेची |
| ८. | कोणापासून काय घ्यावे | निसर्गप्रेम |
| ९. | सिंह आणि बेडूक | भूतदया, प्रेम |
| १०. | बैलपोळा | संस्कृती संवर्धन, संक्रमण |
| ११. | इंधनबचत | पर्यावरण संरक्षण |
| १२. | भोलावे कसे□ | नितिमत्ता |
| १३. | अनुभव | निसर्गसौंदर्य |
| १४. | चित्रसंदेश | सौजन्यशीलता |
| १५. | नदीचे गाणे | निसर्गसौंदर्य |
| १६. | मी नदी बोलते | पाण्याचे महत्त्व, बचत |
| १७. | आमची सहल | निसर्ग सौंदर्य |
| १८. | पैशांचे व्यवहार | दैनंदिन व्यवहार |
| १९. | अनुभव २ | मदत, सहकार्य, प्रेम |
| २०. | गमतीदार पत्र | न्याय |
| २१. | छोटेसे बहिण भाऊ | प्रेम, आनंद |
| २२. | वाचूया लिहूया | भाषेची कौशल्य विकास |
| २३. | प्रामाणिक इस्त्रीवाला | प्रामाणिकपणा |
| २४. | ऐका पहा करा | कौशल्य विकास |
| २५. | मालतीची चतुराई | चतुरपणा, हुशारी, प्रामाणिकपणा |
| २६. | पतंगः कविता | निसर्ग सौंदर्य |
| २७. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | कष्ट, दानशूर |

**इयत्ता ६ वी ः**

| अ.क्र. | पाठाचे नाव | मूल्ये |
|---|---|---|
| १. | मौनाची भाषा | प्राणिमात्रांवर प्रेम, भूतदया |
| २. | ते अमर हुतात्मे झाले | देशप्रेम, देशाभीमान |
| ३. | तिसरा लाडू | ण्याय |
| ४. | कष्टात कसली लाज□ | कष्ट, जिद्द, प्रामाणिकपणा |
| ५. | पाऊस | पर्यावरण संरक्षण |
| ६. | वेळेचे महत्व | वक्तशीरपणा |
| ७. | पैशाचे मोल | वैचारिकता |
| ८. | फुलपाखरू | निसर्ग सौंदर्य |
| ९. | मोत्या | प्रामाणिकपणा |
| १०. | दामू आणि शामू | मदत, सहकार्य |
| ११. | झुंजूमुंजू झाले | निसर्ग प्रेम |
| १२. | असे झाले तर | निष्पापपणा, निरागसता |
| १३. | साहसी शैलेंद्र | शाहस, धाडस |
| १४. | चिंच | निसर्ग सौंदर्य |
| १५. | सदूचे बिल | विश्वास, प्रामाणिकपणा, मदत, सहकार्य |

**इयत्ता ७ वी ः**

| अनु. क्र. | पाठाचे नाव | मूल्ये |
|---|---|---|
| १. | ये रे ये रे पावसा | निसर्गप्रेम, निसर्ग सौंदर्य |
| २. | कष्ट हेच धन | कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा |
| ३. | गवतफुला रे गवतफुला | प्रेम, लळा |
| ४. | कल्पकतेचे वरदान | कला, उत्तेजना, सेवाभाव |
| ५. | कोण हा मित्र | वृक्षसंवर्धन, परोपकार |
| ६. | भाकरीची गोष्ट | कष्ट, अन्नाची नासाडी करू नये |
| ७. | हिरवे हिरवे | निसर्गसौंदर्य |
| ८. | दिवाणाचे गुपित | चाणाक्ष, कर्तबगार, कार्यकुशलता |
| ९. | सरीवर सरी | पर्यावरं, निसर्ग |
| १0. | लहुजी वस्ताद | देशप्रेम, ध्येयवादी |
| ११. | पप्पु आणि चिमणीचं घरटं | जिव्हाळा, प्रेम |
| १२. | आरसेमहल | खाल्पनिकता |
| १३. | विदया उजळणी | योग्य आचरण, ज्ञानाचे महत्त्व |
| १४. | स्वच्छ सुंदर युरोप | निसर्ग संतुलन, स्वच्छता, सुंदरता |
| १५. | पुसू नका | धर्मनिरपेक्षता, न्याय, सर्वशांती |
| १६. | शौर्यकथा झलकारीची | शौर्य, धैर्य, पराक्रम, सन्मान |
| १७. | कळी | निसर्ग सौंदर्य |

**इयत्ता ८ वी ः**

| अनु. क्र. | पाठाचे नाव | मूल्ये |
|---|---|---|
| १. | उषःकाल | |
| २. | माणसातला देव | प्रेम, माणुसकी |
| ३. | जिकडे तिकडे पाणीच पाणी | निसर्ग प्रेम संरक्षण |
| ४. | नीलेशचे साहस | साहस, धाडस |
| ५. | गौरवगाण | देशभक्ती, राष्ट्रीय प्रेम |
| ६. | ...तर मी तुम्हाला शोधत येईन | वैज्ञानिक दृष्टीकोन |
| ७. | माझा गाव | संस्कृती दर्शक |
| ८. | आगळी वेगळी दिवाळी | मदत, सहकार्य, प्रेम |
| ९. | आव्हान | आव्हान, धाडस |
| १०. | दिनूची कामल | सौजन्य, सहकार्य |
| ११. | आला क्षण | वक्तशीरपणा |
| १२. | माझा छंद माझा आनंद | छंद, अभ्यास |
| १३. | आभाळाची आम्ही लेकरे | कष्टाळूपणा |
| १४. | विलक्षण पैज | प्रामाणिकपणा |
| १५. | वाक्प्रचारांच्या गमतीजमती | प्राचिन संस्कृती |
| १६. | चैत्रपाडवा | निसर्ग सौंदर्य |
| १७. | ळोकनेते बाळासाहेब देसाई | मेहनत, कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा |

**इयत्ता ९ वी ः**

| अनु. क्र. | पाठाचे नाव | मूल्ये |
|---|---|---|
| | **गदय ः** | |
| १. | पन्हाळादर्शन | ऐतिहासिक वारसा जतन |
| २. | देशोदेशीचे ज्ञानेश्वर | वैज्ञानिक दृष्टीकोन |
| ३. | माझी आई | प्रेम, वात्सल्य |
| ४. | कुमारांपुढील कार्य | निसर्ग प्रेम |
| ५. | रणरगिणीचे बलिदान | देशाभीमान, राष्ट्रप्रेम |
| ६. | मला घडवणारे शिक्षक | आदर, प्रेम |
| ७. | शिक्षा | धाडसं |
| ८. | चोरी | उद्दात्त नैतिक शिकवण, प्रामाणिकपणा |
| ९. | मातीचा संसार | कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा |
| १०. | मुलाखतीच्या बाहेर | |
| ११. | दार घराचे सदैव बंद | |
| १२. | मनपंसत ऋतू वसंत | निसर्ग, पर्यावरण संवर्धन |
| १३. | मुजावर गुरूजी | प्रामाणिकपणा, निष्ठा, कार्यप्रती |
| | **पदय ः** | |
| १. | संतवाणी ः | परमेश्वर भक्ती प्रेम |
| | अ. देवाविण शून्य मुख | परमेश्वर भक्ती प्रेम |
| | आ. विठ्ठल विठ्ठल गजरी | परमेश्वर भक्ती प्रेम |
| २. | थुई थुई धारा | निसर्ग पर्यावरण संवर्धन |
| ३. | माणसं अजून गाऊ शकतात | आशावाद |
| ४. | सागरसंध्या | पर्यावरण संरक्षण |
| ५. | आत्महत्या हा पर्याय नाही | आशावाद, इच्छाशक्ती |
| ६. | पाणी | जिवनमूल्य |
| ७. | वाटेवरी काचा गं | स्त्री पुरूष समानता |
| | **स्थूलवाचन ः** | |
| १. | वृक्षसंभार | पर्यावरण संरक्षण |
| २. | व्यंकटेश माडगुळकर यांची चित्रकला | कलाविष्कार |
| ३. | माझा अभ्यास माझा छंद | कष्टाळू |

**इयत्ता १० वी ः**

| अ.क | पाठाचे नाव | मूल्ये |
|---|---|---|
| | **गदय ः** | |
| १. | संवाद विसंवाद | |
| २. | शाश्वत शिक्षणसंपत्ती | |
| ३. | अपूर्व भेट | श्रद्धा, नितीमत्ता, आदर |
| ४. | मास्तर आणि मी | विश्वास |
| ५. | हिमालय | पर्यावरण संरक्षण |
| ६. | परिवर्तनाचे उत्सव | योग्य वर्तन, चांगल्या गोष्टींचा आदर |
| ७. | वारूळ | सहकार्य, मदत, प्रेम |
| ८. | उरूसाचे दिवस | संस्कृती संवर्धन |
| ९. | माणुसकीचा झरा | मानवता, प्रेम, सहकार्य |
| १०. | निसर्गवेध | निसर्गप्रेम, निसर्गसंवर्धन |
| ११. | बावूजी | मोठयांबद्दल आदर, योग्य सांभाळ करणे |
| १२. | काय राव पुस्तकराव | काळजी |
| | **पदय ः** | |
| १. | संतवाणी अ. आजि सोनियाचा दिवस | परमेश्वर भक्ती प्रेम |
| | आ.कृपा करी पंढरीनाथा | परमेश्वर भक्ती प्रेम |
| | इ. किती हे सुख | परमेश्वर भक्ती प्रेम |
| २. | जिथे राबती हात | कष्ट, परमेश्वर भक्ती प्रेम |
| ३. | माझ्या घरटयात | समाधान, सुख, मानसिक शांती |
| ४. | प्रलय | समानता, सर्वधर्म समानता, निरपेक्षता |
| ५. | घाव | |
| ६. | आपण धरणी गं | सहनशीलता, त्याग, धाडस |
| ७. | एकत्वाचे गति महान | एकता, एकात्मता |
| | **स्थूलवाचन ः** | |
| १. | नातवंडांस पत्र | पर्यावरण संरक्षण, योग्य संस्कार |
| २. | प्रतिसरकार | देशभक्ती, देशप्रेम |
| ३. | गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व | प्राचीन संस्कृती संवर्धन |
| ४. | मुलांचे स्वप्न | मदत, सहकार्य, प्रेम |

**इयत्ता ११ वी ः**

| अ.क्र. | पाठाचे नाव | मूल्ये |
|---|---|---|
| | **व्यक्तिचित्रे ः** | |
| १. | प्रिय बाबा... | नीटनेटकेपणा□संवेदनशीलता□श्रमप्रतिष्ठा |
| २. | झेप विश्वविक्रमाची | वैज्ञानिक दृष्टिकोन□संवेदनशीलता |
| ३. | आयटीतज्ज्ञ शेतकरी | वैज्ञानिक दृष्टिकोन□श्रमप्रतिष्ठा |
| | **गद्य ः** | |
| १. | वृक्ष व उदक बहुत जतन राखावें | पर्यावरण रक्षण□वृक्ष व जलसंवर्धन |
| २. | माझ्या युवक मित्रांनो□ | सौजन्यशीलता□श्रमप्रष्ठा□नीटनेटकेपणा |
| ३. | अजिंठा | सर्वधर्म समभाव□सामाजिक वारसा |
| ४. | कायमची सोबत | विवेकनिष्ठा |
| ५. | माती आणि कागुद | ज्ञानाचे महत्त्व□भक्तशीरतपणा□श्रमप्रतिष्ठा |
| ६. | नैनीताल | पर्यावरण संरक्षण |
| ७. | आझादीचा महायज्ञ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास |
| | **पद्य ः** | |
| १. | अ. जोडीनियां धन | भूतदया□सौजन्यशीलता |
| | ब. ज्ञान सर्वांहूनी श्रेष्ठ | ज्ञानाद्वारे सामाजिक उन्नती |
| २. | अज्ञान | बुद्धिनिष्ठा□शिक्षणाचे महत्त्व |
| ३. | भंगु दे काठिन्य माझे | चिंतनशीलता□विज्ञाननिष्ठा□सौजन्यशीलता |
| ४. | आमचे निशाण | राष्ट्रनिष्ठा□विज्ञाननिष्ठा |
| ५. | तांडा चालला | संवेदनशीलता□सर्वधर्मसमभाव |
| ६. | सूर्योदय | जातिभेदविरहित□समाजव्यवस्था |
| ७. | राजवाडा | संवेदनशीलता□निसर्गप्रेम |
| ८. | सोनं होऊन उगावं | श्रमप्रतिष्ठा□सर्वधर्मसमभाव |
| ९. | आई□मला जन्म घेऊ दे□ | स्त्री पुरूष समानता |
| १०. | झाडे सडकेलगत उगवलेली | पर्यावरण जागृती व निसर्गप्रेम |

**इयत्ता १२ वी ः**

| अनु. क. | पाठाचे नाव | मूल्ये |
|---|---|---|
| १. | विनोद ः एक वाङ्मय प्रकार | विनोद बुध्दी |
| २. | भुताचा जन्म | विनोद बुध्दी |
| ३. | दहावीची (अ) पूर्वतयारी | विनोद बुध्दी |
| ४. | चाफा | विनोद बुध्दी |
| | **गदय ः** | |
| १. | ज्याचं त्याचं नंदनवन | वैचारिकता |
| २. | आदर्शाच्या शोधात | प्रेरणा, बळ |
| ३. | माझ्या आयुष्याची गोष्ट | प्रेरणा, बळ |
| ४. | ... आणि कैदेत | जिद्द |
| ५. | अति काळजीचे परिणाम | वैचारिकता |
| ६. | सोयरा वृक्षवल्लींचा | पर्यावरण संरक्षण, जतन |
| | **पदय ः** | |
| १. | संतवाणी ः | |
| | अ. सांगितली खूण मनें माझ्या | परमेश्वर भक्ती, प्रेम, श्रद्धा |
| | आ. तू येरे बा विठ्ठला | परमेश्वर भक्ती, प्रेम, श्रद्धा |
| | इ. अभक्ताची ओळख अखंड | परमेश्वर भक्ती, प्रेम, श्रद्धा |
| २. | अखंड | परमेश्वर भक्ती, प्रेम, श्रद्धा |
| ३. | देव अजब गारोडी | परमेश्वर भक्ती, प्रेम, श्रद्धा |
| ४. | आवाहन | देशप्रेम, शौर्य, धाडस |
| ५. | या जन्माला फुटे न भाषा | प्रेम |
| ६. | खांब | धाडस, शक्ती, बळ |
| ७. | विचार | वैचारिक दृष्टिकोन |
| ८. | बहरतील मळे | पर्यावरण संरक्षण |
| ९. | णव्या शहराविषयी | संस्कृती जतन |

## ५.४ समारोप :

वरील प्रमाणे संशोधन पद्धतीनूसार सर्वेक्षण पध्दतीचे वर्गीकरण व त्याचे स्पष्टीकरण त्याच बरोबर इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व पाठयपुस्तकांचे मूल्यानूसार वर्गीकरण करण्यात आलेले आहे व पुर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांकडूनही न.म. जोशी यांचे साहित्य हे मूल्यशिक्षण व संदर्भासाठी उपयुक्त असल्याचा दुजोरा त्यांच्या मतावलीद्वारा स्पष्ट केलेला आहे.

*****

संदर्भ ग्रंथ ः


❖ संशोधन पध्दती, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक - १३, डॉ. गंगाधर वि. कायदे - पाटील, पान.क. १३.१ ते १३.२२


*****

# प्रकरण 6
# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## 6.1 प्रस्तावना ः

शिक्षण हे प्रवाही असल्याने शिक्षणात नेहमीच नवनवीन विचार प्रवाह येतात. शिक्षणाचा व शिक्षण प्रक्रियेचा विचार करण्यासाठी वेळोवेळी विविध शिक्षण आयोग व शैक्षणिक धोरण हे येतच असतात. त्यांच्या शिफारशी त्यांनी सुचविलेल्या अभ्यासक्रमाचे आराखडे वगैरे शिक्षणाला समृद्ध करीत असतात. विविध शैक्षणिक धोरणाला अनुसरून जे विचार प्रवाह येतात त्यांची पूर्तता करणे सुद्धा गरजेचे असते.

अलीकडच्या काळातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये शिक्षण क्षेत्रात बरेच बदल सुचविले गेले. त्यात प्रामुख्याने नैतिक मूल्यांचा अंतर्भाव झाला आहे. या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, सहशालेय उपक्रम आणि अध्यापन प्रक्रिया या महत्त्वाच्या ठरतात.

डॉ.न.म.जोशी यांच्या विपुल साहित्य संपदेतील बाल कुमार वाड्मय हा एक महत्त्वाचा असा भाग आहे की ज्यामध्ये नैतिक मूल्यांचाही समावेश व पुरक व प्रभावी असे संदर्भ आढळतात. अशावेळी बाल कुमार वाड्मयाची अध्यापनात संदर्भ साहित्य म्हणून उपयुक्तता अभ्यासली जाणे हे महत्त्वाचे आहे. बरेचदा बाल कुमार वाड्मय हे मनोरंजन व प्रबोधनाचे साहित्य न राहता ते एक संस्कार साहित्य म्हणूनही पुढे येते. शिक्षकाचे अध्यापनाचे कार्य एकांगी न राहता अध्यापनात संदर्भ साहित्य उपयोगात आणण्याच्या भूमिकेत बदल करणे सुध्दा अपरिहार्य आहे.

## ६.२ संशोधनाची गरज व महत्त्व ः

अध्ययन अध्यापन प्रक्रिया अर्थपूर्ण होण्यासाठी नैतिक मूल्यांच्या स्पष्टीकरणासाठी पाठयपुस्तकातील मुद्दे किंवा इतर संदर्भ साहित्य कमी पडू शकते. अशावेळी शिक्षकाला नैतिक मूल्ये रूजविण्यासाठी स्पष्टीकरण करण्यासाठी विविध कथा या आवश्यक असतात. हे स्पष्टीकरण देण्यासाठी पूरक संदर्भ साहित्याची आवश्यकता असते. शिक्षकाचा पिंड असलेले डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयात असे अध्यापनासाठी पूरक संदर्भ मिळतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये अपेक्षित मूल्यशिक्षण यांचे संदर्भ डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयात पदोपदी आढळतात. म्हणून डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय जर शैक्षणिक दृष्टीकोनातून अभ्यासले तर त्यातून शैक्षणिक नवनीत निघू शकते. असे संशोधकाला वाटते. डॉ.न.म.जोशी यांच्या सारख्या शिक्षण क्षेत्रातील अधिकारप्राप्त व्यक्तीच्या बाल कुमार वाङ्मयातील शैक्षणिक विचारांचे संशोधन करण्याची गरज संशोधकाला वाटली.

मूल्यांचा -हास ही समाजाची ज्वलंत समस्या आहे. मूल्यांचे अधःपतन होत असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमामधून सातत्याने येत आहे. डॉ.न.म.जोशी यांच्या संस्कारक्षम वाङ्मयातील मूल्यांच्या आधारे आत्मपरीक्षण केल्यास विद्यार्थी आणि शिक्षक यांना नक्कीच फायदा होईल. त्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

या संशोधनामुळे शिक्षकांना व शिक्षणप्रेमींना डॉ.न.म.जोशी यांच्या आत्मचरित्राकडे आणि त्यांच्या बालकुमार वाङ्मयाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी मिळेल जी शिक्षण प्रकियेला पोषक ठरेल. डॉ.न.म.जोशी यांच्या रूपाने शिक्षकांना सतत प्रेरणा देणारा साहित्यिक शिक्षक यांचे बाल कुमार वांङ्मयातील शैक्षणिक विचार अभ्यासणे हे आवश्यक असल्याने या शैक्षणिक संशोधनाचे महत्त्व आहे.

आज शालेय स्तरावर मूल्य संवर्धनाचे संस्कार आवश्यक आहेत आणि हे मूल्य संवर्धनाचे संस्कार संस्कारक्षम साहित्यातून दर्जेदार लिखाणातून शक्य आहे. मुलांनी असे संस्कारक्षम साहित्य वाचले तर मूल्य संवर्धन शक्य आहे. तसेच शिक्षकांना सुद्धा आपला घटक उपघटक अधिक परिणामकारकपणे शिकविण्यासाठी डॉ.न.म.जोशी यांचे वाङ्मय संदर्भ म्हणून उपयुक्त ठरू शकते. म्हणून डॉ.न.म.जोशी यांच्या वाङ्मयावरील प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

## ६.३ डॉ.न.म.जोशी यांचा जीवन परिचय ः

शिक्षण क्षेत्रातील एक शिक्षक, साहित्यिक आणि शिक्षणतज्ञ म्हणून ज्यांची आज मान्यता आहे असे डॉ.न.म.जोशी यांचा जन्म दि.११ जानेवारी १९३६ रोजी पुणे येथे झाला. त्यांचे कुटुंब मूळचे पाटण तालुक्यातील गारवडे या गावचे. गारवडे जळगांव व पुणे या ठिकाणी त्यांचे शालेय शिक्षण झाले. शिक्षक होण्यासाठी एस.टी.सी., सी.पी.एड., बी.एड्., एम.एड्. इत्यादी कोर्सेस त्यांनी ठिकठिकाणी केले. त्यांनी विविध शाळांमधून शिक्षक म्हणून सेवा केली तर पुण्याच्या टिळक शिक्षण महाविद्यालयात प्राध्यापक म्हणूनही काम केले.

## ६.४ डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मयातील योगदान ः

साहित्यिक म्हणून डॉ.न.म.जोशी यांनी लेखन केले. कथा, बालकविता, बडबडगीते, कादंबरी, नाटिका, स्त्री पात्र विरहीत एकांकिका, बोधकथा, चरित्र, चरित्रकथा, भाषांतरित ग्रंथ इत्यादी वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले. डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मयातील योगदान मोलाचे आहे. मुलांची संस्कारक्षम वयातील गरज आवड आणि स्वभाव वैशिष्टे विचारात घेऊनच त्यांनी बाल कुमार वाङ्मयाची निर्मिती सातत्याने केलेली दिसते.

पुणे (महाराष्ट्र) येथील १७ व्या अखिल भारतीय मराठी बाल कुमार साहित्य संमेलनाचे डॉ.न.म.जोशी अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्य कारीणीवरही त्यांनी काम केले आहे. याशिवाय साहित्य चळवळीतील अनेक संस्थांवर ते सक्रीय काम करीत आहेत.

डॉ.न.म.जोशी यांनी बाल कुमार वाचकांसाठी दै.लोकमत दै.सकाळ दै.लोकसत्ता इत्यादी वृत्तपत्रातून सातत्याने स्तंभलेखनही केले आहे. या बद्दल त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन झाले आहे. डॉ.न.म.जोशी यांना शासन व विविध संस्था यांनी त्यांच्या साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल अनेक पुरस्कारांनी गौरवान्वित केले आहे. इतकेच नव्हे तर पुणे विद्यापीठात 'डॉ.न.म.जोशी : व्यक्ति आणि वाङ्मय' या विषयात पीएच.डी. पदवीसाठी २००६ मध्ये प्रबंध सुध्दा सादर केला असून तो मान्यही करण्यात आला आहे.

## ६.५ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ :

आजचा भारतीय समाज कसा आहे व २१ व्या शतकातील भारतीय समाज कसा असावा या दोन्ही गोष्टी विचारात घेऊन तज्ज्ञांच्या व लोकप्रतिनिधींच्या प्रतिक्रिया आजमावून मे १९८६ मध्ये 'राष्ट्रीय धोरण १९८६' जाहीर करण्यात आले.

२१ व्या शतकातील आपल्या पुढे एकात्म, सर्वधर्मसमभावी, लोकशाही व समाजवादी अशा भारतीय समाजाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी अनुरूप असे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ आहे. या धोरणाची जी प्रमुख वैशिष्टये आहेत त्यात १० गाभा घटक व १० मूल्ये हे सर्वा त महत्त्वाचे आहे. हे विद्यार्थ्यापर्यंत पोहचवून अभ्यासक्रमाच्या माध्यमातून घेण्याचे ठरविण्यात आले.

इ.स. १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे पुनर्विलोकन करण्याचे कार्य राममूर्ती समिती १९९० व जनार्दन समिती १९९२ यांच्या कडून केले गेले. त्यानुसार 'सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२' सुचविण्यात आले.

शिक्षण ही आजची आणि उदयाची एकमेवद्वितीय अशी गुंतवणूक आहे. 'स्त्रिया, अपंग, अल्पसंख्यांक व प्रौढशिक्षण यांचा विचार, शारीरिक शिक्षेवर बंदी, ऑपेरशन ब्लॅक बोर्ड,

नवोदय विद्यालय, पदवी व नोकरी यांचा संबंध विच्छेदन, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था' ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ची नवीनता आहे.

## ६.६ मूल्य शिक्षण ः

आज मानवी मूल्यांचा समाजात -हास होत असल्याचे सर्वत्र दिसून येत आहे. त्यामुळे समाजस्वास्थ बिघडत आहे. यावर उपाय म्हणून शालेय स्तरावर नैतिक मूल्ये रूजविणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी देशातील विविध शिक्षण आयोगांनी व शैक्षणिक धोरणांनी नैतिक शिक्षणाची आवश्यकता वेळोवेळी स्पष्ट केली आहे. शिक्षणाच्या माध्यमातून आवश्यक ती मूल्ये जोपासली जाऊन ती विकसित होणे हाच शिक्षणाचा मूलभूत हेतू आहे. आजपर्यंत 'डॉ.राधाकृष्णन युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन १९४८, डॉ.मुदलियार सेकंडरी एज्युकेशन कमिशन १९५२, श्री प्रकाश समिती १९५९, संपूर्णानंद समिती १९६१, कोठारी आयोग १९६४, सिमला येथील चर्चासत्र १९८१, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ इत्यादी आयोग व धोरणांनी मूल्य शिक्षणाचा पुरस्कारच केला आहे.

महाराष्ट्र शासनाने शालेय स्तरावर निर्धरित केलेली १0 नैतिक मूल्ये पुढील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. संवेदनशीलता | २. नीटनेटकेपणा |
| ३. वक्तशीरपणा | ४. स्त्री पुरूष समानता |
| ५. श्रमप्रतिष्ठा | ६. वैज्ञानिक दृष्टिकोन |
| ७. राष्ट्रभक्ती | ८. राष्ट्रीय एकात्मता |
| ९. सौजन्यशीलता | १0. सर्वधर्मसहिष्णूता |

ही १0 मूल्ये रूजविण्यासाठी शासनाने मूल्यशिक्षणाची विविध माध्यमे सुचविली आहेत. त्यात प्रामुख्याने ः १. शालेय परिपाठ २. वर्ग अध्यापन ३. अभ्यासपुरक उपक्रम ४. शिक्षकांचे स्वतःचे आचरण यांचा समावेश आहे.

मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका ही महत्त्वपूर्ण ठरते. मुले ही शिक्षकांचे अनुकरण करतात. तेव्हा शिक्षकाच्या हातून मूल्यशिक्षणाचे अपेक्षित कार्य प्रभावीपणे घडले पाहिजे.

## ६.७ बाल कुमार वाङ्मय ः

बाल कुमार वाङ्मय म्हणजे बाल आणि कुमार वाङ्मय. दोन्ही प्रकारात फरक करणारी एक धुसर रेषा आहे. त्यामुळे या प्रकारांना वेगळे करणे जरा कठीणच बाल वाड्मय आणि कुमार वाड्मय यांची निर्मिती त्या त्या वयोगटातील मुलांची मानसिकता आणि मानसशास्त्र समोर ठेवून केलेली असते. या बाल कुमार वाङ्मयाला 'बाल कुमार साहित्य' असेही संबोधले जाते.

बाल कुमार वाङ्मयाचा अभ्यास आणि बाल कुमार वाड्मयाची निर्मिती अनेकांनी केली आहे. या संदर्भात अनेक विचारवंतांनी व साहित्यिकांनी आपआपली मेत प्रकट केली आहेत. त्यात प्रामुख्याने देविदास बागुल, मालतीबाई बेडेकर, गोपीनाथ तळवलकर, सोहनलाल द्विवेदी, राजाभाऊ मंगळवेढेकर, सानेगुरूजी, डॉ.इंदुमती अरकडी, डॉ. सुलभा शाह, यदुनाथ थत्ते, प्रा. देवबा शिवाजी पाटील, डॉ.न.म.जोशी, विश्वास वसेकर यांचा समावेश आहे.

## ६.८ संशोधन विषयाचे शीर्षक ः

" डॉ.न.म.जोशी यांच्या बोधकथांचा चिकित्सक अभ्यास"

## ६.९ संशोधनातील महत्त्वाच्या संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या ः

### १. डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय ः

"प्रस्तुत संशोधनासाठी डॉ.न.म.जोशी यांनी लिहिलेल्या वाङ्मयापैकी बोधकथा हा वाङ्मय कथा प्रकार एकूण २ पुस्तके म्हणजे डॉ.न.म.जोशी यांचे साहित्य होय.

### २. बाल कुमार साहित्य ः

"बाल (वर्ष ६ ते वर्ष १३) व कुमार (वर्ष १४ ते वर्ष १६) या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी लिहिलेले वाङ्मय म्हणजे बाल कुमार वाङ्मय."

## ६.१0 संशोधनाची उद्दिष्टे ः

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये अपेक्षित असलेल्या १0 नैतिक मूल्ये यांच्या आशयांच्या अंगाने डॉ.न.म.जोशी यांच्या बोधकथातील संदर्भाचा शोध घेणे.

२. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील १0 नैतिक मूल्ये यांचे अध्यापनाच्या दृष्टिकोनातून विश्लेषण करणे.

३. वर्तमान स्थितीत असलेल्या शालेय अभ्यासक्रमात डॉ.न.म.जोशी यांच्या बोधकथांचा अध्यापनाच्या संदर्भातील उपयुक्ततेचा शोध घेणे.

## ६.११ संशोधनाची गृहितके ः

१. डॉ.न.म.जोशी यांनी नैतिक मूल्ये केंद्रस्थानी ठेवून बोधकथांची निर्मिती केली आहे.

२. डॉ.न.म.जोशी यांच्या बोधकथेत १0 नैतिक मूल्ये यांचे स्पष्टीकरण करणारे संदर्भ आहेत.

३. आधुनिकीकरणामुळे मूल्यांचा -हास होत आहे.

४. मानवी जीवन आणि मूल्ये यांचा अतुट संबंध आहे.

## ६.१२ संशोधनाची व्याप्ती, परिमर्यादा व मर्यादा :

### अ. संशोधनाची व्याप्ती :

१. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील १० नैतिक मूल्ये यांचा शालेय अध्ययन, अध्यापनाच्या संदर्भातील उपयुक्ततेसंबंधी प्रस्तुत संशोधन आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे :

अ. विद्यार्थ्यांना अध्ययन करताना

ब. शिक्षकांना अध्यापन करताना व

क. पालकांना विद्यार्थ्यांचा अभ्यास घरी घेण्यासाठी उपयोगी आहे.

### ब. संशोधनाची परिमर्यादा :

१. डॉ.न.म.जोशी यांच्या बोधकथांमध्ये १० नैतिक मूल्ये यांच्या संदर्भात अभ्यास करण्यात आला आहे.

२. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील 'कथा' प्रकारातील बोधकथांच्या २ पुस्तकांचाच अभ्यास करण्यात आला आहे.

३. केवळ अध्यापनाच्याच दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधनाच्या उपयुक्ततेचा अभ्यास करण्यात आला आहे.

**क. संशोधनाची मर्यादा ः**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाच्या दृष्टिकोनातून विश्लेषण करण्यात आल्यामुळे संशोधनाला मर्यादा येऊ शकते.

## ६.१३ संबंधित साहित्याच्या आढाव्याचे महत्त्व व आवश्यकता ः

पुस्तके, ज्ञानकोश, वृत्तपत्रे, मासिके यातील लेख प्रकाशित प्रबंध आणि लघुप्रबंध यांचा उपयोग संशोधनकर्त्याला आपल्या संशोधनाच्या समस्येची निवड करण, उद्दिष्टे ठरविणे, संशोधनाची रूपरेषा तयार करणे इ. बाबींसाठी मार्गदर्शक ठरतात. त्यामुळे संशोधन कार्याला दिशाा व गती मिळते. अशा सर्व साहित्याला संबंधित संशोधन साहित्य म्हटले आहे.

संबंधित साहित्य आणि संदर्भ साहित्य यांचा मागोवा घेणे ही एक वेळ घेणारी प्रक्रिया असली तरी अत्यावश्यक आहे. म्हणून संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी जास्तीत जास्त साहित्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या साहित्याचे वर्गीकरण दोन प्रकारे केले आहे.

अ. संशोधन विषयाशी संबंधित साहित्य आणि

ब. संशोधन विषयाशी संबंधित पूर्व संशोधन (पीएच.डी.प्रबंध)

## ६.१४ संशोधन विषयाशी संबंधित साहित्य ः

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने अशा पुस्तकांचा, नियतकालिकांचा, हस्तपुस्तिकांचा, विशेषांकांचा आधार घेतला आहे की ज्यामध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६, शालेय स्तरावरील पाठ्यपुस्तके, नैतिक मूल्ये, बाल कुमार वाङ्मय, डॉ.न.म.जोशी यांच्या संदर्भातील विशेषांक, लेख समीक्षण, डॉ.न.म.जोशी यांच्यावर झालेले संशोधन प्रबंध इ. अभ्यास केला आहे.

## ६.१५ संशोधन विषयाशी संबंधित निवडक पूर्व संशोधने (प्रबंध) ः

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने संशोधन विषयाचा अभ्यास करण्यापूर्वी शिक्षणशास्त्र या विषयातील पीएच.डी. स्तरावरील संशोधन प्रबंध संदर्भ साहित्य म्हणून अभ्यासले. त्यातील निवडक संदर्भ पुढील प्रमाणे आहेत.

**१. भट्ट जे.एन. (१९७३)**

"A Study of the Educational Philosophy of Vinoba Bhave" (पीएच.डी.सरदार पटेल युनिव्हर्सिटी १९७३)

**२. अब्बासी ए.एन.एम.एस. (१९८०)**

"जवाहरलाल नेहरू यांचे शैक्षणिक विचार"

(पीएच.डी. गुजरात युनिव्हर्सिटी १९८०)

**३. Kadiyal R.A. (1980)**

"A Critical study of the contribution of Karmaveer Dr. Bhaurao Patil to the Educational Thoughts, Practices and Development of Education in the state of Maharashtra"

(पीएच.डी. शिवाजी युनिव्हर्सिटी १९८०)

**४. जैन के.सी. (१९८०)**

"A study of the Educational Philosophy of Lord Mahavir with relevance to modern India."

(पीएच.डी. शिवाजी युनिव्हर्सिटी १९८०)

५. **Chauhan B.P.S. (1981)**

"स्वामी दयानंद यांचे शैक्षणिक तत्वज्ञान"

(पीएच.डी. मेरठ युनिव्हर्सिटी १९८१)

६. **Gupta R.P. (1985)**

"A study of Educational thoughts of Swami Vivekanand"

(पीएच.डी. रोहिखंड युनिव्हर्सिटी १९८५)

७. **Pereira J.J. (1985)**

"Narayana Guru as a Social Educator" (पीएच.डी. केरळ युनिव्हर्सिटी १९८५)

८. **अभ्यंकर शंकर (१९८७)**

"A comprehensive in depth and critical analysis of Swami Vivekananads Educational thoughts and Philosophical foundations with special focus on value education in the context of nuclear and space age global value crisis and need of value education in India to day"

(पीएच.डी. पुणे युनिव्हर्सिटी १९८७)

९. **चौधरी प्रभाकर श्रावण (१९८९)**

"लोकमान्य टिळक यांचे शैक्षणिक विचार व कार्य"

(पीएच.डी. पुणे युनिव्हर्सिटी १९८९)

**१०. गोगटे व्ही.व्ही. (१९९१)**

"शिक्षणाच्या क्षेत्रातील समर्थ रामदासांच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास."

(पीएच.डी. शिवाजी युनिव्हर्सिटी १९९१)

**११. श्रीमती लोहकरे एस.एस. (१९९१)**

"जीवनातील मूल्यांच्या संदर्भात समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधाचे शैक्षणिक तत्वज्ञान." (पीएच.डी. नागपूर युनिव्हर्सिटी १९९१)

**१२. अग्रवाल कुसुम (१९९२)**

"रामतीर्थ यांचे शैक्षणिक तत्वज्ञान."

(पीएच.डी. आग्रा युनिव्हर्सिटी १९९२)

**१३. कु.देशमुख ज्योती बाबाराव (१९९९)**

"आचार्य विनोबाजी भावे यांच्या शैक्षणिक विचारांचा वर्तमान भारतीय शैक्षणिक प्रणालीच्या संदर्भात एक चिकित्सक अभ्यास."

(पीएच.डी. अमरावती युनिव्हर्सिटी १९९९)

**१४. निळकंठ रामदास फेगडे (२००२)**

"साने गुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यातून प्रकट झालेली मानवीमूल्ये व त्याद्वारे शिक्षणात संक्रमित होवू शकणारी मानवी मूल्ये ः एक चिकित्सक अभ्यास."

(पीएच.डी. अमरावती युनिव्हर्सिटी २००२)

**१५. पंडितराव वसुधा वासुदेव (२००३)**

“संत कबीरांच्या दोहयांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्याधिष्ठित अनौपचारिक शिक्षणाचा अभ्यास.”

(पीएच.डी. पुणे युनिव्हर्सिटी २००३)

**१६. प्रा.मगर दादासाहेब पांडुरंग (२००४)**

“संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील अनौपचारिक मूल्यक्षिणाचा अभ्यास.”

(पीएच.डी. पुणे युनिव्हर्सिटी २००४)

**१७. आबणे रामदास दशरथ (२००४)**

“लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यातील शिक्षण विचारांचा चिकित्सक अभ्यास.”

(पीएच.डी. पुणे युनिव्हर्सिटी २००४)

**१८. तनपूरे निलिमा (२००५)**

“राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात गुरूवर्य बाबूरावजी जगताप यांनी शालेय माध्यमिक स्तरावर केलेल्या कार्याचा अभ्यास.”

(पीएच.डी. पुणे युनिव्हर्सिटी २००५)

**१९. उगले सुहास प्रल्हादराव (२००६)**

“संत ज्ञानेश्वरांच्या ग्रंथातील शिक्षण व मूल्य विचारांचा चिकित्सक अभ्यास.”

(पीएच.डी. पुणे युनिव्हर्सिटी २००६)

**२०. प्रा. किसनराव कचरू जाधव (२००७)**

"महाराष्ट्र राज्याच्या उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल पाठयपुस्तकांचा समीक्षणात्मक अभ्यास."

(पीएच.डी. पुणे युनिव्हर्सिटी २००७)

**२१. भूषण वसंतराव कर्डिले (२००७)**

"ज्ञानकवी कुसुमाग्रजांच्या काव्यातील शिक्षण व मूल्य विचारांचा चिकित्सक अभ्यास."

(पीएच.डी. उत्तर महाराष्ट्र युनिव्हर्सिटी २००७)

**२२. कशीनाथ पुरूषोत्तम राणे (२००७)**

"मधुकरराव चौधरी यांचे शैक्षणिक विचार व कार्य."

(पीएच.डी. उत्तर महाराष्ट्र युनिव्हर्सिटी २००७)

## ६.१६ प्रस्तुत संदर्भ साहित्याचा संशोधनात झालेला उपयोग ः

संशोधनात्मक साहित्याच्या अध्ययनामुळे प्रस्तुत संशोधनात संशोधकास पुढील गोष्टींचा उपयोग झाला ः

१. संशोधनाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीची कल्पना आली.

२. संशोधनाच्या तयारीची दिशा मिळाली.

३. संशोधनाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीचे टप्पे निश्चित करता आले.

४. संशोधनात उद्भवू शकणा-या समस्यांची कल्पना आली.

५. संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण यांची मांडणी समजली.

६. प्रस्तुत संशोधनाची संशोधन पद्धती, संशोधन साधने ठरविता आली.

## ६.१७ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण ः

पूर्व संशोधनाचा अभ्यास करून त्या संशोधनाच्या आधारे जरी प्रस्तुत संशोधन केलेले असले तरी प्रस्तुत संशोधन पूर्व संशोधनापेक्षा पुढील बाबतीत वेगळे ठरते ः

**अ. संशोधन विषयाचे वेगळेपण ः**

यापूर्वी शिक्षक, शिक्षणतज्ञ व साहित्यिक असलेल्या एखादया व्यक्तीच्या बाल कुमार वाड्मयाचा शैक्षणिक अभ्यास कोणीही केल्याचे आढळले नाही. संशोधन विषयाचे हे वेगळेपण आहे.

**ब. संशोधन कार्यवाहीचे वेगळेपण ः**

आतापर्यंत एका साहित्यिकाच्या बाल कुमार वाड्मयातील पुस्तकाचे सोदयेश निरीक्षण करून एकूण ११0 बोधकथांतील १0 नैतिक मूल्यांच्या आशयांचे संकलन, वर्गिकरण आणि विश्लेषण, आशय विश्लेषण या तंत्राद्वारे कोणीही केल्याचे दिसत नाही. ते प्रस्तुत संशोधनात केले गेले आहे.

**क. संशोधन निष्कर्षाचे वेगळेपण ः**

संशोधन कार्यातून जे निष्कर्ष निघाले आहेत ते म्हणजे ः

१. डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाड्मयातील 'कथा' या प्रकारारील बोधकथांच्या पुस्तकांवर आधारित निष्कर्ष हे एखाद्या साहित्यिकाच्या चौफेर लेखनाशी संबंधित आहेत.

२. डॉ.न.म.जोशी या एका साहित्यिकाच्या वाड्मयातून १0 नैतिक मूल्यांशी संबंधित आशय अध्यापनासाठी शिक्षकांना एकत्र तयार झालेत.

३. शिक्षकांसाठी मूल्यांच्या स्पष्टीकरणासाठी संदर्भ साहित्य म्हणून सहज उपलब्ध झाली.

४. प्रचलित अभ्यासक्रमातील पाठयपुस्तकांमध्ये कोणते मूल्य यांच्या स्पष्टीकरणासाठी डॉ.न.म.जोशी यांचे कोणेत पुस्तक व कोणता आशय अध्यापनात उपयुक्त आहे याबद्दलची माहिती उपलब्ध झाली.

या सर्व प्रस्तुत संशोधनाच्या उपलब्धी आहेत आणि हेच त्याचे वेगळेपण आहे असे संशोधकाला वाटते.

## ६.१८ संशोधन पद्धती ः

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे विचारात घेता प्रस्तुत संशोधन हे 'वाङ्मय विश्लेषण' (Literary Research) या प्रकाराचे संशोधन आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी 'वाङ्मय विश्लेषण पद्धती' (Analysis of Literature Method) वापरण्यात आली. या संशोधनाला पूरक आशय विश्लेषण पद्धतीचा सुद्धा संशोधन तंत्र म्हणून वापर संशोधकाने केला आहे.

## ६.१९ संशोधनाची साधने ः

प्रस्तुत संशोधनासाठी 'वाङ्मय विश्लेषण व सर्वेक्षण' ही संशोधन पध्दती वापरली आहे. त्यासाठी आवश्यक असलेली माहिती संकलनासाठी, वर्गीकरणासाठी व विश्लेषणासाठी आवश्यक असलेले तक्ते / कोष्टके व शिक्षकांची मतावली हे संशोधन साधन म्हणून उपयोगात आणले आहे. ही संशोधन साधने संशोधकाने स्वयंनिर्मित केली आहे. कोष्टकीकरणासाठी आशय विश्लेषण या संशोधन तंत्राचा उपयोग केला आहे.

## ६.२० माहिती संकलनासाठीचे संदर्भ / स्त्रोत ः

### १. प्राथमिक संदर्भ / स्त्रोत ः

डॉ.न.म.जोशी यांनी लिहिलेली आणि प्रसिध्द झालेली बाल कुमार वाङ्मयात येणारी एकूण २ पुस्तके हाच प्राथमिक संदर्भ / स्त्रोत म्हणून विचारात घेतला आहे.

### २. दुय्यम संदर्भ / स्त्रोत ः


१. डॉ.न.म.जोशी यांच्यावर लिहिलेले विविध लेख व नियतकालिके, गौरवपर विशेषांक, तसेच डॉ.न.म.जोशी यांच्या वाङ्मयावरील संशोधन व समीक्षण.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील १० गाभा घटक आणि महाराष्ट्र शासनाने शालेय स्तरावर निश्चित केलेली १० नैतिक मूल्ये यांच्याशी संबंधित माहिती हे दुय्यम संदर्भ / स्त्रोत म्हणून विचारात घेतले आहे.

३. इयत्ता ५ वी ते १२ वी ची मराठी विषयांची प्रचलित पाठयपुस्तके.

## ६.२१ प्रस्तुत संशोधनाची कार्यवाही ः

प्रस्तुत संशोधन कार्याची कार्यवाही दर्शविणारी प्रवाह आकृती पुढील प्रामाणे आहे.




## ६.२२ संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन ः

डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाचे वर्गीकरण करण्यात आले. ते म्हणजे बोधकथा या घटकांतील १0 नैतिक मूल्ये यांच्याशी संबंधित आशय शोधले त्याचे वर्गी करण संशोधकाने केले.

## ६.२३ माहिती वर्गीकरण करण्याची पद्धत ः

१. डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील 'बोधकथा' या वाङ्मय प्रकारातील १0 नैतिक मूल्यांचे आशय प्रत्येक कथेचे वाचन करून शोधण्यात आले. संबंधित आशय अवतरणात दर्शवून पुढे त्याचे विवेचनही करण्यात आले.

२. इयत्ता ५ वी व १२ वी च्या सर्व मराठी विषयांच्या पाठयपुस्तकांचे वाचन केले. त्यामध्ये आलेले नैतिक मूल्ये शोधून त्याच्या स्पष्टीकरणासाठी डॉ.न.म.जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय हे कसे उपयुक्त आहे हे शोधले.

## ६.२४ वर्गीकरण केलेल्या माहितीचे विश्लेषण व निष्कर्ष काढण्याची पध्दत

संशोधकाने वर्गीकरण केलेले माहितीचे संकलन कोष्टकांत केले. त्यामुळे विश्लेषण करतांना निष्कर्ष काढताना व सुटसुटीपणा आला. विश्लेषणाच्या आधारे संशोधनातील निष्कर्ष काढण्यात आले.

## ६.२५ संशोधनाचे निष्कर्ष ः

प्रस्तुत संशोधनात संशोधनाची काही उद्दिष्टे ठरविली होती. त्यानुसार संशोधकाने काही गृहितके स्वीकारली होती. या बाबींचा विचार करता संशोधनात काही मुख्य व वस्तुनिष्ठ निष्कर्ष निघाले आहेत.

कोणत्याही प्रकारच्या संशोधनात संशोधनाच्या निष्कर्षांना अतिशय महत्त्व असते. निष्कर्ष हे संपूर्ण संशोधनाचे सार असतात. संशोधनाची संपूर्ण प्रकिया विशिष्ट निष्कर्षाप्रत येण्यासाठीच राबविली जाते. तसेच संशोधनातील निष्कर्षाचा शिक्षण क्षेत्रात व दैनंदिन जीवनात उपयोग झाला तर ते नेहमीच स्वागतार्ह असते.

प्रस्तुत संशोधनासाठी डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील एकूण २ दोन पुस्तकांचा अभ्यास व १0 नैतिक मूल्ये यावर आधारित अनेक पुस्तके हस्तपुस्तिका आणि

शालेय स्तरावरील मराठी विषयांची पाठयपुस्तके या सर्वांचा एकत्रितपणे विचर करून संशोधकाने पुढील निष्कर्ष काढले आहेत.

मात्र डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील पुस्तकांची विविधता पाहता व नैतिक मूल्यांमधील समानता पाहता काही निष्कर्षांची पुनरावृत्ती आढळण्याची शक्यता आहे. प्रस्तुत निष्कर्ष हे उद्दिष्टांनुसार मांडले असून हे निष्कर्ष सर्व संशोधन अभ्यासाच्या पार्श्वभूमीवर एकात्म पद्धतीने मांडले आहे.

## ६.२६ उद्दिष्टानुसार निष्कर्ष ः

**उद्दिष्ट कमांक** १ ः

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये अपेक्षित असलेल्या १0 नैतिक मूल्ये यांच्या आशयांच्या अंगाने डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाड्मयातील संदर्भाचा शोध घेणे."

**निष्कर्ष** ः

१. डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाड्मयात 'संवेदनशीलता, श्रमप्रष्ठिा, राष्ट्रभक्ती व सौजन्यशीलता या मूल्यांच्या बाबतीत सर्वाधिक संदर्भ आढळतात.

२. डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाड्मयात १0 नैतिक मूल्यांच्या बाबतीय अनेक संदर्भ आहेत.

३. डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाड्मयात 'कथा' हा वाड्मय प्रकार १0 नैतिक मूल्ये स्पष्ट करण्यासाठी सर्वाधिक उपयुक्त आहे.

**उद्दिष्ट कमांक** २ ः

"डॉ.न.म.जोशी यांच्या बाल कुमार वाड्मयातील १0 नैतिक मूल्ये यांचे अध्यापनाच्या दृष्टिकोनातून विश्लेषण करणे."

**निष्कर्ष ः**

१.'संवेदनशीलता' या मूल्याच्या स्पष्टीकरणासाठी डॉ.न.म. जोशी यांची 'पाखरांची शाळा, मुलांच्या मूल्यकथा आणि पंतप्रधान लालबहादूर शात्री' या पुस्तकातील आशय हे संदर्भ साहित्य म्हणून अध्यापनात सर्वाधिक उपयुक्त आहेत.

२. 'नीटनेटकेपणा' या मूल्याच्या स्पष्टीकरणासाठी डॉ.न.म. जोशी यांचे 'पर्यावरण कथा व कथानम' या दोन कथासंग्रहातील आशय व संपूर्ण कथा संदर्भ साहित्य म्हणून अध्यापनासाठी सर्वाधिक उपयुक्ततेचे आहे.

३. 'वक्तशीरपणा' हे मूल्य स्पष्ट करण्यासाठी डॉ.न.म.जोशी यांचे 'मुलांच्या मूल्यकथा, पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, गोष्ट उंच वामनाची आणि मर्दानी झाशीवाली' या पुस्तकांमध्ये सर्वाधिक आशय आले आहेत.

४. 'स्त्री पुरूष समानता' या मूल्याच्या संदर्भात डॉ.न.म. जोशी यांच्या 'पर्यावरण कथा, भारत कथा, मुलांच्या मूल्यकथा, पाखरांची शाळा, म.धोंडो केशव कर्वे व तेजस्विनी (नाटिका)' पुस्तकांमध्ये अध्यापनासाठी आशय सर्वाधिक आहेत.

५. 'श्रमप्रतिष्ठा' या मूल्यांच्या संदर्भात डॉ.न.म. जोशी यांच्या सर्व ६ कथा संग्रहात सर्वाधिक आशय असून 'भगीरथ डॉ.भाभा, पंतप्रधान लालबहादूर शास्त्री आणि म.धोंडो केशव कर्वे' या चरित्रात्मक पुस्तकांत अध्यापनासाठी सर्वाधिक आशय आहेत.

६. 'वैज्ञानिक दृष्टीकोन' हे मूल्य स्पष्ट करण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांच्या 'भारत कथा, मुलांच्या मूल्य कथा, पाखरांची शाळा, भगीरथ डॉ.भाभा' या पुस्तकांत अध्यापनासाठी सर्वाधिक आशय व कथा आढळतात.

७. 'राष्ट्रभक्ती' या मूल्याच्या संवर्धनासाठी डॉ.न.म. जोशी यांच्या 'चरित्रकथा, मुलांच्या मूल्य कथा, पंतप्रधान लालबहादूर शास्त्री' या पुस्तकांत अध्यापनासाठी सर्वाधिक आशय असून 'माशाल' ही संपूर्ण नाटिका 'राष्ट्रभक्ती' या मूल्याच्या संदर्भात आहे.

८. 'राष्ट्रीय एकात्मता' या मूल्याच्या बाबतीत डॉ.न.म. जोशी यांच्या 'भारत कथा, मुलांच्या मूल्य कथा' या कथा संग्रहात अध्यापनासाठी सर्वाधिक आशय आणि कथा आहेत.

९. 'सौजन्यशीलता' हे मूल्य रूजविण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांच्या 'पाखरांची शाळा, चरित्रकथा, पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, न्यायनिष्ठूर रामशास्त्री आणि मॅरेथॉन महादेव' या पुस्तकांमध्ये अध्यापनाच्या संदर्भात सर्वाधिक आशय आहेत.

१०. 'सर्वधर्मसहिष्णुता' या मूल्याच्या संदर्भात डॉ.न.म. जोशी यांच्या 'भारत कथा व चरित्रकथा' हे कथासंग्रह तसेच 'मौलाना अबुल कलाम आझाद व श्री बसवेश्वर' ही चरित्रात्मक पुस्तके यामधील आशय व कथा अध्यापनासाठी सर्वाधिक आढळतात.

**उद्दिष्ट क्रमांक ३ ः**

"वर्तनाम स्थितीत असलेल्या शालेय अभ्यासक्रमात डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाचा अध्यापनाच्या संदर्भातील उपयुक्ततेचा शोध घेणे."

**निष्कर्ष ः**

वरील उद्दिष्टानुसार संशोधनातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.( हे निष्कर्ष इयत्ता ५ वी ते १२ वी च्या पाठयपुस्तकांशी निगडीत आहेत. प्रस्तुत निष्कर्ष हे नमुना म्हणून असून अन्य इयत्तांच्या बाबतीत सुध्दा ते दिसून येतात.)

१. इयत्ता ६ वी च्या मराठी (बालभारती) मधील पाठ १ 'विचारधन' व पाठ २६ 'बिष्णोई', इयत्ता ८ वी च्या हिंदी विषयातील पाठ ५ 'पृथ्वी', इयत्ता ९ वी च्या हिंदी विषयातील

पाठ ११ 'जल की चोरी' व इयत्ता ९ वी च्या 'आपले पर्यावरण' या विषयातील प्रकरण ७ 'पर्यावरणीय मूल्ये आणि मानवी हक्क' या घटकांतील पाठातील 'पर्यावरण संरक्षण' हे मूल्य स्पष्ट करण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय उपयुक्त आहे.

२. इयत्ता ६ वी च्या हिंदी या विषयाच्या पाठ्यपुस्तकातील पाठ ४ 'झुठा डर', इयत्ता ८ वी च्या विज्ञान विषयातील 'प्रकाशाचे परावर्तन' हा घटक आणि इयत्ता ९ वी च्या इतिहास या विषयातील प्रकरण ८ 'भौगौलिक शोध' या घटकांमध्ये 'वैज्ञानिक मनोभावाची रूजवणूक' हे मूल्य स्पष्टकरण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय उपयुक्त आहे.

३. इयत्ता ६ वी च्या हिंदी या विषयाच्या पाठ्यपुस्तकातील पाठ ४ 'झुठा डर', इयत्ता ८ वी च्या विज्ञान विषयातील 'प्रकाशाचे परावर्तन' हा घटक आणि इयत्ता ९ वी च्या इतिहास या विषयातील प्रकरण ८ 'भौगौलिक शोध' या घटकांमध्ये आलेले 'वैज्ञानिक दृष्टिकोन' हे मूल्य रूजनिण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय उपयुक्त आहे.

४. इयत्ता ७ वी च्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकाच्या पाठ ९ 'कामाची यशस्विता' या पाठात आलेले 'नीटनेटकेपणा' हे मूल्य रूजविण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय उपयुक्त आहे.

५. इयत्ता ७ वी च्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठ २८ 'करूणेचे बीज', इयत्ता ९ वी च्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील युनिट १ 'Human Values' या घटकातील आलेले 'संवेदनशीलता' हे मूल्य रूजविण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय उपयुक्त आहे.

६. इयत्ता ८ वी च्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठ ३ 'घडयाळयाचे गुलाम' या पाठात आलेले 'वक्तशीरपणा' हे मूल्य रूजविण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय उपयुक्त आहे.

७. इयत्ता ९ वी च्या हिंदी लोकभारती या पाठयपुस्तकातील पाठ १ 'अनुभव' या कथेत आलेले 'राष्ट्रभक्ती' हे मूल्य रूजविण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय उपयुक्त आहे.

## ६.२७ चर्चा : पूर्व संशोधन व प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष यातील परस्पर संबंध :

प्रत्येक संशोधनात पूर्व संशोधनाचे महत्त्व लक्षात घेता प्रस्तुत प्रबंधासाठी ज्या पूर्व संशोधनाचा आढावा घेण्यात आला तो अत्यंत महत्वाचा ठरला. पूर्व संशोधनातील शीर्षक, उद्दिष्टे, संशोधन पध्दती, सांख्यिकी माहिती आणि तिचे विश्लेषण, निष्कर्ष गृहितके इत्यादी बाबी प्रस्तुत संशोधनात उपयुक्त ठरल्या.

पूर्व संशोधन आणि प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष यातील परस्पर संबंध काय आहे याची चर्चा याठीकाणी करण्यात आली आहे.

संबंधित सर्व पूर्व संशोधन निष्कर्ष व प्रस्तुत संशोधन निष्कर्ष यांचा परस्पर संबंध अभ्यासल्यानंतर असे लक्षात आले की पूर्व संशोधनातील निष्कर्ष हे एखादी थोर व्यक्ती, विचारवंत, तत्वज्ञ, धर्म संस्थापक, संत, समाज सुधारक, राजकारणी, संस्थाचालक, साहित्यिक यांचे जीवन पैलू, जीवन संदेश, तत्वज्ञान, संस्थात्मक कार्य, निर्माण केलेले साहित्य, शिक्षणाविषयक विचार इत्यादी विषयावर संशोधन करून काढलेले आहेत. तर प्रस्तुत संशोधन हे स्वतः शाळेत शिक्षक, पर्यवेक्षक, अध्यापक, महाविद्यालयात प्राध्यापक राहिलेले एक शिक्षण तज्ञ म्हणून मान्यता असलेले आणि सातत्याने बाल कुमारांसाठी संस्कार वाङ्मय निर्माण करणारे डॉ.न.म. जोशी यांच्या शिक्षण विचारावर आहे.

पूर्व संशोधनातील निष्कर्षापेक्षा प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष हे पुढील बाबतीत वेगळे आहेत. प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष हे डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील 'कथा, बोधकथा प्रकारातील पुस्तकावर आधारीत आहेत. तसेच प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील सर्व बोधकथा व १० नैतिक मूल्ये यांच्याशी संबंधित

आशयांना शोधून त्यांची उपयुक्तता शिक्षकांना त्यांच्या दैनंदिन अध्यापनात कोणत्या घटकातील कोणते मूल्य यांचे स्पष्टीकरण देताना डॉ.न.म. जोशी यांच्या पुस्तकतील कोणता आशय हा स्पष्टीकरणासाठी उपयुक्त आहे या संदर्भातील निष्कर्ष संशोधनाच्या आधारे मांडले आहेत.

## ६.२८ प्रस्तुत संशोधनाचे शिक्षण क्षेत्रातील योगदान ः

शिक्षणात नेहमी नवनवीन बदल होत असतात. शिक्षणाची रचना, नव विचार प्रवाह, नवीन अभ्यासक्रम, पुनर्रचित अभ्यासक्रम, उच्चीकृत अभ्यासक्रम, नवीन मूल्यमापन पध्दती, अध्यापनात नवनवीन प्रयोग इत्यादी सतत बदलत असतात. शिक्षणाच्या बदलासाठी पुनर्रविचारासाठी विविध प्रकारचे आयोग येत असतात, त्यांच्या शिफारशीनुसार शिक्षणात बदलही होत असतात. अशावेळी अध्ययन - अध्यापन प्रक्रियेत नवनवीन संशोधन होणे शिक्षण क्षेत्रात सुध्दा महत्वाचे असते.

प्रत्येक संशोधनाचे एक शैक्षणिक मूल्य असते. प्रस्तुत संशोधनाचेही निश्चित शैक्षणिक मूल्य आहे. रा.शै.धोरण १९८६ मध्ये सूचविण्यात आलेले आणि महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेली १0 नैतिक मूल्ये यांची पूर्तता होण्यासाठी डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयाची उपयोगिता आहे. प्रस्तुत संशोधनामुळे शिक्षकाला एखाद्या इयत्तेतील एखादा विषय शिकवितांना त्या घटकातील नैतिक मूल्य स्पष्ट करायचे असेल तर त्याला त्यासाठी आवश्यक संदर्भ इतरत्र शोधत बसण्याची गरज भासणार नाही. प्रस्तुत संशोधनात डॉ.न.म. जोशी यांचे बाल कुमार वाङ्मय अभ्यासले आहे. त्यामुळे शिक्षकाला या एका संशोधनाचा उपयोग सर्वच ठिकाणी सहज होऊ शकतो. या एकाच संशोधन प्रबंधात शिक्षकाला सर्व नैतिक मूल्यांचे आशय संदर्भ साहित्य म्हणून आपल्या अध्यापनासाठी उपलब्ध होऊ शकतात.

डॉ.न.म. जोशी हे स्वतः शिक्षक असल्याने आणि त्यांना बाल कुमारांच्या मानसशास्त्राची जाण असल्याने त्यांचे वाङ्मय आणि वाङ्मयावरील संशोधन हे शिक्षण प्रक्रियेत व

अध्यापनात अत्यंत उपयुक्त ठरते. त्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनाचे शिक्षण क्षेत्रात योगदान महत्वाचे ठरते.

एकाच लेखकाची कथा, चरित्रकथा, बोधकथा, मूल्य कथा, बालनाटय, नाटिका, चरित्र पुस्तिका, संस्कारमाला इत्यादी प्रकारची पुस्तके व ग्रंथसंपदा डॉ.न.म. जोशी या एकाच लेखकाच्या विविधांगी लेखनात किती शैक्षणिक मूल्ये आहेत हे दिसून येते आणि त्यांच्या साहित्यातील संदर्भ या प्रबंधात एकत्रित असल्याने शिक्षकाला अन्य लेखकांची पुस्तके, मार्गदर्शि का, हस्तपुस्तिका इत्यादी शोधण्यात आणि हाताळण्यात वेळ जाणार नाही. त्यामुळे एका अर्थाने शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापनकार्यात संदर्भ साहित्य शोधण्यासाठीचा वेळ या संशोधनाने वाचविला आहे, हे या संशोधनाचे शिक्षण क्षेत्रातील योगदान आहे.

## ६.२९ शिफारशी ः

१. शिक्षकांनी आपल्या दैनंदिन अध्यापनात पाठ नियोजन करतांना त्या घटकात आलेले मूल्य यांचा शोध घेऊन त्यांचे अध्यापनात स्पष्टीकरण देण्यासाठी पाठयपुस्तकांव्यतिरिक्त डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील आशयांचा आधार घेतला पाहिजे.

२. शिक्षकांनी मोकळया तासिकेला डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयातील ‘कथा’ या प्रकारातील कथांचे कथन वा सादरीकरण करावे.

३. मूल्य शिक्षणाच्या तासिकेत अध्ययन अनुभव देताना शिक्षकांनी डॉ.न.म.जोशी यांच्या ‘मुलांच्या मूल्यकथा’ या पुस्तकातील कथा क्रमशः सांगाव्यात.

४. ‘पर्यावरण शिक्षण’ या विषयाच्या तासिकेत डॉ.न.म. जोशी यांच्या ‘पर्या वरण कथा’ या पुस्तकातील योग्य त्या घटकाला अनुसरून संदर्भ म्हणून आपल्या अध्यापनात उपयोग करावा.

५. शिक्षकांनी एखाद्या तासिकेत आवश्यकतेनुसार नाटयीकरण या अध्यापन पद्धतीचा अवलंब केला असेल तर त्यामध्ये डॉ.न.म. जोशी यांच्या एखादया नाटिकेचा किंवा एकांकिकेचा आधार घ्यावा.

६. वर्गात एखादी व्यक्तीरेखा अध्यापनातून स्पष्ट करावयाची असेल तर डॉ.न.म. जोशी यांनी लिहिलेली चरित्रे किंवा चरित्र कथा यातील आशयांचा किंवा संवादाचा पाठाच्या आवश्यकतेनुसार उपयोग करावा.

## ६.३० पुढील संशोधनासाठी विषय ः

केवळ एका संशोधन कार्याने सर्व शैक्षणिक समस्या सुटत नाहीतच तर एक समस्या पूर्णपणे सोडविली जाते असे म्हणणे खरे तर धाडसाचे ठरते. जेव्हा एखादे संशोधन पूर्ण होते तेव्हा असे लक्षात येते की आपल्या संशोधनातून अजूनही अनेक प्रश्न पुढील संशोधनासाठी उपस्थित करता येऊ शकतात आणि संशोधन अहवालात त्यांच्या दिशा निर्देश केल्या तर पुढील संशोधकांना विषय सुचविता येतात मार्गदर्शन करता येते आणि दिशा दाखविता येते. प्रत्येक संशोधकाला विशिष्ट काळ आणि परिस्थिती यांची संदर्भ चौकट असते. बदलणे हा विश्वाचा मूलभूत गुणधर्म आहे. संशोधनामुळे जगातील ज्ञानात नेहमीच भर पडत असते आणि त्यातून भावी काळात संबंध आणि संदर्भ बदलू शकतात. हे तात्विक अधिष्ठान लक्षात घेऊन आपल्या संशोधनाच्या समाप्तीनंतर संशोधकाच्या मनामध्ये या क्षेत्राशी संबंधित आणि दुर्लक्षित क्षेत्राशी निगडीत असे काही प्रश्न निर्माण झाले. त्यांची भावी संशोधनाच्या दृष्टीने नोंद केलेली आहे.

मराठी साहित्य चळवळीत विशेषतः बाल कुमार वाङ्मयाच्या क्षेत्रात डॉ.न.म. जोशी यांचे महत्त्वाचे स्थान आहे. त्यांनी आजवर सातत्याने चौफेर लेखन केले आहे. आजही महराष्ट्रातील नामवंत वृत्तपत्रांमधून मूल्यकथा, बोधकथा, चरित्रकथा या सारख्या सुलभ वाङ्मय प्रकाराचे लेखन ते करीत असतात. त्यांच्या विविधांगी लेखनातून जे शिक्षण विचार मूल्य आणि

संस्कार यांचा परिपोष होत असतो त्यावर अधिक संशोधन होणे गरजेचे वाटल्यामुळे संशोधकाने संशोधनासाठी पुढील काही विषय सूचविले आहेत.

१. डॉ.न.म. जोशी यांच्या संपूर्ण साहित्यातून व्यक्त होणारी राष्ट्रभक्ती राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रभिमान यांचा चिकित्सक अभ्यास.

२. डॉ.न.म. जोशी यांच्या समग्र साहित्यातून व्यक्त होणारी वैश्विक अर्थात शाश्वत मूल्ये यांचा चिकित्सक अभ्यास.

३. डॉ.न.म. जोशी यांच्या बाल कुमार वाङ्मयात आढळणारी जीवनमूल्ये आणि त्यांच्या शालेय अभ्यासक्रमातील उपयुक्तता यांचा अभ्यास.

४. डॉ.न.म. जोशी यांच्या साहित्यावर आधारित मूल्याधिष्ठित उपक्रमाचे नियोजन आणि कार्यवाही यांचे साधन निर्मितीद्वारा संशोधन.

५. आजच्या माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षणामध्ये समाविष्ट असलेले मूल्यशिक्षण आणि डॉ.न.म. जोशी यांच्या साहित्यातून व्यक्त झालेला मूल्य विचार यांचा तौलनिक अभ्यास.

## ६.३१ उपसंहार ः

कोणत्याही क्षेत्रातील संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. तसेच कोणत्याही क्षेत्रात कितीही संशोधन केले तर ते अपुरेच आहे. शिक्षण क्षेत्रात तर नवनवीन आणि सातत्याने चालणा-या संशोधनांची नितांत आवश्यकता आहे. मूळात मानवी समाज हा प्रगतीपथावर असणारा समाज आहे. त्यामुळे जे जे अद्ययावत आहे ते स्वीकारण्याची मानसिकता नवनवीन संशोधनातून किंवा प्रयोगातून निर्माण होऊ शकते.

जगाने विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने नेत्रदिपक प्रगती केली आहे. या प्रगतीशी समायोजन साधण्यासाठी शिक्षण क्षेत्रातही नवनवीन विचार प्रवाह येत आहेत यावयास हवेत.

परंतु या नवीन विचारप्रवाहांना विरोध न करता ते समजून घेणे त्यांचे परीक्षण करणे ते विविध कसोटयांवर पडताळून बघणे आणि त्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. यामुळेच शिक्षणक्षेत्र व शिक्षणशास्त्र समृद्ध होणार आहे. त्यासाठी प्रत्येकामध्ये संशोधनवृत्ती असणे गरजेचे आहे. शिक्षकांनी आपले अध्यापन प्रभावी होण्यासाठी पाठयपुस्तकांवर अवलंबून न राहता विविध लेखकांची पुस्तके आणि त्यामधील आशय संदर्भ साहित्य म्हणून अध्यापनात उपयोगात आणले पाहिजे नव्हे शिक्षकांचा तो स्थायी भाव झाला पाहिजे. मुलांमध्ये मूल्य रूजविणारी शिक्षकांसारखी व्यक्ती नाही याचे भान ठेवून आपल्या वागण्यात अध्यापनात योग्य तो बदल करणे गरजेचे आहे जेणे करून आपले विद्यार्थी भविष्यकालीन आव्हानांना सामोरे जाऊ शकतील.

*****

# संदर्भ ग्रंथ सूची ः

## मराठी ग्रंथ ः


१. आगलावे प्रदिप (२०००) **'संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे'** नागपूर ः विद्या प्रकाशन.

२. कुंडले म.बा. (१९८८) **'शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक मानसशास्त्र'** पुणे ः श्रीविद्या प्रकाशन.

३. खैरनार दिलीप (२००९) **'प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी'** पुणे ः डायमंड पब्लिकेशन.

४. घाटोळ रा.ना. (२००३) **'समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती'** नागपूर ः विद्या प्रकाशन.

५. घोरमोडे के.यु. आणि घोरमोडे कला (२००८) **'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे'** नागपूर ः विद्या प्रकाशन.

६. चौधरी प्रभाकर श्रावण (१९८४) **'शिक्षण समाज आणि शिक्षक'** पुणे ः नूतन प्रकाशन.

७. चौधरी मधुकरराव (१९७०) **'शिक्षण विचार'** मुंबई ः सिंधु प्रकाशन प्रा.लि.

८. डोंबरे विद्या (१९९६) **'नीतीमूल्ये व शिक्षण'** पुणे ः नूतन प्रकाशन.

९. दुनाखे, डॉ. अरविंद (१९९६) **'मराठी आशययुक्त अध्यापन'** पुणे ः नित्यनुतन प्रकाशन.

१०. पवार ना.ग. (१९९०) **'उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण तज्ञ'** पुणे ः नूतन प्रकाशन.

११. पिचड नलिनी आणि बरकले रामदास (२००८) **'मातृभाषा मराठीचे अध्यापन शास्त्री विश्लेषण'** नाशिक ः इनसाईट पब्लिकेशन्स.

१२. पंडित बन्सी बिहारी (१९९७) **'शिक्षणातील संशोधन (संकल्पनात्मक परिचय')** पुणे ः नूतन प्रकाशन.

१३. बागुल देवीदास (२००६) **'बाल वाङ्मय'** पुणे ः चिरंजीव प्रकाशन.

१४. बापट भा.गो. (१९८८) **'शैक्षणिक संशोधन'** पुणे ः नूतन प्रकाशन.

१५. भिंताडे वि.रा. (२००४) **'शैक्षणिक संशोधन पध्दती'** पुणे ः नूतन प्रकाशन.

१६. मुळे रा.का. आणि उमाठे वि.तु. (१९७७) **'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे'** नागपूर ः महाराष्ट्र विद्यार्थी ग्रंथ निर्मिती मंडळ.

१७. शाह सुलभा (२००१) **'मराठी वाङ्मय ः स्वरूप आणि अपेक्षा'** धुळे ः लीलावती प्रकाशन.

१८. सारडा शंकर (१९९३) **'दहा अध्यक्षीय भाषणे'** पुणे ः मराठी बाल कुमार साहित्य संमेलन प्रकाशन.

१९. संत दु.का. (१९८८) **'संशोधन पध्दती प्रकिया व अंतरंग'** पुणे ः पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन.

**<u>इंग्रजी ग्रंथ ः</u>**

1. Best J.W. & Khan J.V. (1977) **'Research in Education'** New Delhi : Prentice Hall of Inadia Private Limited.

2. Buch B.M. (1971-78) **'Second Survey Research'** New Delhi : NCERT.

3. Buch B.M. (1978-83) **'Third Survey Research'** New Delhi : NCERT.

4. Buch B.M. (1983-88) **'Fourth Survey Research Vol-I'** New Delhi : NCERT.

5. Buch B.M. (1988-92) **'Fifth Survey Research Vol-II'** New Delhi : NCERT.

6. Deshpande H.V. (2007) **'Research in Litrerture and Language'** Patan (Satara) : Sukhanda Saurabha Prakashan.

7. Sukhiya S.P. Methortra P.V. & Methortra R.N. (1966) **'Elements of Educational Research'** Bombay : Allied Publication Pvt. Ltd.

## विविध संस्था मंडळे व शासकीय विभाग इत्यादींची पुस्तके ः

१. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे १९९० 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६' ः गाभा घटक परिचय पुस्तिका.

२. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (२०१०) **'मराठी बालभारती इयत्ता सहावी'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००७ (तिसरे पुनर्मुद्रण २०१०).

३. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (२०१०) **'हिंदी सुलभभारी छठी कक्षा'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००७ (तिसरे पुनर्मुद्रण २०१०).

४. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (२००८) **'मराठी बालभारती इयत्ता सातवी'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००८.

५. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (२००९) **'मराठी बालभारती इयत्ता आठवी'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००९.

६. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (२००९) **'सामान्य विज्ञान इयत्ता आठवी'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००९.

७. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (२००९) **'आधुनिक भारताचा इतिहास इयत्ता आठवी'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००९.

८. महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (२०१०) **'हिंदी सुलभ भारती आठवी कक्षा'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००९ ( पहला पुनर्मुद्रण २०१०).

९. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे (२००२) **'माध्यमिक अध्यापक निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण अध्यापन पुस्तिका - १'** प्रथमावृत्ती २००२.

१०. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे (२००९) **'जगाची संस्कृती (इतिहास) इयत्ता नववी'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००६ (पुनर्मुद्रण नोव्हेंबर २००९).

११. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे (२००९) **'नागरिकशास्त्र इयत्ता नववी'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००६ (पुनर्मुद्रण २००९).

१२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे (२०१०) **'हिंदी लोकभारती ः नौवी कक्षा (द्वितीय भाषा ः पूर्ण) प्रथम संस्करण'** २००६ (पुनर्मुद्रण २०१०).

१३. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे (२०१०) **'आपले पर्यावरण ः इयत्ता नववी'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००५ (पुनर्मुद्रण २०१०).

१४. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे (२०१०) **'English Reder A Course Book Ina English Standard IX (Third Language)'** (पाठयपुस्तक) प्रथमावृत्ती २००६ (पुनर्मुद्रण २०१०).

१५. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे (२००३) **'माध्यमिक शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम इयत्ता ५ वी ते ७ वी हस्तपुस्तिका'** प्रथमावृत्ती २००३.

१६. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण पुणे (१९९६) **'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ः शैक्षणिक अव्हानाकडून कृति कार्यकमाकडे (पुस्तिका)'** प्रथमावृत्ती १९९६

१७. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मूक्त विद्यपीठ नाशिक (१९९0) **'शिक्षणातील नवे विचार प्रवाह'** (सेवांतर्गत अध्यापक प्रशिक्षण पुस्तक क.३) प्रथमावृत्ती १९९0.

## <u>नियतकालिके / विशेषांक ः</u>

१. सौ. भागदरे ज्योती **'अष्टपैलू व्यक्ति ः न.म. जोशी'** मासिक ः 'एकता' (डॉ.न.म. जोशी गौरव विशेषांक) वर्ष ५६ वे, अंक ५ वा ऑक्टोबर २00३ संपादक ः श्री. विद्याधर ताठे प्रकाशन स्थान ः १३६0 शुकवार पेठ पुणे २.

२. बेलसरे र.रा. (सेवानिवृत्त अध्यापक नु.म.वि. कनिष्ठ महाविद्यालय पुणे) **'न.म. जोशी एक संस्था'** लेख ः

३. सौ. कोल्हटकर विद्या प्रदीप (ज्योतिष विशारद) **'संघर्षाकडून सन्मानाकडे'** लेख ः

४. शेलार बजरंग **'गावाकडचा लेखक ः न.म. जोशी'** लेख ः

५. टोळ दत्ता **'आनंद यात्री साहित्यिक शिक्षक ः डॉ.न.म. जोशी'**

उपनिर्दिष्ट ः

६. कुळकर्णी विनायक (संपादक) **'प्रबोधनाचा नंदादीप ः नम'** मासिक 'ज्ञानकुंभ शैक्षणिक वार्ता पत्र' वर्ष १0 वे अंक १२९ फेब्रुवारी २00६ प्रकाशन स्थान ः १३१८ कसबा पेठ पुणे ११.

७. नांदूरकर योगेश मो. (संपादक) **'कथानम' (पुस्तक परिचय)** मासिक ः साहित्य सूची वर्ष २९ वे अंक ः तिसरा एप्रिल २00८ प्रकाशन स्थान  साहित्य सूची पर्वती  पुणे ९

## वृत्तपत्रातील लेख

१. देशपांडे सुचिता २००९ मार्च २८ **'बाल साहित्याचा मागोवा'** (मराठी बाल साहित्य सृजन समीक्षा दायित्व आणि प्रसार) लेखक ः विश्वास वसेकर साकेत प्रकाशन औरंगाबाद या पुस्तकाचे समीक्षण दै. लोकसत्ता नागपूर.

२. पाटील देवबा शिवाजी (२००७ जुन २८) **'बाल कुमार वाङ्मयाची उपयोगिता'** लेख दै. तरूण भारत नागपूर.

## संशोधने ः पीएच.डी. स्तरावरील प्रबंध

१. अग्रवाल कुसुम १९९२ 'रामतीर्थ यांचे शैक्षणिक तत्वज्ञान' आग्रा युनिव्हार्सिटी Buch M.B. Fifth Survey of Research 1988-92 Vol – II, New Delhi : NCERT.

२. अब्वास ए.एन. एम.एस. १९८० **'जवाहरलाल नेहरू यांचे शैक्षणिक विचार'** गुजरात युनिव्हर्सिटी Buch M.B. Third Survey of Research 1978-83 First Edition March 87 , New Delhi : NCERT.

३. अभ्यंकर शंकर १९८७ ः **'A comprehensive in depth and critical analysis of Swami Vivekanadnds educational thoughts and philosophical foundations with specila focus on value education in the contest of nuclear and space age, global value crisis and need for value education in Inadia today'** पुणे विद्यापीठ पुणे. Third Survey of Research 1978-83 First Edition March 87 , New Delhi : NCERT.

४. आवणे रा.द. २००४ **'लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यातील शिक्षण विचारांचा चिकित्सक अभ्यास'** पुणे विद्यापीठ पुणे ः जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ.

५. उगले सु.प्र. २००६ **‘संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथातील शिक्षण व मूल्य विचारांचा चिकित्सक अभ्यास’** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती ः अमरावती विद्यापीठ ग्रंथालय.

६. कर्डिले भू.व. २००७ **‘ज्ञानकवी कुसुमाग्रजांच्या काव्यातील शिक्षण व मूल्य विचारांचा चिकित्सक अभ्यास’** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव. जळगांव ः ग्रंथालय उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ.

७. काडीयाल आर.ए. १९८० ः **‘A Critical Sutdy of the contribution of karmaveer Dr. Bhaurao Patil to the Educational Thought practices and Development of Education in the state of Maharshtra.’** शिवाजी विद्यापीठ (१९७८- ८३) Third Survey of Research New Delhi : NCERT.

८. गरूड दि.मा. २००६ ‘डॉ.न.म. जोशी ः व्यक्ति आणि वाङ्मय’ पुणे विद्यापीठ पुणे येथे मराठी वाङ्मय या विषयातील पीएच.डी. प्रबंध.

९. गुप्ता आर.पी. १९८५ ः **‘A Study of Educational thoughts of Swami Vevekanand’** रोहिलखंड युनिव्हर्सिटी , Buch M.B. (1983-88) Fourth Survey of Research Vol-II First Edition Aug.1991 , New Delhi : NCERT.

१०. गोगटे व्ही.व्ही. १९९१ ‘शिक्षणाच्या क्षेत्रातील समर्थ रामदासांच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास’ शिवाजी विद्यापीठ Buch M.B. (1988-92) Fifth Survey of Research Vol – II, New Delhi : NCERT.

११. चव्हाण बी.पी.एस्. १९८१ **'Educational Philosphy of Swami Dayanand'** मेरठ विद्यापीठ Buch M.B. (1978-83) Third Survey of Research First Edition March 1987 , New Delhi : NCERT.

१२. चौधरी प्र.श्रा. १९८९ **'लोकमान्य टिळक यांचे शैक्षणिक विचार व कार्य '** पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालय पुणे.

१३. जाधव कि.क.२००७ **'महाराष्ट्र राज्याच्या उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल पाठयपुस्तकांचा समीक्षणात्मक अभ्यास'** पुणे विद्यापीठ ग्रंथालय ः शिक्षणाशास्त्र व विस्तार विभाग पुणे विद्यापीठ पुणे.

१४. जैन के.सी. १९८० **'A study of the Educational Philsosphy of Lord Mahavir with relevance to modern India'** शिवाजी विद्यापीठ Buch M.B. (1978-83) Third Survey of Research First Edition , New Delhi : NCERT.

१५. तनपुरे निलिमा २००५ **'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात गुरूवर्य बाबूरावजी जगताप यांनी शालेय माध्यमिक स्तरावर केलेल्या कार्याचा अभ्यास'** पुणे ः शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग ग्रंथालय.

१६. देशमुख ज्योती बाबाराव १९९९ **'आचार्य विनोबाजी भावे यांच्या शैक्षणिक विचारांचा वर्त मान भारतीय शैक्षणिक प्रणालीच्या संदर्भात एक चिकित्सक अभ्यास'** अमरावती विद्यापीठ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ग्रंथालय.

१७. पेरियर जे.जे. १९८५ '**Narayan Guru as a Social Educator'** Buch M.B. (1983-88) Fourth Survey of Research Vol-I , New Delhi : NCERT.

१८. पंडितराव वसुधा वासुदेव २००३ **'संत कबीरांच्या दोहयांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्याधिष्ठित अनौपचारिक शिक्षणाचा अभ्यास'** पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ.

१९. फेगडे नि.रा. २००२ **'सानेगुरूजींच्या आत्मचरित्रात्मक कादंब-यातून प्रकट झालेली मानवी मूल्ये व त्याद्वारे शिक्षणात संक्रमित होवू शकणारी मानवी मूल्ये : एक चिकित्सक अभ्यास'** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ग्रंथालय.

२०. भट्ट जे.एन. १९७३ **'A Study of the Education Philosophy of Vinobha Bhave'** सरदार पटेल युनिव्हर्सिटी Buch M.B. (1971-78) Second Survey of Research, New Delhi : NCERT

२१. मगर दा.पा. २००४ **'संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील अनौपचारिक मूल्य शिक्षणाचा अभ्यास'** पुणे विद्यापीठ पुणे : जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ .

२२. राणे का.पु. २००७ **'मधुकरराव चौधरी यांचे शैक्षणिक विचार व कार्य '** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय.

२३. लोहकरे एस.एस. १९९१ 'जीवन मूल्यांच्या संदर्भात समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधाचे शैक्षणिक तत्वज्ञान' राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ Buch M.B. (1988-92) Fifth Survey of Research Vol-II , New Delhi : NCERT

## <u>संशोधन : एम.फील. स्तरावरील प्रबंध</u>

१. बेरा मानसी २००७ 'Assertion of traditional yoga in human health & value education' पुणे विद्यापीठ शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग ग्रंथालय पुणे.

*****

# परिशिष्ट ः 'अ'

## डॉ.न.म. जोशी यांचे कार्य

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | ः | नरसिंह महादेव जोशी |
| पत्ता | ः | १०१३, सदाशिव पेठ, गंधाली अपार्टमेंट्स, नागनाथपार रस्ता, पुणे- ४११०३० |
| | | दुरध्वनी ः ०२० २४४७६८६८ |
| जन्मदिनांक | ः | ११ जानेवारी १९३६ |
| व्यवसाय | ः | प्राध्यपक टिळक, शिक्षण महाविद्यालय, पुणे- ४११०३० |
| शिक्षण | ः | एम.ए., एम.एड., पी.एच.डी., एस.टी.सी. , सी.पी.एड. |
| अनुभव | ः | २१ वर्षे शिक्षक, पर्यवेक्षक, नू.म.वि. प्रशाला पुणे व अन्य संस्था. |
| | | २० वर्षे शिक्षणशास्त्राचे प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय पुणे. |
| | | ४५ पुस्तके प्रसिद्ध ः कथा, कादंबरी, चरित्र, एकांकिका, बालसाहित्य, स्फुटवैचारिक लेख इ. |
| | | तरूण भारत पुणे या वृत्तपत्रात भ्रमंती आणि 'नमगोष्टी' या सदरांचे नियमित लेखन. तसेच सकाळ (बोधकथा), लोकमत (चरित्रकथा), लोकमत (मूल्यकथा) या सदरांचे लेखन. |
| संपादन | ः | 'अेकता' या मासिकाच्या अनेक विशेषकांचे संपादन, विशेषतः 'सिंधी समाज व संस्कृती', 'शाहिर' हे विशेषांक संपादित. |
| | | 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' या साहित्य परिषदेच्या पत्रिकेचे संपादन. |
| | | विविध संस्थांच्या अनेक स्मरणिकांचे संपादन. |
| | | 'चित्तपावन शाहिल्य गोत्री जोशी कुलवृत्तांत' या १४५६ पानांच्या विस्तृत ग्रंथाचे संपादन वा त्याला संशोधनात्मक प्रस्तावना. |

पुणे महानगरपालिकेचे पहिले मुख्याधिकारी व एक प्रयोगशील विचारवंत कै.शं.रा. भागवत यांच्या राजगड प्रयोगाविषयी स्मरणिकेचे संपादन.

शालेय व महाविद्यालयीन नियतकालीकांचे संपादन.

पुरस्कार ः महाराष्ट्र शासनाचा तीन वेळा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कार.

१९६५ 'बालसाहित्य', २००० 'पत्रकारांचा शिक्षण विचार'.

१९८७ 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र व कार्य'

अखिल भारतीय गोरसंरक्षक मंडळी, मुंबई या संस्थेच्या शताब्दीनिमित्त ' Cow milk better, next to mothers' या विषयावरील अ.भा.निबंधस्पर्धेत इंग्रजी भाषेतील निबंधमाला राष्ट्रपती डॉ.शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते पारितोषिक.

रोटरी क्लब पुणे तर्फे 'चैतन्यदिप पुरस्कार' २००६.

महाराष्ट्र शिक्षण परिषद पुणे तर्फे 'महाराष्ट्र शिक्षण रत्न पुरस्कार' २०१०.

स्नेहाजंली प्रकाशन पुणे तर्फे 'स्नेहाजंली पुरस्कार' २०१०.

राष्ट्रीय मानवाधिकार परिषद नवी दिल्ली, पुणे शाखा तर्फे 'राष्ट्रीय मानवाधिकार पुस्कार' २०१०.

गौरव ः पुणे महानगरपालिकेच्या वतीने १५ ऑगस्ट १९९० रोजी उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल

सिंधी साहित्यसभा, पुणे या संस्थेच्या वतीने 'एकात्मता कार्याबद्दल गौरव'.

सिटी हायस्कूल सांगली या संस्थेच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'नामवंत माजी विद्यार्थी म्हणून गौरव'.

'गदिमा प्रतिष्ठान' या संस्थेच्यावतीने कै.ग.दि.माडगूळकर स्मृतिदिनी गौरव, 'गदिमा एक शिक्षक' हे व्याख्यान.

व्याख्यान ः मुंबई विद्यापीठ बहिःशाल शिक्षण मंडळाच्यावतीने उरण, मुरबाड, कोसबाड, हिल,

डहाणू, राजापूर इत्यादी ठिकाणी व्याख्याने.

पुणे विद्यापीठ बहिःशाल शिक्षण मंडळाच्या वतीने धुळे, नाशिक, पुणे, नगर, जळगाव इत्यादी जिल्हयांमध्ये व्याख्याने.

विविध गावी वसंत व्याख्यानमाला, शारदीय व्याख्यानमाला यांमध्ये विविध विषयांवर एकूण महाराष्ट्रातील २०० गावी ५०० व्याख्याने .

बृहन्ममहाराष्ट्रातही ग्वाल्हेर, दिल्ली इत्यादी व्याख्याने .

प्रबोधन ः महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद या संस्थेच्या वतीने 'लोकसंख्या

शिक्षण' या विषयाच्या प्रबोधनवर्गासाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे खास प्रशिक्षण व व्याख्याने .

इंग्रजी व मराठी अध्यापन पध्दती विषयी अनेक कृतिसत्रांतून मार्गदर्शन .

आदिवासी शिक्षणसंस्था महाराष्ट्र शासन, पुणे या संस्थेच्या वतीने आश्रमशाळाच्या

मुख्याध्यापकांसाठी प्रशिक्षण वर्गाला मार्गदर्शन व व्याख्याने .

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अनेक शाळांमध्ये शिक्षकांसाठी मार्गदर्शक व्याख्याने .

विशेष अध्ययन ः आंग्लभाषा प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र शासन, पुणे यांचा चार महिन्यांचा इंग्रजी

अध्यापनाचा विशेष प्रशिक्षणक्रम पूर्ण .

सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ इंडियन लॅग्वेजेस म्हैसूर या केंद्रशासनाच्या संस्थेच्या वतीने सिंधी भाषेचे विशेष प्रशिक्षण पुर्ण .

विशेष अध्यापन ः महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या आंतरभारती भाषा वर्गाचे

संचालन आणि या वर्गात सिंधी भाषेचे अध्यापन .

पश्चिम विभागीय भाषा केंद्र, डेक्कन कॉलेज या ठिकाणी येणा-या अमेरिकन विद्यार्थ्यांना मराठी व्यवहार भाषेचे विशेष अध्यापन .

संस्थात्मक कार्य ः माजी कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद्र, पुणे .

माजी कोषाध्याक्ष, मराठी साहित्य महामंडळ, पुणे / मुंबई .

माजी कार्यवाह, पुणे जिल्हा मराठी पत्रकार .

आजीव सदस्य, मराठी नाटय परिषद मुंबई, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, बालकुमार साहित्य संमेलन पुणे, इंडियन ॲडल्ट एज्युकेशन असोसिएशन नवी दिल्ली, इन्स्टटयुट ऑफ गांधियन थॉट अलाहाबाद, इंग्लिश स्पीकींग युनियन ऑफ द कॉमनवेल्थ लंडन, विश्वस्त संस्थापक, महर्षी शांडिल्य प्रतिष्ठान पुणे.

आकाशवाणी : १९६0 पासून आकाशवाणी पुणे/ मुंबई केंद्रावरून अनेक कार्यक्रमात सहभाग, लेखन,

भाषणे, चर्चा, संचालन इत्यादी.

शैक्षणिक कार्यक्रम आणि हसतखेळत हिंदी हा राष्ट्रभाषा शिक्षणाचा विशेष कार्यक्रम प्रस्तुत - ३ वर्षे.

दूरदर्शन : दूरदर्शन चॅनल १ व २ वरून कार्यक्रम प्रसारित बालचित्रवाणी, महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था मध्ये सहशालेय उपक्रम.

आदिवासींचे शिक्षण, जिवंत शिक्षण, राष्ट्रीय एकात्मतेसाठी भाषाशिक्षण या विषयांवर मुलाखती प्रसारित.

विशेष नोंदी : जागतिक मराठी परिषद, पहिले अधिवेशन मुंबई, आंतरभारती कार्यक्रमात पु.ल.

देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवादात विशेष निमंत्रित.

केंद्रिय हिंदी संस्थान, भारत शासन यांच्या वतीने प्रतिवर्षी सर्व भारतीय भाषांतील निवडक साहित्य अनुवाद करून हिंदी 'वार्षिक' मध्ये संकलित मुद्रित केले जाते. १९७८ मधील उत्कृष्ट मराठी कथा म्हणून 'सत्कार' या कथेचा अंतर्भाव.

आजपर्यंत विद्यार्थ्यांसाठी कथाकथनाचे अनेक कार्यक्रम सादर.

'फत्तेवाडीचा झुंजार' हा एकपात्री प्रयोग सादर.

विविध संस्थांमधून एकांकिकांचे अनेक प्रयोग सादर.

शैक्षणिक संशोधन : "चिपळूणकर, टिळक, आगरकर, शि.म.परांजपे, अ.ब.कोल्हटकर,

न.चि.केळकर, वा.म.जोशी या पत्रकार, शिक्षक, लेखकांच्या लेखनात आलेल्या शिक्षणविचारांचा चिकित्सक अभ्यास" संशोशनासाठी पुणे विद्यापीठाची पी.एच.डी. पदवी.

पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र शाखेत पीएच.डी.व एम.फिल.साठी अधिकृत मार्गदर्शक.

सन्मान : १ ले कोयना साहित्य संमेलन पाटण (सातारा) याचे अध्यक्ष.

१७ वे अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलन निगडी, पुणे याचे अध्यक्ष.

*****

# परिशिष्ट ः 'ब'

## डॉ.न.म.जोशी यांची ग्रंथसंपदा

१. श्री बसवेश्वर ः चरित्र ः विदर्भ मराठवाडा बुक कं. , पुणे ः १९६२

२. डॉक्टर रोगी आणि यम ः एकांकिका ः त्रिदल प्रकाशन, मुंबई ः १९६३

३. हलकल्लोळ आणि इतर एकांकिका ः दा.ना.मोघे, कोल्हापूर ः १९६२

४. तीन एकांकिका ः सिटी बुक स्टॉल प्रकाशन, पुणे ः १९६४ ः राज्य पुरस्कार ः १९६५

५. पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री ः चरित्र ः सरोज साहित्य, पुणे ः १९६५

६. डॉ.शामाप्रसाद मुखर्जी ः चरित्र ः विदर्भ मराठवाडा बुक कं. , पुणे ः १९६५

७. भगीरथ डॉ. भाभा ः चरित्र ः सरोज साहित्य, पुणे ः १९६६

८. प्रेषित ः चरित्रात्मक कादंबरी ः म.गांधी दत्त प्रकाशन, पुणे ः १९७०

९. निःस्पृह ः चरित्रात्मक कादंबरी ः रामशास्त्री प्रभुणे संजय प्रकाशन, पुणे ः १९७०

१०. निष्प्रेम ः सामाजिक कादंबरी ः श्रीराम बुक एजन्सी, पुणे ः १९८२

११. जनरल अरूणकुमार वैद्य ः चरित्र ः श्रीराम बुक एजन्सी, पुणे ः १९८७

१२. जालियानवाला बाग ः यशवंत प्रकाशन, पुणे ः १९८५

१३. न्यायनिष्ठूर रामशास्त्री ः यशवंत प्रकाशन पुणे ः १९८५

१४. जगज्जेता सिकंदर ः यशवंत प्रकाशन, पुणे ः १९८०

१५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र व कार्य ः गजाजन बुक डेपो, पुणे ः १९८५ ः राज्यपुरस्कार

१६. दत्तक राजपुत्र ः बालनाटय ः अतुल बुक एजन्सी, पुणे ः १९९०

१७. हिंदुत्वातील कुटप्रश्न ः अनुवाद ः Riddles in Hinduism ः १९९० गजानन बुक, पुणे.

१८. कॉंग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांसाठी काय केले ः अनुवाद ः गजानन बुक १९९२

१९. कोण आणि काय ः दिलीपराज प्रकाशन, पुणे १९८0

२0. पर्यावरण कथा ः सुविधा प्रकाशन, पुणे ः १९९२

२१. भारत कथा ः सुविधा प्रकाशन, पुणे ः १९९६

२२. मूल्य कथा ः सुविधा प्रकाशन, पुणे ः १९९८ ः इंग्रजी अनुवाद

२३. पाखरांची शाळा ः सुविधा प्रकाशन, पुणे ः २000

२४. मौलाना अबुल कलम आझाद ः ज्ञानराज प्रकाशन, पुणे ः १९९३

२५. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन ःा ज्ञानराज प्रकाशन, पुणे ः १९९३

२६. पत्रकारांचा शिक्षणविचार ः सुविधा प्रकाशन, पुणे ः १९९८ ः राज्य पुरस्कार २00१

२७. महर्षी धोंडो केशव कर्वे ः चरित्र ः महाराष्ट्र राज्य साहित्य सत्र मंडळ ः २00३

२८. बिनखात्याचा मंत्रि ः एकांकिका ः जोशी ब्रदर्स, पुणे ः १९७७

२९. जगणारी माणंस ः एकांकिका ः त्रिदल प्रकाशन, मुंबई ः १९७0

३0. निश्चयाचा महामेरू ः एकांकिका ः अरगडे कुळकर्णी, पुणे ः १९६९

३१. फलेवाडीचा झुंजार ः बालकादंबरी ः अरगडे कुळकर्णी, पुणे ः १९६८

३२. चरित्रकथा ः पुष्पक प्रकाशन, पुणे ः २00३

३३. शालेय शब्दकोष (मराठी, इंग्रजी, हिंदी) संपादन, शिक्षण विकास प्रकाशन, पुणे ः २000

३४. गोष्ट उंच वामनाची (प्रा.वा.म. दबडघाव यांचे चरित्र) ः आम्ही नूमवीय प्रकाशन ः २00५

३५. The tale of a Tall woman (Biography) : आम्ही नूमवीय प्रकाशन ः २00५

३६. कर्मयोगी भैयासाहेब (प्रा. दबडघाव जीवनी) ः आम्ही नूमवीय प्रकाशन ः २00५

३७. मॅरेथॉन महादेव (श्री महादेव काशिनाथ गोखले यांचे चरित्र) ः सुविधा प्रकाशन, पुणे ः २00६

३८. कथानम ः अनुबंध प्रकाशन, पुणे ः २००७

३९. बखर एका सारस्वताची ः डॉ.न. म. जोशी यांचे आत्मचरित्र

*****

# परिशिष्ट ः 'क'

## मुल्यांची नावे

१. बंधुता ः मानवता
२. ऋतुवर्णन ः प्राकृतिक सौंदर्य
३. धैर्य, संघर्षपूर्ण जीवन
४. सहनशीलता
५. आत्मशक्तिचा विकास
६. उदात्तपणा, पर्यावरण संरक्षण
७. वास्तविकता
८. राष्ट्रभक्ति, सहाय्यता
९. निःस्वार्थपणा, सेवाभाव
१०. निरपेक्षता
११. राष्ट्रप्रेम
१२. मानवताधर्म, धैर्य
१३. मानवता, अहंकार
१४. विनम्रता, बंधुता
१५. त्याग, समर्पण
१६. एकात्मता, स्वाधीनता
१७. वास्तविकता, अंहिसा
१८. सर्वजनहीताय
१९. सौंदर्य, शाश्वतता
२०. प्रेम, परोपकार
२१. सज्जनता, भाषासन्मान
२२. आत्मपरिक्षण
२३. सर्वधर्म समभाव, सदाचार
२४. कर्तव्य, करूणा
२५. गुरूमहिमा, दूरदृष्टि
२६. मातृप्रेम
२७. स्वाभिमान, स्वत्वरक्षा
२८. कृतज्ञता, विनम्रता
२९. अपार कष्ट, त्याग
३०. स्वावलंबन, स्त्री-पुरूष समानता
३१. सांकृतिक, वारसा
३२. परंपरा, विकास
३३. धर्मनिरपेक्षता
३४. श्रमप्रतिष्ठा

३५. सर्वधर्म सहिष्णुता
३६. संवेदनशीलता
३७. सौजन्यशीलता
३८. बंधुत्वभावना
३९. वेळेचे नियोजन
४0. स्वच्छता
४१. विश्वकल्याण
४२. प्राकृतिक सौंदर्य
४३. आत्मविश्वास
४४. दुर्दम्य इच्छाशक्ति
४५. समाजसेवा
४६. स्व-प्रतिष्ठा
४७. समर्पित जविन
४८. विश्वास, कर्तव्य
४९. सत्यप्रियता
५0. संघर्ष
५१. सामाजिक अभिसरण
५२. भक्तिभावना
५३. आत्मसमर्पण
५४. सदाचार
५५. शालीनता
५६. ध्येयासक्ति

*****

# परिशिष्ट : 'ड'

# शिक्षकांची मतावली

१. या कथांमध्ये मूलात्मक आशय आहे असे आपणास वाटते का ☐

होय / नाही

२. यातील कोणकोणत्या कथांमध्ये आपल्याला कोणत्या मूल्यांसंबंधी आशय आढळतो ☐

(५ कथांची व मूल्यांची नावे द्या.)

३. या कथांचा मूल्यांच्या रूजवणुकीसाठी 'पुरक साहित्य' म्हणून किती प्रमाणात उपयोग होईल ☐

**श्रेणी :** अ. उत्कृष्ट ब. चांगला क. ठीक ड. मूळीच नाही.

| **अनु. क्र.** | **कथांची नावे** | **कथांमधून निष्पन्न होणारी मूल्ये** |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |
| ६. | | |
| ७. | | |
| ८. | | |
| ९. | | |
| १०. | | |

# परिशिष्ट ः 'इ'

## डॉ.न.म.जोशी यांना मिळालेले प्रमाणपत्र

# परिशिष्ट : ‘ ई ’

# शासनाचे परिपत्रक